म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

ाण्य

मार्ग

उर्फ

# मनाचे श्लोक

REFBK-0002562

ल. रा. पांगारकर
दक 'मुमुक्षु' पुणें

किंमत बारा आणे.

REFBK-0002562

REFBK-0002562

सार्थ व सभाष्य

# श्रीमनोबोध

अथवा

# मनाचे श्लोक.

मन अधोमुख-(तें) उफराटें । केलें पाहिजे ॥१७॥
सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें ।
मानत मानत घालावें । मूळाकडे ॥ १९ ॥
(दास०द०२०स.९)

कोण तुह्मांवीण मनाचा चालक ।
दुजें सांगा एक नारायणा ! ॥ १ ॥
—श्रीतुकाराम.

संपादक व प्रकाशक
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.
संपादक 'मुमुक्षु' पुणें.

किंमत बारा आणे

प्रकाशकः—लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए.
संपादक 'मुमुक्षु' पुणें.
मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ
४९५ जमखंडिकरांचा वाडा, पुणें.

मराठी ४३८०

# विषयानुक्रमणिका.


| विषय | श्लोक |
|---|---|
| १ मंगलाचरण | १ |

## २ विवेकवैराग्याचें उद्बोधन.

| | |
|---|---|
| १ हरिभक्ति व सदाचार ... | ... २-१० |
| २ वैराग्याचें उद्दीपन ... | ...११-२७ |

## ३ राघवाचा पंथ—सगुणभक्ति.

| | |
|---|---|
| १ नुपेक्षी कदा राम दासाभिमानी | ... २८-३७ |
| २ मना सज्जना राघवीं वस्ति कीजे | ... ३८-४६ |
| ३ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा | ... ४७-५६ |
| ४ निष्कामभक्ति व वादविरोधता | ... ५७-७६ |
| ५ प्रभाते मनीं राम चिंतीत जावा | ... ६७-७६ |
| ६ रामविश्वास ... ... | ... ७७-८० |
| ७ नामस्मरण . ... | ... ८१-१०२ |
| ८ क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे | ...१०३-१०५ |
| ९ तुटे वाद संवाद तो हीतकारी | ...१०६-११५ |
| १० नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी | ...११६-१२७ |
| ११ सत्संगांत रामभक्ति ... | ...११८-१३५ |

## ४ राघवाचा पंथ-निर्गुणबोध.


१ जुनें ठेवणें मीपणें आकळेना ...१३६-१४४

२ मना ! संत आनंत शोधूनि पाहे ...१४५-१५०

३ समाधान तें सज्जनाचेनि योगें ...१५१-१५५

४ मना सर्व जाणीव सांडून राहे ...१५६-१६२

५ सत्संगांत देहबुद्धि सोडून आत्म-
बुद्धि करावा ...१६३-१७४


## ५ सगुणनिर्गुणातीत शुद्धस्वरूप.


१ थोरला देव-केवल ब्रह्म ...१७५-१७९

२ भोंदु गुरू नकोत, सद्गुरु पाहिजे ...१८०-१८३

३ संग सोडून मुख्यदेवाला भजावें ...१८४-२०१


## १ उपसंहार.


१ साध्य होऊन साधन करावें ...२०२-२०४

२ फलश्रुति ... ... ...२०५

॥ श्रीराम समर्थ ॥

# श्रीमनोबोधाचें विवरण.

## प्रस्तावना.

१ श्रीसमर्थकृत ‘मनाचे श्लोक’ महाराष्ट्रांत आबालवृद्धांना चांगले माहीत आहेत. त्यांतलें चारदोनही श्लोक ज्याला पाठ येत नाहींत किंवा दहापांच चरण ज्याच्या मुखांत नाहींत असा मनुष्य साक्षर स्त्रीपुरुषांत तरी विरळच सांपडेल. आपल्या मनाशीं बोलायला व मनाशीं बोलतांना मनोवाचातीत अशा ‘राघवाचा पंथ’ शोधायला ह्या श्लोकांनीं लोकांना शिकविलें आहे. हे श्लोक २०५ च आहेत, पण हे बिनमोल मोत्याचे दाणे आहेत. ह्या पुण्य श्लोकांचा जो श्रवणमनननिदिध्यास ठेवील तो स्वयेंच पुण्यश्लोक होईल. समर्थांच्या प्रतीतीचे हे बोल आहेत. हे अतिशय साधे, सोपे व प्रासादिक आहेत. ह्यांचा प्रवाह अस्खलित आहे. ह्मणायला गोड, पाठ करायला सोपे, ऐकायला मधुर, मननाला सुखशांतिदायक असे हे श्लोक लोकप्रिय झाले आहेत यांत कांहीं नवल नाहीं. हे श्लोक सहज गुणगुणतां गुणगुणतां पाठकाला पूर्णबोधाच्या महानंदांत अचानक

नेऊन सोडतात. सूर्यबिंब दिसतें बचकेएवढें लहान पण प्रकाशानें त्रिभुवन व्यापून टाकतें; त्याप्रमाणें मनोबोध आकारानें आहे सान पण श्रुतिस्मृतिपुराणांचें सार त्यांत प्रगट झालें असल्यानें तो आत्मदान करण्यास पूर्ण समर्थ आहे. मराठीभाषेंतलें हें एक उपनिषदच आहे असें ह्मणायला हरकत नाहीं. आत्मनिष्ठ महापुरुषाचे हे स्वैरालाप असून यांत सारा श्रुत्यर्थ उमटला आहे. अर्जुनाच्या मिषानें देवांनीं जगाला गीतामृत पाजलें, तसें मनाचे निमित्त करून समर्थांनीं जनांला बोधसुधा पाजली आहे. कित्येक कवींनीं मनावर पद्यरचना केली आहे, पण समर्थकृत मनोबोधाची माधुरी कांहीं अपूर्व आहे. एखादा पंडित ठाकठिकीचे दोनशे काय पण दोनहजार सुद्धां श्लोक रचील, पण समर्थांच्या ह्या श्लोकांत ‘आधीं केलें मग सांगितलें’ अशा स्वानुभवाचा जो रंग भरला आहे, जो प्रसाद व सहजपणाचा आनंद उसळला आहे, उपासनेची ज्ञानाशीं मिठी पडल्याचा जो अनिर्वाच्य स्वसुखानुभव उमटला आहे, त्यामुळें ह्या श्लोकांना अवीटपणा आला आहे. अनुभवाची वाणी प्रासादिक असते ह्मणून त्यावर जनता भाळते.

२. रामदासी वाण्याचे लोक भिक्षेला बाहेर पडतात तेव्हां रस्त्यावरच प्रत्येक घरापाशीं क्षणभर उभे राहून

मनाचा एखादुसरा श्लोक ह्मणून व तितक्यांत येईल ती भिक्षा झोळीत घेऊन 'जयजय रघुवीर समर्थ' ह्या मंत्राचा घोष करीत संतोषानें पुढें जातात. तो रामदासी वाण्याचा फकीरी वेष व खड्या सुरांत गंभीर वाणीनें ह्मट-लेला तो श्लोक ऐकून नरनारी व वृद्धतरुण हातांतलीं कामें टाकून चटकन् घरांतून आंगणांत येतात व तत्काळ परम समा-धान पावतात. एक मूठभर तांदूळ किंवा एखादा पैसा घेऊन समर्थांची बिनमोल अमृतवाणी कानावर पडल्याबद्दल संसारी जीव त्या रामदासीयांचे उपकारच मानतात. हे श्लोक नव्हेत; नेहमी टवटवीत, ताजी, व परिमळानें दश-दिशा व्यापणारीं हीं दिव्य सुमनें आहेत. ही सुमनांची परडी नित्य सान्निध बाळगावी, हा सुमनांचा हार कंठांत घालावा, कोणतेंही फूल केव्हांहीं हुंगलें तरी परमानंदाचा लाभ होईल, चित्तावर चिल्लहरी खेळूं लागतील.

३. समर्थांनीं मनाचे श्लोक कोणत्या प्रसंगीं रचले यासं-संधाची आख्यायिका माझ्या ऐकण्यांत आहे ती अशीः— चाफळास समर्थांनीं श्रीरामनवमीचा उत्सव सुरू केला. यास कांहीं वर्षे होऊन गेलीं, प्रथम समर्थांचे शिष्य उत्सवासाठीं भिक्षा मागून आणीत व त्यावर उत्सवाचे दहा दिवस निभून जात. पुढें शिवाजीमहाराजांकडूनहा शिधासामग्री

येऊं लागली, यात्राही पुष्कळ जमूं लागली व यामुळें उत्स- वाचा उत्साह व व्याप वाढत चालला. एक साल शिवाजी-महाराजांकडून शिधासामग्री सालाबादप्रमाणें यावयाची ती वेळेवर आली नाहीं. दिवस थोडे म्हणजे पंधराच उरले, तेव्हां यंदांचा उत्सव कसा पार पडेल याची शिष्यांस चिंता पडली व त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. १४ दिवस राहिले, १३ राहिले. तेव्हां सायंकाळीं बरेच शिष्य समर्थांभोंवतीं गोळा झाले व 'महाराजांस समर्थांनीं पत्र लिहावें व शिधा-सामग्री मागवावी ' अशी त्यांनीं त्यांस विनंति केली. यावर समर्थांनीं शांतपणें हंसून उत्तर केलें; "रामराय समर्थ आहेत, त्यांचा उत्सव ते पार पाडून घेतील. माझ्या रामाच्या उत्सवासाठीं कोणा शिष्याकडे कांहीं मागायला नको. भिक्षेवर उत्सव होईल." तरी या उत्तरानें शिष्यांचें मोठेसें समाधान झालें नाहीं. त्यांनीं चिंतातुर होऊन आप-सांत मसलती चालविल्या. रोज यात्रा येणार; त्यांच्या फराळाची, जेवण्याखाण्याची आगाऊ तजवीज झाली पाहिजे. याची काळजी समर्थांना नव्हती, सारी काळजी शिष्यांना! बारा दिवस राहिले, संध्याकाळ झाली, रात्र पडली. समर्थ निश्चिंत व शिष्य चिंतातूर! मध्यरात्रीच्या सुमारास सम-र्थांनीं कल्याणस्वामीस कागदलेखणी व दौत घेऊन खोलींत

बोलावलें व मुखानें ' गणाधीश जो ईश ' येथपासून श्लोक बोलण्यास सुरुवात केली. समर्थांनीं श्लोक म्हणावा व तो कल्याणस्वामींनीं टिपून घ्यावा. याप्रमाणें एका प्रहरांत हे श्लोक सांगण्याचें व लिहिण्याचें काम संपलें ! कल्याण-स्वामींस कांहीं आज्ञा करून समर्थ वनांत गेले ते पाडव्याचें दिवशीं सूर्योदयानंतर प्रगट झाले. समर्थ गेल्यावर दुसरेच दिवशीं प्रभातीं कल्याणस्वामींनीं १०।१५ शिष्य बोलावून घेतले, त्यांजकडून मनाच्या श्लोकांच्या तितक्या प्रती करविल्या, त्यांना आसपासच्या गांवांतून पाठविलें व आज्ञा केली कीं " प्रत्येक घरापुढें उभे राहून एक श्लोक म्हणावा, ' जयजय रघुवीर समर्थ ' ही गर्जना करावी, व तितक्या वेळांत येईल ती भिक्षा झोळींत घ्यावी व दुसरें घर पहावे " समर्थांची वाणी, समर्थशिष्यांच्या मुखांतून प्रगट होत असलेली, लोकांनीं अत्यंत आवडीनें ऐकली. दहा दिवसांत गाड्यांच्या गाड्या भरून सामान सज्जन-गडावर आलें आणि उत्सव दरसालापेक्षांही मोठ्या थाटानें पार पडला ! समर्थांची जिवंत वाणी जिवंत माणसास वेड लावील यांत नवल काय-ती निजलेल्यांनाहीं जागे करणारी आहे !

३. पुणें शहरांत २५।३० वर्षांमागें एक रामदासी

पांहटेस चार वाजतां खडया व सुस्वर आवाजानें श्लोक ह्मणत रस्त्याने जात, व ते ऐकण्यासाठी लोक साखरझोंप मोडून खिडक्यांपाशीं लगबगीनें धांवत येत. पतिपत्नींना एकमेकांची ग्रंथी सोडवायला व स्तनाचें पोर दूर सारून खिडकीपाशीं ओढून न्यायला समर्थ अशी ही समर्थांची वाणी आहे. ती कानाचे द्वारीं मनांत शिरेल तर बहुत जन्मांची प्रपंचाची मिठी सुटेल. बाळ होऊन समर्थमाउलीच्या मुखांतून स्रवणारे हें अमृत जो प्राशन करील त्याला पुन्हां बाळ होऊन स्त्रीस्तन्य पिण्याचें कारणच उरणार नाहीं! असे हे मनाचे श्लोक अमृतरूप आहेत.

४, आत्मसुखार्थ त्याचें विवरण करण्याचें मनांत येऊन प्रस्तुतचा उद्योग केला आहे. पुढे ' श्लोकसंगति ' दिली आहे ती नीट पाहून मग श्लोक व त्यावरील विवरण पहावें. श्लोकांचा ओघ अस्खलित आहे व सर्व श्लोकांचा परस्पर अन्वय आहे, असें दिसून आल्यामुळें ही ' श्लोकसंगति ' दिली आहे. मनाच्या श्लोकांचें विवरण करितांना समर्थांचा जुना दासबोध, वीसदशकी मुख्य दासबोध, करुणाष्टकें, स्फुट प्रकरणें, स्फुट ओव्या, पंचीकरणयोग, मानपंचक, अभंग, पदें वगैरे सर्व ' कवितासमुद्राचें ' आलोडन करून त्यांनीं दिलेल्या दृष्टीनें श्लोक लावण्याचा प्रयत्न केला आहे.

दासबोधादि ग्रंथांचे सारसर्वस्व समर्थांनी ह्या मनोबोधांत आणलें असल्यामुळें जागोजाग दासबोधांतील व इतर ग्रंथांतीलही अवतरणें यथाप्रसंग दिलीं आहेत. गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, तुकोबांचे अभंग, तुलसीदासांचें रामायण ह्या ग्रंथांचेही कोठें कोठें आधार घेतले आहेत. ह्या पुस्तकांत श्लोकांचें विषयवारीनें वर्गीकरणही प्रथमच केलें आहे तें अनुक्रमाणिकेवरून पहावें. प्रत्यहीं एकेक विषयावरील श्लोक ह्मणून जावें व त्यांचें विवरण मनपूर्वक पहावें. असो. ह्या पुस्तकांत उत्तम असेल तें सर्व समर्थांचें, दोष असतील तर ते माझे. वाचकांनीं ही २०५ मोत्यांची माळ अखंड कंठांत ठेवावी व कृतार्थ होऊन जावे.

पुणें, मुमुक्षु कचेरी } श्रीसंतचरणरज
नागपंचमी शके १८४६ } **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**

# मनालाच बोध कां ?

१. आतां समर्थांनीं मनालाच कां बोध केला, मनाचें सामर्थ्य केवढें आहे व मनाचें स्वरूप काय आहे याचा प्रथम थोडासा विचार करूं.

२. प्राणिमात्रांकडून जे व्यापार होतात त्या सर्वांचें मूळ मन होय. मनाच्या योगानेंच इतर प्राण्यांपेक्षां मनुष्याला श्रेष्ठत्व आलें आहे. "मानव म्हणजे मन असलेला, मनन करणारा प्राणी तो मनुष्य." पशुपक्ष्यादिकांत मन हें इंद्रिय आहे कीं नाहीं व असलेंच तर तें मनुष्यापेक्षा किती खालच्या प्रतीचें आहे याचा पाश्चात्य मानसशास्त्रवेत्त्यांनीं विचार केला आहे. बाह्यविषयसंसर्गी मन व अंतर्व्यापारकर्तृ मन असे मनाचे त्यांनीं दोन प्रकार केले आहेत ! असो. आपण आपल्या विचारसरणीनेंच मनाचा विचार करूं. मन ह्म० मनन करणें, विचार करणें व मानव ह्म० मननशील प्राणी या दृष्टीनें पाहतां मनुष्याचें इतर प्राण्यांहून या मनामुळेंच श्रेष्ठत्व मानलें पाहिजे. इतर प्राण्यांस मन असलेंच तर तें मनुष्याइतकें परिणावस्थेस तरी आलेलें नाहीं. इतर प्राण्यांस मन नाहीं असें आपण कसें ह्मणावें ? ज्याच्या त्याच्या मानानें त्याला मन आहेच, पण मनुष्याला जें मन दिलें आहे तें साऱ्या विश्वाला गवसणी घालण्याइतकें समर्थ आहे. आहारनिद्राभयमैथुनादि इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्याच्याही

मागे लागले आहेत, पण मनुष्य आपल्या मनाचा उपयोग करील तर साक्षात् परमेश्वरच होईल व होतोही. मोठमोठे संतमहंत ह्या मनाला ओळखून त्याच्या द्वारेंच देव-पदाला पोंचले आहेत.

**सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयाऽऽत्मशक्त्या**
**वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् ।**
**तैस्तैरतुष्टहृदयः पुरुषं विधाय**
**ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः** (भागवत ११-९-२८)

भगवंतांनीं आपल्या दैवीशक्तीच्या योगानें वृक्ष, सरपटणारे प्राणी ( सरीसृप ) पशु , पक्षी, डांस, मत्स्य इ० असंख्य जीव नानारूपगुणांचे उत्पन्न केले; पण ते पाहून त्यांच्या चित्ताला समाधान झालें नाहीं. त्यांनीं नंतर हा मनुष्य प्राणी उत्पन्न केला तेव्हां मात्र परतून उगमाकडे ब्र० ब्रह्मरूपाकडे पाहण्याची याला बुद्धि आहे असें पाहून देवाला आनंद झाला ! जळचर, खेचर, भूचर अशा ८४ लक्ष प्राणिकोटींत मनुष्यप्राणि हा असा आहे कीं, जो शाश्वत निजरूपाला पावूं शकतो. ‘ मनुष्यदेहीचेनि ज्ञानें । सच्चिदानंद पदवी घेणें । एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दीधला ’ ( नाथभागवत ). मन, बुद्धि, विवेक, विचारशक्ति, ज्ञान हें मनुष्यांत अधिक आहे व यांमुळेंच

मनुष्यजन्माची थोरवी वर्णिली आहे. मनुष्यदेह ज्या अनेक तत्त्वांचा बनला आहे त्या सर्वांत सद्गति किंवा अधोगति देण्याला एक मनच समर्थ आहे. सुखदुःखाला कारण मन होय. मन ह्मणजेच संसार. बंध आणि मोक्ष मनामुळेंच.

**मनःकल्पित संसार जाण ।**
**मनें कल्पिलें जन्ममरण ।**
**संसारचक्रीं आवर्तन ।**
**मनास्तव जाण पुनः पुनः ॥** ( नाथ )

३ निर्गुणब्रह्म मनामुळेंच गुणपाशांत पडलें आहे व मनच त्याला स्वस्वरूपावर नेऊन ठेवतें. मनुष्याचें व्यापार पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें यांच्या योगानें होतात असें आपण पाहतों. हस्त, पाद वाचा, उपस्थ व गुद हीं कर्मेंद्रियें व कर्ण, त्वचा, चक्षु, जिव्हा व घ्राण हीं ज्ञानेंद्रियें. कर्मेंद्रियें अत्यंत जड आहेत, ज्ञानेंद्रियांचीं तीं किंकरें आहेत. पंचज्ञानेंद्रियें अनुक्रमें शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पंचविषयांकडे पूर्वसंस्कारबळानें व अध्यासामुळें आकर्षिलीं जातात; पण ज्ञानेंद्रियेंही स्वतंत्र नाहींत. त्यांचा एक प्रेरक स्वामी आहे. हीं ज्ञानेंद्रियें व ज्ञानेंद्रियांच्या देवता मनाच्या आधीन आहेत, पण हें मन मात्र त्यांच्या मुळींच आधीन नाहीं. मनाला अंतरिंद्रिय ह्मणतात. तें महाप्रतापी आहे, ह्मणून

मनाचा निग्रह हेंच सर्वोत्तम ज्ञान होय. " ज्ञानेंद्रियेंच केवळ नव्हत तर त्या इंद्रियांच्या देवताही मनाच्या आधीन असतात, मन मात्र दुसऱ्या कोणाच्याही तंत्रानें चालत नाहीं. मनोरूप देव सर्व देवांत अत्यंत बलिष्ठ आहे. अशा पराक्रमी मनाला जो कोणी लगाम घालील तो देवांचाही देव होय " ( श्रीभागवत ११–२३–४८ ). एखादा पराक्रमी शिकंदर सारें जग जिंकील, पण मनाला जिंकणें अत्यंत काठिण आहे, व ह्मणूनच बाहुबळानें जग जिंकणाऱ्या महावीरांपेक्षाही मनोनिग्रही साधूंचा साऱ्या जगांत अधिक मान असतो. रावणांसारखे कैक जगज्जेते आजवर झाले आहेत, पण विश्व मनोजेत्यालाच प्रिय व पूज्यतम मानीत आलें आहे. त्रिभुवनविजयी मनावर खोगीर घालून त्याला कह्यांत वागविणारे संतच खरे बहाद्दर होत. मनोजय दुर्घट आहे पण मनोजयाचें फळही अफाट आहे. संस्कृतभाषेनें मनाला नपुंसकलिंगी ठरविलें आहे पण त्यानें आपल्या पौरुषानें देवदानवमानवादि सारे जीव पादाक्रांत केले आहेत! संसारचक्राचें परिवर्तन करणारें मनच होय. मनच त्रिविध गुणवृत्ति उत्पन्न करिते व त्यापासून सात्विक, राजस व तामस अशीं त्रिविध कर्में घडतात व कर्मांमुळेंच जगाचें राहटगाडगें चाललें आहे. मन हें असें बलाढ्य आहे.

वाऱ्याची मोट बांधवेल पण या चंचळ, खोड्यांत पाडणाऱ्या व प्रतापी मनाचा निग्रह होणें दुर्घट असें धनुर्धर पार्थानें जें मनाचें वर्णन केलें आहे तें खोटें कोण ह्मणूं शकेल? तें खरेंच आहे, तथापि अशाही मनाला 'वैराग्य आणि अभ्यास' या दोन साधनांनीं कह्यांत ठेवतां येतें असें योगेश्वर कृष्णाचें त्यावर धीराचें उत्तर आहे. अभ्यास आणि वैराग्य या दोन शब्दांत सारा साधनमार्ग आला आहे. वैराग्य ह्म० मनाला विषयांपासून सोडवणें व अभ्यास ह्म० त्याला स्वस्वरूपानुसंधानाच्या खुंट्याला घट्ट बांधून टाकणें. गीतेंत भगवंतांनीं व योगशास्त्रांत पतंजलमुनींनीं वैराग्य व अभ्यास या दोन साधनांनीं मन जिंकण्यास सांगितलें आहे. मन जिंकणें ह्मणजे काय? तें आहे कोठें? आहे कसें? त्याला धुंडावें कसें? जिंकावें कसें? असें अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्याला साधुसंत काय उत्तर देतात तें पाहूं. मन ह्मणजे कल्पना. संकल्पविकल्पांच्या उतरंडी उतरणें व रचणें हें त्याचें काम आहे. उभारणी व संहारणी हा सारा मनाचा खेळ आहे. मन, बुद्धि, चित्त व अहंकार हीं कार्यपरत्वें मनालाच दिलेलीं चार नांवें आहेत. याला चित्तचतुष्टय ह्मणतात. कल्पनेच्या,: वृत्तीच्याच या चार कला आहेत. वृत्ति संकल्पविकल्प करिते तेव्हां तिला **मन**

ह्मणतात, एकाच संकल्पाचें चिंतन करिते तेव्हां तिला **चित्त** ह्मणतात, निश्चयारूढ झाली कीं तिला **बुद्धि** हें अभिधान मिळतें व संकल्पाचा अभिनिवेश घेते तेव्हां तिलाच **अहंकार** हें नांव मिळतें! वृत्ति, कल्पना, मन, जीव, संसार हीं एका कल्पनेचींच नांवें आहेत. समर्थांनीं एकदा निःसंगाचें रूप सांगतांना ( दास० द. ४ स. ४ ) ह्मटलें आहे कीं 'संगत्याग आणि निवेदन। विदेहस्थिति अलिप्तपण। सहजस्थिती उन्मनी विज्ञान। हे सप्तही एकरूपी', त्याप्रमाणेंच आपणांसही ह्मणतां येतें कीं माया, अविद्या, प्रकृति, अज्ञान, शून्य, महत्तत्व, संसार, कल्पना, मन, अहंकार, जीव इ० सर्व जगज्ज्योतीला प्रगट करणाऱ्या किंवा झांकणाऱ्या कल्पनेची उर्फ मनाची नांवें आहेत. आपलें निजस्वरूप ( जुनें ठेवणें ) आपलें आपल्यापाशीं सहजसिद्ध असून त्याची प्रतीति झाली नाहीं तोंवर त्याला आवरण झालेल्या कल्पनेच्या उर्फ मनाच्या निरसनार्थ यत्न करणें हाच परमार्थ. पण असें हें मन आहे तरी कोठें?

**हें मन कैसें केवढें। पाहों ह्मणों तरी न सांपडे।**
**येऱ्हवीं राहाटावया थोडें। त्रैलोक्य यया ॥४१४॥**
**तें विवेकातें भुलवी। संतोषासी चाड लावी।**
**बैसिजे तरी हिंडवी। दाही दिशा ॥ ४१५ ॥**

( ज्ञाने० अ० ६ )

४ मन हें कल्पनेचेंच दुसरें नांव आहे. या मनाच्या संगानें परमात्मवस्तूला जीवदशा प्राप्त झाली आहे; मन हें प्रकृतीचें मूळ, काम, अहंकार, इच्छा, आशा, भय, द्वेष इ० विकारांना वळ देणारें, इंद्रियांना विषयांच्या खाचेंत लोटून देणारें, बुद्धीचें दार झांकून टाकणारें, सर्व भ्रमांचें कोठार आहे, असें ज्ञानोबारायांनीं मनाचें वर्णन केलें आहे. (ज्ञाने० अ. १३ ओवी ११०–११५ ) मन हें वायुतत्वाचें असून रजोमय आहे व एकीकडे बुद्धि व एकीकडे इंद्रियें या दोघांच्या संधींत तें आहे असें त्यांनीं तेथेंच ह्मटलें आहे. इंद्रियांच्या पलीकडे मन, मनाच्या पलीकडे बुद्धि व बुद्धीच्या पलीकडे परमात्मवस्तु आहे असें श्रुतिमाउली सांगते ह्म० मनोबुद्धींचा पडदा दूर सारतां आला कीं परमात्मवस्तु सिद्धच आहे. मनोरूप कल्पनेचा पट फाटला कीं निर्विकल्प वस्तु आपली आहे, आपणच आहोंत. पण मन हें केवढें बलाढ्य, चंचल व दुर्दमनीय आहे हें आपण वर पाहिलेंच आहे. त्या मनाचा पट दूर करितां येतो काय ? जरूर येतो, तो पट दूर सारूनच संत निजरूपाला पावले आहेत. दुसरें असें कीं मन म्हणजे केवळ कांहीं सत्य वस्तु नव्हे, तेव्हां तिचा निरास करणें कठीण असलें तरी अशक्य नाहीं. मनाचा निरास करायचा कसा ? नाथांनीं या

प्रश्नाला सुंदर उत्तर दिलें आहे. ‘ जेंवि हिरेनि हिरा चिरिजे । तेंवि मनेंचि मन धरिजे ’ (नाथ भागवत अ० २३-६८५) मनानेंच मन मारायचें-जिंकायचें आहे. हिरा अत्यंत कठिण ह्मणून तो चिरायला तत्सम हिराच लागतो, त्याप्रमाणें वायुरूप मनाला मनानेंच जिंकलें पाहिजे. मन हें ओढाळ गुरूं आहे, जिकडे धांवेल तिकडे धांवेल. त्याला गोड बोलून, चुचकारून, न्यावें तिकडे तें जातें. हा मनाचा फार उत्तम गुण आहे. त्याच्या गुणानुरोधानेंच त्याला वळाविलें पाहिजे. एखाद्या घोड्यासारखें तें वाटेल तिकडे बेफाम धांवत सुटतें, पण त्याला चुचकारून, गोड बोलून, वळवावें तिकडे तें वळतेंहि ! हें वेडें मन ज्याचें चिंतन करितें तत्सम होतें. त्याला एकदोनदां नाटक दाखविलें कीं तें नाटकाचाच छंद घेऊन उठतें, बरें त्याला कीर्तनांत रंगविलें तरी त्याची ना नाहीं-तें कीर्तनाचाही छंद घेऊन उठतें. जें देखतें तेथेंच हें बिलगतें हा मनाचा धर्म लक्ष्यांत घेऊन त्याला विषयाची गोडी न चाखवितां विषयदोषदर्शन घडविलें तर तेंच मन विषयांचा कंटाळा करून आत्मारामीं रंगतें ! ज्ञानेश्वरमहाराजांनीं हा मनाचा गुण उत्तम प्रकारें वर्णिला आहे, मन चंचल खरें:—

**परी वैराग्याचेनि आधारें । जऱ्हीं लाविलें**

**अभ्यासाचिये मोहरे। तरी केतुलेनि एके अव· सरें। स्थिरावेल ॥ ४१९॥ कां जें यया मनाचें एक निकें। जें देखिलें गोडीचिया ठाया सोखे। म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जाइजे**

वैराग्याचा आधार घेऊन हें अभ्यासाच्या मार्गाला लावलें तर कांहीं काळानें ह्य० अभ्यास पचनीं पडेल तेव्हां हें स्थिर होईल. या मनाचें एक फार चांगलें आहे कीं याला ज्याची गोडी लागतें तेथेंच हें लगटते, म्हणून याला कौतुकानें स्वानुभवसुख चाखवीत जावें म्हणजे तें तेथेंच स्थिरावेल. नाथांनींही हेंच सांगितलें आहे.

**या मनाची एक उत्तम गती। जरीं स्वयें लागलें परमार्थी। तरी दासी करी चारी मुक्ती। दे बांधोनि हातीं परब्रह्म ॥ २३-६८७॥**

जें मन संसारचक्रांत पाडायला कारण होतें तेंच मन तेथून सोडवायलाही कारण होतें. बंधाला कारण मन व मोक्षालाही कारण मनच, यास्तव मनाला प्रसन्न करून घ्यावें. मनोरूपदेवता प्रसन्न झाली कीं मोक्ष सिद्ध आहे. म्हणून तुकोबाराय सांगतात:—

**मन करारे प्रसन्न। सर्व सिद्धींचें कारण। मोक्ष अथवा बंधन। सुखसमाधान इच्छा ते ॥ १॥**

आजवर जे जे पुरुष कृतार्थ झाले त्यांचा त्यांची 'मनें इच्छा पुरविली' आहे ह्मणून 'मन माउली सकळांची' हें उघड आहे. ह्मणून मनाला प्रसन्न करून घेणें अगत्याचें आहे. हें ज्याचें त्यानेंच दृढाभ्यासपूर्वक केलें पाहिजे.

**मन दिसतें मा धरावें। ज्याचें त्यानें आवरावें।**
**आवरून विवेकें भरावें। अर्थांतरीं॥**

(दास० १८-१०-१७)

मनाला कसें आवरावें व रामरूपीं भरावें हें शिकविण्या॰ साठीं मनाच्या श्लोकांची प्रवृत्ति झाली आहे. हे मनाचे श्लोक वाचावेत, त्यांचें निरूपण ऐकावें, मननानें अर्थांतरीं भरावें, सगुणनिर्गुणरूप रामरूपाच्या ठायीं समरसून जावें व मुक्तीचा सुखसोहळा भोगावा अशी श्रीसमर्थांची या श्लोकांच्या रूपानें सर्व जीवांस शिकवण आहे,

पुणें, मुमुक्षुकचेरी<br>नागपंचमी शके १८४६

श्रीसंतचरणरज<br>**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

संसारमाया ममता नसावी
नैराश्यता दुर्लभ ते असावी।
आनंदरूपीं भजनीं भरावें
निरूपणें मानस आवरावें ॥ १ ॥
कल्याणकारी भवशोकहारी
सत्संगती मानव मूढ तारी।
ग्रंथांतरीं अंतर· वीवरावें
निरूपणें मानस आवरावें ॥ २ ॥
नानापरी हें धरितां धरेना
कल्पीतसे तें सरतां सरेना।
द्रष्टेपणें आपणही नुरावें
निरूपणें मानस आवरावें ॥ ३ ॥
ब्रह्मादिकां मानस आवरेना
नानाउपायीं मरतां मरेना।
तें निर्गुणीं पांगुळतां मरावें
निरूपणें मानस आवरावें ॥ ४ ॥
जनीं मनावांचुनि सूख नाहीं
मनेंचि लाभे गुज सर्व कांहीं।
परंतु तें स्वाधिन हो! करावें
निरूपणें मानस आवरावें ॥ ५ ॥

# श्लोकसंगति.

१ मनाचे श्लोक एकंदर २०५ आहेत. त्यांत पहिला श्लोक मंगलाचरणरूप असून शेवटचे दोन श्लोक उपसंहाराचे आहेत. गणेशशारदांना वंदन करून राघवाचा ह्म० अनंताचा पंथ शोधण्याचा हेतु उपक्रमांत दर्शवून सर्व ग्रंथभर राघवाचा पंथ दाखविला आहे व उपसंहारांत ह्या ग्रंथाच्या श्रवणमननानें मंदाधिकारीही साधनायोग्य होऊन ज्ञानवैराग्यसाधनसंपन्न होतील व विश्वासतां मुक्तिपदही पावतील असें ह्मटलें आहे. मधल्या २०२ श्लोकांत अनंत व त्याचा पंथ म्हणजे साध्य व साधन यांचा विचार सांगितला आहे. श्लोक २ ते २७ भूमिका तयार करण्यासाठीं विवेकवैराग्याचें उद्बोधन करण्यांत खर्च झाले आहेत; पुढें राघवाचा पंथ सगुणोपासनेच्या द्वारें कसा आक्रमावा हें श्लोक २८ ते १३५ पर्यंत सांगितलें आहे; त्यापुढें निर्गुण बोधाचें दिग्दर्शन श्लोक १३६ ते १७४ पर्यंत केलें आहे; व शेवटीं सगुणनिर्गुणातीत अशा शुद्धस्वरूपाचें वर्णन १७५ ते २०२ पर्यंत केलें असून त्या पुढील दोन श्लोकांत आत्मसिद्धीनंतरही साधन केलें पाहिजे असें सांगून शेवटल्या श्लोकांत ग्रंथाची फलश्रुति दिली आहे. दाशरथि राम हें राघवाचें सगुण रूप, निर्गुण ब्रह्म हें त्याचें निर्गुणरूप, व शुद्ध केवलब्रह्म हेंही त्याचेंच स्वरूप म्हणून सर्व ग्रंथ-

भर राघवांच्या स्वरूपाचें व त्याला पावावयाच्या पंथाचें वर्णन आहे. पंथ म्हटलें कीं वाटेंत कांहीं खांचखळगे असायचेच, त्याच्या निवारणार्थ जागोजाग साधकांना इषारे दिले आहेत. उत्तम वैद्य नुसतें औषध देत नाहीं, औषधाबरोबर पथ्यही सांगतो. त्याप्रमाणें श्रीसमर्थांसारख्या भव वैद्यानें ह्या ग्रंथांत औषध देऊन पथ्यही सांगितलें आहे पथ्यांत अनेक गोष्टी संभाळायच्या असतात, कांहीं ग्राह्य असतात व कांहीं त्याज्य असतात. वैद्याला दोन्ही नीट सांगाव्या लागतात व समर्थांनीं निर्भीडपणानें तशा सांगितल्याही आहेत.

२ श्लोकांचे आणखी थोडेसें स्पष्टीकरण करितों. " मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें' असा प्रथमच बोध केला आहे. निंद्य काय वंद्य काय, यांचा संतांनीं निर्णय केलेला आहे, तो ध्यानीं धरावा व सदाचारानें चालावें. दुष्ट वासना, पापबुद्धि, अनीति, विषयसंगति, कामक्रोधादि विकार हें 'निंद्य' म्हणून सोडावें व श्रेष्ठ धारिष्ट, नम्र व मधुर वाणी, धर्माचरण, चंदनासारखा देह परकार्यार्थ झिजविण्याची बुद्धि, निःस्वार्थबुद्धि व मुख्यतः रामभक्ति हें 'वंद्य' याप्रमाणें सदाचार व हरिभक्ति यांचा प्रास्ताविक उपदेश ( श्लोक २ ते १० ) करून पुढील १७ श्लोकांत विवेकवैराग्याची

२१ ग्रं. क्र. १५८२

थोरवी वानिली आहे. प्रत्येकाला निरंतर सुख पाहिजे असतें, पण जगांत सर्वसुखी असा कोणी नाहीं; पूर्वसंचितानुसार सर्वांस आपापल्या वाट्यांचें सुखदुःख भोगावें लागतें; देहबुद्धीच्या पोटांत सुखदुःखशोकचिंता या विषयींच्या कल्पना उद्भवतात म्हणून विवेकानें देहाचें ममत्व सोडावें व विदेहीपणानें मुक्तिसुख भोगावें; ही मृत्युलोकची राहटी ध्यानांत आणून वैराग्याची जोड विवेकाला द्यावी; जन्ममृत्यु सर्वांच्याच मागें लागले आहेत, कोणाबद्दल शोक करूं नये, कसलीही चिंता करूं नये, जेव्हां जें प्राप्त होईल तें समाधानानें भोगून सारावें व जन्ममरणाच्या यातनांतून सुटण्यासाठीं रामाला भजावें व निर्भय व्हावें हा ह्या १७ श्लोकांचा (११–२७) तात्पर्यार्थ आहे.

३ येथून पुढें सगुणभक्तीनें रामाला कसें भजावें हें सांगतात. रामाचें पद निर्भय आहे, तूं रामाला शरण जा, तो परमसमर्थ आहे, कोदंडपाणी रामाला काळही भितो, भक्तरक्षणाचें रामाचें ब्रीद असून काळसत्तेला न जुमानतां त्यानें सारी अयोध्या वैकुंठास नेली, त्या समर्थांच्या सेवकाकडे वक्रदृष्टीनें पाहणारा विश्वांत कोणी नाहीं, रावणाच्या बंदींतून त्यानें देवांना सोडविलें, अहल्याशिळा उद्धरिली, बिभीषणहनुमंताला चिरंजीवपद दिलें, भक्तांचा योगक्षेम वाह-

ण्याची त्याची प्रतिज्ञा आहे, भावासरसा तो भक्तांना संकटीं तारतो, तात्पर्य 'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी' ह्मणून तूं परमसमर्थ व भक्तवत्सल रामाला शरण जा (२८–३७). मना! रामाचें एकेक चारित्र पहा कीं, थक्क होऊन जाशील. वेदशास्त्रपुराणें ज्याला वानतात त्याला आपलें चांचल्य देऊन त्याच्या पदीं निश्चळ हो, सर्वसुखागर अशा त्या दीनानाथाच्या स्वरूपीं रमून रहा, रामावांचून गोष्टी बोलूं नकोस, ऐकूं नकोस, राम नाहीं तेथें जाऊं नकोस, एक क्षण रामावांचून व्यर्थ दवडूं नकोस, (३८–४६). रामाला भजतात ते त्या सर्वोत्तमाचे दास त्रैलोक्यांत कसे धन्य होतात तें पहा. त्यांची राहणी किती सोज्वळ, त्यांची सुखावस्था किती रमणीय, त्यांची निर्भयता केवढी! रामभक्त मनीं व लोचनीं (आंतबाहेर) रामालाच पाहतात, त्यांचें ज्ञान अगाध व भक्ति सोज्वळ असतें, ते सगुणाचा प्रेमतंतु कधीं तोडीत नाहीत, साधनमार्ग सोडीत नाहींत, देवकार्यांत कायावाचामनानें झिजतात, अखंड रामनामघोष करितात, स्वधर्मानें चालतात, बोलण्यासारखें वागतात, ज्ञान स्वच्छ असून सगुणाला भजतात, निःसंशय व निर्विकार असतात, मदमत्सर स्वार्थादिकांचा विटाळ त्यांच्या मनाला होत नाहीं, प्राणिमात्राशीं मधुर वाणीनें बोलतात, एकांतात आत्माचिंतन

करितात व लोकांतांत उगमाच्या गोष्टी सांगून लोकांना रामाचे वेड लावतात, नानामतांच्या व कल्पनांच्या जाळ्यांत न सांपडतां तें आपली निष्ठा स्थिर ठेवतात, रामभक्तिसुखाशिवाय त्यांना कसलीच इच्छा नसते, ते दयाशीळ व शांत असतात—हे सर्वोत्तमाच्या दासांचे गुण आपल्या अंगीं असावेत असें तुला वाटते ना? मग त्यांना हे गुण रामाच्या उपासनेनें मिळालेले असतात ह्मणून मना! तूं रामाला भज (४७–५६). रामनामानें धन्य होऊन जा, उदासीनता (निःसंगता) हें सर्वांचें सार आहे, ह्मणून अंतरीं मोकळा होऊन कर्मज्ञानउपासनामार्गानें जा व विषयनिवृत्त होऊन निष्कामबुद्धीनें रामभजन कर. रामासाठींच रामाला भज. अनेक कल्पना व तर्क यांच्या नादीं लागलास तर कल्पकोटी तुला राम भेटणार नाहीं. रामापाशीं सर्व कांहीं आहे. रामाला कां कल्पतरु ह्मणूं कां कामधेनु ह्मणूं कां चिंतामणि ह्मणूं, ह्मणूं तरी काय? त्याच्या सेवेनें सर्वसत्ता हातीं येते. तर्क आणि वादविवाद यांच्या दंभांत सांपडूं नकोस. अनेक पंडित त्यामुळें वुडाले आहेत. निजध्यासाचा खंड पडतो, शोकसंतापानें शांति मोडते, स्वानंदाची बैठक ढळते, चित्त चंचल होऊन निश्चय डळमळूं लागतो असे हे वादाचें तोटे ध्यानांत धरून तूं त्या मार्गाकडे ढुंकून पाहूं नकोस,

घरची कामधेनु टाकून दुसऱ्याच्या घरीं ताक मागायला जावेंच कां? पढतमूर्खांना राम सोडून वाद हवा असतो! चित्ताक्षोभ घेऊन बिचारे शेवटीं दीनवाणे होतात. मना! भक्तीवांचून जिणें व्यर्थ आहे. आदरानें रामप्रीति धर व घोर संसारांतून मोकळा हो (५७-६६). रामभक्तीचा पहिला पाढा सांगतों. ‘ प्रभाते मनीं राम चिंतीत जावा! ’ घनश्याम, लावण्यरुप, धीरगंभीर, पूर्णप्रतापी, अशा रामाचें ध्यान कर. कोंदडधारी व सुखानंदकारी रामाचें चरित्र चित्त शुद्ध करून मनांत आण. मद व आळस सोडून रामाचें नित्यनेमानें प्रभातीं चिंतन करीत जा. रामनामाचा छंद लागला कीं आपदांची बाधा होत नाहीं, महादोष जाऊन सद्गति मिळतें, पुण्यसंस्कार वाढतात, मुखानें नामोच्चार केला तर कष्ट पडत नाहींत, गांठीचा पैसा खर्चत नाहीं, व्रतदानउद्यापनाला द्रव्य व शरीरकष्ट व पैका लागतो तसें नामस्मरणाचें नाहीं, कर्मधर्मयोगयाग कांहींच हातून घडत नाहीं मग फुकाचें नाम घ्यायला काय जातें? सांगायचें इतकेंच कीं सर्वसाधनांचें सार असें हें रामनाम आहे तें घ्यायला तर लाग (६७-७७). रामाची आवड उत्पन्न झाली की इतर क्षुद्र काम अपाप झडतात, सर्वांभूतीं रामच दिसूं लागतो, द्वैत मावळतें. ज्याला रामविश्वास नाहीं त्याला संसारबाधा

सोसावी लागते. कैवल्यदाता दयाघन राम. त्याला प्रेमानें भजून देहसंसारचिंता सोड. महातापसी व योगी शंकर ज्याला अंतरीं जपतात त्या दुस्तरभवाब्धिपारद अशा रामाला भजून पोटापाण्याची चिंता सोडून दे. ( ७८--८० ) राम-भजनाचा सर्वोत्कृष्ट उपाय ह्मणजे अखंड नामस्मरण. नामाची साम्यता कोणालाही येणार नाहीं. शंकरांनी हालाहल विषावर उतारा ह्मणून रामनाम घेतलें, त्यापुढें संसार-तापाची किंमत काय ? ज्ञानवैराग्यसामर्थ्यवंत असे शंकरही उमेसह रामनाम परमप्रीतीनें जपत आहेत, मग सामान्यांनीं नामामृत पिण्यास कांकूं कां करावें ! मुखांत राम तरच चित्तांत विश्राम आहे. अंतकाळीं रामावांचून सोडविणारा कोण आहे बरें ? रामनामाचा सदानंद सेवून रहा मुखीं राम त्याला कामाची पीडा होत नाहीं, याला उदाहरण मारूतीचें. रामाचें नाम फार चांगलें व ' अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ' आहे. तें सर्वकाळ घ्यावें. ' हरीचिंतनें अन्न जेवीत जावें ' अन्न ब्रह्मरूप होईल. वेदशास्त्र-पुराणांनीं हरिनामाची योग्यता व माधुरी वर्णिली आहे. नामघोष होतो तेथून सर्वदोष दूर जातात, व तेथें साक्षात् हरि उभा असतो. अन्नदाता व सर्व संभाळणारा देव आहे, त्याचें नाम कां बरें घेऊं नये ? अजामीळ, कुंटिणी, प्रल्हाद

इ० अनेक भक्त नामसंकीर्तनानें तरले आहेत. नामानें जडशिळा तरल्या मग काय सचेतन मानव तरणार नाहींत? असंख्य मानव नामानेंच तरले आहेत. काशींत मरण आलें ह्मणजे प्राण्याच्या अंत्यसमयीं शंकर स्वतः रामनाममंत्र कानांत सांगून त्यांना उद्धरतात. तात्पर्य 'सगूणीं अतीं आदरेसीं भजावें' व भजनाचें उत्कृष्ट साधन ह्मणजे नामस्मरणच होय ( ८१–१०२ ). नामामृत घ्यायला सांगितलें पण थोडें पथ्य हें सांभाळलेंच पाहिजे. परद्रव्य व परस्त्री यांचा विटाळ मानावा, व अहंकाराला तोंड वर करायला जागा राहूं नये ह्मणून क्रियेवीण वाचाळता करूं नये, व वादविवादाच्या डंभांत पडूं नयें, व वाद तुटण्यासारखा असेल तेथेंच संवाद करावा. स्नानसंध्यादि नित्यकर्म निष्ठापूर्वक करून मनाला आवरावें. कामक्रोधादि चांडाळांचा संग करूं नये. सत्संगतीनें भक्तिभावार्थ लागतो, क्रिया पालटते ह्मणून सत्संगतींत संवादसुखाची देवघेव करावी. वादानें अहंकाराचा उठाव होऊन नाना विकारांचें काहूर उठतें, वाद करितां करितां जन्म गेला. तरी वाद संपत नाहीं, वादाहंकारानें मोठमोठे पंडित ब्रह्मराक्षसाच्या योनीला गेल्याच्या कथा आपण ऐकतों, ह्मणून मना! तूं क्रिया कर, वाचाळता सोडून दे, बोलण्यासारखे चाल व क्रियापालटें

भक्तिपंथानें जा ( १०३ -११५ ) राम भक्तांची उपेक्षा करीत नाहीं असें पूर्वीं सांगितलेंच आहे, तेंच पुन्हा दृढीकरणार्थ सांगून रामभजनाला प्रोत्साहन देतात, अंबरीष, उपमन्यु, ध्रुव, गजेंद्र, अजामीळ यांच्या उदाहरणांवरून देव हांकेसरसी उडी घालून भक्ताला संकटांतून तारतो असें स्पष्ट होतें. देवानें दशावतारही भक्तांसाठी घेतले आहेत. हें सर्व नीट ध्यानांत ठेवून बा! मना परमप्रतापी, भक्तवत्सल, दासाभिमानी रामाला भज यांतच तुझें परम कल्याण आहे. रामभक्ति सत्संगतींत वाढीस लागते ह्मणून सत्संग कर माझ्या एकवचनी, एकबाणी, एकपत्नी रामासारखा सेवेयोग्य असा दुसरा कोण आहे? रामभक्तही तसेच पुण्यदर्शन आहेत, नष्ट संदेह मोडून त्यांचे संगतींत निःसंदेहता येते. ह्मणून सत्संगीं रामाला भज.(११६-१३५)

४ सगुणाच्या आधारानें जीव निर्गुणपद पावतो. येथवर सगुणोपासनेचा मार्ग सांगितला, आतां निर्गुणाची ओळख करून देतात. सगुण तेंच निर्गुण, राम तोच ब्रह्म. भवभयांतून सुटावें यासाठींच सगुणाला भजायला सांगितलें, निर्गुणाच्या बोधानेंही तसेंच निर्भयत्व प्राप्त होतें. निर्गुण ब्रह्म संत ( शाश्वत ) अनंत ( अपार ) व भयातीत आहे. तेथें द्वैत नाहीं व म्हणून भयही नाहीं. तें सर्वांचें जुनें ठेवणें

आहे पण अहंकार (मीपणा) आड येतो म्हणून जीव अज्ञानानें भितात. देहाला मी म्हणणें, देहबुद्धि, अहंकार मी-पण—यामुळेंच निर्गुणपद दुरावल्यासारखें वाटतें; पण मीपण सोडलें कीं निर्गुणपद सहजासिद्ध आहे. तें निजधन, स्वस्वरूप, स्वयमेव असून जीवाला 'गुप्त वित्त' मोठें गूढ वाटतें व विनाकारण तो स्वतःला जन्मदरिद्री समजतो. देहच मी असें तों मानतों तोंवरच हें बंधन राहतें, पण मी देह नसून देहातीत आत्माराम आहे असें यानें ओळ-खलें कीं हा मुक्तच आहे. हा स्वस्वरूप ओळखीत नाहीं म्हणून 'गुप्त धन' नाहींतर हें स्वस्वरूप 'पुढें पाहतां सर्वही कोंदलेसें,' पण याची यावर श्रद्धा (भाव) बसत नाहीं त्याला काय करावें ? देह त्रिगुणाचा गुंताडा आहे त्यांत हा गुंतून पडतो म्हणून ' जयाचें तया चूकलें, प्राप्त नाहीं. ' देहातीत गुणातीत मी आत्मा आहे हें ओळख. ही ओळख पटवायला गुरु लागतात. ' गुरुअंजनेवीण तें आकळेना. ' जगीं सत्य काय आहे, संत अनंत निर्गुण निजरूप कसें आहे, तें शोधून पहा. देह व विषय यावरची बुद्धि उडवून विवेकानें स्वस्वरूपीं लाव. उगमापर्यंत अंतर्मुखतेनें शोध करीत जा, नाशवंत दृश्याहून—नामरूपाहून तें कसें वेगळें आहे तें पहा, तें एकाजिनसी ब्रह्म कसें आहे याचा विचार कर.

ब्रह्मादिदेव मागाहून झाले त्यांच्यापूर्वींचें अतिजुनाट ब्रह्म तदाकार होऊन पहा. तें ज्ञानचक्षूला दिसतें, चर्मचक्षूला दिसत नाहीं. त्याला पहायला गेलें असतां पाहणेंपण हरपून जातें. तें निर्गुण अनंतरूप शोधून पहा. तूं आपली विवेकशक्ति खर्च कर, पण तुला वर्म सांगतों. संतसद्गुरुसमागमावांचून तें यथार्थ आकळायचें नाहीं, ह्मणून त्यांचा कृपाप्रसाद जोड. अनंत शास्त्रें पाहिलींस तरी ' समाधान तें सज्जनाचेनि योगें ' हें विसरूं नकोस. संतसंगतींत पंचीकरण, तत्त्वविचार, महावाक्यबोध हें सर्व पाहून खुणेला पाव. तुझें तुझ्यापाशींच आहे पण सत्संगाशिवाय त्याच्या प्राप्तीचा आनंद मिळत नाहीं. मीपणा आहे तोंवर तें दिसत नाहीं व त्याच्याशीं समरसता झाल्यावर वेगळे राहतां येत नाहीं. ब्रह्मज्ञानाला मीपण हाच महान् प्रत्यवाय आहे, वेदशास्त्रांना त्याचा यथार्थ स्वरूपबोध होणें दुर्घट मग जाणीवेला—अहंतेला जागाच कोठें आहे ? ' मीं तें जाणलें' असें हा ह्मणत आहे तोंवर यानें तें जाणलेंच नाहीं. जाणतेपणाचा अभिमान हीच तर ज्ञानान्नभोजनांतली माशी आहे, ही कांहींएक पचूं देत नाहीं. अहंकार निःशेष झडेल तरच निर्गुणपदप्राप्ति ! अहंकार वाईट, सर्वतोपरी फार वाईट, ह्मणन देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि कर. हरि

चिंतनानें मुक्त होशील. 'सदा संगती सज्जनाची धरावी' म्हणजे अहंकार मावळून निजपद सांपडतें. हा निर्गुण ब्रह्माचा विचार झाला. हेंच निर्गुण ब्रह्म भक्तकार्यार्थ सगुण होऊन अवतरतें हें मात्र विसरूं नकोस हो (१३६-१७४).

५ आतां सगुण व निर्गुण ही अद्वैतभाषाही जेथें खुंटते त्या विमलब्रह्माची ( शुद्धस्वरूपाची ) ओळख ! तो मुख्य देव, तो थोरला देव, हरिहरब्रह्मादिकांचा जनक, मूळमायेच्या पलीकडचें गुलदस्तांतलें ब्रह्म ( त्याला काय नांव द्यावें ? त्याचें स्वरूप कोणी काय कसें वर्णावें ? ) फुटेना, तुटेना, चळेना, ढळेना--' मीपणासी कळेना ! ' गुरुवीण तो आकळत नाहीं, पण जगांत भोंदुपणाच फार ! सर्वगुणसंपन्न ह्मणजे गुणातीत झालेला व ' मुखें बोलिल्यासारिखे चालताहे ' असा भक्त, ज्ञानी, विवेकी, विरागी सद्गुरु भेटल्यानें ह्या शुद्ध स्वरूपाची ओळख–नव्हे प्राप्ति होते. असो. ' लपावें अती आदरें रामरूपीं ' कां कीं तें गुप्त आहे. तेथवर कालाचा हात पोंचत नाहीं, तेथें अर्थात् जन्मरणाचें भय नाहीं. तें स्थान निर्भय आहे. असा हा ' सदा सर्वदा राम सन्नीध आहे. ' त्याची अखंड भेट आहेच; सर्व संसर्ग, सर्व संग, सोडून निःसंगपणें तन्मय व्हावें. त्याचें ' दुजेवीण ध्यान ' करावें. त्या निर्विकल्पाला कल्पावें. हा

देवराणी तुर्येच्याही पलीकडे आहे. आकाशही त्याच्या मानानें स्थूल–इतका तो सूक्ष्म आहे. आकाशाचा दृष्टांतही अपुरा आहे. तेथें व्याप्यव्यापक हा–कसलाच भेद नाहीं. त्याला व्यापकही ह्मणतां येत नाहीं. हेंही बोलणें तेथें खुपतें –असें तें रामस्वरूप ! त्याच्या भेटींत द्वैत उरत नाहीं. झाली, रामाची भेट झाली. आनंदीआनंद ! ( १७५–२०१ )

# सार्थ मनोबोध.

## १ मंगलाचरण.

श्रीराम

गणाधीश जो ईश सर्वां गुणाचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥

१ गणांचा अधीश व गुणांचा ईश; मुळारंभ म्हणजे निर्गुणाचा आरंभ—असा गणेश व परादि चारी वाचांचें मूळ—अशी शारदा या उभयतांना वंदन असो. नमनाचा हेतु हा कीं ( यांच्या पलीकडील पूर्ण ब्रह्मस्वरूप ) राघवाचा पंथ आकळतां यावा.

हा पहिला श्लोक मंगलाचरणरूप असून याच्याच चौथ्या चरणांत मनोबोध ग्रंथरचनेचा हेतु सांगितला आहे.

अनंत अशा राघवाचा पंथ कळावा या हेतूनें गणेश शारदांना वंदन केलें आहे. गणेश, शारदा, राघव व त्याचा पंथ या चारही पदांचा गूढार्थ ध्यानीं आल्याशिवाय श्लोकाचा भावार्थ कळणार नाहीं.

राघव व राघवाचा पंथ या ग्रंथाच्या विवरणानें कळणार असून शेवटच्या श्लोकांत ग्रंथाची जी फलश्रुति सांगितली आहे ती पाहतां राघवाचा पंथ उमगल्यानें मतिमंदही निर्दोष होऊन साधनाला योग्य होतील, त्यांच्या अंगीं ज्ञानवैराग्यांचें सामर्थ्य चढेल व ते विश्वास ठेवतील तर मुक्तीचा सुखसोहळा भोगतील असें समर्थांचें आश्वासन आहे. अर्थात् हे श्लोक त्यांच्या प्रचीतीचे बोल आहेत.

राघवाचा पंथ आक्रमीत त्याच्या स्वरूपाला कसें पावावें हें यांत सांगितलें आहे, व या समर्थांच्या शब्दांवर विश्वास ठेवणारा निर्बुद्ध मनुष्यही अधिकारसंपन्न होऊन मुक्त होईल असें ग्रंथाच्या आद्यंतावरून स्पष्ट होतें. आतां राघवाचा पंथ पाहतें असतां राघवाला वंदन न करितां गणेश शारदांना कां वंदन केलें, किंबहुना समर्थांच्या ग्रंथांत व सामान्यतः आपल्या इतर धर्मग्रंथांत प्रारंभीं गणेश-शारदांनाच वंदन केलेलें कां आढळतें याचा उलगडा गणेशशारदांचें स्वरूप लक्ष्यांत आलें म्हणजे होणार आहे.

गणेशशारदांचें स्वरूप लक्ष्यांत आलें व त्याचा राघवाच्या स्वरूपाशीं काय संबंध आहे हें उमगलें म्हणजे त्याचा पंथही सुगम होतो. अशा दृष्टीनें हा श्लोक उलगडला म्हणजे या एकाच श्लोकांत समर्थांनीं संपूर्ण अध्यात्मरहस्य कसें ओतलें आहे हें ध्यानांत येतें.

समर्थांनीं अध्यात्माची मांडणी जी दासबोधादि ग्रंथांत केली आहे तिच्याच अनुरोधानें हा श्लोक, किंबहुना पुढील सर्व श्लोक लावले पाहिजेत. त्यांच्या सर्व ग्रंथांत गणेश, शारदा व सद्गुरु यांना वंदन केलेलें आढळतें. दासबोधांत पहिल्या उपोद्घाताच्या समासानंतरच्या तीन समासांत या त्रयीला क्रमानें नमन केलें आहे, व ७ व्या दशकाच्या प्रारंभींच्या १८ ओव्यांत तिचें स्वरूप दर्शविलें आहे. दुसऱ्या, चौथ्या, पांचव्या व आकराव्या दशकाच्या प्रारंभींही तोच प्रकार आढळतो. ११ व्यांत अंतरात्म्याला म्ह. गणेशशारदारूप मूळमायेला वंदन केलें असून १७ व्यांत ( स० ७।८ ) तत्त्वविवरण केल्यावर तत्त्वांतील अशा 'पाताळलिंगाला' म्ह० सद्गुरुस्वरूपालाच वर्णिलें आहे. युद्धकांडाच्या प्रारंभीं भ्रमहर्ता (ज्ञानरूप, जाणीवरूप ) गणेश व स्फूर्तिरूप शारदा यांना व नंतर सद्गुरूला॰ वंदन केलें आहे. येथें एक लक्ष्यांत ठेवलें

पाहिजे कीं समर्थांचे सद्गुरु श्रीरामच होते. वशिष्ठानें रामाला व रामानें रामदासाला उपदेशिलें आहे असें त्यांचेंच वचन आहे, सद्गुरु सगुणरूपानें कोदंडपाणि राम व निर्गुण रूपानें परब्रह्म होत. दोन्ही एकरूप हा सिद्धांत व अनुभव. सगुण व निर्गुण, सगुणाची उपासना व निर्गुणाचा बोध, भक्ति व ज्ञान हीं दोन साधकासाठीं सांगावीं लागतात. ‘ सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ’ ‘ रघुनाथ भजनें ज्ञान झालें ’ इ० उद्धार साधकाला मार्ग लागावा, यासाठीं. वस्तुतः ‘ ज्ञान आणि उपासना । दोन्ही एकचि पाहाना । उपासनेकरितां जना । जगदुद्धार ’ ( द. १३ स. २ ). राम आणि ब्रह्म एकच व त्याला समर्थांनीं सद्गुरु भावानें वरिलें आहे. राम अनंत आहे. ‘ सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ’ असें श्रुति सांगते, अनंत ब्रह्म हेंच समर्थांच्या ‘ अनंत राघवाचें ’ स्वरूप आहे. सद्गुरु ह्म. अनंत राघव त्याहून ब्रह्मांडांत थोर कोणीच नाहीं. त्याच्या लाभापरता लाभ नाहीं, त्याच्या सुखापरतें सुख नाहीं, त्याच्या अखंड तादात्म्यापरता मोक्ष नाहीं. त्या अनंत राघवाचा पंथ उपासनेनें आकळतो, म्हणून गणेशशारदांचें स्तवन उपासनाबुद्धीनें केलेलें आहे. गणेशशारदा म्ह. मूळमाया. तिचा अंतपार ब्रह्मादिकांनाही लागत

नाहीं, तथापि समजुतीसाठीं तिच्या अरूपरूपाचा थोडक्यांत विचार करूं.

परब्रह्म निश्चळ, निर्मळ व सदोदित आहे ( द० ७ स. ३ ). त्याच्या ठिकाणीं ' एकोऽहं बहु स्याम् ' म्ह० मी एक आहें तें बहु व्हावें असा मूळ संकल्प उठला. त्याला मूळमाया, मूळपुरुष, जगदीश्वर इ० बहुत नावें आहेत. सृष्टीचें आदिबीज ही मूळमाया. अहं ऐसी स्फुर्ति जाली । तेचि माया ( द० ८–३–५१ ). सिद्धाच्या अनुभवानें पाहतां सृष्टि झालीच नाहीं; 'अरे जें जालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई । तथापि सांगों जेणें कांहीं । संशय नुरे ' ( द० ८ स० ३–१ ). 'अरे जें जालेंचि नाहीं ' हें आहे सिद्धांत वचन. परब्रह्म एकीएक एकमेवाद्वितीय आहे. सृष्टि झाल्याची कथा मिथ्या असल्यामुळें सृष्टीची उभारणी व संहारणी, मांडणी व मोडणी केवळ अज्ञानी जीवांच्या समजुतीसाठीं श्रुतिशास्त्रसंतांना सांगावी लागली आहे, तथापि नीट विचार करून पाहतां तिचा सिद्धांताशीं समन्वयच आहे. ' निश्चळ परब्रह्मा वेगळें कांहीं नाहीं ' हा मुख्य सिद्धांत व ब्रह्मनिष्ठांचा अनुभव हाच. मनोबोधांतही अखेरचें सत्य हेंच सांगितलें आहे. ' कर्ता ठायींचा अरूप । केलें तेंही मिथ्यारूप '—मायासृष्टि स्वप्ना-

दिवत् मिथ्या असून केवळ ब्रह्म सत्य आहे. ब्रह्मभावाचा उदय झाला कीं विश्वाभास मावळतो व जगदाभास भासतो तोंवर ब्रह्मभावाचा लोप होतो, असा या लपंडावीच्या खेळाचा अनुभव आहे. **मुख्यदेव** अद्वैत आहे त्या 'अद्वैतास कैचें द्वैत?' पण त्या अद्वैताची गोष्टही द्वैताच्या भाषेनेंच सांगावी लागते. खुणेनें खूण पाळली पाहिजे. असो. ब्रह्मीं मूळमाया झाली! मूळमायेपासून गुणमाया झाली. गुण तीन. सत्व, रज व तम. ह्या गुणांचे नियामक देव अनुक्रमें विष्णु ( जाणीव ), ब्रह्मा ( जाणीव व नेणीव यांचें मिश्रण ) व शंकर ( नेणीव ). तमोगुणापासून अहंकार व त्यापासून पंचभूतें झालीं. त्रिगुण व पंचभूतें मिळून अष्टधा प्रकृति. भूमि, आप, तेज, वायु, आकाश, मन ( रज ), बुद्धि ( सत्व ) व अहंकार ( तम ) ही अष्टधा प्रकृति ( गीता. अ० ७–४ ). हिच्यापासून चार वाणी चार खाणींचे असंख्य जीव निर्माण होऊन पिंड-ब्रह्मांड रचना झाली. मूळ परब्रह्म निश्चळ, मूळमाया चंचळ व सृष्टि उत्तरोत्तर जड. जड चंचळाचा कर्दम ह्म० सृष्टी. 'कुडीं वाढे कुबुद्धि वाढे' ( दा० १५–९–७ ). निश्चळ त्यापलीकडे. सूक्ष्मांतून स्थूलाकडे व शुद्धांतून अशुद्धाकडे असा हा सृष्टीचा ओघ खालीं खालीं जात असतो. 'ऊर्ध्व-

मूलमधःशाख ' असा हा प्रपंचवृक्षाचा विस्तार झालेला आहे. दैवी, गुणमय व दुरत्यय असा हा मायानदीचा ओघ वाहत आहे. विवेकविचारानें उलट पोंहत उगमापाशीं जाणें हें नरदेहाचें सार्थक होय. ही मायानदी 'केवळ अचंचळीं निर्माण जाली । अधोमुखें बळें चालली ' असून असंख्य जीवतरंग हिच्यावर उत्पन्न होऊन लयाला जात असतात, म्हणून जे कोणी ' उगमापैलीकडे गेले । तेथें परतोन पाहिलें। तंव तें पाणीच आटलें । कांहींच नाहीं ' ( द० ११ स० ७ ). अखिल सृष्टीचा उगम मूळमाया. तिच्या पलीकडे जाऊन निर्गुण ब्रह्माशीं जे समरस होऊन जातात त्यांना मायानदीच नाहीं. असो. जडचंचळ मिळून पिंड ब्रह्मांडांचीं ८२ तत्त्वें शास्त्रानें सांगितलीं आहेत ( द० १७ स. ९ ). ह्या तत्त्वांचा निरास करीत ह्म० हीं तत्त्वें मी नव्हे, मी तत्त्वांहून निराळा आहे, असें विवरत विवरत मूळमायेपर्यंत जाणें व तत्वांचें गाठोडें खालीं टाकून ' तत्त्वमसि ' या महावाक्याच्या बोधानें मूळपुरुषीं दडी देणें ही उपासना. मूळ पुरुषाच्या म्ह० मूळमायेच्या उपासनेनेंच निर्गुण ब्रह्मपदाचा लाभ होतो. आत्मनिवेदनभक्ति हीच, मुक्ति हीच, अध्यात्मयोग हाच. ' अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति' (कठोपनिषत् ).

याच्या लाभानें जीवपणा मावळून ‘ आपला आपणासी लाभ ’ होतो.

वर जा मूळमाया सांगितली तेंच गणेश शारदांचें रूप होय. गणेश व शारदा यांचें एकपण न मोडतां त्यांनीं दोनपण दाखविलें आहे. ‘येकें स्त्री पुरुषें होती । उभयतांमध्यें बहुप्रीति । येक रूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ’ ( द० १३–५–३ ). गणाधीश आणि शारदा, शिव आणि शक्ति, प्रकृति आणि पुरुष, हीं एकच. वाचा आणि अर्थ हीं जशीं अपृथक् तसेच गणेश आणि शारदा अभिन्नपणेंच नांदतात. फुलें दोन पण परिमळ एक, दिवे दोन पण प्रकाश एक, ओठ दोन पण गोष्ट एक, डोळे दोन पण दृष्टि एक, तसे गणेश शारदा आमच्या समजुतीसाठीं दोन पण तत्त्वतः एकच ! त्यांना वंदनहीं तदंशानेंच केलें पाहिजे. अमृतानुभवाच्या प्रारंभीं ज्ञानोबाराय म्हणतातः—

**ऐसीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।**
**तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवो देवी ॥ १ ॥**

निर्गुणाच्या ठिकाणीं ‘ मी बहु व्हावें ’ ही जी प्रथम स्फूर्ति ती मूळमाया. त्या मूळमायेंत जाणीव व वायु किंवा ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति असे दोन परमसूक्ष्म भेद भासतात. ‘ तयामध्यें जाणीव कळा । जगज्ज्योतीचा जिव्हाळा।

वायु जाणीव मिळोनी मेळा। मूळमाया बोलिजे ' ( दास० १०-९-५ ).

यांतील जाणीव तो गणेश व वायु ती शारदा. गणेशशारदांनाच पुरुषप्रकृति, शिवशक्ति, अर्धनारी नटेश्वर, जगज्ज्योति, अंतरात्मा, परमेश्वर इ० अनेक नांवें आहेत. श्रीज्ञानेश्वराच्या अमृतानुभवाचें पहिलें प्रकरण शिवशक्तिविलासाचें आहे तें पहावें ह्मणजे गणेशशारदांचें स्वरूप उमगेल. ज्ञानेश्वर ज्या मूळमायेला शिवशक्ति म्हणून वर्णितात तिलाच समर्थांनीं गणेशशारदा म्हटलें आहे. गणेशशारदा एकपण न मोडतां दोन कशीं भासतात हें विचार करूनच पाहावें. जाणीवरूप गणेश व वायुरूप ह्म० क्रियारूप, ध्वनिरूप, शारदा, यानां वंदन करूनच (समर्थ सांगतात) निर्गुण, निश्चळ व निर्मळ असा जो राघव त्या राघवाचा पंथ आकळतो. गणेशशारदारूप मूळमाया हें निर्गुणब्रह्माचें महाद्वार होय. विविध उपासकांचें तें एकच उपास्य आहे. नामदेवानीं ज्या महाद्वारांत समाधि घेतली तें महाद्वार हें. सर्वच सद्भक्त येथें समाधि घेतात, तत्त्वांचें गाठोडें टाकून येथें बुडी मारतात, ब्रह्मस्वरूपाकार होतात. मूळमायेचें महाद्वार ओलांडावें कीं ब्रह्मरूपीं मिठी पडते. समर्थांनीं गणेशशारदांना वंदन करून ह्म० मूळमायेच्या--उपासनेच्या

बैठकीवरून पलीकडचा राघवाचा म्हणजे निश्चलब्रह्माचा पंथ आम्हां तुम्हांला दाखविण्यासाठीं मनोबोधाचे श्लोक सांगितले आहे.

**गणाधीशः**—गण म्ह० सांख्यांची २४ तत्त्वें किंवा समर्थांची ८२ तत्वें पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचप्राण, पंचविषय, व अंतःकरणचतुष्टय मिळून २४ तत्वें. पंचविसाव्यास म्ह० मूळपुरुषास उपासावें यासाठीं २४ तत्त्वांस जाणावें असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. २४ तत्त्वांची प्रकृति ती जड आहे, तिला म्ह० गणाला ईक्षणेंकरून चिद्रूप करितो तो गणाधीश. गण, गणेश, गणपति हे गणित शब्दाप्रमाणें संख्यावाचक आहेत. गण म्ह० माया, प्रकृति शारदा, तिला चेतविणारा तो गणेश. गणाधीश म्ह. शिवगणांचा किंवा इंद्रियगणांचा अधीश असाही लौकिकार्थ आहेत.

**गुणाधीशः**—सत्व रज तम हे त्रिगुण व त्यांचे अधिपति विष्णुब्रह्माशिव. त्रिगुण गुणमायेपासून झाले व गुणमाया मूळमायेपासून झाली हें वर सांगितलेंच आहे, अर्थात् गणेश गुणांचा जनक व नियंता आहे. 'यश श्री, औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ' हे सहाही गुण ज्यापाशीं आहेत

तो षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् असा गुणाधीश पदाचा लौकिकार्थ आहे.

**मुळारंभ व निर्गुणाचा आरंभः**—उंबऱ्यावरच्या दिव्याप्रमाणें निर्गुण परब्रह्म आणि सगुण व नामरूपात्मक जग या दोहोंतली सांखळी मूळमाया होय. मूळमायेचा तेथून आरंभ, जगद्रचनेचा चित्रपट तेथून मांडला गेला, कर्तृत्वास तेथून आरंभ ह्मणून 'मुळारंभ'. निर्गुणाला सगुणत्व प्रथम तेथें आलें ह्मणून 'निर्गुणाचा आरंभ'.

**शारदाः**—परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणींना प्रेरणारी शक्ति. 'जे उठवी शब्दांकुर, वदे वैखरी अपार ।' (दास० १-३-२). मूळमाया म्हणजे गणेश शारदा. ही सर्व कर्तृत्वाचें मूळ होय. सूक्ष्म सृष्टिरचनेस मूळ प्रारंभ तेथून. पलीकडे परब्रह्म आहे तेथें कर्तृत्व नाहीं. शारदा—

**जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण ।**
**जे व्यापकपणें संपूर्ण । सकळां घटीं ॥ १८ ॥**

**( दास० १-३-१८ ).**

गणेश शारदांना वंदन करायचें तें त्यांच्याहून वेगळें राहून नाहीं. 'तयेसी माझा नमस्कार । तदंशेंचि आतां' ( २६ ). देहावीण लोटांगण घालावयाची ती जागा आहे, घालतां येईल त्या भाग्यवंतानें घालावें.

**राघवः**—निश्चळ परब्रह्म, मूळमायेचाही जेथें पोंच नाहीं तें स्वरूप. मूळमाया, गुणमाया, त्रिगुण, हरिहर ब्रह्मादिक देव, पिंडब्रह्मांडात्मक अखिल सृष्टि या सर्वांचें आयुष्य कमी अधिक आहे, या सर्वांना लय आहे, विवेक प्रळयांत सारे लीन होतात. पण 'सर्वदा अविनाश एक सद्गुरुपद' आहे ( दास० १-४-२९ ).

**गणेश** कसा आहे? सांख्यांच्या चतुर्विंशतितत्वात्मक प्रकृतीचा नियंता ह्मणून 'गणाधीश,' त्रिगुणात्मक गुणमायेचें मूळ म्हणून 'गुणाधीश,' मूळमायेच्या जगदुत्पत्ति कार्यास तेथून आरंभ ह्मणून 'मुळारंभ,' व निर्गुण ब्रह्म 'एकोहं' स्फूर्तिरूपानें तेथें प्रथम सगुणतेला येतें ह्मणून 'निर्गुणाचा आरंभ'. राम त्यापलीकडे आहे.

# विवेक वैराग्याचें उद्बोधन ( २—२७ )

(मन हें एखाद्या उच्छृंखल घोड्याप्रमाणें चंचल, अडखळणारें व अनावर असें असल्यामुळें त्याला 'सज्जना मना!' इ० गोड शब्दांनीं चुचकारून स्ववश केलें पाहिजे, आणि मग त्याच्यावर विवेकाचें खोगीर चढवून व त्याच्या गळ्यांत वैराग्यकाष्ठ बांधून आपल्याला इष्ट अशा मार्गानें त्याला नेलें पाहिजे. या न्यायानें येथून २६ श्लोकांत हरि-

भक्ति व सदाचार यांचा उपदेश करून विवेक वैराग्यास मनोभूमि तयार केली आहे. )

## १ हरिभक्ति व सदाचार ( २-१० ).

२

**मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ।**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।**
**जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें ।**
**जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥**

बा भल्या मना ! बापा ! इतर कोणत्याही मार्गाच्या नादीं न लागतां तूं आपला भक्तिमार्गानेंच चालूं लाग म्हणजे अनायासें श्रीहरिस्वरूपाच्या मुक्कामावर जाऊन पोंचशील. एक गोष्ट मात्र लक्ष्यांत ठेव. सज्जनांनीं निषिद्ध-त्याज्य म्हणून जें ठरविलें आहे तिकडे अगदीं वळूं नकोस व त्यांनीं वंद्य-प्रशस्त ह्मणून म्हटलें आहे तें सर्व मनोभावानें करीत जा.

भक्तिमार्ग स्वच्छ दिसावा यासाठीं दासबोधाच्या ३ऱ्या दशकाचा १० वा समास व नवविधा भक्तीचा संपूर्ण ४था दशक मननपूर्वक वाचून पहावा. कोणास दासबोधाचें

संक्षिप्त पारायण रोज करावयाचें असल्यास त्यानें हे 11 समास मुखोद्गत करावेत. भक्तिपंथ कोणता ?

**जयास भगवंत आवडे । तयाचे देवासी सांकडें। संसारदुःख सकळ उडे । निज दासांचें ॥११॥**

**जे अंकित ईश्वराचे ।**
**तयांस सोहळे निजसुखाचे ।**
**धन्य तेचि दैवाचे ।**
**भाविक जन ॥ १२ ॥**
**आयुष्य हेचि रत्नपेटी ।**
**माजीं भजनरत्नें गोमटीं ।**
**ईश्वरीं अर्पूनिया लुटी ।**
**आनंदाची करावी ॥ २७ ॥**

**( द. ३ स. १० )**

भजनरत्नें कोणतीं ? श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन. ( 1 ) 'सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं' ही **श्रवणभक्ति**. नानाविध शास्त्रग्रंथ ऐकावेत व पहावेत. पण त्यांतून सारभूत हरि तेवढा घ्यावा व आपण हरीहून वेगळे आहोंत असें भावूं नये. हरि सगुण व निर्गुण उभयरूप आहे म्हणून सगुणप्रेमसंवर्धनासाठीं रामायण भागवतादि

हरिचरित्रग्रंथ ऐकावेत व निर्गुणबोधासाठीं उपनिषदादि अध्यात्मग्रंथ पहावेत. 'ऐसें श्रवण सगुणाचें। अध्यात्म-निरूपण निर्गुणाचें। विभक्ति सांडूनि भक्तीचें। मूळ शोधावें' ही झाली श्रवणभक्ति. देवांत व आपणांत विभक्ति म्हणजे वेगळेपण राहूं नये, एकरसता, ऐक्य असावें याचेंच नांव भक्ति. श्रवणाचें मनन अवश्य झालें पाहिजे. (२) **कीर्तन-भक्ति** दुसरी आहे.आपल्या स्वानंदासाठीं निरपेक्ष हरिकीर्तन करावें. विद्वत्ता, वक्तृत्व, बहुश्रुतपणा, गायन, सदाचार व मुख्य स्वानुभव इतके गुण कीर्तनाला अवश्य आहेत व ते अंगीं आणावेत. आपल्या प्रबोधशक्तीनें भक्तिज्ञानवैराग्याचा उठाव करावा व श्रोत्यांचीं श्रवणपुटें आनंदानें भरावीं. मन स्वरांत गुंतवूं नये तर हरिप्रेमांत गुंतवावें. देवाचे गुणानुवाद सप्रेम गावे. स्वधर्म, नीतिन्याय, गुरुपरंपरा, वर्णाश्रमधर्म सर्व सांभाळून बोलावें. कीर्तनानें स्वतःलां व लोकसमाजाला हरिप्रेमाची गोडी चाखवावी. ( ३ ) तिसरी भक्ति **नामस्मरण**. हरिनाम सर्वकाळीं गावें. सुखांत व दुःखांत, दिवसां व रात्रीं, संपत्तींत व विपत्तींत, कोणत्याही प्रसंगांत असतांना ' नामस्मरणाची स्थिति सांडूचि नये.' नामस्मरणें विघ्नें दूर होतात, उत्तम गति मिळते. ( ४ ) चौथी भक्ति **पादसेवन.** कायावाचामनो-

भावें सद्गुरुचरण सेवावे. म्हणजे अनुभवाचीं सकल अंगें कळूं लागतात. लक्ष्य वस्तु आपणच होतां येतें. ( ५ ) पांचवी **अर्चनभक्ति**. अर्चन म्ह० देवतार्चन. तें शास्त्रोक्त केलें पाहिजे. देव, ब्राह्मण, अग्नि, साधुसंत, अतीत अभ्यागत यांचें पूजन करावें. आपले गृहींचें देवतार्चन करणें, नाना तीर्थक्षेत्रांस जाऊन तेथील देवतांचें पूजन करणें, पूजेचें साहित्य यथाशक्ति सर्व मिळवून देवाचें ऐश्वर्य वाढविण्या-साठीं भक्तिपूर्वक अर्चन करणें ही अर्चनभक्ति होय. ( ६ ) **वंदनभक्ति** सहावी. देव व संतसद्गुरु यांना साष्टांग नम-स्कार घालावे. व इतरांस यथाधिकार वंदावें. जेथें विशेष गुण दिसतात तेथें सद्गुरूचें अधिष्ठान आहे असें भावून वंदन करावें. लवण्यानें नम्रता येते.

(७)सातवी भक्ति **दास्य**. देवद्वारीं पडेल तें कार्य शरीर, मन व धन वेचून करावें. ( ८ ) आठवी भक्ति **सख्य**. देवाला प्रेम प्रीतीनें बांधावें, देवाला प्रिय तें करावें, देवा-साठीं जिवलग सोडावे, देव करील तें मानावें, देवासाठीं आपलें सौख्य सोडावें ही सख्य भक्ति. (९) नववी भक्ति **आत्मनिवेदन**. ही मुख्य भक्ति होय. आत्मनिवेदना-शिवाय मुक्ति नाहीं. आत्मनिवेदन म्हणजे काय ? ‘ देवासी व्हावें आपण ’ तें व्हावें कसें ? ‘ करावें तत्त्व विवरण

म्हणजे कळे'. देवाला दारा, सुत, गृह, प्राण, वहावें हें थोडेसे समजतें, पण 'आपण वहावें' म्हणजे काय? तत्वांचें गांठोडें हें शरीर, यालाच आपण बहुधा 'आपण' म्हणतों. हा देह किती तत्वांचा बनला आहे व त्यांत 'आपण' आहोंत काय? हा विचार पंचीकरणानें करावा. पांच-भौतिक पिंडांत व ब्रह्मांडांत तत्वें किती आहेत याचा विचार करितां तत्वांच्या गलबल्यांत 'आपण' नाहीं. 'तत्वें तत्व जेव्हां सरे। तेव्हां आपण कैंचा उरे। आत्मनिवेदन येणें प्रकारें। सहजचि जालें.' सकल सृष्टि तत्वरूप आहे व तत्वें नाशिवंत आहेत व 'आपण' अविनाशी आहोंत. हा विचार दृढ झाला म्हणजे महावाक्याच्या विचारानें अविनाशी परब्रह्माशीं आपला समन्वय पहावा. 'आपण' तत्वांत नाहीं, तत्वांहून वेगळे आहोंत.

**आत्मा एक स्वानंदघन।**
**आणि 'अहमात्मा' हें वचन।**
**तरी मग आपण कैंचा भिन्न।**
**उरला तेंथें॥ १५॥**
**त्वंपद तत्पद असिपद।**
**निरसुनि सकळ भेदाभेद।**

**वस्तु ठायींची भेद ।**
**आपण कैचा? ॥ २० ॥**

स्वानंदघन परमात्मा ' एकमेवाद्वितीय ' आहे व ' अहमात्मा ' मी आत्मा–' आपण ' आत्मा, असें श्रुतीचें वचन आहे, अर्थात् ' आपण ' वेगळा उरतच नाहीं. 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यांतील त्वंपद ( जीव ) व तत्पद ( ब्रह्म ) यांतील भेद असिपदानें काढून टाकल्यावर म्ह० तूं तें ब्रह्म अहेस असें ऐक्य झाल्यानंतर शुद्ध वस्तूच उरते, ' आपण ' कोणी वेगळा उरत नाहीं–ही आत्मनिवेदनभक्ति होय. सायुज्य मुक्ति हीच. शब्दांत लिहिलें हें अनुभवाला आलें पाहिजे. श्रवणभक्तीपासून आरंभ व आत्मनिवेदनांत परिसमाप्ति. ' मना सज्जना ! भक्तिपंथेचि जावें ' तो भक्तिपंथ हा. हा नऊ पायऱ्यांचा सोपान चढून गेल्यावर श्रीहरि अनायासें पावतो म्ह० श्रीहरिवांचून (परब्रह्मावांचून) दुसरें कांहींच नाहीं, हा पूर्ण बोध ठसतो.

नवविधा भक्तीचें संक्षिप्त विवरण वर दासबोधांतील ४ थ्या दशकाच्या आधारें केलें आहे तें नीट ध्यानांत ठेवावें.

**आधीं अध्यात्मश्रवण ।**
**मग सद्गुरुपादसेवन ।**
**पुढें आत्मनिवेदन ।**

सद्गुरुप्रसादें ॥ ४० ॥
आत्मनिवेदना उपरी ।
निखळ वस्तु निरंतरीं ।
आपण आत्मा अंतरीं ।
बोध जाला ॥ द० ६ स० २-४१ ॥
आत्मनिवेदन होतां ।
देवभक्तांसी ऐक्यता ।
साचार भक्त विभक्तता ।
सांडून जाला ॥ द० ६ स० ३-३२ ॥

जड, चंचल व निश्चळ या तीन प्रकारांनीं आत्मनिवेदन कसें करावें हें द० १२ स० ३ व स० ५ मध्यें पहावें. विभक्तता सांडल्याशिवाय साचार म्ह० खरा भक्त होत नाहीं. नवविधाभक्तीवर समर्थांचा एक अभंग आहे तो देतोः—

श्रवण ह्मणजे ऐकतचि जावें ।
बरें विवरावें ग्रंथांतरीं ॥ १ ॥
ग्रंथांतरीं कळे तें सुखें बोलावें ।
कीर्तन जाणावें याचें नांव ॥ २ ॥
नांव घ्यावें साचें सर्वदा देवाचें ।
तिसरें भक्तीचें लक्षण हें ॥ ३ ॥

लक्षण चौथीचें तें ऐसें जाणावें ।
पाऊल सेवावें सद्गुरूचें ॥ ४ ॥
गुरुदेव पूजा तेचि तें अर्चन ।
सद्भावें वंदन नमस्कार ॥ ५ ॥
नमस्कार कीजे सर्व दास्यभावें ।
भक्तीचें जाणावें लक्षण हें ॥ ६ ॥
लक्षण हें सख्य आठवे भक्तीचें ।
सांगावें जीवींचें देवापाशीं ॥ ७ ॥
देवापाशीं होतां उरेना मीपण ।
आत्मनिवेदन रामदासी ॥ ८ ॥

सुलभरीत्या परमार्थाचा बोध व्हावा म्हणून समर्थांनीं चौदा ' ओव्या शतें ' केलीं आहेत. राघवाचा भक्तिपंथ कोणता याचा त्यांतून कांहीं बोध मिळाल्यास पाहूं.

(३) पावावया मुक्ती हरीचें भजन ।
श्रवण मनन सर्वकाळ ॥ २२ ॥
सर्वकाळ होय सार्थक श्रवणें ।
ब्रह्मनिरूपणें संतसंगें ॥ २३ ॥
संतसंगें ब्रह्मपद वोळखावें ।
विवेकें पावावें निरंजना ॥ २४ ॥

एकाएकी देव निर्मळ निश्चळ ।
आतुडें प्रांजळ दुजेंविण ॥ २६ ॥
दुजेवीण देव येकला येकट ।
उभा घनदाट मागेंपुढें ॥ २७ ॥

× × ×

( ४ ) आलया रे सांग तूं कोण आहेसी ।
वेगीं आपणासी ठाईं पाडी ॥ २ ॥
अभिमान देहीं कोण्या अवेवाचा ।
पांचा पंचकांचा स्थूळ देह ॥ ४ ॥
स्थूळ देह दृश्य याचा तूं जाणता ।
देह मी म्हणतां जीवदशा ॥ ५ ॥
पंचवीस तत्वें या लिंगदेहाचीं ।
साक्षी वेगळाची अनुभवें ॥ १२ ॥
अनुभवें साक्षी तूं स्थूळसूक्ष्माचा ।
जागृतीस्वप्नाचा जाणता तूं ॥ १३ ॥
तुझें रूप तुज दृश्य होत आहे ।
नेणपण पाहे साक्षिरूप ॥ १७ ॥
वेगळाचि तीहींदेहां विलक्षण ।
वर्तती आपण साक्षिरूपें ॥ १९ ॥

साक्षिरूप सर्व पदार्थ जाणता ।
तो कांहीं तत्वता आत्मा नव्हे ॥ २० ।
आत्मरूप मनबुद्धि अगोचर ।
आठव विसर जेथें नाहीं ॥ २२ ॥
निवृत्ति उन्मनी निःशब्द विज्ञान ।
ऐसें समाधान अनिर्वाच्य ॥ २५ ॥
अनिर्वाच्य तेथें नाहीं जाणपण ।
आपुलें आपण पुरातन ॥ २६ ॥
पाहे अहं ब्रह्म ऐसेंचि वचन ।
ब्रह्म सनातन तूंचि बापा ॥ ३९ ॥
आहे भक्ति ऐसी विवेकें जाणावी ।
आवडी धरावी शाश्वताची ॥ ४४ ॥
स्वरूपीं आसक्ती याचें नांव भक्ती ।
पाहतां विभक्ती जेथें नाहीं ॥ ४८ ॥
सर्वभावें सदा सगुणीं भजावें ।
कोरडें त्यागावें शब्दज्ञान ॥ ७० ॥
साधनाची वाट वोस पाडूं नये ।
सांडूं नये सोय सगुणाची ॥ १०१॥
मूढजन तरे साधनीं लागतां ।
पाविजे अनंता भक्तिपंथें ॥ १०४ ॥

भक्तिपंथें जातां होय सायुज्यता ।
निश्चयो तत्वता दास ह्मणे ॥ १०५ ॥
( ५ ) सुखी झाले संत शोधितां अनंत ।
कल्पनेच्या प्रांत परब्रह्म ॥ ५ ॥
सावधान आतां वृत्ति हे करावी ।
भक्ति वोळखावी नवविधा ॥ १० ॥
विचारणा करी श्रवण मनन ।
ध्यासें समाधान पाविजेते ॥ १३ ॥
हरिकथाभक्ति थोर कलियुगीं ।
कीर्तनाचे रंगीं देव आहे ॥ १६ ॥
पडों नये भ्रांति नामस्मरणाची ।
तृतीय भक्तीची वोळखण ॥ २२ ॥
रामनामवाणी त्या नाहीं जाचणी ।
नामें बहु प्राणी उद्धरले ॥ २७ ॥
उद्धरले संत सज्जन शोधितां ।
हेंचि जाण आतां चौथी भक्ति ॥ २८ ॥
सेवा सज्जनाची हे वाट भक्तीची ।
येथें संदेहाची उरी नाहीं ॥ २९ ॥
विधियुक्त पूजा देवा ब्राह्मणांची ।
संतसज्जनांची सर्वकाळ ॥ ३२ ॥

सर्वकाळ गोडी अर्चनीं आवडी ।
येणें होय जोडी ईश्वराची ॥ ३४ ॥
भक्ती सार जाण सर्वां नमस्कार ।
घाली अधिकार पाहोनियां ॥ ३७ ॥
दास्य करूनिया देवासीं पावले ।
ऐसे उद्धरले नेणो किती ॥ ४० ॥
सख्यत्व देवाचें भाग्येवीण कैचें ।
सांगावें जीवीचें देवापाशीं ॥ ४४ ॥
ईश्वरीं टाकितां संसारींचा भार ।
मग हा संसार सुखरूप ॥ ४६ ॥
सांगईन भक्ति सर्वांमध्यें सार ।
पावती साचार मुक्ति जेणें ॥ ४९ ॥
मावळे अज्ञान शुद्ध होय ज्ञान ।
आत्म विवेदन भक्ति सार ॥ ५१ ॥
भक्ति सार आहे जेथें द्वैत राहे ।
संतसंगें लाहे निजभक्ति ॥ ५२ ॥
निजभक्ति जेथें विभक्ती मावळे ।
ऐक्यरूपें कळे ज्ञान होतां ॥ ५३ ॥
ज्ञान होतां तुटे संसारबंधन ।
नाहीं समाधान ज्ञानेवीण ॥ ५४ ॥

नवविधा भक्ति केल्या होय मुक्ति ।
चळेना कल्पांतीं सायुज्यता ॥ ६५ ॥

× × ×

( ६ ) सांडूनिया दृश्य आणि मनोभास ।
मग जगदीश वोळखावा ॥ ६६ ॥
वोळखावें तया असावें अनन्य… …
( ८ ) वेदशास्त्रीं भक्ति राघवाची सार ।
तेणें पैलपार पाविजेतो ॥ ७ ॥
गुणेंचि निर्गुण कळे सर्व खुण ।
म्हणोनि सगुण देव धरी ॥ ४३ ॥
धरावा सगुण निर्गुणा कारणें ।
पावावें सगुणें निर्गुणासी ॥ ४५ ॥
स्वरूप रामाचें मनीं आठवावें ।
नाम उच्चारावें रात्रंदिस ॥ ९१ ॥
दिस ना रजनी मन ना उन्मनी ।
ज्ञाता जनीं वनीं सारिखाची ॥ ९२ ॥
सांडू नये भक्ति स्वधर्म विरक्ति ।
ब्रह्मज्ञान प्राप्ती रामदासी ॥ १०० ॥

मनोबोधांत मुख्यतः भक्तिपंथच सांगितला असल्यामुळें भक्तीचें स्वरूप यथार्थ कळावें म्हणून हीं अवतरणें घेतलीं

आहेत. दासबोधांतही ' भक्तीचेन योगें देव । निश्चयें पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं ' असें समर्थांनीं प्रथमच म्हटलें आहे. समर्थांची मुख्य शिकवण भक्तिपंथाचीच आहे. ज्ञानयुक्त भक्ति, अद्वैतभक्ति, अभेद-भक्ति, पराभक्ति, ज्ञानोत्तरभक्ति अशीं या भक्तीचीं नावें आहेत. ज्ञानेश्वर नाथतुकोबादि इतर महात्म्यांप्रमाणेंच समर्थांची या बाबतींत शिकवण आहे. हे सर्व सद्भक्त भागवत धर्मीयच आहेत यांत संदेह नाहीं. असो.

तुलसीदासरामायणांत ( उत्तरकांड ) रामराय स्वतः सांगतातः—

चौपाई

**जौ परलोक इहां सुख चहहू ।**
**सुनि ममवचन हृदय दृढ गहहू ।**
**सुलभ सुखद मारग यह भाई ।**
**भगति मोरि पुरान स्रुति गाई ॥**

जर इहपर लोकीं सुख प्राप्तीची चाड असेल तर माझें वचन ऐकून त्याची हृदयांत पक्की खूणगांठ बांधून ठेवा. बाबांनो, माझी भक्ति करणें हाच सुलभ, सुखद, सरळ मार्ग आहे. वेद व पुराणें हेंच सांगतात.

ज्ञान अगम प्रत्यूह अ:का।
साधन कठिन न मन कहँ टेका।
करत कष्ट बहु पावइ कोऊ।
भगतिहीन मोहि प्रिय नहि सोऊ॥

ज्ञानमार्ग दुर्गम असून त्यांना अनेक प्रत्यूह ह्म० विघ्नें असतात. तो साधणें कठिण असून त्यांत मन एकाग्र राहत नाहीं. अतिशय कष्ट करून तो एखाद्यालाच साधतो. त्यांतही जर भक्ति नसेल तर तो मला प्रिय नाहीं.

भगति सतंत्र सकलसुखखानी।
बिनु संतसंग न पावहि प्रानी।
पुन्यपुंज बिनु मिलहि न संता।
सतसंगति संसृतिकर अंता॥

भक्ति ही स्वतंत्र असून सर्व सुखांची केवळ खाण आहे, पण ती सत्संगावांचून मनुष्याला मिळत नाहीं. पुण्यसंचय पदरीं असल्यावांचून संतांची गांठ पडत नाहीं. पण सत्संग मिळाला कीं संसाराचा अंत झालाच.

राममुखानें हें भक्तिमाहात्म्य ऐकून शंकर म्हणतातः—

प्रेमभगति जल बिनु रघुराई।
अभि अंतर मलक बहु न जाई।
सोइ सर्वज्ञ तज्ञ सोइ पंडित।

**सोइ गुनगृह विज्ञान अखंडित ।**
**दच्छ सकललच्छनजुत सोई ।**
**जा के पदसरोजरति होई ॥**

हे रघुनाथा! कितीही जपतपादि साधनें केलीं, श्रुति-पुराणें पाहिलीं तरी भक्तिप्रेमजलावांचून अभ्यंतरींच्या म्ह० मनांतील मलाचें म्ह० पाप संस्कारांचें क्षालन कधींच होत नाहीं. तोच सर्वज्ञ, तोच पंडित, तोच गुणनिधान, तोच ज्ञानविज्ञानवान्, तोच दक्ष, तोच सर्वलक्षणसंपन्न—कीं ज्याच्या चित्तांत तुझ्या चरणकमलाविषयीं अत्यंत प्रेम उत्पन्न झालें आहे. काक भृशुंडी कथेंत पुनः म्हटलें आहेः—

**जप तप व्रत मख सम दम दान्त ।**
**बिरति बिबेक जोग विज्ञाना ।**
**सब कर फल रघुपतिपद प्रेमा ।**
**तेहि बिनु कोऊ न पावइ षेमा ॥**

जप, तप, व्रत, यज्ञयाग, शमदम, दान, वैराग्य, विवेक, योग, विज्ञान इ० सर्व साधनांचें फल हेंच कीं रघुपति-चरणीं प्रेम उत्पन्न व्हावें. त्याखेरीज कोणालाही क्षेमप्राप्ति व्हाणें नाहीं.

बाबांभक्तिपंथानें जावें खरें पण भक्ति कोणाची—सगुणाची कां आहे. क्वी? दोन्ही एक हाच सिद्धांत. एक अग्नि दारुगत

( काष्ठांतला ) व एक व्यवहारांतला असें दोन प्रकार दिसले तरी अग्नि एकच. हा सुंदर दृष्टांत देऊन तुलसीदास ( बालकांड ) म्हणतातः--

**सगुनहि अगुनहि नहि कछु भेदा ।**
**गावहि मुनि पुरान अरु बेदा ।**
**अगुन अरूप अलख अज सोई ।**
**भगतप्रेमबस सगुन सो होई ॥**

सगुण व निर्गुण यांत बिलकुल भेद नाहीं असें संत, पुराणें, व वेद सांगत आहेत. जो निर्गुण निराकार, अलक्ष्य व अज ( जन्मरहित ) असा आहे तोच परमात्मा भक्त प्रेमाला भुलून सगुणसाकार होतो.

तुळसीदासजींप्रमाणेंच सर्व संतांनीं सगुणनिर्गुणरूप परमात्म्याची भक्ति सांगितली आहे. ' मी एक वांचूनि कहीं । तया तयाही सगट नाहीं ', म्ह० आपणासगट विश्व ब्रह्मस्वरूप पाहतो तो भक्त व अशी माझी सहज/स्थिती ती भक्ति असें ज्ञानेश्वरमहाराज ( ज्ञाने० अ. १८ ) सांगतात. तुकोबाराय म्हणतातः--

**सगुण निर्गुण जयाचीं हीं अंगें ।**
**तोचि आम्हांसंगें क्रीडा करी ॥**

म्हणूनः—' **मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें !** '

निंद्य काय आणि वंद्य काय याविषयीं सामान्य जनांचे विचार न घेतां महाजनांच्या—सज्जनांच्या मताप्रमाणें चालावें हें श्रेयस्कर आहे. ‘ महाजनो येन गतः स पंथाः ’ म्ह० थोर सज्जन ज्या मार्गानें जातात, तोच मार्ग उत्तम, असें धर्मराजानें यक्षास उत्तर दिलेलेंच आहे ( महाभारत वनपर्व ). देवाची भक्ति करणें व सदाचारानें चालणें हें वंद्य व काम क्रोधादि विकारांना वश होणें हें निंद्य असें पुढील ७।८ श्लोकांत सांगतात. ( वंद्य काय हें पुढें श्लोक १०६ वरील ‘ तैसें निंद्य सोडून द्यावें। वंद्य तें हृदयीं धरावें ( दा. १३।१० टीपेंत पहा ).

३

**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ।**
**पुढें वैखरी राम आधीं वदावा ।**
**सदाचार हा थोर सोडूं नये तो ।**
**जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो ॥**

प्रभातकाळीं ( आंथरुणावरून उठल्यावर मुखमार्जनादि सारून ) श्रीरामाचें ध्यान करावें. मनांत आधीं रामाचें रूप आणावें, त्याचें चिंतन करावें आणि मग ( पुढें ) वाणीनें

त्याचें भजन करावें. सदाचाराला कधींच न सोडील तोच या लोकीं धन्य होईल.

'ब्राह्मे मुहूर्ते चोत्थाय चिंतयेदात्मनो हितम्' हा क्रम पुरातन आहे. निद्रा संपून जागृती आल्याबरोबर इंद्रियवृत्ति प्रायः प्रसन्न असतात. अशा वेळीं देवाच्या ध्यानांत मन गुंतवावें म्हणजे त्याची एकाग्रता लवकर होते आणि शिवाय व्यवहाराला लागण्यापूर्वी हरिध्यान व नामस्मरण यांच्या अभ्यासानें मन पवित्र संस्कारांनीं शुद्ध झालेलें असलें ह्मणजे प्रत्यक्ष व्यवहारांत रजतमांच्या विकारांनीं तें मलिन होण्याचा संभव फार कमी असतो. पांहटेस ध्यान, काकडआरती, धूपारती, भूपाळ्या, आरत्या, अभंग, पदें, श्लोक, करुणाष्टकें वगैरे ह्मटल्यानें सात्विक संस्कार उत्पन्न होतात व चित्तशुद्धि होऊन भगवत्प्रेम उत्तरोत्तर वाढीस लागतें. 'प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरामि करावें' ( दास० द० १२–९–९ ) 'प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें । यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी' ( द० ११–३–१५ ).

४

**मना वासना दुष्ट कामा नये रे ।**
**मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।**

## मना सर्वथा नीति सोडूं नको हो ।
## मना अंतरीं सारवीचार राहो ॥

बा मना ! दुष्ट वासना किंवा पापबुद्धि मुळींच धरूं नकोस. स्वधर्मकर्मे व नीति यांना सोडूं नकोस. अंतरांत सारभूत जो परमात्मा त्याचा विचार करीत जा.

देहासक्तीमुळें स्वतःचें हित साधण्यासाठीं मनुष्य दुसऱ्याचा घातपात करण्यासहि प्रवृत्त होतो व नानाविध पातकें करितो. पण पापाचें फल दुःख हें ठरलें असल्यामुळें दुष्ट व पापी मनुष्याला त्याच्या दुर्वासनेचीं व पापकर्मांचीं फळें भोगावीं लागतात. दुर्वासना दुसऱ्याचा घात करण्यापूर्वीं याचाच तीं घात करितात. म्हणून स्वपरांना दुःख देणारा पापमार्ग सर्वथा सोडावा. स्वधर्मप्रीति व सदाचार यांना धरून चालावें व सारासार विचारानें असार (संसार) याचा मनांतून त्याग करून सार ( श्रीहरि ) चित्तीं सांठवावा. तुकोबा म्हणतातः—

**फळकट तो संसार । येथें सार भगवंत ॥ १ ॥**

'जें अखंड होत जातें । जें सर्वदा संहारतें' म्ह० जड तें असार व जो एकाचि विस्तारला अंतरात्मा म्ह० चंचळ तें सार ( द० ११-४ ). पण चंचळही निश्चळाच्या दृष्टीनें

असारच आहे. ' निरसतां अवघेंचि निरसलें । चंचल तितुकें निघोन गेलें । निश्चळ परब्रह्म उरलें । तेंचि सार ' ( द० १३-१-१८ ). पांचभौतिक जड व अंतरात्मा चंचळ, हे दोनी असार व निश्चळ ब्रह्म सार. ' निर्गुण ब्रम्हाविगळें अवघें भ्रमरूप ' ( द० १२-६-२६ ). निश्चळ ब्रह्माचा विचार तो सारविचार.

५

**मना पापसंकल्प सोडूनि द्यावा**
**मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ।**
**मना कल्पना ते नको वीषयांची**
**विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ॥**

बा मना ! पापसंकल्प सोडून सत्यसंकल्प चित्तांत धरावा, विषयांची कल्पनाही मनांत आणूं नये, विकारवशतेमुळें जगांत मनुष्याची छीथू ( फजीती ) होते.

सत्यसंकल्प म्ह० शाश्वत सत्याचा म्ह० ब्रह्माचा संकल्प' व पापसंकल्प म्ह० मिथ्या संसाराचा किंवा विषयांचा संकल्प. ' सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प

संकल्प किंवा कल्पना हीच बंधाला व मोक्षालाही कारण आहे. ‘ संशय धरी आणि वारी । तेही कल्पना ’ ‘कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान ’ ब्रह्माची कल्पना शुद्ध व मायेची (द्वैताची) कल्पना अशुद्ध किंवा शबल (सबळ). ब्रह्माची कल्पना अद्वैताचें निरसन करून आपणही स्वस्वरूपीं मुरून जाते सत्य ब्रह्माची कल्पना निर्विकल्प ब्रह्मपदाला पाववितें व मिथ्या सृष्टीची किंवा द्वैताची कल्पना बंधनांत पाडते, म्हणून पहिली तारक व दुसरी मारक आहे. ( द० ७ स० ५ पहा ). तात्पर्यः—

**शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि जे कल्पी स्वरूप ।**
**स्वरूप कल्पितां तद्रूप । होय आपण ॥ २९ ॥**

तात्पर्य ‘असत्य ह्मणिजे पाप । सत्य ह्मणिजे स्वरूप ’ ( द० १८-५-२६ ). पापसंकल्प असत्यसंकल्प, मायेचा संकल्प, प्रत्यक्ष व्यवहारांत विषयासक्तिरूपानें प्रगट होत असल्यामुळें श्लोकाच्या उत्तरार्धांत विषयविकारांपासून अलिप्त राहण्याचा उपदेश केला आहे—‘ध्यायतो विषयान्पुंसः’ या श्लोकांत ( गीता० अ० २ ) विषयांचें ध्यान, ध्यानापासून संग, संगापासून काम, कामापासून क्रोध, क्रोधापासून संमोह, संमोहापासून स्मृतिभ्रंश, व अखेर

बुद्धिनाश व शेवटी पतन कसें होतें हें क्रमानें सांगितलें आहे.—

सांडून राम आनंदघन।  
ज्याचे मनीं विषयचिंतन।  
त्यासी कैंचें समाधान।  
लोलंगतासी ॥ ६२ ॥  
विषयजनित जें जें सुख।  
तेथेंचि होतें परमदुःख।  
पूर्वीं गोड अंतीं शोक।  
नेमस्त आहे ॥ ६५ ॥ ( द० ३ स० १० )

६

नको रे मना क्रोध हा खेदकारी  
नको रे मना काम नानाविकारी।  
नको रे मना सर्वथा अंगिकारू  
नको रे मना मत्सरु दंभभारू ॥

रे मना! हा दुःख देणारा क्रोध, हा नानाविकारी काम, हा मद, हा मत्सर, हा दंभभार—इ० षड्रिपूंपासून पूर्णपणें ( सर्वथा ) दूर रहा.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सहा विकार मुमुक्षूंनीं अवश्य जिंकले पाहिजेत. 'त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः' ( गीता अ. १६–२१ ) ह्म० नरकाचें दार व आत्मनाशाचें बीज असें देवांनीं कामादिविकारांचें वर्णन केलें आहे दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य (कठोर॰ पणा ), व अज्ञान हे आसुरी संपत्तीचे गुण आहेत ( अ० १६ श्लोक. ४ ) या दोन्ही श्लोकांवरील ज्ञानेश्वरमहाराजांची टीका पहावी व समर्थांचें षड्रिपुवर्णन वाचावें, म्हणजे अनंताच्या व आपल्या आड केवढाले क्रोधादि पर्वत पडले आहेत हें कळून येईल. ह्या षड्रिपूंचीं परस्पर नातीं कशीं आहेत हें एकच उदाहरण घेऊन सांगतों. एक उत्तम हिरा आहे. तो पाहिल्यावर हवासा वाटणें हा **काम**; तो न मिळाला तर **क्रोध** व मिळाला तर आणखी तसेच हिरे मिळावे हा **लोभ**; त्या हिऱ्याविषयीं देहगेहांहून अधिक प्रेम वाटणें हा **मोह**; तो आपल्याजवळ आहे व दुसऱ्या कोणाजवळ नाहीं असा डौल वाटणें हा **मद**; व दुसरा कोणी आपल्याहून बलिष्ठ तो हरप्रयत्नानें नेईल अशी भीति वाटणें अगर तसलाच किंवा त्याहून भारी हिरा दुसऱ्याजवळ आहे असे कळल्यावर चैन न पडणें हा **मत्सर**; याप्रमाणें एकच हिरा सहाही विकार मनांत उत्पन्न करूं

शकतो ! ह्या षड्विकारांचा राजा काम आहे. तोच आत्मनिश्चय बळकट करून जिंकला म्हणजे सर्व अधःपात टळेल.

**दंभ दर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन ।**
**हे अज्ञानाचे लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें॥२**

( द. १२ स. १

७

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें**
**मना बोलणें नीच सोशीत जावें**
**स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें**
**मना सर्व लोकांसि रे निववावें ॥**

करावी कीं
राहतील.
दनासारखें

मना ! चित्तांत श्रेष्ठ ह्म० सात्विक धैर्य धरावें द्
त्यांनीं नीच दुरुत्तरें केलीं तरी तीं शांतपणानें स
ध्यावीत आणि स्वतः मात्र नम्र भाषण करून सर्व लोकां
अंतःकरणांना संतोषित करावें.

त्क्रिये-
फल
ंडन
ंक-

श्रेष्ठ धारिष्ट ह्म० सात्विक धैर्य. आत्मनिष्ठेच्या योग मन, प्राण व इंद्रियें यांचे व्यापार स्वाधीन करून घे याचें नांव सात्विक धृति ( गीता अ० १८-३३ ) ह्म० आत्मस्वरूपाची बैठक अढळ ठेवून चित्तवृत्ति कह्यांत

ठेवणें हें श्रेष्ठ धारिष्ट. दुसऱ्याच्या दुष्ट दुरुक्ति निष्कंप-चित्तानें सहन करायच्या व आपण उलट मृदुमधुर भाषणांनीं परचित्त संतुष्ट ठेवायचें हें काम श्रेष्ठ धारिष्ट अंगीं असल्यावांचून व्हायचें नाहीं व आत्मबलाशिवाय श्रेष्ठ धारिष्ट येत नाहीं.

**चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे**
**तेणें जन परावे । आपले होती ॥**
(दास० १५-६-२२)

**सकलांसी नम्र बोलणें ।**
**मनोगत राखोन चालणें** (दा. १९-३-१६)

**उदंड धिक्कारून बोलती ।**
**तरी चळों न द्यावी शांती ।**
**दुर्जनांसी मिळोन जाती ।**
**धन्य ते साधु ॥** (द० १२-१०-१६)

**ह्मणोनी दुर्वाक्य न बोलावें ।**
**पराचें आपण साहीत जावें ।**
**याहूनि श्रेष्ठ साधन बरवें ।**
**भुवनत्रयीं असेना ॥** (मुक्तेश्वर)

८

**देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी**
**मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।**
**मना चंदनाचेपरी त्वां झिजावें**
**परी अंतरीं सज्जना नीववावें ॥**

सज्जना मना ! जन्मभर अशी सत्क्रिया करावी कीं देहत्यागानंतर लोक आपली कीर्तिच गात राहतील. बापा ! स्वत: कायावाचामनानें परकार्यार्थ चंदनासारखें झिजावें पण सज्जनांना अंतरीं संतोषवावें.

कीर्तीसाठीं सत्क्रिया आचरायची नाहीं, तर सत्क्रियेसाठींच सत्क्रिया करायची. कीर्ति हें तिचें आनुषंगिक फल होय. चंदनवृक्ष हा फलकुसुमवर्जित असून परतापखंडन करणारा, शीतल, परोपकारी व 'सेव्यःस्यादिह सर्वलोकमनसामानंदनश्चंदनः' असा सर्वजनप्रिय आहे.

**मरणाचें स्मरण असावें ।**
**हरिभक्तीस सादर व्हावें ।**
**मरोन कीर्तीस उरवावें ।**
**येणें प्रकारें ॥ १३ ॥** (दा. द. १६-१०)

स्वयें आपण कष्टावें ।
बहुतांचे सोसित जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें ।
नानाप्रकारें ॥ १८ ॥ ( द० १२-१० ).

जिकडे तिकडे कीर्ती माजे ।
सगट लोकांस ह्व्यास उपजे ।
लोक राजी राखोन कीजे ।
सकळ कांहीं ॥ ( द० १९-७-२० )

९

नको रे मना द्रव्य तें पूढिलाचें
अती स्वार्थबुधीन रे पाप सांचे ।
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें
न होतां मनासारिखें दुःख मोठें ॥

बा मना ! दुसऱ्यांचें ( पुढिलांचें ) द्रव्य नको, परद्रव्याचा अभिलाष करूं नकोस. अतिस्वार्थबुद्धीमुळें तें पाप सांचत जातें. ज्यानें पापफळ भोगावें लागतें तें कर्म वाईट, खोटें म्ह० ( निंद्य ) होय, स्वार्थबुद्धि बाळगूनही मनासारखें घडून आलें नाहीं ह्मणजे फार दुःख मात्र

होतें. तात्पर्य पाप व दुःख देणारी स्वार्थबुद्धि सोड परद्रव्याभिलाष करूं नकोस. ' मा गृधःकस्यस्विद्ध-नम् ' असें ईशावास्योपनिषदांत पहिल्याच मंत्रांत सांगि-तलें आहे. मनुष्याला पुण्य न करितां पुण्यफळ पाहिजे असतें, व तो पाप आचरीत असून त्याचें फळ मात्र त्याला नको असतें. विद्यारण्यस्वामी म्हणतात.

**पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः।**
**न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नतः ॥**

' पुण्याचें फळ तें सुख । पापाचें फळ तें दुःख ' ह्मणून दुःख नको असेल तर पाप करूं नकोस. अति स्वार्थबुद्धि पापमूलक आहे. ' लोभमूलानि पापानि !'

१०

**सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी**
**दुःखाची स्वयें सांडि जीवीं करावी ।**
**देहेदुःख हें सूख मानीत जावें**
**विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें ॥**

सर्वकाळ रामप्रीतीनें चित्त रंगवावें व मनांतून ( जीवीं ) सर्व दुःखांची आठवणच काढून टाकावी, इतकेंच काय

पण देहाला दुःख झालें तर (त्यामुळें देहासक्ति कमी होते व देव आठवतो म्हणून) तें सुखच मानावें, आणि देह अनित्य आहे व आत्माराम नित्य (शाश्वत) आहे असा विवेक करून नित्य अशा आत्मारामाच्या–स्वस्वरूपाच्या–चिंतनांत मग्न व्हावें.

**सांडूनि आपली संसारव्यथा ।**
**करीत जावी देवाची चिंता ।**
**निरूपण कीर्तन कथावार्ता ।**
**देवाच्याचि कराव्या ॥** दास० ४–८–

दुःखाच्या आठवणीनें दुःखच वाढत जातें व दुःख करायची संवय झाली म्हणजे स्वरूपानुसंधानाला खंड पडतो. 'स्वस्वरूपानुसंधान' हीच पराभक्ति होय असें आचार्यांनीं म्हटलें आहे व 'स्वस्वरूपानुसंधानें तरे । प्राणिमात्र' असें समर्थांचें वचन आहे. देहदुःखाच्या आठवणीनें देहबुद्धि वाढते व देहबुद्धि मोडून आत्मबुद्धि करायची आहे म्हणून देहदुःखाची कदर बाळगूं नये, सुखस्वरूप रामाचें चिंतन करावें भागवतांत (स्कंध १२–७–४६):–

**'यदुत्तमश्लोकगुणानुवर्णनम् ।**
**समस्तसंसारपरिश्रमापहम्'**

जीवासी जीवत्व-अभिमान ।
तंवचि वर्ते कर्माधीन ।
स्वरूपीं लागल्या अनुसंधान ।
सुखदुःख असेना ॥ ५ ॥

१२

**मना मानसीं दुःख आणूं नको रे**
**मना सर्वथा शोक चिंता नको रे ।**
**विवेकें देहेबुद्धि सोडूनि द्यावी**
**विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥**

मना ! मानसीं दुःख आणूं नकोस ह्म० चित्तांत दुःखाचेंच चिंतन करून कढत बसूं नकोस. मना शोक आणि चिंता यांना चित्तांत मुळींच थारा देऊं नकोस. ( दुःख, शोक, चिंता केवळ देहबुद्धीमुळें उत्पन्न होतात म्हणून ) विवेकानें देहबुद्धि सोडून आपण देहातीत आत्माराम आनंदस्वरूप आह्मों अशा विचारानें मुक्तिसुख भोग.

**दुःख** वर्तकानकाळीं अप्रिय घडलेल्या गोष्टींबद्दल, **शोक** भूतकाळीं झालेल्या लाभहानींबद्दल व **चिंता** भविष्यकाळीं येणाऱ्या आपत्तींबद्दल-याप्रमाणें वर्तमान

भूत भविष्य काळच्या सकलदुःखांबद्दल मनुष्य केवळ देहबुद्धीमुळें विचार करीत असतो.

**गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिंतयेत् ।**
**वर्तमानेन कालेन प्रवर्तन्ते विचक्षणाः ॥**

गतगोष्टींबद्दल शोक करूं नये, भविष्यकालीन गोष्टींची चिंता करूं नये, वर्तमानकाळ भोगून सारावा आणि चित्त स्वरूपीं लावावें.

**देहबुद्धीनें बांधला ।**
**तो विवेकें मोकळा केला ।**
**देहातीत होतां पावला ।**
**मोक्षपद ॥ दास० ६-२-३६ ॥**

'तत्र को मोहःकःशोकः एकत्वमनुपश्यतः' ( ईशावास्य ). 'मां प्रपन्नो जनः कश्चिन्न भूयाऽर्हति शोचितुम्' ( श्रीभागवत १०-५१-४५ )

१३

**मना सांग पा रावणां काय जालें ।**
**अकस्मात तें राज्य सर्वे बुडालें ।**
**म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं ।**
**बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥**

मना ! रावणाचा परिणाम काय झाला तो पहा. एवढें ( चौदा चौकड्यांचे ) राज्य पण वेळ येतांच–पापाचा घडा भरतांच ( अकस्मात् ) तें पार नाहींसें झालेंच कीं नाहीं ! ह्मणून दुर्बुद्धि ( कुडी ह्म० वाईट वासना ) सोड. काळ हा बळेंच सर्वांच्या पाठीं लागला आहे. सर्व कालवश आहेत हें जाणून दुर्वासनेचा त्याग कर. ऐश्वर्याची घमेंड व कुडी वासना सोड. समर्थ ' पंचमान ' प्रकरणांत ह्मणतातः—

**राहिला कोण ये लोकीं । संहार रावणादिकां ।**
**इतर कोण तो लेखा । नेणतीं मूढ माणसें ॥**
**मी मोठा मी मोठा वाटे । न शोधितां वसुंधरा ।**
**चालिला गर्व कोणाचा । काळ हा घसरी जना ॥**

१४

**जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला ।**
**परी सेवटीं काळमूखीं निमाला ।**
**महा थोर ते मृत्युपंथेंचि गेले ।**
**कितीयेक ते जन्मले आणि मेले ॥**

पूर्वकर्मानुरूप जीव जन्म घेऊन येतो पण शेवटीं काळानळाच्या तोंडीं ( लोण्याच्या गोळ्यासारखा ) जाऊन

पडतो. मोठमोठे मृत्युमार्गानेंच गेले आहेत, मृत्यु कोणा-सही सोडीत नाहीं. आजवर असंख्य प्राणी आले आणि गेले.

दासबोधाचा (द० ३ स० ९) मृत्यूवरचा समास वाचून पहावा. 'अनंताचि झाले जन्मोनीयां मेले । होवो-नीयां गेले रावरंक ॥' (तुकाराम). स्वरूपाकार झालेले आत्मज्ञानी तेवढे आत्मरूप होऊन राहिले. बाकीचे सर्व कालवश झाले. सर्वांस मागे पुढे जायचें आहे हें जाणून स्वहित करावें ह्म० विवेकें स्वरूपीं भरावें.

१९

**मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ।**
**जिता बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव हे सर्वही मानिताती ।**
**अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥**

मना ! ही मृत्युलोकची वस्ती अशाश्वत आहे. जिवंत-पणीं मात्र जो तो आढ्यतेनें 'मी मी' करीत असतो, आपण चिरंजीव आहोंत, असे समजून संसारांत दंग होऊन राहतो, पण काळाची उडी पडतांच एकदम् सर्व येथेंच टाकून प्रत्येकाला जावें लागतें.

'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' 'मृत्युर्जन्मवतां सदा' इ० वचनें प्रसिद्ध आहेत. मी-पणाला वावच कोठें आहे? 'चित्रीं लिहिलीं सेना। त्यांत कोण थोर कोण साना?'

जो जन्मासी येऊन गेला।
तो मी थोर ह्मणतांच मेला। द० ६-४-१८

१६

**मरे येक त्याचा दुजा शोक वाहे**
**अकस्मात तोही पुढें जात आहे।**
**पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें**
**म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें॥**

एक मरतो व दुसरा त्याच्यासाठीं शोक करीत आहे तोंच तोही त्याच्या मागोमाग (पुढें) मरून जातो. संसाराचा लोभ सुटत नाहीं, लोभामुळें ह्म० अतृप्तीमुळें वृत्तिक्षोभ होऊन वासना बळावते व त्याला पुन्हा जन्मास घालते.

वासनेमुळें जीव जन्ममरणाच्या यातायातींत पडतो. 'जन्म घेणें लागे वासनेच्या संगें' असें तुकोबा ह्मण तात. जन्माच्या पाठीं मृत्यु व मृत्यूच्या पाठीं जन्म

अशी ही जन्ममरणपरंपरा केवळ वासनेमुळें जीवाच्या मागें लागली आहे. वासनात्मक सूक्ष्म लिंगदेह जळून भस्म झाल्यामुळें तुकोबानीं 'मरणाहातीं सुटली काया' 'मरण माझें मरोन गेलें' 'आपलें मरण पाहिलें म्यां डोळां' असले उद्गार काढले आहेत.

१७

**मनीं मानव व्यर्थ चिंता वाहातें**
**अकस्मात होणार होऊनि जातें ।**
**घडे भोगणें सर्वही कर्मयोगें**
**मतीमंद तें खेद मानी वियोगें ॥**

हा क्षुद्र मनुष्यप्राणी ( हें मानव ) व्यर्थच काळजी करीत बसतो. होणाऱ्या गोष्टी व्हायच्या तशाच होऊन जातात. पूर्वकर्मानुसार सर्व कांहीं जीवाला भोगावें लागतें, भोग कांहीं याचा सुटत नाहीं, आणि हा जडात्मा मात्र मृत्युजन्य वियोगामुळें रडत कढत बसतो.

ह्याच अर्थाचे दोन श्लोक करुणाष्टकांत समर्थांनीं घातले आहेतः—

**जनीं संचितें पिंड निर्माण जाला**
**मनीं तेंचि भोगावया जीव आला ।**

२५८२

शुभाशूभ होणार कांहीं कळेना
पुढें प्राप्त ब्रह्मादिकांही टळेना ॥ २४-१ ॥
ह्मणे दास उदास होई मना रे
बहूसाल चिंता नको कामना रे।
स्वभावेंचि होणार तें होइना कां
अकस्मात जाणार तें जाइना कां ॥ २७-२ ॥

१८

मना राघवेवीण आशा नको रे
मना मानवाची नको कीर्ति तूं रे।
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ॥

मना ! तूं श्रीरामावांचून कोणाचीही आशा करूं नकोस, मनुष्यांचीं स्तुतिस्तोत्रें गात त्यांच्या भोंवतीं नाचूं नकोस. वेदशास्त्रपुराणें ज्या रामाचे भाट झाले आहेत त्याचे गुणानुवाद गात॰आयुष्य त्याच्या सेवेंत वेंचशील तर सर्व कांहीं गोड ( श्लाघ्यवाणें ) होईल.

इष्टमित्र, गणगोत, धन, विद्या इ०च्या आशेंत न गुंततां सर्वभावें रामाला शरण जा, त्याचा यशकीर्ति-

प्रतापमहिमा गा, ह्मणजे तुझ्या संसाराचें सोनें होईल. समर्थ ह्मणतात:—

सेवकू मानवीयांचें । कष्टती बहुतांपरी ।
( पण मी ) सेविला देव देवांचा ।
तेणें मी धन्य जाहलों ॥

१९

मना सर्वथा सत्य सोडूं नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे ।
मना सत्य तें सत्य वाचे वदावें ।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥

मना ! सत्य जें परब्रह्म त्याला तिळभरही विसंवूं नकोस व मिथ्या मायेचा बडेजाव वाढवूं नकोस. वाचेनें सत्य तें सत्य आहे ह्मणूनच सांगावें व असत्य तें असत्य आहे म्हणूनच टाकावें. ( दास० १०-१०-५५ ):—

सत्य ह्मणिजे स्वरूप जाण ।
असत्य माया हें प्रमाण ।

राजहंस दूध व पाणी वेगळें करतात, किंवा अग्नींत शुद्ध सोनें व अशुद्ध सोनें यांचा निवाडा होतो, किंवा

पांखडतांच बी आणि भूस निराळें होतें ' तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंच सहजें सांडवलें। मग तत्वता तत्व उरलें। ज्ञानियासि ' ( ज्ञाने० अ० २-१३१ )

**सत्य तें जाणिजे ब्रह्म। मिथ्या माईक दृश्य तें।**
**दृश्यभास मुळीं नाहीं। मायातीत निरंजनु॥**
**( चतुर्थमान ).**

२०

**बहू हिंपुटी होइजे मायपोटीं**
**नको रे मना यातना तेचि मोठी।**
**निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं**
**अधोमूख रे दुःख त्या बाळकासी।**

मना! (मिथ्या प्रपंचाविषयीं विरक्त होण्यास आणखी एक कारण सांगतों. ) अरे! जन्मकाळच्या यातना किती आहेत पहा बरें! आईच्या ऊदरीं नऊ महिने अत्यंत दुःखकष्ट काढावे लागतात, त्यासारख्या यातना नाहींत. गर्भांत असतांना चहूंकडून जीव कोंडला जाऊन ( निरोधें ) नुस्ता उकडून निघतो ( पचे ), व अधोमुख होतांना तर त्या बाळकाला अत्यंतात्यंत वेदना काढाव्या लागतात.

गर्भवास व जन्म यांचें सविस्तर वर्णन दासबोधांत द० ३ स० १ मध्यें पहावें. ' जन्म होंचि विस्मरण । ईश्वराचें '

ऐसिये कारागृहीं वस्ती ।
नवमास भोगिल्या विपत्ती ।
नवही द्वारें निरोधती । वायु कैंचा तेथें ॥ २९ ॥
वोकांनरकांचे रस झिरपती ।
ते जठराग्नीस्तव तापती ।
तेणें सर्वही उकडती । अस्थिमांस॥३०॥ इ० इ०

२१

**मना वासना चूकवीं येरझारा**
**मना कामना सांडिं रे द्रव्यदारा ।**
**मना यातना थोर हे गर्भवासीं**
**मना सज्जना भेटवीं राघवासी ॥**

मना ! वासनेच्या योगानें येणाऱ्या जन्ममरणांच्या येरझारा चुकीव, द्रव्यदारांच्या कामना सोड, गर्भवासाच्या यातना भयंकर आहेत म्हणून ( या वासना, व यातना ) यांतून कायम सुटण्यासाठीं बा मना ! राघवाची भेट करून दे.

२२

मना सज्जना हीत माझें करावें
रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।
महाराज तो स्वामि वायूसुताचा
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥

भल्या मना ! माझें ऐवढें हित कर. कोणतें हित ? तर श्रीरामाला चित्तांत बळकट धरून ठेव. वायुसुताचा स्वामी—ह्म० मारुतियारायासारख्यांनीं ज्याचें दास्य पत्करलें त्या त्रैलोक्याधिपति रामरायानें जनांचा उद्धार करण्याचें ब्रीद घेतलें आहे. तुकोबा म्हणतातः—

सांठविला हरी । जेणें हृदयमंदिरीं ॥ १ ॥
त्याची सरली येरझार । झाला सफळ संसार॥२॥

२३

न बोलें मना राघवेंवीण कांहीं
जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं ।
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ॥

मना राघवावांचून कांहीही बोलूं नकोस, वायफळ गोष्टी

बोलण्यापासून कांहीं सुखलाभ घडत नाहीं, आयुष्य मात्र व्यर्थ जातें. आयुष्याची घडीने घडी साधावी, नाहीं तर काळ आयुष्य खाऊन टाकीत जातो. देह-पाताचा समय आला ह्मणजे तुला सोडवायला कोण येईल ? रामावांचून सोडविणारा कोणीही समर्थ नाहीं.

**काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥**
**कांहीं धांवाधांव करीं । जंव तो काळ आहे दुरी २**

शेवटल्या चरणाचें स्पष्टीकरण तुकोबा करितातः—

**नको नको मना गुंतूं मायाजाळीं ।**
**काळ आला जवळी ग्रासावया ।**
**काळाची हे उडी पडेल वा जेव्हां ।**
**सोडवीना तेव्हां बापमाय ॥ इ० इ०**

२४

**रघूनायकावीण वायां सिणावें**
**जनासारखें व्यर्थ कां वोसणावें ।**
**सदा सर्वदा नाम वाचें वसो दे**
**अहंता मनीं पापिणी ते नसों दे ॥**

मना ! राघवावांचून दुसऱ्या फालतु गोष्टी बोलण्यांत व

सामान्य जनांप्रमाणें व्यर्थ वाचेची चावटी करण्यांत (वोसणावें=वरळावें ) काय लाभ आहे ? कांहीं नाहीं. रामनाम सर्वकाळ वाणींत राहूं दे, व भेदभाव वाढविणारी पापमूलक अहंता चित्तांत ठेवूं नकोस.

२५

मना वीट मानूं नको बोलण्याचा
पुढें मागुता राम जोडेल कैंचा ? ।
सुखाची घडी लोटतां सूख आहे
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ॥

मना ! ह्या माझ्या बोलण्याचा कंटाळा मानूं नकोस. उबग मानून रामनाम घेण्याचा आळस करशील तर पुढें राम कसा बरें जोडेल ? सुखांत काळ चालला आहे यावर विश्वसून राहूं नकोस. हीं सुखसाधनें व आयुष्य अखेरपर्यंत टिकणारीं नाहींत.

२६

देहेरक्षणाकारणें यत्न केला
परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।
करीं रे मना भक्ति या राघवाची
पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची ॥

देहरक्षणाचा अटोकाट यत्न केला तरी काळ हा त्याला शेवटीं घेऊन जाणारच. देह हें काळाचें भातुकें आहे, हें जाणून मना! राघवाची भक्ति कर ह्मणजे तुला जन्माची अर्थात् जन्ममरणाची–संसाराची चिंता करणें नको.

२७

**भवाच्या भयें काय भीतोस लंडीं**
**धरीं रे मना धीर धाकासि सांडीं।**
**रघूनायकासारिखा स्वामि शीरीं**
**नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥**

हे भित्र्या ( लंडी )! भवाच्या भयानें भयभीत काय झाला आहेस? मना! दे भीति टाकून, धर धीर. अरे! रघुनाथासारखा स्वामी शिरावर असतांना तो प्रत्यक्ष यम (दंडधारी काळ) कोपला तरी आपल्या दासाची उपेक्षा करीत नाहीं, ह्मणून रामाचा दास हो.

# ३ राघवाचा पंथ—सगुणभक्ति
# ( २८—१३५ )

## १ नुपेक्षी कदा राम दासाभिमानी (२८-३७)

( हे मना ! दासांचा अभिमानी राम शरणागताची ह्म० आपल्या भक्ताची कधीही उपेक्षा करीत नाहीं हें तूं पळभरही विसरूं नकोस. तुला दहा वेळ निश्चयात्मक सांगतों कीं राम भक्ताची उपेक्षा कालत्रयीं करीत नाही यावर विश्वास ठेवून रामाला शरण जा. )

२८.

**दिनानाथ हा राम कोदंडधारी**
**पुढें देखतां काळ पोटीं थरारी ।**
**जना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

रामाचा प्रताप एवढा थोर आहे कीं त्याची ती कोदंड ( धनुष्य ) हातीं धरणारी वीरमूर्ती पाहतांच प्रत्यक्ष सर्वभक्षक यमराजालाही भयानें कांपरें भरतें. हें वाक्य निरपवाद ( नेमस्त ) सत्य समज, या गोष्टीला तुला

एकही अपवाद सांपडणार नाहीं. राम दासाचीं उपेक्षा करीत नाहीं.

२९

**पदीं राघवाचे सदा ब्रीद गाजे**
**बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे ।**
**पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

रामाच्या पायांतला तोडर भक्तरक्षण करण्याचें रामाचें ब्रीद गर्जून त्रिभुवनाला सांगत आहे. भक्तांचें जे शत्रु असतील त्यांच्या मस्तकांवर रामाच्या हातांतला धनुष्यदंड ( कांबि, धनुष्याची कांब ) ताडकन् बसतो व भक्तरिपूंचा क्षणांत चुराडा होऊन जातो. ( रामाचा दरारा काळालाही एवढा मोठा आहे कीं काळाची त्रिभुवनावर सत्ता चालत असतांनाही ) रामानें आपल्या अयोध्यापुरींतले सर्व लोक विमानांत घालून खुशाल वैकुंठाला नेले !

पुढें श्लोक ४२ मध्यें ' दिनानाथ हें तोडरी ब्रीद गाजे' असा चरण आहे. ( युद्धकांड १३–७८ ):–

**पडें सांकडें सर्वदा सेवकांचें ।**
**दिनानाथ हें ब्रीद विख्यात साचें ।**

मनामाजि ते जैसजैसी अपेक्षा ।
करीना कदा राम त्याची उपेक्षा ॥

३०

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे? ।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

माझा हा राम परमसमर्थ आहे. रामाच्या सेवकाकडे वांकड्या नजरेनें पाहील असा त्रिभुवनांत कोण आहे ? रामाची लीला त्रैलोक्यांतले देव, मानव, दानव ( सात्विक, राजस व तामस तीनही प्रकृतीचे यच्चावत् प्राणी ) गाऊन राहिले आहेत.

शंकरानें शतकोटि रामायण तीन लोकांना वांटून दिल्यामुळें त्रैलोक्यांत रामाचें यश गायला सर्वांना सुलभ साधन झालें आहे.

रामाचें चरित्र सांगतां अपार ।
जाहला विस्तार तिन्ही लोकीं ॥

## ३१

**महासंकटीं सोडिलें देव जेणें**
**प्रतापें बळें आगळा सर्वगूणें ।**
**जयातें स्मरे शैलजा शूळपाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

ज्या रामानें थोर संकटांतून ( रावणाला मारून ) देवांना बंधमुक्त केले असा माझा राम प्रताप, बल इ० सर्व गुणांत सर्वांहून अत्यंत श्रेष्ठ ( आगळा ) आहे ( तो खरोखरीच 'एकमेवाद्वितीय' आहे–त्याची बरोबरी करणारा त्रिभुवनांत कोणी नाहीं ) पर्वतकन्या पार्वती व तिचा पति शंकर ( शूळपाणी–ज्याच्या हातांतला शूळच त्याच्या पराक्रमाची जाणीव करून देत असतो ) म्ह० शिव-शक्तिही ज्या परमात्मा रामाचें ध्यान निरंतर करीत असतात, असा महाप्रतापी व सर्ववंद्य राम दासांची उपेक्षा करीत नाहीं. ह्मणून मना तूं त्याचा अनन्यभक्त हो.

रावणानें देवांना बंदींत घालून हवीं तीं नीच कामें त्यांजकडून करून घेतलीं. 'बहू कठीण काळ हो । समस्त पावले मोहो । हिनादिनाचिया परी । सदा गळीत अंतरीं ॥'

अशा तऱ्हेनें देव गांजले होते तेव्हां रामावतार झाला व रामानें रावणादि राक्षसांचा संहार करून देवांना सोडविलें.

३२

**अहल्या शिळा राघवें मुक्त केली**
**पदीं लागतां दिव्य होऊनि गेली।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

असा प्रतापी व शिवशक्तींनाही परमपूज्य राम किती भक्तवत्सलही आहे याचें एक उदाहरण सांगतों. गौतमपत्नी अहल्या पतिशापानें शिळा होऊन पडली होती. (रामलक्ष्मण विश्वामित्राबरोबर मिथिला नगरीस सीतास्वयंवरासाठीं जात असतांना वाटेंत विश्वामित्राच्या सांगण्यावरून ) रामरायाचा चरणस्पर्श होतांच अहल्या उद्धरून गेली. ( यावरून रामचरणाचा महिमा, रामाचें पतितपावनत्व व भक्तवात्सल्य प्रतीत होतात. एकच अहल्याशिळा उद्धरली असें नव्हे, तर रामचरणस्पर्शानें किती शिळा उद्धरल्या आहेत, किती पाषाणांचे (जड मूढांचे) देव झाले आहेत ) हें ध्यानीं धरून बा मना ! रामाला शरण

जा. रामाचे अनंत गुण वानतां वानतां वेदवाणीही थकून गेली आहे.

गौतमानें अहल्येस शाप दिला तो असा:—

**वायुभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी।**
**अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्निवत्स्यासि**

( वाल्मीकिरामा. बाल. सर्ग ४८ )

रामानें 'ददर्श स महाभागां तपसा द्योतितप्रभाम्'(४९)

३३

**वसे मेरु मांदार हे सृष्टिलीला**
**शशी सूर्य तारांगणें मेघमाळा।**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

सृष्टिरचनेंतल्या परमात्म्याच्या अनंत लीलांपैकीं मेरु-मांदारादि पर्वत, चंद्रसूर्य तारांगणें व मेघमाला, जोंवर आहेत तोंवर रामानें आपले दोन भक्त—मारुतिराय व बिभीषण—त्यांना चिरंजीव करून ठेवलें आहे, ह्म० राम-कृपेनें त्यांवर काळाची सत्ता चालली नाहीं. ( ज्याच्या दासांवर काळाची सत्ता चालत नाहीं व ज्याला पाहतांच काळ पोटीं थरारतो त्या रामाला ) हे मना! तूं शरण जा.

रामानें मारुतिरायाला वर दिला तो असा आहे:—

**यावच्चंद्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी ।**
**यावन्ममकथा लोके तावद्राज्यं करोत्यसौ ॥**

( अध्यात्मरामा० युद्ध० ३-४३ )

३४

**उपेक्षा कदा रामरूपीं असेना**
**जिवां मानवां निश्चयो तो वसेना ।**
**शिरीं भार वाहेन बोले पुराणीं**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

राम कधींच भक्ताची उपेक्षा करीत नाहींत, पण मनुष्याचाच याबद्दल निश्चय होत नाहीं याला कांहीं उपाय नाहीं. मी भक्तांचा योगक्षेम वाहतो, त्यांचा सर्वभार वाहतों, अशी रामरायांनीं पुराणांतून अनेकवार वचनें दिलीं आहेत.

**अनन्यांश्चिंतयन्तो मां ये जनाःपर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

**संसारीचें ओझें वाहतां वाहवीतां ।**
**तुजवीण अनंता नाहीं कोणी ॥ १ ॥**

**गीतेमाजी शब्द दुंदुभीचा गाजे ।**
**योगक्षेम काज करणें त्याचें ॥ २ ॥**

असा वरील गीताश्लोकाचा (अ.९–२२) भावार्थ तुकोबांनीं सांगितला आहे. त्या शिवाय 'तेषामेवानुकंपार्थं' (अ० १०–११),'तेषामहं समुद्धर्ता' (अ० १२–७), 'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोचयिष्यामि मा शुचः' (अ० १८–६६) इ०अनेक स्थळीं देवांनीं धीर दिला आहे–पण, पण काय ? 'अश्रद्दधाना पुरुषाः' (गीता अ० २–९) ! माणसाची निष्ठा त्यावर नाहीं !

३५

**असे हो जया अंतरीं भाव जैसा**
**वसे हो तया अंतरीं देव तैसा ।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

जसा भाव तसा देव, भावासारखा देव पावतो (म्हणून भाव एकनिष्ठ असावा.) अनन्य भक्ताचें चक्रपाणि भगवान् संरक्षण करितो, म्हणून तूं त्याचा अनन्य भक्त हो.

भागवतांत 'भजन्ति ये यथा देवान् देवा अपि तथैव

तान् ' ( अ० ११–२–३ ) व गीतेंत भगवान् 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ' ( अ० ४–११ ) असें म्हणतात. याचा अर्थ समर्थांच्या वाणीनें ऐकावाः—

**जैसा भाव जयापाशीं । तैसा देव तयासी ।**
**जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥**
**जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।**
**भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे॥१५**

( द० ३–स० १० )

समर्थांच्या मुखानेंच त्यांच्या रामायणाच्या युद्धकांडांत ( अ० १३ ) पुढील गोड श्लोक प्रगट झाले आहेतः—

**मनीं भावना भक्त लोकांस जैसी ।**
**तयासारिखी देवरायासि तैसी ।**
**जनीं सेवकाकारणें जन्म घेणें ।**
**महद्भाग्य सांडूनियां नीच होणें ॥ ७७ ॥**
**जया अंतरीं भाव होईल जैसा ।**
**तयालागिं तो देव पावेल तैसा ।**
**यदर्थीं कदा संशयोही असेना ।**
**अभावें तरी देव तो पालटेना ॥ ८१ ॥**

तात्पर्य ' जो जैसा भजे त्याला । तैसाचि वोळे '

३६

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे**
**कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंदआनंदकैवल्यदानी**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥**

देव सर्वकाळ सन्निध आहे. किती धैर्यानें आपण (वासना-जाळ दूर करून ) देवाकडे धांवत आहों हें ता दयासागर पाहत असतो. तो सुखस्वरूप, आनंदस्वरूप असून कैवल्य ह्म० मोक्षसुख देणारा आहे. तो भक्ताची केव्हांहि उपेक्षा करीत नाहीं या विषयीं निभ्रांत रहा व रामाचा दास हो.

देव जवळ आहे म्हणजे किती जवळ आहे ? 'देव जवळी अंतरीं' आहे. 'ईश्वरःसर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' ( गीता १८-६१ ). हृदयस्थ रामाच्या सत्तेनेंच प्राणिमात्र सर्व चेष्टा करितात. समर्थ ( स्फु. प्र. ५ ) ह्मणतातः—

**भक्तांचा देव लोभाळू । भक्तांचें मनिचें करी ।**
**हारद्र जीविचें जाणें । राजा त्रैलोक्यनाथ कीं ॥१**
**देव तो दयाळु मोठा । अन्याय क्षमणें बहु ।**
**भक्तांचा साभिमानी तो । बुद्धिदाता परोपरी ॥२॥**

भक्तानें अंतरीं देवो। जाणोनि धरिला बळें।
देवही विसंबेना कीं। सोडीना भक्तवत्सळु ॥१७॥

३७

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा।
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें ( विरहवेडें होऊन जसें नदीतीरीं ) ओरडत असतांना सूर्योदय होतांच पुन्हां एकत्र होतें, ह्म० सूर्यनारायण त्यांच्या संकटकाळीं धांवून येतो व त्यांची विरहव्यथा निवारण करितो; त्याप्रमाणें भक्ताच्या संकटकाळीं भक्ताचा अभिमानी राम धांवत येऊन भक्ताचीं संकटें वारतो—याप्रमाणें वेदशास्त्रपुराणीं हरिभक्तीचा नगारा वाजून राहिला आहे.

निशाण—निस्साण नामक वाद्य, नगारा. नगाऱ्यावर हरिभक्तीचा घाव गाजून राहिला आहे, नगारा गर्जून राहिला आहे. ती गर्जना ऐकून जीवांनीं 'अल्प धारिष्ट' तरी धरून रामाला भजलें पाहिजे.

चक्रवाक पक्षी हा बहुधा एकटा कधी राहत नाहीं. नर-मादीचें जोडपें नेहमीं एकत्र नांदत असतें. नरमादीचें परस्परांवर अत्यंत प्रेम असतें. दांपत्यप्रेमाचा उत्कृष्ट नमुना ह्मणजे चक्रवाक. चक्रवाकालाच कोक म्हणतात व त्यावरून प्रेमाचें शास्त्र किंवा शृंगारशास्त्र हें संस्कृतभाषेंत 'कोकशास्त्र' म्हणून प्रसिद्ध आहे. कोकशास्त्र म्हणजेच कामशास्त्र. चक्रवाक बहुधा नदीतीरीं विहरत असतात. विचित्र योगायोगामुळें नर एका तीरावर व मादी दुसऱ्या तीरावर असतांनाच सूर्यास्त होतो व रात्रभर एकमेकांचें ओरडणें एकमेकांस ऐकूं येत असून रात्र उभयतांस विरह-व्यथेंत काढावी लागते. पुन्हां सूर्योदय झाला ह्मणजे मीलन होतें. ह्या कविसंकेताचाच समर्थांनीं वरील श्लोकांत उपयोग करून घेतला आहे. ज्ञानेश्वरांनींही हा संकेत घेतला आहे:-

**शब्दाचिया आसकडी। भेदनदीच्या दोहीं थडी।**
**आरडत विरहवेडी। बुद्धिबोध ॥ ५ ॥**
**तयां चक्रवाकांचें मैथुन। सामरस्याचें समाधान।**
**भोगवी जो चिद्गगन-। भुवनदिवा ॥६॥**(ज्ञाने० १६)

भक्तावर संकट आलें हें कळतांच किंवा भक्तानें हाक देतांच भक्तवत्सल राम उडी घालतो हें अनेक भक्तांनीं स्वानुभवानें गायिलें आहे. तुकोबा म्हणतातः—

हांकेसरसी उडी। घालोनियां स्तंभ फोडी ॥१॥
ऐसी कृपावंत कोण। माझे विठाईवांचून? ॥धृ०॥

## ( २ ) मना सज्जना राघवीं वस्ति कीजे
## ( ३८–४६ )

### ३८

मना प्रार्थना तूजला येक आहे
रघूराज थक्कीत होऊनि पाहे।
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे
मना सज्जना राघवीं वास्ति कीजे ॥

( राम असा दासाभिमानी आहे व दासाची कधींच उपेक्षा करीत नाहीं, म्हणून म्हणतों ! ) बा भल्या मना ! तूं रामाच्या स्वरूपीं वस्ती करून रहा म्हणजे सर्वदा निर्भयपणा पावशील. श्रीरामाचे दिव्य गुणकर्म स्मरून रामरूप पहा, तुला परमाश्चर्य वाटेल. तुझी मी प्रार्थना करितों, माझ्या या प्रार्थनेची अवज्ञा ह्म० हेळणा करूं नकोस बरें ! थक्कित होऊँन (आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं) रामाकडे पहा.

**एक अंतरीं निश्चळ। जें निहाळितां केवळ।**
**विसरलें सकळ। संसारजात ॥ १७२ ॥**

**एका गुणानुवाद करितां। उपरति होऊनि चित्ता।**
**निरवधि तल्लीनता। निरंतर ॥ १७३ ॥**
**एक ऐकतांचि निवाले। जे देहभावीं सांडिले।**
**एक अनुभवें पातले। तद्रूपता ॥ १७४ ॥**
**( ज्ञाने० अ. २ )**

रामाचें ध्यान करितां त्याचें स्वरूप पाहून कोणी संसार विसरून निश्चळ होतात, कोणी गुणानुवाद गात तल्लीन होतात, कोणी त्याच्या कथा ऐकत शांतिसुख पावतात. या प्रमाणें मना ! तूंही ' रघुराज थक्कीत होऊनि पाहें '.

## ३९

**जया वर्णिती वेदशास्त्रेंपुराणें**
**जयाचेनि योगें समाधान बाणे।**
**तयालागि हें सर्व चांचल्य दीजे**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥**

वेदशास्त्रपुराणें ज्याचे गुण गाणारे भाट झाले आहेत, ज्याचा योग होतांच पूर्ण समाधान प्राप्त होतें, त्या श्री-रामाला हे मना ! तूं आपलें सर्व चांचल्य देऊन मोकळा हो व रामरूपीं अखंड वस्ती करून निश्चळ रहा.

मना ! तुझ्यापाशी आहे चांचल्य व रामापाशीं अगदी त्याच्या उलट आहे समाधान, तूं आपलें चांचल्य रामाला अर्पण कर, स्वत:जवळ ठेवूं नकोस कीं समाधान पावशील.

**माया सांडून मूळास जावें ।**
**तरीच समाधान पावावें ॥ दा० २०-९-२३**
**ज्ञानदृष्टीविण नव्हे ।**
**समाधान ॥ ( दास० २०-१० २१ ).**

४०

**मना पाविजे सर्व ही सूख जेथें**
**अतीआदरें ठेविजे लक्ष तेथें ।**
**विवेकें कुडी कल्पना पालटीजे**
**मना सज्जना राघवीं वास्ति कीजे ॥**

मना ! सर्व सुख जेथें अखंड मिळतें त्या रामरूपीं अत्यादरें लक्ष लावून रहा, तेथें एकाग्र निश्चळ होऊन रहा. विवेकानें कुडी कल्पना ( वाईट, द्वैताची-कल्पना ) सोडून दे. शुद्ध अद्वैतभावानें रामरूपीं समरस होऊन रहा.

राम परब्रह्माचें सुख कसें आहे ?—

**यल्लाभान्नापरो लाभो यत्सुखान्नापरं सुखम् ।**
**यज्ज्ञानान्नापरं ज्ञानं तद्ब्रह्मेत्यवधारयेत् ॥**

ज्ञानोबारायही ‘तैसा हृदयामध्यें मी राम। असतां सर्वसुखाचा आराम’ ( ज्ञाने० ९-६० ) असें सांगतात. ‘सर्व सुखाचें आगर। बापरखुमादेवीवर’.

४१

**बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं**
**सिणावें परी नातुडे हीत कांहीं।**
**विचारें बरें अंतरा बोधवीजे।**
**मना सज्जना राघवीं वास्ति कीजे॥**

मना! पुष्कळ हिंडलास-अनेक देश फिरलास किंवा नाना साधनांचे सायास केलेस-तर शीण मात्र होईल, स्वहित कांहीं होणार नाहीं, स्वसुख त्यानें मिळणार नाहीं. ह्मणून बा मना! विचारानें अंतराला चांगला बोध करून त्याला बाह्यसाधनांपासून किंवा विषयांपासून निवृत्त कर व रामरूपीं स्थिर हो.

‘नित्यनूतन हिंडावें’ ‘परिभ्रमण करावें,’ असें समर्थांनीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे व ते स्वतः अतिशयच हिंडत असत, पण तें हिंडणें वेगळें. देवासाठीं हिंडायला नको, देव बसल्या ठायींच अंतरींच सांपडणारा आहे

देवाचें सुख बहु 'हिंडतां' मिळत नसतें, तर 'अंतरा बोधवितां' मिळतें हें या श्लोकाचें तात्पर्य आहे.

अंतरीचा देव अंतरीं पहावा।
मीपण हें देवा समर्पावें ॥ १ ॥
समर्पावें भावें तनमनधन।
आत्मनिवेदन ऐसें आहे ॥ २ ॥

४२

**बहूतांपरी हेंचि आतां धरावें**
**रघूनायका आपुलेसें करावें।**
**दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे**
**मना सज्जना राघवीं वास्ति कीजे ॥**

मना ! फार सांगण्यांत काय मतलब आहे? एकच गोष्ट सांगतों कीं कसेंही करून रामाला आपलेसें करून घे. दीनपरिपालनाचा त्याचा बाणा आहे म्हणून तूं मोठेपणाच्या साऱ्या कल्पना सोडून त्याच्या स्वरूपीं मिळून जा.

सुखाचें आगर राम आहे व राम आपलें सुख स्वभक्तांना देतो, म्हणून तूं रामाला आपलेसें करून घे. 'जे अंकित ईश्वराचे। तयास सोहळे निजसुखाचे। धन्य तेचि

दैवाचे । भाविकजन' ॥ (दास० ३–१०–१२). 'देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटापांसूनि रक्षी) धांविन्नला अंतर साक्षी । गजेंद्राकारणें ' ( दास० ४–८–२७ ) ' पै एक रंक अडलेंपणे । काकूळतां धांव गा धांव म्हणे । तरी तयाचिये ग्लानी धांवणें । काय न घडे मज ?' असें देव विचारतात ( ज्ञाने० ८–१२८ )

४३

**मना सज्जना येक जीवीं धरावें**
**जनीं आपुलें हीत तूंवां करावें ।**
**रघूनायकावीण बोलों नको हो**
**सदा मानसीं तो निजध्यास राहो ॥**

मना ! आपलें परम हित करावयाचें आहे हें पळभरही विसरूं नकोस. स्वहिताविषयीं जागरूक रहा. रामाचाच अहर्निश छंद घे व रामावांचून कांहींही बोलूं नकोस, रामनामावांचून व्यर्थ शब्द बोलून वाणी शिणवूं नकोस.

**श्रवणापरीस मनन सार। मननें कळे सारासार । निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ॥**

( दास. ११–१–४१ )

आपलें हित, स्वहित, स्वार्थ कोणता? जाणत्यांनीं स्वहित कशाला म्हटलें आहे? परमात्मदर्शन हाच खरा स्वार्थः—

**एतावानेव मनुजैर्योगनैपुणबुद्धिभिः ।**
**स्वार्थः सर्वात्मना ज्ञेयो यत्परात्मैकदर्शनम् ॥**

( भागवत ६-१६-६३ )

४४

**मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी**
**कथा आदरें राघवाची करावी ।**
**नसे राम तें धाम सोडूनि द्यावें**
**सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥**

मना! ( वाणीनें रामनामाचा उच्चार कर, ) प्रेमळांच्या संगतींत आदरपूर्वक कथाकीर्तन कर, नाहीं तर जनांत मौन धरून रहा ( पण व्यर्थ शब्दचावटी करूं नकोस ). ज्या घरांत राम नाहीं ( रामभक्तीचा उल्हास नाहीं ) त्या घरांत पाऊल ठेऊं नकोस, खुशाल अरण्यांत जाऊन रामसुख भोगीत रहा.

खरें मौन म्हणजे नुसतें न बोलणें नव्हे. मननशील तो मुनि व मुनीचें जें व्रत तें मौन. दासबोधांत द. १७ स. ५

मध्यें अजपाजपाचा विचार सांगितला आहे, तेथें मौनाचा खरा अर्थ दिला आहे. मुखांतून व नाकांतून श्वासोच्छ्वास अखंड चालला असून त्याची संख्या ८ प्रहरांत २१६०० अशी मुक्रर केली आहे. नाभिस्थानीं परावाणी व हृदयांत पश्यन्ती वाणी आहे. या दोन्ही वाणींच्या मध्यें स्वराचें जन्मस्थान आहे. एकांतीं उगाच बसावें व श्वासोच्छ्वास पहावा. "एकांतीं मौन धरून बैसे। सावध पाहातां कैसे भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती ॥७॥" त्या शब्दांना नाद नाहीं, उच्चार नाहीं, पण त्यांचा प्रत्यय येतो. 'ते शब्द सांडून बैसला। तो मौनी म्हणावा भला।' ते सहज होणारे सोहं सोहं शब्दही शब्दातीत–निःशब्दाच्या ठिकाणीं बसले असतां ऐकूं येत नाहींत. स्वाधिष्ठानावर बसून 'दृष्टीस दिसे व मनास भासे' तें सर्व सांडून अनुभवरूप होणें हें खरें मौन! लौकिकी मौन म्हणजे वैखरीनें शब्द न बोलणें. खरें मौन न साधलें तर निदान अव्हासव्हा शुष्क चावटी तरी करूं नये. ( समर्थांच्या स्फुटश्लोकांपैकीं १७ वें प्रकरण हें शब्द (कलह) व निशब्द ( मौन ) यांच्या स्पष्टीकरणार्थ पहा. ) अनंत प्रकृतीचे लोक, नाना पंथ व नाना मतें, नाना विकार, अहंपणा हें सर्व कलहाचें मूळ होय. 'अहंमती विरोचिना। तरी कळहो सरेचिना.'

**जनीं उदंड पाहिले । कळहो करीत राहिले ।**
**अनन्य देव भेटला । कळहो तयासि तूटला ११**
**कळहो करील शब्द रे । अनंत तो निशब्द रे ।**
**तुह्मी अनंत कां न व्हा। वेवादितां अव्हासव्हा १२**

राम नाहीं तें धाम सोडून अरण्यवास करावा, एकांत धरावा व ‘ एकांतीं विवेक करावा । अत्माराम वोळखावा ’ ( दास० १९-६-३० ). एकांतापासूनच सर्व लाभ होतात. ‘ जयास एकांत मानला । अवघ्याआधीं कळे तयाला ’ ( दास. १८-१०-५० ) स्फु. प्र. १४ मध्यें:—

**चाळणा करावी सर्वे । येकांतीं राहतां बरें ।**
**येकांत मानला ज्याला । त्याला साधे हळु हळु॥**

‘ भवाचा वीट ’ येऊन रामसुखालागीं अरण्य कसें सेवावें हें समर्थ स्वानुभवानें सांगतातः—

**मना चाल ऊठीं वना दुर्गमातें ।**
**न गुंतें भवागारदारादिकांतें ।**
**विवेकें विचारें विवंचूनि पाहीं ।**
**जनीं पाहतां सर्वथा ऊरि नाहीं ॥ १ ॥**
**वहु वीट आला भवाचा न सावे (साहवे)।**
**अरण्यांत देऊनियां हाक जावें ।**

मनातें दमावें श्रीरामीं रमावें ।
दिगांतीं फिरावें जना न स्मरावें ॥ ९ ॥

४९

जयाचेनि संगें समाधान भंगें
अहंता अकस्मात येऊनि लागे ।
तये संगतीची जनीं कोण गोडी
जिये संगतीनें मती राम जोडी ॥

ज्याच्या संगतीमुळें समाधान भंग पावतें, अहंकाराचें भूत अंगीं भरतें ह्म० अहंतेचा उठाव होतो व मति रामपराङ्मुख होते अशाच्या संगतीपासून सुखसंतोष कोठचा ?

समाधान आणि समाधि एकच, समाधान ह्म० स्वरूपस्थिति, निजानंद. आत्मलाभांतच समाधान आहे.

ज्या घरांत राम नाहीं, ज्याच्या चित्तांत राम नाहीं, अशा रामविमुख पुरुषाच्या संगतीपासून कोणते तोटे होतात ते ह्या श्लोकांत सांगितले आहेत.

ह्मणोनि गा पार्था । जे विमुख या परमार्था ।
तयासी भाषण सर्वथा । करावें ना ॥ (ज्ञाने०)
काय ते करावे संपत्तीचे लोक ।
जानकीनायक जेथें नाहीं ॥ १ ॥

जेथें नाहीं माझा श्रीरामसमर्थ ।
त्याचें जिणें व्यर्थ कोटिगुणें ॥ २ ॥रामदास

४६

**मना जे घडी राघवेंवीण गेली**
**जनीं आपुली ते तुवां हानि केली ।**
**रघूनायकावीण तो सीण आहे**
**जनीं दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे ॥**

मना रामचिंतनावांचून जी घटका गेली ती तूं व्यर्थ दवडून आपला तेवढा घात केलास असें समज. रामाला सोडून केललें कार्य दुःखालाच कारण होत असतें, म्हणून जो प्राणी सावध आहे त्याचें अखंड अनुसंधान रामचरणाकडेच असतें.

**अलक्षास लावी लक्ष । ह्मणोनि साधु परम दक्ष।**
**वोढूं जाणती कैपक्ष । परमार्थाचा ॥**
( दास० ८-९-५२ ).

## ३ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा (४७–५६)

( सर्वोत्तम राघवाचा दास वोळखतां यावा म्हणून त्याचीं कांहीं लक्षणें सांगतात. अंतरीं ज्ञानभक्तीचा दिवा

लागला कीं त्याच्या प्रकाशाचीं कांहीं किरणें देहावर पडा-यचींच. ' अंतरीं गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित । अंतरस्थिती बाणतां संत । लक्षणें कैसी ( दास० द० ८ स० ९ पहा ). तथें दिलेली सिद्धलक्षणेंच पुढील १० श्लोकांत, मुख्यतः श्लोक ५०।५१।५२ मध्यें, संक्षेपानें सांगितलीं आहेत. हे श्लोक वाचीत असतांना आपण श्री-समर्थांचें चारित्रच त्यांच्या मुखानें ऐकत आहोंत असें वाटतें ).

४७

**मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे**
**जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।**
**गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

त्याच्या मनांत व लोचनांत म्हणजे आंत व बाहेर श्रीराम-तोच त्याला सर्वत्र दिसत असतो. अंतर्बाह्य रामरूप भरून गेल्यामुळें त्याला ज्ञानीही म्हणावें व भक्तही म्हणावें किंवा ' जाणता भक्त ' म्हणावें अशी त्याची बैठक बसलेली असतें; त्याच्या ठिकाणीं ज्ञान व भक्ति एकरूप झालेलीं असतात. तो पूर्ण ज्ञानी असून सगुणाचें प्रेम व साधनाचा

क्रम दोन्ही राखून असतो. तो सर्वोत्तमभक्त धन्य होय.

जाणता असून भक्त नाहीं तर तो रुक्ष शब्दज्ञानी होय, भक्त आहे पण जाणता नाहीं तरी तो भोळाभाव कामाचा नाहीं. ज्ञानही पूर्ण, भक्तीचा जिव्हाळाही उत्तम, आणि साधनमार्गही आस्थेनें चालविणारा, असा सर्वोत्तमाचा भक्त खचितच धन्य होय. संतसद्गुरुजवळ कर्मज्ञानउपासना सर्वही असतें. 'म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि साधन। कथानिरूपण श्रवणमनन। नीति-न्याय मर्यादा' (दास० ५-२-५२) यांत कांहीं न्यून असेल तर तेवढाच कमीपणा येतो, ह्मणून सर्वोत्तमाच्या दासापाशीं सर्व सद्गुण असतात. 'साधनेवीण परमार्थ प्रतिष्ठे। तो मागुता सवेंचि भ्रष्टे' म्हणून तर संत साधन सोडीत नाहींत "आचार उपासना सोडिती। ते भ्रष्ट अभक्त दिसती। जळो तयांची महंती। कोण पुसे? (५६)

४८

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा।
सदा रामनामें वदे नित्य वाचा।
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥

त्याचा देह सर्वकाळ देवकार्यांत झिजत असतो, व वाणी रामनामाच्या उच्चारांत रंगलेली असते. तो नित्य स्वधर्मा-प्रमाणें वागत असतो.

स्वधर्म म्ह० जातिवर्णानुसार आलेला धर्म किंवा 'सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ' ( दास० ८-९-५४ ) हा स्वस्वरूपानुसंधानरूपधर्म भक्ताजवळ दोन्ही पुरे असतात.

४९

**सदा बोलण्यासारिखें चालताहे**
**अनेकीं सदा येक देवासि पाहे ।**
**सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

तो बोलतो तसाच चालतो, अनेक देवांत तो एक मुख्य देवाला पाहत असतो, पूर्ण भ्रमातीत असून तो सगुणाची भक्ति सप्रेमभरित करितो.

आचार, उच्चार, व विचार तीनही गोष्टींत एकरूपता असणें हें साधुलक्षण आहे ' जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें । मग महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे '

( दास० १२-९-२३ ). ' क्रियेवीण शब्दज्ञान । तोंचि श्वानाचें वमन । भले तेथें अवलोकन । कदापी न करिती ॥ ३० ॥ बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें । तयाची वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३१ ॥ ( दास० १२-१० ). चौथ्या ओव्याशतांत समर्थ म्हणतात.—

**नाहीं भक्तिभाव सगुणाच्या ठाईं ।**
**शब्दज्ञान काई बोलानीयां ॥ ५८ ॥**
**बोलोनीयां मुखें तैसी क्रिया करी ।**
**धन्य तो संसारीं ब्रह्मज्ञानी ॥ ५९ ॥**
**ब्रह्मज्ञानी भला वर्तणुके नासी ।**
**कोरड्या शब्दांसी कोण पुसे ? ॥ ६० ॥**
**कोण पुसे बापा ज्ञान हें शाब्दिक ।**
**क्रिया अमोलीक सत्य जाण ॥ ६१ ॥**

बोलण्याप्रमाणें चालणें हा गुण खरा, पण ' बोलतों खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें ' असा त्या बोलण्यांत चालण्यांत खरेपणा पाहिजे, शास्त्रशुक्त नीतिन्याय यास धरून बोलणें चालणें पाहिजे.

अनेक देवांत एकच अंतरात्मा खेळत आहे; विप्रांनीं बहुत प्रकारें सांगितलें खरें पण तें ' एकं सत् ' आहे, असें

जो जाणतो तो धन्य होय. (दास० ११–८ पहा ). अनेकीं ह्म० अनेक देवांत किंवा अनेकांत म्ह० नाना पदार्थांत, भूतभौतिक सकल सृष्टीत, प्रत्येक वस्तूंत-' ईशावास्यमिदं सर्वं—न्यायानें सर्वत्र एक देव पाहतो. अनेक देवांत मुख्य परमात्माच आहे; ' सर्व देवमयो हरिः ' ( भागवत. स्कंध ७–१०–११ ) म्हणून ' येप्यन्यदेवताभक्ताः ' तेही माझेंच भजन करितात असें गीतेंत देव सांगतात.

५०

**नसे अंतरीं कामकारी विकारी**
**उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ।**
**निवाला मनीं लेश नाहीं तमाचा**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

त्याच्या चित्तांत अनेक विकार उत्पन्न करणारा काम नसतो, तो उदासीन असतो, ब्रह्मचारी असतो, व अंतरीं तमाचा बिंदु नसून उलट परम समाधानाप्रत पावलेला असतो.

**स्वरूपीं भरतां कल्पना तेथें कैंची उरेल कामना ह्मणोनियां साधुजना । कामचि नाहीं॥**दा.८-९-२४

उदासीन म्ह० उदास नव्हे, अनासक्त.

५१

मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ।
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

मद, मत्सर, स्वार्थबुद्धि, प्रपंचोपाधि, ह्या सर्वांपासून तो अगदीं सुटलेला असतो. तो सदा सर्वांशीं नम्र व मधुर वाणीनें बोलतो. (दा. द० ८ स० ९ पहा):–

साधु स्वरूपें निर्विकार । तेथें कैंचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥२९
साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें । साधूसि नाहीं ॥ ३० ॥
आशा धरितां परमार्थाची ।
दुराशा तुटली स्वार्थाची ।
ह्मणोन नैराश्यता साधूची । वोळखण ॥ ४६ ॥
जेणें दृश्य केलें विसंच ( नष्ट ) ।
तयास कैंचा हो प्रपंच ? ।
याकारणें निःप्रपंच । साधु जाणावा ॥ ३२ ॥

आपला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद
याकारणें वादविवाद । बुडोन गेला ॥ २८ ॥

कठोर न बोलतां नम्र बोलावें. चतुर्थमानांत:—

कर्कशें भुंकती श्वानें । तैसें वाक्य करूं नये ।
सर्वांसी मृदु बोलावें । चालावें सर्वमान्यसे ॥

५२

ऋमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें
न लिंपे कदा दंभवादें विवादें ।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

तो 'तत्वमसि' ( म्ह० तूं तें आहेस अर्थात् जीव हा परमात्मा आहे ) ह्या महासिद्धांताचे ( मनांत ) चिंतन व ( जनांत ) अनुवादन किंवा व्याख्यान करण्यांत आयुष्य वेंचीत असतो. दांभिकपणाचा वाद किंवा वितंडवाद यांचा त्याला स्पर्शही होत नाहीं. मूळपुरुषाविषयीं तो शांतपणें सुखसंवाद करितो.

'ओव्या शतक तिसरें' यांत संतांची वोळखण समर्थांनीं सांगितली आहे. ती पहावी.

५३

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

तो सदा आर्जवी, सर्व लोकांना प्रिय, सत्याचा कैवारी विवेकानें चालणारा व कालत्रयींही असत्याचा विटाळ आपल्या वाणीला न होऊं देणारा असा असतो.

आर्जव ( ऋजु=सरळ ) ह्म० सरळपणा, किंवा मनधरणीपणा. लोकाप्रिय ह्म० सर्वांना हवाहवासा वाटणारा.

५४

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं।
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

तो आपला सारा तारुण्यकाळ अरण्यांत एकांतांत घालवितो, देवाविषयीं अनेकांच्या अनेक कल्पना असतात पण त्या कल्पनांच्या गोंधळांत न सांपडतां निर्विकल्प परब्रह्मा-

च्या चिंतनांत मग्न असतो, श्रीरामस्वरूपाविषयीं त्याचा अढळ निश्चळ असतो.

तारुण्यांत बहुधा लोक व लौकिक यांच्यामागें मनुष्य लागतो, नानाविध कल्पनांच्या उतरंडी रचण्यांत व उतरण्यांत कुशल असतो व एक निश्चय असा त्याचा होत नाहीं; पण तारुण्यांतील स्वभावधर्म ज्यानें तारुण्यांतच जिंकलेले असतात तो धन्य होय. एकांतांत चिंतन होतें, लौकिकांत वादविवाद, दंभ, कलह इ० दोष उद्भवतात; एकांतांत मति निश्चळ असते, लोकांत चंचळ असायला अनेक कारणें होतात.

५५

**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा**
**वसे अंतरीं प्रेमपाशा पिपाशा ।**
**ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

त्याच्या मनांत स्वार्थाची क्षुद्र आशा नसते, भगवत्प्रेमाची त्याला तहान लागलेली असते, व त्याच्या भक्तिभावाला भुलून देव त्याचा ऋणी होतो.

अवघें विश्व ज्याचें घर झालें आहे त्याला क्षुद्र स्वार्थ

तो कोणता असणार? ज्ञानोत्तरभक्तीची त्याला तहान लागणेंच योग्य आहे. पूर्वी झालेल्या भक्तोत्तमांच्या प्रेमळ-कथा ऐकून त्याला भक्तिप्रेमसुखाची लालसा असते व देवही त्याचा भक्तिभाव पाहून भुलून त्याचें रक्षण करितो.

५६

**दिनाचा दयाळु मनाचा मवाळु**
**स्नेहाळु कृपाळु जनीं दासपाळु ।**
**तया अंतरीं क्रोध संताप कैंचा**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

तो दीनांविषयीं दयाळू असतो, मनाचा मवाळ ह्म० सौम्य असतो, स्नेह, कृपा, अनुकंपा हे सर्व त्यापाशीं असतात. त्याच्या सुखशीतल अंतरांत क्रोधसंतापाचा उष्ण वायु कधींच वाहत नाहीं—इ० गुणांनीं युक्त असा हा सर्वोत्तमाचा दास त्रैलोक्यांत धन्य होय.

## ४ निष्कामभक्ति व वादविरोधता.

( ५७—६६ )

५७

जगीं होइजे धन्य या रामनामें
क्रिया भक्ति ऊपासना नित्यनेमें ।
उदासीनता तत्वता सार आहे
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥

श्रीरामनामस्मरण, क्रिया ह्म० स्वधर्माचरण, भक्ति ह्म० अंतरंग, एकांतभक्ति, उपासना ह्म० ज्ञानपूर्वक स्वस्वरूपाचें अनुसंधान व नित्यनेमाचें कर्मानुष्टान हीं सर्व उज्ज्वळ, निर्दंभ व निर्लोभ ठेवून त्रैलोक्यांत निष्कामभक्त म्हणून धन्य होऊन जावें. वस्तुतः उदासीनता ह्म० निःसंगता किंवा निष्कामता हें सर्वांचें सार आहे, त्यामुळें मनोवृत्ति सर्वकाळ मोकळी राहते.

लोकांत उपासना ह्म० कामनापूर्तीसाठीं एखाद्या देवतेची आराधना करणें असें समजतात. पण उपासनेचा नीट विचार झाला पाहिजे. उपासनेवीण सारा परमार्थ निराधार आहे. उपासना मूळमायेपलीकडे ब्रह्मस्वरूपाशीं गांठ

घालून देणारी आहे. 'मूळमायेचे सेवटीं। हरिसंकल्प मूळीं उठी। उपासनायोगें तेथें मिठी। घातली पाहिजे' ( दास० १७–३–२४ ). हरिसंकल्प ह्म० मूळमाया, ईश्वर. तेथें उपासनेनें मिठी घालून पलीकडील निर्विकल्प ब्रह्म पावायचें आहे. म्हणून 'उपासना ज्ञानस्वरूप' आहे असें म्हटलें आहे ( दास० २०–४–२० ). पृथ्वीपासून आकाशापर्यंत जीं पंचभूतें आहेत त्या सर्वांत आकाश वडील आहे. आकाश ह्म० अंतरात्मा ह्म० देव. 'सकळां वडील देव त्यासी अनन्य होणें' ही उपासना (दास. १५-९-२०).

सर्वांभूतीं एक अंतरात्मा देव आहे, तो सर्वांतरात्मा व सर्वभूताधिवास आहे, त्यासी शोधून जाणून त्याशीं अनन्य होणें ही उपासना. ज्ञान हेंच, भक्ति हीच, सर्वांभूतीं भगवद्भाव हेंच ज्ञानाचें, भक्तीचें, वैराग्याचें व मोक्षाचें स्वरूप आहे. समर्थ चौथ्या 'ओव्या शतकांत' ह्मणतातः—

**स्वरूपीं आसक्ति याचें नांव भक्ति।**
**पाहतां विभक्ति तेथें नाहीं ॥ ४८ ॥**
**जेथें नाहीं देहबुद्धीचें अज्ञान।**
**तया नांव ज्ञान बोलिजेते ॥ ४९ ॥**
**बोलिजेतें ज्ञान सर्वसाक्षिभूत।**
**जाणावें अद्वैत तेंचि ज्ञान ॥ ५० ॥**

ज्ञान आणि भक्ति एकचि असती ।
वैराग्याची स्थिति बोलिजेल ॥ ५१ ॥
जाणोनी माईक सर्वहि त्यागिलें ।
मन सुखावलें संगत्यागें ॥ ५३ ॥
संगत्याग केला निसंग राहिला ।
सर्वही येकला येकरूप ॥ ५४ ॥
येकरूप झालें भक्ती आणि ज्ञान ।
वैराग्यही जाण येकरूप ५५ ॥

या चरणांचें नीट मनन करून त्याचें वर्म ध्यानांत धरावें. मनोबोधांत ' मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ' ( २ ) येथून आरंभ केला असून ' विदेहीपणें भक्ति मार्गेंचि जावें ' ( १८८ ) येथें त्याचें पर्यवसान केलें आहे. राघवाचा पंथ म्हणजे भक्तिपंथ. ज्ञानवैराग्यभक्ति सर्व जेथें एकमय होतात असा हा भक्तिपंथ आहे! जेथें उपासक उपास्याहून वेगळा राहत नाहीं असा हा भक्तिपंथ आहे. उदासीनता ह्म. निःसंगता हेंच याचें सार आहे. ' शाश्वताची प्रीति । विषयीं विरक्ति' याचें नांव उदासीनता किंवा निष्कामता. निष्काम भक्तीपरतें श्रेष्ठ त्रैलोक्यांत दुसरें कांहीं नाहीं. ही ज्याला साधली तो ब्रह्मांडांत धन्य होय. भगवंतांनीं गीतेंतही अश्वत्थ ह्या प्रपंचवृक्षाचें छेदन कर-

ण्यास असंगशस्त्रच हातीं दिलें आहे. ( गीता अ० १५-३)

उदासीनता म्ह० निःसंगता, निष्कामता. संग अशाश्वत व दुःखदायक आहे हें जाणल्यानें निःसंगता-अनासक्ति येते, स्फुट प्रकरणें १९ मधील पुढील श्लोकांचें मनन करावें.

**देहाचा भर्वसा नाहीं । वैभवाचा असेचिना ।**
**देशकाळवर्तमानें । सर्वही होत जातसे ॥ १ ॥**

कितीक येतात कितीक जातात, मागें पुढें सर्वांस जाणें आहे, संगतींचे किती लोक नित्यशः जात असतात हें विचारानें पाहणारा ' उदासवृत्तिचा योगी न लिंपे असतां जनीं । '

**यालागीं मोकळी वृत्ति । असिली पाहिजे सदा ।**
**धन्य ते जाणती ज्ञानी । उदास गिरिकंदरीं ॥ १० ॥**

## ५८

**नको वासना वीषई वृत्तिरूपें**
**यदर्थीं जडे कामना पूर्वपापें ।**
**सदा राम निःकाम चिंतीत जावा**
**मना कल्पनालेश तो ही नसावा ॥**

( उदासीनता नसेल तर ) मनोवृत्तीचा सारा ओघ विषयांकडे वाहत असतो. पूर्वपापामुळें जड व नश्वर पदार्थांच्या

ठिकाणीं वासना लोलुप होऊन जडत असेत. ह्मणून बा मना ! विषयवृत्तीचा ( कल्पनेचा ) लेशही चित्तांत न ठेवतां रामाचें निष्कामबुद्धीनें चिंतन करीत जा.

विषयवृत्ती म्ह० कामता म्ह० कल्पना. भगवंताला भजायचें आणि काय क्षुल्लक विषय त्यापाशीं मागायचे ? अमृताच्या तीरीं जाऊन डबक्यांतील घाणपाण्याची आठवण कां करावी ? समर्थ म्हणतातः—

**निःकाम बुद्धीचिया भजना ।**
**त्रैलोक्यीं नाहीं तुळणा ।**
**समर्थेंवीण घडेना । निःकाम भजन ॥ १९ ॥**
**कामनेनें फळ घडे । निष्कामभजनें भगवंत जोडे**
**फळ-भगवंता कोणीकडे । महदंतर ! ॥ २० ॥**
**नाना फळें देवापाशीं ।**
**आणि फळ अंतरी भगवंतासी ।**
**याकारणें परमेश्वराशीं । निःकाम भजावें ॥२१॥**
**निःकाम भजनाचें फळ आगळें ।**
**सामर्थ्य चढे मर्यादेवेगळें ।**
**तेथें हे बापुडीं फळें । कोणीकडे ? ॥ २२ ॥**
**ह्मणोनी निःकाम भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।**
**तयासी तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ॥ २४ ॥**

( दास १०–७ )

तात्पर्यः—सांडूनि संसारस्फूर्ती ।
चित्स्वरूपीं जडे वृत्ती ।
जीव शिव एकत्वा येती ।
योगसंग्रहस्थिती या नांव ॥
( एक भाग ११-२३-९६६ )

५९

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।
मनीं कामना राम नाहीं जयाला
अती आदरें प्रीति नाहीं तयाला ॥

मना ! कोटयवधि कल्पना करीत राहिलास, अनंत विषय सर्वकाळ चिंतीत राहिलास ( व कदाचित् मिळविलेस तरी) रामदर्शनानंद त्यामुळें होणार नाहीं. हें पहा ! ज्याच्या मनीं कामना आहेत त्याला रामभेटीं तर नाहींच नाहीं पण रामाविषयीं सादर भक्तिप्रेमही त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न होणार नाहीं.

६०

मना राम कल्पतरु कामधेनु
निधी सार चिंतामणी काय वानूं ।
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता
तया साम्यता कायसी कोण आतां ॥

मना ! रामाला कां कल्पतरु ह्मणूं, कां कामधेनु म्हणूं, कां निधीसार ह्म० संपत्तीचें अगाध भांडार म्हणूं, कां चिंतामणि ह्मणूं, कां ह्मणूं तरी काय ? जी जी उपमा योजायला घ्यावी ती ती तेथें फिकीच पडणार. ज्या रामाचा योग झाला असतां सर्व सामर्थ्यें पायाशीं लोळत येतात त्याच्या बरोबरीचा ब्रह्मांडांत आहे कोण ?

कल्पतरु आदिकरून दृष्टांत कसे हीन पडतात हें (दास० द. १स. ४ मध्यें) सद्गुरुस्तवनांत दाखविलें आहे.

६१

उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे
तया अंतरीं सर्वदा तेंचि आहे ।
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा
पुढें मागुता शोक जीवीं धरावा ॥

जी जी कामना जीवानें करावी ती ती पुरविणारा राम-रूप कल्पवृक्ष असून त्याच्या छायेखालीं रहाणारा एखादा मूढ जर दुःखच वाहत बसेल तर त्याला सर्वकाळ दुःखा-वांचून काय मिळेल बरें ? ( रामसुख भोगायचें सोडून ) जर कोणी अहंकाराला वश होऊन वादांग वाढवील तर त्याला पुढें मागें परमदुःखच भोगावें लागेल यांत संशय नाहीं.

कल्पतरूखालीं बसणारा मनुष्य सुजाण असेल तर आपलें आत्यंतिक हितच मागून घेईल, जर कां करंटा तेथे गेला तर तो दुःखच मागेल व तें त्याला भरपूर मिळेल. त्याप्रमाणें सर्व सुखाचें आगर असे रामराय शिरा-वर असून त्यांना विन्मुख होऊन जर कोणी अहंकारी पुरुष शब्दचावटी करीत वाद वाढवीत बसेल तर तो भला असला तरीं दुःखविभागीच होईल.

६२

**निजध्यास तो सर्व तूटोनि गेला**
**बळें अंतरीं शोकसंताप ठेला ।**
**सुखानंद आनंद भेदें बुडाला**
**मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला ॥**

वाद विवादापासून चार तोटे होतात ( १ ) निजध्यास ह्म० स्वरूपानुसंधान राहत नाहीं, ( २ ) आपण होऊन दुःखशोकाला बोलावून घेऊन अंतःकरणाच्या माजघरीं त्याला बिऱ्हाड करूं देतों, ( ३ ) माझें तुझें असा भेदभाव वाढल्यानें आपला सहजानंद बिघडून जातो, व ( ४ ) चित्तांत विक्षोभ झाल्यामुळें आत्मानिश्चय ढळून जातो.

'अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार । पुढें क्रोधाचा विकार । प्रबळें बळें.' याप्रमाणें वादविवादामुळें षड्रिपु मनांत प्रबळ होतात व मनुष्य आत्मानुसंधानापासून च्युत होऊन व्यर्थ दुःखांत पडतो म्हणून परमार्थी मनुष्यानें वादाचा सर्वथा त्याग करावा.

६३

**घरीं कामधेनू पुढें ताक मागे**
**हरीबोध सांडूनि वीवाद लागे ।**
**करीं सार चिंतामणी काचखंडें**
**तया मागतां देत आहे उदंडें ॥**

घरीं कामधेनु असतांना दुसऱ्याच्या दारोदार ताकाची

भिक्षा मागत फिरणाऱ्या करंट्याप्रमाणें श्रीहरीचा चित्तांतला सहजानंद सोडून वादाच्या भरीं भरणारा मनुष्य मूढ समजावा. आपल्या हातांत चिंतामणि असतांना, व त्यापासून हवे ते श्रेष्ठ पदार्थ मागून घेऊन परमतृप्त होण्याचा योग असतांना जर कोणी त्यापाशीं कांचखंडें ( कांचेचे तुकडे ) मागत सुटेल तर त्याला ते पुष्कळ मिळतील म्हणा, पण या जन्मदरिद्र्यानें परमलाभ गमावला असेंच नाहीं कां होणार ? तात्पर्य वितंडवादापासून निरंतर दूर रहावें.

६४

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना**
**अती काम त्या राम चित्तीं असेना ।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा**
**अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ॥**

पण काय करायचें ? अत्यंत मूढ ( मोहव्याप्त, देहाभिमानी ) असतो त्याची आत्मबुद्धि दृढ राहत नाही, म्हणून तो आत्मसुख सोडून वादाच्या नादीं लागतो. आणि ‘ अति तेथें माती’ हा न्यायच आहे. अति काम त्याला राम नाहीं

अतिलोभ त्याला शांति नाहीं व अति विषयी त्याचे बुद्धीचें दारिद्र्य टळत नाहीं.

काम म्ह० विषयवासना चित्तांत जर प्रबळ असेल तर तेथें राम राहत नाहीं. काम व राम दोन्ही चित्तांत राहत नाहींत, काम आहे तर राम नाहीं व राम आहे तर काम नाहीं. 'अती काम त्या राम चित्तीं असेना' (६४) 'मुखीं राम त्या काम बाधूं शकेना' (८७). भागवतांत (स्कंध ११ अ. १४):—

**विषयान्ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते ।**
**मामनुस्मरतश्चित्तं मय्येव प्रविलीयते ॥ २७ ॥**

म्ह० विषयांचें चिंतन करणारें चित्त विषयांतच रमतें व हरीचें चिंतन करणारें चित्त हरिरूपींच लीन होतें असें म्हटलें आहे. विषय आणि हरि म्हणजेच काम आणि राम एका चित्तांत राहत नाहींत.

अतिविषयी मनुष्याचें जिणें दैन्यवाणें असतें, म्हणून 'विषयवासना मोडे। तो येक सुखी' (दास० ३-१०-६४)

६५

**नको दैन्यवाणें जिणें भक्तिऊणें**
**अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें ।**

**धरीं रे मना आदरें प्रीति रामीं**
**नको वासना हेमधामीं विरामीं ॥**

भक्तीहीन जिणें दैन्यवाणें होय, तें तसलें कोरडें जिणें नसावें. अतिमूढाला विषयासक्तीमुळें सर्वकाळ दुप्पट दुःखच भोगावें लागतें, म्हणून मना ! विरामीं (रामरहित) अशा हेमधामीं ( सुवर्णाच्या घराविषयीं, सोनें मोत्यें हिरें यांनीं भरलेल्या मोठाल्या प्रसादांविषयीं ) वासना धरूं नकोस, तर अत्यादरें रामाविषयीं प्रीति धर.

मागें ' नसे राम तें धाम सोडून द्यावें ' ( ४४ ) असें म्हटलें आहे, येथें ' नको वासना हेमधामीं विरामीं ' (६५) असें म्हणतात. ज्या घरांत राम नाहीं, रामभक्तीचा आनंद नाहीं, नवविधा भक्तीपैकीं कोणत्याही भक्तीचा सुखसोहळा नाहीं, त्या घरावर सोन्यामोत्याचा पाऊस पडत असला तरी तसल्या घराविषयीं म्ह० गजांत लक्ष्मीविषयींही हे मना ! वासना धरूं नकोस. तात्पर्य ज्या घरीं राम नाहीं त्या घरीं गजांत लक्ष्मी असली तरी तसलें घर नको. (करुणा० १३४)

**नुठे घोष ज्या मंदिरीं रामनामें ।**
**जळो संपदा जाळिं तें हेमधामें ।**

जळो बोल ते फोल वाचाळ ज्ञानी ।
नसे मानसीं राम कैवल्यदानीं ॥

६६

नव्हे सार संसार हा घोर आहे
मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ।
जनीं वीष खातां पुढें सूख कैंचें
करी रे मना ध्यान या राघवाचें ॥

संसार सार म्ह० शाश्वत नाहीं, हा दुःखरूप (घोर) आहे, म्हणून तूं सारभूत सत्य असा राम शोधून पहा. संसार हा विषतुल्य आहे, त्याचे संगतीं सुख नाहीं, म्हणून सुखस्वरूप रामाचें तूं ध्यान करून सुखरूप हो.

'सांडुनि आपली संसारव्यथा । करीत जावी देवाची चिंता' (दास० ४-८-७). परममूर्खांमाजी मूर्ख । जो संसारीं मानी सुख । या संसारदुःखाऐसें दुःख । आणीक नाहीं' (२-१०-४०) देवही गीतेंत (९-३३) 'अनित्यमसुखं लोकं इमं प्राप्य भजस्व माम्' म्ह० हा मृत्युलोक अनित्य व असुख आहे म्हणून तूं माझी भक्ति कर असेंच सांगतात. ह्या श्लोकावरील ज्ञानेश्वरीभाष्य पहावें.

## ५ प्रभाते मनीं राम चिंतीत जावा.(६७-७६)

( प्रभातकाळीं श्रीरामाचें रूप ध्यानीं आणून त्या रूपाचें चिंतन करावें व मुखानें नामस्मरण करावें हें पुढील १० श्लोकांत सांगतात. नामस्मरण सर्वकाळींच करावें पण विशेषतः नित्यनेमानें पहाटेस उठून शुचिर्भूत होऊन श्रीराममूर्तीपुढें बसावें, आपादमस्तक सगुणरूप पहावें व त्या रूपाचें ध्यान करावें ह्मणजे संसाराचा विसर पडून हरिप्रेमांत चित्त निमग्न होतें. नित्यनेमाच्या या अभ्यासानें सर्वकाळ निदिध्यास लागून सर्वकार्य करीत असतां ध्यान–अनुसंधान सुटत नाहीं. मागें ३ ऱ्या श्लोकांत ह्या विषयाचें सूतउवाच केलें आहेच.

**अभंग.**

**प्रातःकाळ जाल्या राम आठवावा ।**
**हृदयीं धरावा क्षण येक ॥ १ ॥**
**क्षण येक राम हृदयीं धरिजे ।**
**संसारीं तरिजे हेळामात्रें ॥ २ ॥**
**सर्वकाळ राम मानसीं धरावा ।**
**वाचे उच्चारावा नामघोष ॥ ३ ॥**
**नामघोष वाचे श्रवण कीर्तन ।**
**चरणीं गमन देवालया ॥ ४ ॥**

रामपायीं शिळा दिव्य झाली बाळा ।
तैसाचि सोहळा मानवांसीं ॥ ५ ॥
महादेव सांगे जप पार्वतीस ।
तोचि तो विश्वास रामदासीं ॥ ६ ॥

श्रीरामाचें ध्यान कसें करावें हें समर्थांनीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. 'रत्नजडित सिंहासन । वरी शोभे रघुनंदन' हा अभंग किंवा 'सर्वांगसुंदर कासे पीतांबर' हा तीस चरणी अभंग पहा.

सर्वकाळ माझे मनीं आठवण ।
युगासम क्षण जात आहे ॥ १२ ॥
दिसेना कीं रूप सांवळें सुंदर ।
कासे पीतांबर कासियेला ॥ १४ ॥
कासियेली अंगीं चंदनाची उटी ।
मुक्तमाळा कंठीं डौल देती ॥ १५ ॥
शोभतसे माथां मुगुट रत्नकीळ ।
किरीटी तेजाळ रम्य शोभा ॥ १९ ॥
रम्य नीमासुरश्रीमुख साजिरें ।
दिव्य मकराकारें तळपताती ॥ २० ॥
आंदुवांकी पाई शोभे वीरासन ।
माझे मनीं ध्यान आठवलें ॥ २५ ॥

आठवलें रामचंद्रध्यान चित्तीं ।
सन्मुख मारुती उभा असे ॥ २८ ॥
वानरांसहित राम अयोध्येसी ।
आनंद जनांसी थोर जाला ॥ २९ ॥
जाला यशवंत राम सूर्यवंशी ।
रामीं रामदासी भेटी जाली ॥ ३० ॥

आपल्या मनीं असेल तसें किंवा गुरूनें दिलें असेल तसें ध्यान चित्तीं धरून एकाग्रतेनें पहावें. )

६७

घनश्याम हा राम लावण्यरूपी
महा धीर गंभीर पूर्णप्रतापी ।
करी संकटीं सेवकाचा कुडावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥

राम हा लावण्याचें केवळ आगर आहे, मेघासारखा उदार राम मेघश्याम ह्म० सांवळा आहे, तो महाधीर आहे, गंभीर आहे, पूर्णप्रतापी आहे, संकटीं सेवकांचें रक्षण ( कुडावा ) करणारा समर्थ व भक्तवत्सल आहे असें रामरूपाचें ध्यान करावें.

अभंग ठाण बाणलें । गुणीं धनुष्य ताणलें ।
सपिच्छ ते सणाणिले । भुमंडळीं दणाणिलें ॥८॥
कृपावलोकनीं भले । विशाळ नेत्र शोभले ।
सुवास्ति घेतली सुखें । नयेचि बोलतां मुखें ॥१०॥
प्रचंड दंड दंडिले । वितंड दैत्य खंडिले ।
विराश्रिया घडीघडी । धनुष्यबाण भातडी ॥१२
विद्यावळी पदीं वसे । विशेष दूसरा नसे ।
विबुधबंद तोडिले । अनंत जीव सोडिले ॥ १४ ॥

६८

बळें आगळा राम कोदंडधारी
महाकाळ विक्राळ तोही थरारी ।
पुढें मानवा किंकरा कोण केवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥

राम बळानें सर्वांपेक्षां श्रेष्ठ ( आगळा ) आहे, तो कोदंडधारी ह्म० धनुष्य हातीं धारण करणारा आहे. एवढा मोठा काळ कीं ज्याला सर्व लहानथोर भितात पण तोही त्याला पाहतां थरथर कांपतो, मग दीन-

दुबळ्या अशा मानवांचा त्यापुढें काय पाड (केवा)?– अशा बलिष्ठ रामाचें प्रभातीं ध्यान करावें.

दुर्बळाचें ध्यान करून काय लाभ ?

मोठमोठे देवदानवमानव सर्व रामाचें भजन करितात.

६९

**सुखानंदकारी निवारी भयातें**
**जनीं भक्तिभावें भजावें तयातें ।**
**विवेकें त्यजावा अनाचार हेवा**
**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

राम सुखानंद देणारा सुखमूर्ति आहे, सर्व भयांचें निवारण करणारा आहे, म्हणून मनीं व जनीं ( अंतरांत व बाहेर लोकांत ) भक्तिभावानें त्याला भजावें. भजकाचें अंतःकरण शुद्ध पाहिजे म्हणून अनाचार व मत्सर व इतर दोष टाकून द्यावेत व चित्त शुद्ध करून रामाचें प्रभातीं चिंतन करावें.

राम भय वारून आनंद देणारा आहे. भय देहबुद्धिजन्य द्वैतभावामुळें उत्पन्न होतें. ‘ द्वितीयाद्वै भयं भवति ’ अशी श्रुतीची वाणी आहे. ‘ भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात् ’ ( भागवत ११–२–३७ ) असें शुकाचार्यांचें वचन आहे.

राम तर ' एकमेवाद्वितीय ' असे आहेत, त्यांना दुसरें कोणी नाहीं म्हणून ते निर्भय आहेत. ' भयातीत तें संत आनंत पाहे ' ( १३६ ).

शुद्धचित्तानें भयनिवारक व आनंदरूप रामाचें ध्यान करावें. ' नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ' ( दास० ४-३-२५ ) असें चिंतन करावें. दासबोधांतील ४ थ्या दशकाचा तिसरा समास येथें पहावा.

७०

**सदा रामनामें वदा पूर्णकामें**
**कदा बाधिजेनापदा नित्यनेमें ।**
**मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा**
**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

पूर्णकाम ह्म० सकलकामना पूर्ण करणारें असें रामनाम घ्यावें किंवा रामनाम पूर्णकामें ह्म० अत्यंत प्रीतीनें-परमादरानें घ्यावें. तें नित्यनेमानें घेत राहिल्यास आपत्तींची ( संकटांची ) बाधा नामधारकांस कधींच होत नाहीं. नामस्मरण घडण्यास मद व आळस हे दोन दोष मुख्यतः कारणीभूत होतात म्हणून मद ह्म० आपल्या मोठेपणाचा डौल आणि आळस हे सोडून देऊन नम्रपणानें

व निरलसपणानें रामरूपाचें चिंतन करावें. दा.द.४ स.३:-

नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥
हरिनामें प्रल्हाद तरला ।
नाना आघातांपासून सुटला ।
नारायणनामें पावन जाला । अजामेळ ॥ १७ ॥
परमेश्वराचीं अनंत नामें ।
स्मरतां तरिजे नित्यनेमें ।
नामस्मरण करितां यमें । बाधिजेना ॥ १९ ॥
नित्यनेम प्रातःकाळीं । मध्यान्हकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥

७१

जयाचेनि नामें महादोष जाती
जयाचेनि नामें गती पाविजेती ।
जयाजेनि नामें घडे पुण्यठेवा
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥

ज्याच्या नामस्मरणें करून महादोषही नाहींसे होतात उत्तमगति मिळते न पुण्याचा ठेवा जोडतो त्या पतितपावन रामाचें प्रभातीं स्मरण करावें. दा. द. ४ स. ३:—

नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ।
महादोषांचे गिरिवर । नाममात्रें नासती॥ २१ ॥
नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटके नासती।
नामें होय उत्तमगती ॥ अंतकाळीं ॥ १३ ॥
सहस्रनामांमध्यें कोणी येक ।
ह्मणतां होतसे सार्थक ।
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होइजे स्वयें ॥ २० ॥

७२

न वेंचे कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं
मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।
महाघोर संसार शत्रू जिणावा
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥

नामस्मरण किती सुलभही आहे तें पहाः–नाम घेतां पदरचा, गांठीचा ( ग्रंथिचा ) पैसा ( अर्थ ) खर्चत नाहीं, व नाम घेतांना कष्टही लागत नाहींत. अशा सुलभ व सर्वसाध्य नामस्मरणानें महाभयंकर असा संसारशत्रु जिंकावा ( नामधारकापुढें संसाराचा बागुलबोवा उभा राहतच नाहीं ). नामानें एवढा महल्लाभ होतो म्हणून प्रभातकाळीं मनीं रामचिंतन करावें.

तुकोबांचा असाच एक अभंग आहेः-

**नाम घेतां न लगे मोल। नाममंत्र नाहीं खोल॥१॥**
**दोचि अक्षरांचें काम। उच्चारावा रामराम॥ध्रु.॥**
**नाहीं वर्ण धर्म याती। नामीं अवघींच सरती**
**तुका ह्मणे नाम। चैतन्यनिजधाम॥ ३॥**

समर्थांच्या वरील श्लोकाचे पहिले दोन चरण व तुकोबांच्या अभंगाचे पहिले दोन चरण अगदीं एकाच अर्थाचे आहेत. अभंगाचा तिसरा चरण पुढील ओवींत पहावा.:-

**चहुं वर्णा नामाधिकार। नामीं नाहीं लहानथोर**
**जड मूढ पैलपार। पावती नामें॥ (दा.४-३-२४)**

अभंगाच्या चौथ्या चरणांत नाम हें चैतन्याचें 'निज-धाम' आहे असें ह्मटलें आहे तर पुढें ८६ व्या श्लोकांत 'निजधाम हें नाम शोकापहारी' असेंच ह्मटलें आहे. समर्थ व तुकोबा यांचा नामस्मरणासंबंधाचा अनुभव व उपदेश अगदीं एकच आहे हें यावरून समजेल.

**पुण्याचें माहेर सार्थकाचें घर।**
**बहुतांचें छत्र स्वामी माझा॥ १॥**
**स्वामी माझा राम योगाचें मंडण।**
**संसारखंडण महाभय॥ २॥**

**महाभय कैचें अभेदभक्तासी ।**
**रामींरामदासीं धन्य वेळ ॥ ३ ॥**

**७३**

**देहेदंडणेचें महादुःख आहे**
**महां दुःख तें नाम घेतां न राहे ।**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा**
**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

जप, तप, तीर्थयात्रा, व्रतानुष्ठान इ० हरिप्राप्तीचीं साधनें अनेक आहेत त्यांत देहाला दंडन ह्म० कष्ट बहुत आहेत, पण नामस्मरणांत देहदंडनाचें दुःखकष्ट कांहींच नाहींत. रामनामाचें स्मरण परम योगेश्वर श्रीशंकरही नित्य करीत असतात ( मग तुला काय हरकत आहे ? तूं कांहीं शंकरापेक्षां थोर नाहींस!) द. ४-३-१५:-

**नामाचा महिमा जाणे शंकर ।**
**जना उपदेशी विश्वेश्वर ।**
**वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ॥**

वाराणशीला ह्म० काशीला 'मुक्तिक्षेत्र' हें नांव पडण्याचें कारण कीं तेथें शंकर नित्य रामनामस्मरण करीत

असतात व तेथें प्राण्याच्या अंतकाळीं ते त्याच्या कानांत राममनाममहामंत्र सांगतात व तेणेंकरून प्राणी मुक्त होतो. पुढें श्लोक ९९ पहा.

राम हा ‘ देवांचा देव ’ आहे, हरिहरब्रह्मादिक त्याचेंच भजन व स्तवन करितात. तो देवराय आहे. समर्थ ‘ मानपंचक ’ नामक प्रकरणांत स्वानुभव सांगतातः—

कास या रघुनाथाची। धरितां सुख पावलों।
इतर कष्टती प्राणी। थोर संसारसांकडीं ॥ १ ॥
सांकडीं तोडिलीं माझीं। राघवें करुणालयें।
पूर्वींच तुटली माया। दुःखशोक विसंचला ॥२
सेवकू मानवीयांचे। कष्टती बहुतांपरी।
सेविला देव देवांचा। तेणें मी धन्य जाहलों
जें नाम सकळां तारी। तें नाम मज अंतरीं॥८॥

७४

बहुतांपरी संकटें साधनाचीं
व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं।
दिनाचा दयाळू मनीं आठवावा
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥

तीर्थयात्रादि अनेक साधनें आहेत पण त्यांत बहुत कष्ट आहेत, संकटें आहेत, संसारिकांना नानाविध अडचणी आहेत. व्रतें, दानधर्म, उद्यापनें हीं तर कामें कष्टाचीं असून पैशाचींही आहेत. नामस्मरणाला कष्ट नकोत, धन नको, कांहीं नको. सर्वसुलभ साधन म्हणजे दीनदयाळु प्रभूचें त्याच्या चरणीं दीन होऊन स्मरण करणें हेंच होय.

**दानव्रततपोहोमजपस्वाध्यायसंयमैः ।**
**श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः कृष्णे भक्तिर्हि साध्यते ॥**

( भाग० १०–४७–२४ )

दान, व्रतें, तप, यज्ञ, जप, वेदाध्ययन, इंद्रियनिग्रह. व अशींच दुसरीं पुण्यकारक साधनें यांच्या योगानें साध्य करायचें काय तर परमात्मभक्ति.

तपोदानंव्रतंयज्ञो येन तुष्टत्यधोक्षजः ॥ ( भाग० ८-१६-४१ ) तप, दान, व्रत, यज्ञ तेंच कीं जेणेंकरून परमात्मा प्रसन्न होतो.

७५

**समस्तांमध्यें सार साचार आहे**
**कळेना तरी सर्व शोधून पाहे ।**
**जिवा संशयो वाउगा तो त्यजावा**
**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

सर्व साधनांत नाम हें खरोखर सारभूत श्रेष्ठ आहे. हें बोलणें समजत नसेल तर वेदशास्त्रपुराणें व संतवचनें शोधून पहा, संशय सोडून शोधून पहा, म्हणजे कळून येईल कीं सर्वांनीं रामचिंतन हाच परमोपाय सांगितला आहे.

७६

**नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं ।**
**ह्मणे दास विश्वास नामीं धरावा**
**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥**

कलिकालप्रभावामुळें कर्म, धर्म, योगयाग, भोगत्याग कांहीच सांग ह्म० यथाशास्त्र घडत नाहीं आणि ह्मणून तर एकच साधन जें उरलें तें नामस्मरण हें होय. यास्तव नामावर दृढ विश्वास ठेवून नामस्मरण करावें व विशेषतः प्रभातीं—वस्तुतः सर्वकाळीं—हरिचिंतन करावें.

## ६ रामविश्वास ( ७७–८० )

### ७७

**करी काम निःकाम या राघवाचें**
**करी रूप स्वरूप सर्वां जिवांचें ।**
**करी छंद निर्द्वंद हे गूण गातां**
**हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ॥**

या राघवाचें काम ( भक्ताला ) निःष्काम करी ह्म० श्रीरामाची आवड भक्ताला निष्काम करिते ह्म० रामभक्तीचा उदय चित्तांत झाला कीं भक्त सकलकामनारहित होतो. ( राघवाचें ) रूप ( भक्ताला ) सर्वांजीवांचें स्वरूप करी ह्म० रामरूप चित्तीं ठसावलें कीं भक्ताला सर्वभूतांतर्यामीं आपणच भरले आहोंत असें वाटतें. (राघवाचे हे गुण गातां ( व ) हरीकीर्तनी वृत्तिविश्वास होतां (राघवाच्या गुणांचा ) छंद ( भक्ताला ) निर्द्वंद्व करी ह्म० रामाचे गुण गाण्याचा व हरिकीर्तनावर दृढ विश्वासरति जडल्याचा छंद भक्ताला लागला कीं हा छंदच भक्ताला सकलद्वंद्वातीत करितो.

रामाची भक्ति भक्ताला निष्काम करिते ह्म० त्याच्या

ठिकाणीं रामाव्यतिरिक्त इतर कोणतीच कामना ठेवीत नाहीं. नारदांनीं आपल्या भक्तिसूत्रांत परमप्रेमरूप भक्ति मिळालेला भक्त 'सिद्धो भवत्यमृतो भवति तृप्तो भवति न किंचिद्वांछति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति' असा असतो ह्मणून ह्मटलें आहे. तुकोबाराय ह्मणतातः—

**तुज मागणें तें देवा। आह्मां तुझी चरणसेवा १**
**आन नेघों देसी तरी। रिद्धिसिद्धि मुक्ति चारी**
**संतसंगती सर्वकाळ। थोर प्रेमाचा सुकाळ ३**
**तुका ह्मणे नाम। तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥**

भगवंतावांचून अन्यकामनांचा निरोध ह्मणजेच भक्ति-भागवतांत (स्कंध ११-१४-१४) भक्तांला पारमेष्ठ्य ह्म० ब्रह्मपद, इंद्रपद, सार्वभौमपद या सार्‍यांचें स्वामित्व, योग-सिद्धी, फार काय मोक्ष सुद्धा नको असतो-भगवंतावांचून कांहीं एक नको असतें असें ह्मटलें आहे. हरिचिंतन हेंच भक्तांचें सर्व धन असतें.

रामाचें ध्यान भक्ताला सर्वांजीवांचें स्वरूप करितें ह्म० ध्यानानें रामरूप झालेला भक्त आपण सर्वाभूतीं भरले आहोंत, सर्व जीव आपणच आहोंत, असें पाहतो.

**सर्वभूतेषु यःपश्येद्भगवद्भावमात्मनः ।**

भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥

( भाग० ११-२-४५ )

जो सर्वभूतांच्या ठायीं आपला भगवद्भाव पाहतो, आपण भगवद्भक्त आहोंत तसेंच सर्व भूतें हरिस्वरूप आहेत असें पाहतो व सर्वभूतें आपल्या ठिकाणीं पाहतो तो उत्तम भक्त होय.

हरिश्चंद भक्ताला निर्द्वंद्व करितो हें गीतेच्या १२ व्या अध्यायांत 'हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तोयः स च मे प्रिय ' ' यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति, ' ' समः शत्रौच मित्रेच तथा मानापमानयोः । शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः' 'तुल्यनिंदास्तुतिर्मौनी '—इ० वर्णनावरून स्पष्ट आहे. भक्त याप्रमाणें द्वंदनिर्मुक्त असतो.

७८

**अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं**
**तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ।**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता**
**वृथा वाहणें देहसंसारचिंता ॥**

अहो ! ज्या मनुष्याचा रामावर विश्वास नाहीं त्या पामराला-त्याच्या देहबुद्धीमुळें-सर्वकांही संसाराची परोपरीची

पीडा सोसावी लागते. प्रभु राम, कैवल्यदाता राम, मोक्षाएवढें घबाड देण्यास समर्थ असा राम, शिरावर असतांना व 'योगक्षेमं वहाम्यहम्' असा त्याचा बाणा असतांना त्यावर विश्वास न ठेवतां जीवानें देहाची व संसाराचीं चिंता व्यर्थ वहावी यास काय ह्मणावें ?

७९

मना पावना भावना राघवाची
धरी अंतरीं सोडिं चिंता भवाची ।
भवाची जिवा मानवा भूलि ठेली
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली ॥

हे मना ! राघवाची पावना भावना ह्म० पवित्र निर्मळ भावना अंतरांत धर व भवाची ( संसाराची ) चिंत्ता सोड. जीवाला ह्म० मानवाला भवाची भूल पडल्यामुळें तो नसे वस्तुची ह्म० देहगेहादि मिथ्याप्रपंचाची धारणा करितो, देहादि प्रपंच सत्य मानून तेथेंच मन लावतो, पण शेवटीं ही नश्वर भवाची धारणा व्यर्थ जाते, ती कांहीं अंतकाळीं त्याच्या उपयोगी पडत नाहीं.

८०

धरा श्रीवरा त्या हराअंतरातें
तरा दुस्तरा त्या परा सागरातें ।
सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें
करा नीकरा त्या खरा मत्सरातें ॥

हरा–अंतरा ह्म० शिवाचें हृदय जो लक्ष्मी( सीता )पति राम त्या रामास आपल्या हृदयांत सांठवा, ह्मणजे पर ( महान् ) असा जो दुस्तर भवसागर त्याला तरून जाल. त्या दुर्भरातें ह्म० कितीही भरलें तरी जें भरणें कठिण अशा पोटातें भरा, पोटापाण्याचा उद्योग करा, पण त्या पोटाला कांहीकाळ तरी विसरा, त्यापासून जरा मागें सरून अंतर्मुख होऊन पहा. तो खरा ( गाढव ) मत्सर त्याला नीकरा करा ह्म० त्याच्याशी निकरानें झगडून त्याचा नाश करा.

पहिले दोन चरण तर. ‘ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ’ ह्या गीताश्लोकाचीच (अ. ७–१४) छाया आहे. ह्या श्लोका-वरील ज्ञानेश्वरीभाष्य पहावें. ‘ येथ एकाचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले ’ हें त्याचें सार आहे.

## ७ नामस्मरण ( ८१-१०२ )

( येथून पुढें २२ श्लोकांत नामस्मरणाचें मांहात्म्य वर्णिलें आहे. कलियुगांत नामस्मरण हेंच मुख्य साधन सर्वसंतांनीं एकमतानें सांगितलें आहे, कां कीं सर्वकाळीं सर्वांनां सुसाध्य व सुलभ व निश्चयानें कार्यसिद्धकर असें हरिप्राप्तीचें सर्वसाधनांवरिष्ठ असें हें एकच साधन आहे असा सर्वांचा अनुभव आहे. शंकरासारख्यांनीं रामनामच परमप्रीतीनें आदरिलें आहे. अजामीळ व प्रल्हादध्रुवादि अनेक भक्त नामानेंच उद्धरले आहेत. हरीची पूजा, व हरिगुणालाप, हें कांहीं नियमित काळींच होऊं शकतात—पण नामानुसंधान अखंड ठेवतां येतें म्हणून ह्याच साधनाचा येथें मनाला उपदेश केला आहे. सगुणोपासनेचें साधन-सर्वस्व नामस्मरण हेंच आहे. यांत सर्व कांहीं येतें ).

८१

**मना मत्सरें नाम सांडूं नको हो**
**अतीआदरें हा निजध्यास राहो ॥**
**समस्तांमध्यें नाम हें सार आहे**
**दुजी तूळणा तूळितांही न साहे ॥**

हे मना ! देवधर्मसंतांविषयीं मत्सरग्रस्त ह्म० संशयित होऊन नामस्मरण सोडूं नकोस हो ! अतिआदरानें नामानुसंधान ठेव. सर्व साधनांचें सार हें नाम आहे, त्याची सर यज्ञयागतपव्रतादिकांना येणार नाहीं.

श्रेष्ठ ' सुगमोपाय ' नामक ग्रंथांत ह्मणतातः—

जो नवविध भक्तीचें मूळ ।
जो चतुर्विध मुक्तीचें फळ ।
जो सर्वसाधनांची सिद्धि केवळ ।
तो उघडा मंत्र श्रीराम ॥

८२

**बहू नाम या रामनामीं तुळेना**
**अभाग्या नरा पामरा हें कळेना ।**
**विषा औषध घेतलें पार्वतीशें**
**जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥**

अनेक नाममंत्र आहेत पण रामनामाशीं त्यांची तुळणा होऊं शकत नाहीं, रामनाम सर्वनामांवरिष्ठ आहे, सर्वांत उत्तम आहे, पण हें पामर निर्दैव जे आहेत त्यांना कळत नाहीं. साक्षात् शंकरांनीं हालाहलनामक अत्यंत जहर

विषावर उतारा म्हणून रामनाम कंठीं धारण केलें व विषाची त्यांना त्यानंतर बाधा झाली नाहीं. शंकर रामनामाला इतकें जपतात मग बापड्या मानवांची कथा काय ?

समुद्रमंथनसमयीं 'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा' इ० १४ रत्नें प्रकट झालीं त्यांत हालाहल किंवा कालकूट नांवाचें अत्यंत जहाल विष बाहेर पडलें. तें विष जगाला जाळीत सुटलें. सर्व ब्रह्मांडांत हाहाःकार उडाला. देवदैत्यही घाबरले. तेव्हां 'कृपया भृशपीडितः' ह्म० जगाची करुणा येऊन शंकरांनीं जगत्कल्याणार्थ तें विष प्राशन केलें. लोककल्याणार्थ स्वतःवर त्यांनीं घोर संकट ओढवून घेतलें. 'तें विश्वप्राणहर व्यसन विलोकूनि फार कळवळला' असें पंत ह्मणतात. त्या विषानें शंकरांच्या अंगाचा फार दाह जाला. दाहशमनार्थ त्यांनीं मस्तकावर चंद्रमा व जटेंत गंगा धारण केली, तरी दाह कमी होईना, तेव्हां रामनाम कंठांत धारण केलें व त्यानें दाह शमला. ह्या गोष्टीकडे नजर ठेवून वरील श्लोक पहावा. ही सुंदर कथा भागवत स्कंध ८ अ. ५ ते ९ मध्यें पहावी. लोककल्याण-कारी महात्म्यावर घोर संकटें आलीं तरी त्यांतून त्यांना पार पाडण्याचें सामर्थ्य एका रामनामांत आहे असें या कथेचें वर्म आहे.( दास.१६-८-३ ):-

**सकळ जनामध्यें नाम । रामनाम उत्तमोत्तम ।**
**श्रम जाऊनि विश्राम । चंद्रमौळी पावला ॥**

८३

**जेणें जाळिला काम तो राम ध्यातो**
**उमेसीं अतीआदरें गूण गातो ।**
**बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें**
**परी अंतरीं नामविश्वास तेथें ॥**

शंकरानीं आपल्या दृढतर वैराग्यानें मदनाला जाळून टाकलें तरी तेही रामचिंतनांत निमग्न असतात व पार्वतीला परमादरपूर्वक रामाचे गुणानुवाद सांगतात (अध्यात्म-रामायण उमामहेश्वरसंवादात्मक आहे हें प्रसिद्ध आहे) ज्ञान, वैराग्य, सामर्थ्य यांनीं संपन्न असे शंकर परमसमर्थ असूनही त्यांच्या चित्तीं रामनामाचा एवढा दृढ विश्वास आहे ! (मग कामादि विकारांचे किंकर व दुर्बळ अशा पामरांनीं स्वहितार्थ रामनाम कितीं तरीं आस्थेनें घ्यायला पाहिजे बरें ?)

असें असून कोणी रामाला हट्टानें नच भजेल तर—

**साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखे व्हावें ।**
**आणि देवास न मनावें । हें कोण ज्ञान ? ॥१९॥**

हरिहरब्रह्मादिक। हे जयाचे आज्ञाधारक।
तूं येक मानवी रंक। भजसीना काय गेलें॥२०॥
(दास. ६–७)

ज्ञानाच्या अभिमानानें कोणी सगुणोपासनेचा व नाम-स्मरणाचा अव्हेर करील तर तें त्याचें ज्ञान व्यर्थ होय. 'मी थोर वाटे मनीं। तो नव्हे ब्रह्मज्ञानी'

अभंग

मुक्तपणें नको रामाचा अव्हेरु।
करी तो गव्हारु (मूर्ख) मुक्त नव्हे।
मुक्त नव्हे काय स्वयें शूळपाणी।
रामनाम वाणी उच्चारितो॥ २॥
उच्चारितो शिव तेथें किती जीव।
बापुडे मानव देहधारी॥ ३॥
रामनाम वाचे रूप अभ्यंतरीं।
धन्य तो संसारीं दास ह्मणे॥ ४॥

रामभक्त तुळचीदासजी आपल्या रामायणांत ह्मणतातः–

रामनाम कर अमित प्रभावा।
संत पुरान उपनिषद गावा।
संतत जपत संभु अविनासी।
सिव भगवान ज्ञानगुनरासी।

रामनामाचा प्रताप अपरंपार आहे, ह्मणून सर्व पुराणें व उपनिषदें गर्जून राहिलीं आहेत. ज्ञानगुणराशि व अविनाशी भगवान् शंकरसुद्धां रामनामाचाच अखंड जप करितात!

भागवतधर्मांत हरिहरांविषयीं समप्रीति आहे. हरि हरास व हर हरीस यथार्थ जाणतात व भजतात. विष्णुविषयीं अप्रीति बाळगणारा शैवच नव्हे व शिवाविषयीं प्रीति नसेल तर तो वैष्णवच नव्हे ! ज्ञानेश्वरांनीं आपली परंपरा 'आदि गुरुशंकरा—। लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसरा (विस्तार) आला जो आमुतें' याप्रमाणें शंकरापासून आली आहे असें ह्मटलें असून वारकरी संप्रदायाचे आद्यगुरु शंकर आहेत. समर्थांची शंकरभक्ति मनोबोधावरून प्रगटच आहे. तुलसीदास म्हणतातः——

**सिवपद कमल जिन्हहि रति नाहीं ।**
**रामहि ते सपनेहु न सुहाहीं ।**
**बिनुछल बिस्वनाथ पद नेहू ।**
**रामभगत कर लच्छन एहू ।**

ज्यांचें शिवपदकमलीं प्रेम नाहीं ते रामास स्वप्नांतही प्रिय व्हायचे नाहींत. शिवचरणीं निष्कपट ( बिनुछल ) प्रेम असणें हेंच रामभक्ताचें लक्षण होय !

८४

विठोनें शिरीं वाहिला देवराणा
तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी
जिवां सोडवी राम हा अंतकाळीं ॥

ज्या शंकराला श्रीविठ्ठलानें आपल्या मस्तकावर प्रेमानें धारण केले आहे ( पंढरीची विठ्ठलमूर्ति पहा ) त्याला रामाचा अंतरीं एवढा निजध्यास आहे आणि तुह्मी त्याला ओळखत नाहीं याला ह्मणावें तरी काय? महातापसी असे शंकरही रामचिंतनानें शांत झाले, त्यांची पीडा दूर झाली. अंतकाळीं जीवाला रामावांचून सोडाविण्यास कोणीच समर्थ नाहीं ह्मणून रामचिंतन करा.

८५

भजा राम विश्राम योगेश्वरांचा
जपू नेमिला नेम गौरीहराचा ।
स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी
तुम्हां सोडवी राम हा अंतकाळीं ॥

योगेश्वरांचा विश्राम अशा रामाला भजा. उमामहेश्वर रामनामाचा नियमानें जप करून शमसुख पावले आहेत. अंतकाळीं रामच सोडवील बरें !

कामादि षड्रिपु जिंकलेले, ज्ञानवैराग्यसंपन्न, महान् तपस्वी व योगेश्वर असे शंकरही रामनामाचा जप परमादरप्रेपूमर्वक करीत आहेत, मग त्यांच्या गुणांचा लेशही ज्यांचे जवळ नाहीं अशा कामजित, पामर, तपोहीन अशा मानवांनीं स्वहितार्थ रामभजनाचा किती आस्थेनें व आवडीनें आदर केला पाहिजे बरें ! भक्तिज्ञानवैराग्याचे मूर्तिमंत पुतळे अशांनाही रामनामस्मरणानें वेध लावला आहे. त्या रामनामाची कास आपण धरिली नाहीं तर आपली अंतकाळीं तरी सोडवणूक कोण करील ? शंकराचें उदाहरण जीवांनीं नित्य डोळ्यांपुढें ठेवलें पाहिजे. ' तरि श्रद्धावस्तूसी आदरू । करितां जाणिजे प्रकारू । जरी होय श्रीगुरु । सदाशिव ' ( ज्ञाने० १२–२१६ ) शंकरांनीं हरिचरणापासून निघालेली गंगा ( हरिपादोदक ) तीर्थबुद्धीनें मस्तकावर धारण केली व मुखांत रामनाम अखंड ठेवलें, याबद्दल श्रद्धावस्तूचा आदर कसा करावा हा धडा शिकण्यासाठीं सर्वांनीं श्रीशंकराला गुरु करावें हेंच योग्य आहे.

' जिवा सोडवी राम हा अंतकाळीं ' म्हणून तर स्वतः

देवांनींच ' अंतकालेच मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरं । यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ' ( गीता अ. ८-५ ) असें स्वमुखानें सांगितलें आहे. अंतकाळीं हरिस्मरणानें परम गति मिळते, पण अंतकाळीं स्मरण व्हावें असें वाटत असेल तर स्मरणाचा जन्माभ्यासच ठेवला पाहिजे.

८६

**मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे**
**सदानंद आनंद सेऊनि राहे ।**
**तयावीण तो सीण संदेहकारी**
**निजधाम हें नाम शोकापहारी ॥**

सुखांत राम असेल तरच चित्तांत विश्राम ( शमसुख ) असतो, म्हणून मना ! अखंड नामस्मरणानें तूं निजानंदीं रत होऊन रहा. रामावांचून बाकी सारे श्रमच आहेत. नाम हें निजधाम ह्म० निजाचें, परमात्म्याचें, धाम ( घर ) असून सर्व दुःखशोक हरण करणारें आहे.

**माझें मनीं सर्व सुख व्हावें तुज ।**
**ह्मणोनियां गुज सांगतसे ॥ १ ॥**
**राघवाचें प्रेम तें करी विश्राम ।**

येर सर्व श्रम जाण बापा ।
सांगतसे खूण माझे अंतरींची ।
सर्वही सुखाची सुखमूर्ती ॥
लागो नेदी कष्ट आपुल्या दासासी ।
रामीरामदासीं साहकारी ॥ ५ ॥

८७

मुखीं राम त्या काम बाधूं शकेना
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।
हरीभक्त तो शक्त कामास मारी
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥

ज्याच्या मुखांत राम आहे त्याला कामाची पीडा होत नाहीं, व नामसंकीर्तनाच्या योगानें ( गुणें ) विषयवासनांशीं झगडण्यांत त्याचें धैर्य चळत नाहीं ह्मणजे तो सर्व अंतर्बाह्य रिपूंवर विजय मिळवितो. हरिभक्त हा हरिभक्तीच्या गुणेंकरून मोठा बलिष्ट असतो व ह्मणून तो कामादिकांस जिंकतो. असे ब्रह्मचारी मारुतिराय धन्य होत !

८८

बहू चांगलें नाम या राघवाचें
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें
जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें ॥

'राम' हें नाम फारच चांगलें आहे, मधुर आहे, तें फार सुंदर (साजिरें), स्वल्प (दोचि अक्षरांचें काम) सोपें व फुकटचें (नवेचें कदा ग्रंथिचें अर्थ कांहीं) आहे. आणि असें असून भवाचें मूळ निर्मूळ करितें ह्म० जन्माचें मूळ जी वासना तिचें बीज जाळून तिला निर्मूल करिते. मानवांना नाम हेंच कैवल्य, ब्रह्म, मोक्षधन आहे.

८९

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें
अती आदरें गद्य घोषें ह्मणावें ।
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥

लोकांत वागतांना, भोजन करितांना, नामाची गर्जना करावी, आदरानें नामाचा मोठ्यानें घोष करावा. हरिचिंतन

करीत असतां भोजन सारावें, तात्पर्य ' चालतां बोलतां, धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ' ( दास० ४–३- ७ ). येणें करून अनायासें श्रीहरीची प्राप्ती होते.

तुकोबा ह्मणतातः—

**(१) पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥ १ ॥**
**तुका ह्मणे चवी आले । जे कां मिश्रित विठ्ठलें॥४**
**(२) नाम घेतां ग्रासोग्रासी ।**
**तो नर जेविला उपवासी ॥**

९०.

**न ये राम वाणी तया थोर हाणी**
**जनीं व्यर्थ प्राणी तया नाम काणी ।**
**हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं**
**बहू आगळें बोलिली व्यासवाणी ॥**

ज्याच्या मुखाला राम येत नाहीं त्याचा मोठा घात आहे. 'जनांत त्याचें आयुष्य व्यर्थ आहे ह्म० ज्याला नर-देहाची मातब्बरी कळत नाहीं त्याला नामस्मरण हें क्लेश-दायक किंवा कष्टाचें ( काणी ) वाटतें. हरिनाम हें बहु

आगळें ( श्रेष्ठ ) आहे असें वेदशास्त्रांनीं व पुराणांत व्यासांनीं सांगितलें आहे.

ज्ञानेश्वरांचे 'हरिपाठाचें अभंग' सुप्रसिद्ध आहेत त्यांत:-

**चहू वेदीं जाण साहिशास्त्रीं कारण ।**
**अठराही पुराणें हरिसी गाती ॥ २१ ॥**

असा चरण आहे. हरि मुखें ह्मणा । हरि मुखें ह्मणा ' हेंच साऱ्या हरिपाठाचें पालुपद आहे. हरिपाठ ही वारकऱ्यांची संध्या आहे. ज्ञानेश्वरांचा तसाच नाथांचाही ' हरिपाठ ' पहावा. तुळशीदास रामायणांत:—

**अगुनसगुनबिच नाम सुसाखी ।**
**उभयप्रबोधक चतुर दुभाखी ।**

सगुणनिर्गुणांत राम हा उत्तम साक्षी ( सुसाखी ) असून उभयतांचें यथार्थ ज्ञान करून देणारा दुभाष्या आहे !

**जपहि नाम जन आरत भारी ।**
**मिटहि कुसंकट होहि सुखारी ।**

लय लावून आर्त ह्म० संसारपीडित जन जर नामस्मरण करतील तर संकटांचा नाश होऊन ते सुखांत नांदतील.

**चहुं जुग चहु स्रुति नाम प्रभाऊ ।**
**कलि बिसेषि नहि आन उपाऊ ।**

चारी युगांत व चारी वेदांत नामाचाच प्रभाव प्रगट आहे, विशेषतः कलियुगांत तर नामावांचून तर दुसरें कोणतेंही साधनच नाहीं.

९१

**नको वीट मानूं रघूनायकाचा**
**अतीआदरें बोलिजे राम वाचा ।**
**न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा**
**करीं घोष त्या जानकीवल्लभाचा ॥**

मना ! नामस्मरणाचा कंटाळा करूं नकोस, अत्यादरपूर्वक वाचेनें नाम घेत जा. यांत तुझें कांहीं वेंचत नाहीं ह्मo खर्च होत नाहीं, आणि अनायासें रामाची भेट होते. मुखानें सीतापति रामाचा घोष कर ह्मणजे राम सहजासहजी सांपडेल.

**न सोडी रे भावो टाकी रे संदेहो ।**
**रामकृष्णीं टाको नित्य फोडी ॥ २४-२ ॥**
**( हरिपाठ )**

९२

**अती आदरें सर्वही नामघोषें**
**गिरीकंदरीं जाइजे दूर दोषें ।**

**हरी तिष्ठतु तोषला नामघोषें**
**विशेषें हरामानसीं रामपीसें ॥**

अत्यादरानें रामनामाचा घोष केल्यानें अंतरीचे सर्व दोष दूर गिरिकंदरीं पळून जातात. नामघोष चालत असेल तेथें अत्यंत संतोषानें हरि राहतो. रामाचें वेड विशेषतः शंकराच्या मनाला लागलें आहे.

**हरिउच्चारणीं अनंत पापराशी ।**
**जातील लयासी क्षणमात्रें ॥ ११-१ ॥**
**रामकृष्णउच्चार अनंत राशी तप ।**
**पापाचे कळप पळती पुढें ॥ १४-२ ॥**
**रामकृष्णनाम सर्व दोषां हरण ।**
**जड जीवां तारण हरि एक ॥ २१-२ ॥**

इ० चरण ज्ञानेश्वरांच्या हरिपाठांत आहेत.

**नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥**

हा श्लोक कोठला आहे तें समजत नाहीं, पण याची छाया ज्ञानोबातुकोबांप्रमाणेंच समर्थांच्या वाणीवर ही पडली आहे. ‘ नामघोषें तोषला हरी तिष्ठतु ’ याचा स्पष्टार्थ वरील

श्लोकांत आहेच. शिवाय दासबोधांत ‘ सभास्तवनाच्या ’ समासांत :—

**आतां वंदू सकळसभा। जये सभेसी मुक्ति सुलभा। जेथें जगदीश स्वयें उभा। तिष्ठतु भरें१ नाहीं वैकुंठीच्या ठाईं। नाहीं योगियांचे हृदईं। माझे भक्त गाती ठाईं ठाईं। तेथें मी तिष्ठतु नारदा॥ २॥**

ज्ञानेश्वरींत ( अ० ९–१४ ) ‘ सततं कीर्तयन्तो मां ’ ह्या श्लोकांवरील टीकेंत नाममाहात्म्य उत्कृष्ट प्रकारें सांगतांना महाराज ह्मणतात :—

**तो मी वैकुंठीं नसे। वेळ एक भानुबिंबींही न दिसे। वरी योगियांचींही मानसें। उमरडोनि जाय॥ २०७॥ परी तयापाशीं पांडवा। मी हारपला गिंवसावा। जेथ नामघोष बरवा। करिती माझा॥ २०८॥**

तुकोबांनीं ही ‘ माझे भक्त गाती जेथें। नारदा मी उभा तेथें ’। असा एके ठिकाणीं चरण घातला आहे.

९३

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता**

**तया लागली तत्वता सार चिंता।**

**तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें**
**मना सांग पां रे तुझें काय वेचें ॥**

सर्व जीवांचा अन्नदाता ह्म॰ योगक्षेम चालविणारा देव असून त्यानें सर्व भार शिरावर घेतला आहे, मग हे मना! त्याचें फुकटचें नांव तोंडानें घेण्यांत रे! तुझें काय जातें? इतकी कृतज्ञताही तुझे ठिकाणीं नाहीं काय?

९४

**तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां**
**निवाला हरु तो मुखें नाम घेतां।**
**जपे आदरें पार्वती विश्वमाता**
**ह्मणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां ॥**

जो प्रळयकाळीं कोपानें त्रैलोक्य जाळूं शकतो असा समर्थ शंकरही मुखानें ‘रामराम’ ह्मणतां उपशम पावला. विश्वनाथाप्रमाणें विश्वमाता पार्वतीही रामनामस्मरण आदरानें करीत आहे. विश्वाचे मायबाप उमामहेश्वर हेही रामनाम जपत आहेत हें जाणून तरी रामनामाचा जयजयघोष करा.

**सुरेंद्र चंद्रशेखरु। अखंड ध्यातसे हरु।**
**जनांसि सांगतो खुणा। ‘श्रीरामराम हें ह्मणा’।१**

महेश पार्वतीप्रती । विशेष गुज सांगती ।
"सलाभ होतसे दुणा । श्रीरामराम हें ह्मणा ।२।
विषें बहुत जाळिलें । विशेष आंग पोळिलें ।
प्रचीत माझिया मना । श्रीरामराम हें ह्मणा ॥३॥
बहुत प्रेत्न पाहिले । परंतु सर्व राहिले ।
विबुधपक्षरक्षणा । श्रीराम राम हें ह्मणा ॥ ४ ॥
अपाय होत चूकला । उपाय हा भला भला ।
नसे जयाहि तूळणा । श्रीरामराम हें ह्मणा ॥५॥
बहूत पाहिले खरें । परंतु दोनि अक्षरें ।
चुकेल यमयातना । श्रीरामराम हें ह्मणा ॥ ६ ॥
मनीं धरूनि साक्षपें । अखंड नाम हें जपें ।
मनांतरीं क्षणक्षणा । श्रीरामराम हें ह्मणा ॥ ७ ॥
( समर्थ )

तुळसीदासजीनीं रामनाममाहिमा गातांना शंकर, नारद, ध्रुव, प्रल्हाद, गजेंद्र, पिंगलावेश्या ( गणिका ), अजामिळ, हे नामस्मरणानेंच तरले ह्मणून ह्मटलें आहे ( बालकांड )–

नाम प्रसाद संभु अविनासी ।
साज अमंगल मंगलरासी ।
सुकसनकादि सिद्धमुनि जोगी ।
नामप्रसाद ब्रह्मसुख भोगी ।

नारद जानेउ नामप्रतापू ।
जगप्रिय हरि हरिहरप्रिय आपू ।
नाम जपत प्रभु कीन्ह प्रसादु ।
भगतसिरोमनि भे प्रल्हादू ।
ध्रुव सगलानि जपेउ हरिनाऊ ।
पाएउ अचल अनूपम ठाऊ ।
सुमिरि पवनसुत पावननामू ।
आपने वस करि राखे रामू ।
जपत अजामिल गज गनिकाऊ ।
भये मुकुत हरिनाम प्रभाऊ ।

९५

अजामेळ पापी वदें पुत्रकामें
तया मुक्ति नारायणाचेंनि नामें ।
शुकाकारणें कुंटणी राम वाणी
मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ॥

अजामिळ नांवाचा ( मूळचा सदाचारी पण अनावर विषयवासनेच्या स्वाधीन झाल्यामुळें ) पापी बनलेला ब्राह्मण ( दासीपासून झालेल्या १० पुत्रांपैकीं शेवटच्या )

नारायण नामक पुत्रावर अत्यासक्तीमुळें ' नारायण ' नामाचा सततोच्चार करून पापमुक्त होऊन सद्गतीला गेला. तसेंच पिंजऱ्यांतल्या राघूचें नांव ' राम ' ठेवून ' रामराम ' सतत उच्चारणारी गणिका उद्धरून गेल्याची कथाही पुराणांतून प्रसिद्ध आहे.

अजामिलाचें आख्यान भागवतांत ( स्कंध ६ अ. १।२।३ ) पहावें. यासंबंधानें वामनपंडितांची ' नामसुधा ' लोकप्रिय आहेच. मूळ भागवती आख्यानच अवश्य वाचून पाहावें ह्मणजे नामस्मरणानें पापनाश कसा होतो याचा स्पष्ट बोध होईल. केवढींही पापें पूर्वी हातून घडलीं असलीं तरी प्रभुपदारविंदाच्या ठिकाणीं चित्त खरोखर जडल्या-नंतर तीं क्षणांत दग्ध होऊन जातात.

**सर्वेषामप्यघवतामिदमेव सुनिष्कृतम् ।**
**नामव्याहरणं विष्णोर्यतस्तद्विषयामतिः। ६-२-१०**

सर्वही पाप्यांचें उत्तम प्रायश्चित ह्मणजे विष्णूचें नाम-स्मरण हेंच होय, कारण नामधारकाविषयीं ' मी याचें रक्षण केलें पाहिजे ' अशी भगवंताला बुद्धि होते.

**तत्कर्मनिर्हारमभीप्सतां हरे ।**
**गुणानुवादः खलु सत्वभावनः ॥ १२ ॥**

ह्मणून सर्वकर्मांचा नाश (निर्हार) व्हावा अशी ज्यांना इच्छा असेल त्यांना (अभीप्सतां) हरीचें गुणानुवाद चित्त-शुद्धिकर होतात.—हरिनाम कोणत्याही मिषानें घेतलें तरी एखादें जालीम औषध रोग्यानें त्याचे गुण कळून अथवा न कळून घेतलें तरी गुण करितेंच, त्याप्रमाणें हरिनाम सांकेत्यं ह्म० संकेतानें मुलाचें वगैरे नांव ठेवून, पारिहास्यं ह्म० थट्टेनें, स्तोभं ह्म० गाण्याच्या आलापांत, किंवा हेलन ह्म० हेळणेनें घेतलें तरी सुद्धां तें जीवाचा पापनाश करितेंच करितें ( ६-२-१४ ). तात्पर्यः—

**म्रियमाणो हरेर्नाम गृणन्पुत्रोपचारितम् ।**
**अजामिलोप्यगाद्धाम किं पुनः श्रद्धया गृणन् ।**

पुत्राचे ह्मणून ठेवलेलें नारायणाचें नाम मरतांना अजा-मिळानें घेतलें तरी तेवढ्यानें तो विष्णुपदीं गेला, मग श्रद्धेनें नामस्मरण करणारा पुरुष उत्तम पद पावेल यांत नवल काय ? तात्पर्य नामस्मरणादि उपायांनीं भगवंता-विषयीं भक्तियोग मिळविणें हाच जीवांचा परमधर्म आहे ( ६-३-२२ ). तुकाबाराय सांगतातः—

(१) **नामसंकीर्तन साधन पैं सोपें ।**
**जळतील पापें जन्मांतरिचीं ॥ १ ॥**
**न लगती सायास जावें वनांतरा ।**

सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा ।
मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ३ ॥
(२) भक्तकरुणा बहु तुझिया अंतरा ।
मज विश्वंभरा कळों आलें ॥ १ ॥
पक्षियासी तुझें नाम जें ठेविलें ।
तये उद्धरिलें गणिकेसी ॥ २ ॥
कुंटिणी ते दोष बहु आचरली ।
नाम घेतां आली करुणा तुज ।
तुका ह्मणे सीमा नाहीं तुझे दये ।
कोमल हृदय पांडुरंगा ॥ ४ ॥

९६

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं
जपे रामनामावळी नित्यकाळीं ।
पिता पापरूपी तया देखवेना
जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना ॥

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकुळांत ( हिरण्यकशिपूच्या पोटीं ) जन्मास आला तरीही त्यानें अखंड नारायणाच्या नामस्मरणाचा छंद घेतला. त्या पापी पित्याला तें न खपून

त्यानें पुत्राचा अनन्वित छळ केला. त्या दैत्याच्या तोंडून कांहीं देवाचें नाम आलें नाहीं.

प्रल्हादानें श्रद्धापूर्वक नामस्मरण केल्यानें तो दैत्यकुळांत जन्मूनही उद्धरला यावरून कोणत्याही जातिकुळांत जन्म मिळाला तरी भक्तियोगानें जीव तरतो हें सिद्ध होतें. प्रल्हादाची ही कथा पुढें १२१ वे श्लोकांत ही आली आहे प्रल्हादाची सुंदर कथा मूळभागवतांत ( स्कंध ७ अ. ५ ते १० ) पाहावी. प्रल्हाद हा ' कृष्णग्रहगृहीतात्मा ' होता ह्म० त्याला कृष्णरूपी महाभूतानें पछाडलें होतें.

**आसीनः पर्यटन्नश्नन्शयानः प्रपिबन्ब्रुवन् ।**
**नानुसंधत्त एतानि गोविंदपरिरंभितः ॥**

तो प्रल्हाद याप्रमाणें गोविंदानें आलिंगलेला (परिरंभितः स्वीकारलेला, अंगीकृत केलेला ) असल्यामुळें बसतां (आसीनः) फिरतां ( पर्यटन् ), खातां ( अश्नन् ), निजतां ( शयानः ) पितां ( प्रपिबन् ) बोलतां ( ब्रुवन् ) आपण काय करीत आहोंत इकडे त्याचें अनुसंधान नसे. त्याचें बाह्यकर्मांकडे लक्ष नसे पण हरीचें अनुसंधान पळभरही सुटत नसे. ' वासुदेवे भगवति तस्य नैसर्गिकी रतिः ' ह्म० भगवंताविषयीं त्याला सहजप्रेम असे, प्रल्हादाला त्याच्या बापानें एकदां विचारिलें ' बाळा ! तुला गुरुजीनें जे

पाठ दिले त्यांतला एखादा पाठ ह्मणून दाखीव ' यावर ते महाभागवत ह्मणाला कीं

"श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन दास्य, सख्य व आत्मनिवेदन या नवविध प्रकारांनीं विष्णूची भक्ति ज्याच्या योगानें होते तें अध्ययन, शिक्षण ( अधीत ) उत्तम होय ! " बाप देहाभिमानी, अहंकारी नास्तिक व पुत्र परमात्माभक्त. बापाला हें भाषण आवडलें नाहीं. देवाचा छंद सोडण्याविषयीं त्यानें त्याला हरतऱ्हेनें सांगितलें पण उपयोग काय ? प्ऱ्हादाचा नामछंद अनावर झाला. शेवटीं बापानें त्याचा अमानुष छळ केला.

शेवटीं हिरण्यकशिपु पुत्रास मारावयास तयार झाला ! मूर्खा ! मीच देव आहें, माझ्यावांचून दुसरा देव कुठचा आणतोस ! कोठें आहे तुझा देव ? ' प्रल्हाद ह्मणालाः—

**भू जल तेज समीर ख-रविशशि काष्ठादिकीं असे भरला । स्थिरचर व्यापुनि अवघा तो परमात्मा दशांगुलें उरला ॥**

हें ऐकतांच ' या समोरच्या खांबांत देव आहे काय ' हा उग्र प्रश्न करून त्या असुरानें खांबावर लत्ताप्रहार केला तोंच त्या स्तंभांतून भगवान् नृसिंहरूपानें प्रगट झाले, नृसिंहाचें रूप अत्यंत उग्र पाहून हिरण्यकशिपु तर भ्याला,

पण प्रल्हाद शांत होता. ब्रह्मादि देवांनीं स्तुति केली पण त्याच्याजवळ जाण्यास कोणी धजेना. लक्ष्मीही भ्याली. तेव्हां निर्भय प्रल्हाद जवळ गेला व त्यानें भगवंताची स्तुति केली. देव बापाला वज्राहून कठोर वाटला पण प्रल्हादाला कुसुमापेक्षांहि कोमल वाटला.

तुकोबा ह्मणतातः—

आडिले पीडिले गांजिले संसारीं ।
त्यांचा तूं कैवारी देवराणा ॥ १ ॥
प्रल्हाद महासंकटीं रक्षिला ।
तुह्मी आपंगिला नानापरी ॥ २ ॥
× × × ×
प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत ।
विषाचें अमृत तुझ्या नामें ॥ ५ ॥
तुका ह्मणे तूं या अनाथांचा नाथ ।
ऐकोनियां मात शरण आलों ॥ ७ ॥

९७

मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैची
अहंतागुणें यातना ते फुकाची ।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा।
म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ॥

ज्याच्या मुखांत देवाचें नाम नाहीं त्यावर भगवंताचा कृपाप्रसाद कोठून होणार ? ( हिरण्यकशिपुसारखा ) अहंकार ह्म. देहाभिमान चित्तांत वागवल्यानें ( इहपरलोकींचे) वृथा क्लेश मात्र भोगावे लागतात. पुढें दैन्यवाणें मरण येणारच ह्मणून आधींपासून ) नारायणाचें भजन करण्याचा दृढाभ्यास ठेवावा.

समर्थ ' स्फुट ओव्या २५ मध्यें सांगतातः--

कोणाचें हें घर कोणाचा संसार ।
सांडूनी जोजार जाणें लागे ॥ १ ॥
आत्महित गेलें संसाराचे ओढी ।
अंतीं कोण सोडी रामेवीण । ४॥
जाणवेना राम सुकृतावांचुनी ।
पापियाचे मनीं राम कैंचा । ७
राम कैचा तया लौकीकाची चाड ।
पुरावितो कोड संसाराचें ॥ ८
अनुतापी जाले संसारीं सुटले ।
राजे राज्य गेले सांडोनीयां ॥ १० ॥
भक्तराज भावें भेटले देवासी ।
रामीरामदासीं धन्य वेळा ॥ १३ ॥

९८

हरीनाम नेमस्त पाषाण तारी
बहू तारिले मानवदेहधारी ।
तया रामनामीं सदा जो विकल्पी
वदेना कदा जीव तो पापरूपी ॥

हरिनामानें ( रामावतारीं सेतु बांधीत असतां सागरावर ) जड पाषाण तारिले मग मनुष्यदेहधारी पाषाण तें तारील यांत नवल काय ? तसें त्यानें लक्षावधि जड-जीव तारिलेही आहेत. अशा रामनामाविषयीं जो नेहमीं साशंक राहून मुखानें कधींच नाम उच्चारीत नाहीं तो जीव पापरूपच होय. ( दास० ४-३-१८ ):—

**नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।**
**महापापी तेचि जाले । परमपवित्र ॥**

९९

जगीं धन्य वाराणसी पुण्यराशी
तयेमाजिं जातां गती पूर्वजांसी ।
मुखें रामनामावळी नित्यकाळीं
जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ॥

जगांत पुण्यक्षेत्र काशी धन्य होय कांकीं तेथें जीव गेला असतां ( तो स्वतः उद्धरतो एवढेंच नव्हे ) तर त्याचे पूर्वजही उद्धरतात. काशीक्षेत्राला हें धन्यत्व येण्याचें कारण हेंच आहे कीं तेथें निरंतर रामनामाचा घोष चालत असतो व हा जीवांच्या हिताचा मार्ग स्वतः शंकरांनीं तेथें घालून दिला आहे.

**नामाचा महिमा जाणे शंकर ।**
**जना उपदेशी विश्वेश्वर ।**
**वाराणसी मुक्तिक्षेत्र ।**
**रामनामें करूनी ॥ दा. ४–३–१५ ॥**

रावणवधानंतर रामाचें गौरव करितांना शंकर स्वतः ह्मणतात ( अध्यात्मरामायण. युद्धकांड १५–६२ ):—

**अहं भवन्नाम गृणन्कृतार्थो ।**
**वसामि काश्यामनिशं भवान्या ।**
**मुमूर्षमाणस्य विमुक्तयेऽहं ।**
**दिशामि मंत्रं तव राम नाम ॥**

हे रामा ! तुझ्या नामाचा जप करीत मी भवानीसह काशीसच नित्य राहतों, हेतु हा कीं प्राण्यांना मरणावसरीं तुझ्या नाममंत्रोपदेशानें मोक्ष मिळावा.

१००

**यथासांग रे कर्म तेंही घडेना**
**घडे कर्म तें पुण्य गाठीं पडेना ।**
**दया पाहतां सर्वभूतीं असेना**
**फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥**

जीवांच्या हातून ( कलिप्रभावानें ) यथाशास्त्र कर्माचरण होत नाहीं, धर्म क्वचित घडला तरी ( पोटांत वासना असल्यामुळें ), त्याचें पुण्य पदरांत पडत नाहीं, भूतमात्रा-विषयीं अंतःकरणांत दया वसत नाहीं. व फुकटचें भगवंताचें नाम तेंही मुखांत येत नाहीं !

१०१

**जया नावडे नाम त्या यम जाची**
**विकल्पें उठे तर्क त्या नर्क चीं चीं ।**
**म्हणोनी अतीआदरें नाम घ्यावें**
**मुखें बोलतां दोष जाती स्वभावें ॥**

ज्याला नाम आवडत नाहीं त्या जीवाचे ( मृत्युसमयीं ) यमाकडून फार हाल होतात, जे नामाविषयीं कुतर्क

काढतात त्यांना अघोर नरकच घडतो—ह्मणून वा मना ! अत्यादरानें हरीचें नाम घ्यावें. मुखानें नामस्मरण चाललें कीं चित्तांतले सर्व दोष जातात.

तुकोवा स्वानुभवपूर्वक सांगतातः—

रंगलें हें चित्त माझें तयापाईं ।
ह्मणउनी घेईं हाचि लाहो ॥ २ ॥
लाहो करीन मी हाचि संवसारीं ।
रामकृष्ण हरी नारायण ॥ ३ ॥
अमृताचें सार निजतत्वबीज ।
गुह्याचें तें गुज रामनाम ॥ ३२ ॥
हेंचि सुख आह्मी घेऊं सर्वकाळ ।
करूं हे निर्मळ हरिकथा ॥ ३४ ॥
कथाकाळीं लागे सकळां समाधि ।
तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ॥ ३५ ॥

१०२

अतीलीनता सर्वभावें स्वभावें
जना सज्जनांलागि संतोषवावें ।
देहे कारणीं सर्व लावीत जावें
सगूणीं अती आदरेंसी भजावें ॥

तात्पर्य, सर्व प्राण्यांशीं अत्यंत नम्रतेनें वागावें. संत-सज्जनांना संतोष देत असावें, देह कारणीं लावावा म्ह० भगवंताच्या सेवेंत व भूतसेवेंत झिजवावा व परमादरानें सगुणोपासना अखंड चालवावी.

## ८ क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे

### ( १०३–१०५ )

( सगुणभक्ति व तिचें मुख्य साधन नामस्मरण हें सांगितल्यावर थोडेसें पथ्य संभाळण्यास सांगतात. औषध कितीही चांगलें असलें तरी पथ्य सांभाळलें तरच त्याचा उपयोग आहे. मुख्य पथ्य म्ह० अहंकाराला तोंड वर करायला जागा न देणें हें होय. यासाठीं क्रियेवीण वाचाळता करूं नये व वादविवादाच्या डंभांत पडूं नये हें पुढील १३ श्लोकांत सांगतात ).

१०३

**हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी**
**देहेबुद्धि नीरूपणीं वीसरावी ।**
**परद्रव्य आणीक कांता परावी**
**यदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥**

कीर्तनप्रसंगीं रामाच्या गुणरूपाविषयीं अत्यंत प्रेम धरावें व निरूपणप्रसंगीं देहबुद्धी पार विसरावी. परद्रव्य व परस्त्री यांचा मनांतून सर्वस्वी त्याग करावा, कां कीं सदाचार पाळला जाईल तरच कीर्तनाचा व निरूपणाचा उपयोग नाहींतर सारा परमार्थ लटका होईल.

‘ सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणजे निरूपण ’ ( दास० ४–२–२३ ). परमात्मा सगुण आहे व निर्गुणही आहे, ह्मणून श्रवणभक्तीच्या विवरणांत समर्थांनीं सगुण· प्रेमवर्धनासाठीं ‘ हरिकथापुराणश्रवण ’ व अद्वैतबोधा-साठीं ‘ अद्वैतनिरूपण ’ सांगितलें आहे. ‘ सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । निर्गुण अध्यात्में शोधावीं’ मात्र ‘सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावें ’ ही सावधागिरी ठेवावी ( द० ४ स. १ ).

सगुणप्रेमासाठीं रामाच्या अवतारलीलांविषयीं व रूपगुणां-विषयीं प्रेम पाहिजे व निर्गुण आहे गुणातीत व देहातीत ह्मणून निर्गुणबोधासाठीं देहातीतता पाहिजे. भक्ति व ज्ञान दोन्ही पाहिजेत.

परद्रव्य व परस्त्री यांचा सर्वस्वी त्याग करणें हा तर पर-मार्थाचा पहिला धडा आहे. तुकोबा ‘ परद्रव्य परनारी । यांचा धरी विटाळ ’ हें साधन सांगतात. ‘ कांचनाचें ध्यान

परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण होचि दोनी ' असें समर्थांनींही अन्यत्र सांगितलें आहे.

१०४

क्रियेवीण नानापरी बोलिजेतें ।
परी चित्त दुश्चीत तें लाजवीतें ।
मना कल्पना धीट सैराट धांवे
तया मानवा देव कैसेनि पावे ॥

हा अनेक प्रकारें ढीग बोलतो पण बोलण्याप्रमाणें वागणें नाहीं, तर मग याचें मन कानकोंडें ( दुश्चित ) होऊन याला लाजविणारच ! नुस्ता कल्पनेच्या स्वच्छंद विहारानें हा देव कसा पावेल बरें ? कल्पना कितीही ताणली, कितीही उंच भराऱ्या कल्पनेनें मारल्या तरी ( निर्विकल्प देव ) कसा पावावा बरें ?

१०५

विवेकें क्रिया आपुली पालटावी
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा
मना कल्पना सोडिं संसारतापा ॥

विवेकानें आपुली वागणूक सुधारावी, आपल्या वर्तनांतले दोष काढून टाकून आपले वर्तन शुद्ध करावें, अत्यादरानें शुद्ध आचरणं ठेवावें. (जनीं वंद्य तें सर्वभावें करावें) पायाशुद्ध शास्त्रशुद्ध बोलावें व बोलण्यासारखें आपलें आचरण ठेवावें आणि संसारदुःखासंबंधी सर्व कल्पना सोडून द्याव्यात.

बोलण्यासारखें चालणें हीच शुद्ध क्रिया. 'बोला ऐसें वर्तों जाणे। शुद्ध क्रिया' ( दास० १९-४-८ ).

## ९ तुटे वाद संवाद तो हीतकारी

( १०६–११५ )

१०६

**बरी स्नानसंध्या करीं येकनिष्ठा**
**विवेकें मना आवरीं स्थानभ्रष्टा ।**
**दया सर्व भूतीं जया मानवाला**
**सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥**

मना ! स्नानसंध्यादि स्वधर्म कर्मे एकनिष्ठपणें करून स्थानभ्रष्ट ह्म० निर्विषय ब्रह्मापासून च्युत अशा मनाला विवेकानें ( विषयांपासून ) आवर. सर्वभूताधिवास असा

राम सर्वांभूतीं पहा ह्मणजे भक्तिभावानें शांतिसुख भोग-
शील व सर्वांभूतीं दयाप्रेम सहज उत्पन्न होईल.

**स्नानसंध्या टिळे माळा । अंतरनिष्ठ उपासना ।**
**नित्यानित्यविवेकानें । धन्य संसार होतसे ॥**
( स्फु. प्र. ५२ )

**आधी तें करावें कर्म । कर्म मार्गें उपासना ।**
**उपासका सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पावणें ॥**
( मानपंचक )

**कर्में चित्तशुद्धि होऊनियां गेली ।**
**मग उपासिली उपासना ।**
**उपासनामिसें देव ठाईं पडे ।**
**संदेहचि उडे येकसरा ॥** ( स्फु. ओ. ७० )
**उपासना कर्म हें आधीं पाळावें ।**
**मग सांभाळावें ब्रह्मज्ञान ॥** ( स्फु. ओ. ६ )
**स्नानसंध्या प्रदक्षिणा नमस्कार ।**
**श्राद्धपक्ष थोर सांडूं नये ॥ २४ ॥**
**ब्राह्मणासी वैश्वदेव उपासना ।**
**करावें तर्पण आदरेसीं ॥ २५ ॥**
**तपें पुरश्चरणें ध्यानस्थ बैसावें ।**
**सांग संपादावें देवार्चन ॥ २७ ॥**

**घरणीं पारणीं नित्य उपोषणें ।**
**तेणें होती क्षीण महादोष ॥ २८ ॥**

( स्फु. ओ. ५ )

**स्नानसंध्या देवार्चन । एकाग्र करावें जपध्यान ।**

( दास. १२–१०–४ )

इ० अनेक ठिकाणीं स्नानसंध्यादि स्वधर्मकर्मांचें आचरण अवश्य केलें पाहिजे असें समर्थांनीं सांगितलें आहे. 'चित्तस्य शुद्धये कर्म'–कर्म हें चित्तशुद्धीसाठीं अवश्य आहे असें आचार्यही सांगतात. कर्ममार्ग अजिबात सोडून नुस्त्या वेदांतग्रंथाचेंच वाचन व श्रवण कोणी ठेवील तर तें चालणार नाहीं. 'अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन' दोन्ही पाहिजेत. 'आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती' 'कर्म उपासनेचा अभाव । तेथें भक्तार्थीसी जाला ठाव' इ० प्रकारें ( दास० ५ द० ५ स. ७ ) समर्थांनीं स्पष्ट सांगितलें आहे.

१०७

**मना कोपआरोपणा ते नसावी**
**मना बुद्धि हे साधुसंगीं वसावी ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं**
**मना होइरे मोक्षभागीं विभागी ॥**

मना ! कोपाची आरोपणा ( धारणा ), कोपावर आरूढ होणें, क्रोधवश होणें नको रे बापा ! क्रोधादि विकारांनीं मन विटाळूं नेय यासाठीं सत्संगतींतच बुद्धि रमूं दे. मना ! कामक्रोधादि नष्ट चांडाळांच्या संगापासून अगदीं फटकून दूरच रहा ह्मणजे मोक्षाचा वांटेकरी होशील.

**कोपआरोपणा खोटी । कोपें कोपचि वाढतो ।**
**मोडतो मार्ग न्यायाचा । अन्याय प्रबळे बळें॥१॥**
**क्रोध हा खेद संपादी । जेथें तेथें चहूंकडे ।**
**विवेक पाहतां कैंचा । शुद्धि तेथें असेचिना॥२॥**
**भल्यांनीं कोप सांडावा । शांतीनें असतां बरें ।**
**क्षुलकें कोप पाळावा । भल्यांचें काम तों नव्हे॥**

समर्थांचें 'षड्रिपुनिरूपण' पहा. क्रोधानें कामानें, लोभानें करंटे केले असे किती तरी आहेत ! या चांडाळांचा, मना ! संग नको. 'कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्' ( गीता १६–२१ )

**ह्मणोनि कामादिकीं तिघीं ।**
**सांडिला सुख पावोनि जगीं ।**
**संग लाहे मोक्षमार्गीं । सज्जनांचा ॥ ४४० ॥**

१०८

मना सर्वदा सज्जनाचेनि योगें
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

मना ! सज्जनसंगतीच्या योगानें क्रिया पालटते ह्म० अशुद्ध क्रिया पालटून भक्तिज्ञानवैराग्याची शुद्ध क्रिया (आचरण) लागते, भक्तिभाव अंतरीं जागृत राहतो. मना ! अशा तऱ्हेनें ह्म० सत्संगतीनें शुद्धमार्ग लागला नाहीं आणि तोंडानें ब्रह्मज्ञान स्वैर बोलत राहिला तर त्यालाच 'वाचाळ' म्हणतात. असली 'क्रियेवीण वाचाळता' सोडून दे ( तिचा तुला व लोकांना कांहीं उपयोग नाहीं ). वाद तुटेल, दुसऱ्याचे संशय निरसून त्यांना समाधान मिळेल असा संवाद करितां ( किंवा ऐकतां ) येईल तर तो तेवढा हितकर होईल. वाद तुटे तो संवाद व तोच हितकारी होय.

१०९

जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूखसंवाद सूखें करावा ।

## जनीं तोचि तो शोकसंतापहारी
## तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

मना ! लोकांत वादविवाद करूंच नये, सुखसंवाद तेवढा खुशाल आनंदानें करावा. सुखसंवाद मात्र शोक व संताप दूर करितो ह्मणून वाद तुटेल तोच संवाद हितकर होय.

वादापासून तोटे कोणते होतात ते मागें ६२ व्यां श्लोकांत सांगितले आहेत. वादविवाद हा देहाभिमानी ह्म० मताचा आग्रह बाळगणाऱ्यांत होतो, तो तत्वबोध न देतां वैरवन्हि मात्र वाढविण्यास कारण होतो. त्यानें शोकसंताप वाढतो. सुखसंवाद हा गुरुशिष्यांत किंवा निरहंकारी प्रेमळ भक्तांत होतो, त्यानें हरिप्रेम दुणावतें. पहिल्यानें नारकी गति मिळते, दुसऱ्यानें मोक्षसुख मिळतें. पहिला बाधक व दुसरा तारक आहे. वादविवादानें देहाहंकार वाढतो, सुखसंवादानें देहबुद्धि नष्ट होऊन भक्तिसुखानंद द्विगुणित होतो. वादाचें पर्यवसान बहुधा वितंडवाद किंवा अतिवाद यांत होतें, ह्मणून वाद न करितां संवाद करावा.

११०

**तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें**
**विवेकें अहंभाव यातें जिणावें ।**
**अहंतागुणें वाद नानाविकारी**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥**

जेथें वाद तुटतो तो संवाद किंवा सुखसंवाद, व जेथें वाद वाढतच जातो तो वादविवाद. संवादांत विवेक जागा असतो ह्मणून अहंभाव मोडून जातो, आणि विवादांत अहंभाव पेट घेतो व क्रोध मत्सर, द्वेष इ० नानाविकारांचीं भूतें तो उठवतो. ह्मणून बा मना! वाद खुंटविणाऱ्या व प्रेमाचें ऐक्य करणाऱ्या हितकर संवादांतच तूं रमणाण हो.

अहंकार हा वादाचें मूळ बीज आहे. समर्थांनीं ( स्फुट ओव्या ७१ ) मध्यें अहंकारामुळें द्वेषमत्सर जागृत होऊन एकमेकांत कशीं रणें माजतात याचें यथार्थ वर्णन केलें आहे.

**भिन्न उपासना भिन्न संप्रदाव ।**
**येकमेकां सर्व निंदिताती ॥ ३ ॥**
**क्रियेसी निंदिती क्रियाभ्रष्ट ज्ञानी ।**
**क्रियाभ्रष्टां जनीं निंदिताती ॥ ४ ॥**
**निस्पृहा निंदिती संसारिक जन ।**

संसारिकां जन निंदिताती ॥ ५ ॥
पंडितां पंडितां वेवाद लागला ।
पुराणिकां जाला कळहो थोर ॥ ६ ॥
वैदिकां वैदिक भांडती निकुरें ।
योगी परस्परें भांडताती ॥ ७ ॥
स्मार्त ते वैष्णव शाक्त आणि शैव ।
निंदिताती सर्व परस्परें ॥ ९ ॥
स्वजाती विजाती भांडण लागलें ।
दास ह्मणे केलें अभिमानें ॥१० ॥
ऐसा हा मत्सर लागलासे पाठीं ।
देवा तुझी भेटी केविं घडे ॥ ११ ॥

देवाची भेट ज्यांना पाहिजे ते सर्व भाविक भक्त या वादविवादांच्या कल्होळांपासून व मतामतांच्या गलबल्यांपासून दूरच राहतात. पंडित, पुराणिक, वैदिक, योगी, शाक्त, शैव व वैष्णव हे समर्थांनीं वर सर्व आणले आहेत त्यांतच समर्थ सांप्रत असते तर ' देशभक्त ' त्यांनीं घातले असते !!

असो. मी आपल्या ' उपकृतिस्मरण ' नामक काव्यांत वादसंवादाबद्दल दोन श्लोक दिले आहेत ते येथें देतों:—

**वादें चित्त जळे, समत्व विटळे, संतोष सारा पळे।**

**दीर्घस्नेह गळे, अहंकृतिबळें पुण्यर्धि तीही ढळे। शांतिक्षांति चळे, सुबुद्धिहि मळे, संभोक्ष वादा-नळें। वादी तो न वळे, न वादहि खळे, होती खुळे आंधळे ॥ ६३ ॥ वादें वाढत वैरवान्हि बहुधा, तो म्यां दिला टाकुनी ! । संवादीं सुख थोर, रीति ह्मणुनि स्वीकारिली ही जुनी । सत्संगीं समधर्ममित्रनिवहीं संवादसौख्यासही येते जी भरती न त्यासम दुजा आनंद लोकीं तिहीं ॥ ६४ ॥**

असो. आतां प्रेमळ भक्तांच्या सुखसंवादाचा काय आनंद आहे तो ( भागवत ११-३-३१ ) पहाः—

**स्मरंतः स्मारयन्तश्च मिथोऽघौघहरं हरिम् ॥**
**भक्त्या संजातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकांतनुम्॥**

भक्त एकत्र मिळाले ह्मणजे परस्परांत पापनाशक हरीचें स्मरण करीत व करवीत असतां साधनभक्तीनें उत्पन्न झालेल्या प्रेमभाक्तियोगानें त्यांचें शरीर आनंदाच्या रोमाचांनीं थरारून जातें. गीतेंतही म्हटलें आहेः—

**मच्चिता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्तिच रमन्तिच ॥**

१११

हिताकारणें बोलणें सत्य आहे
हिताकारणें सर्व शोधूनि पाहे ।
हिताकारणें बंड पाखांड वारीं
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

मना! तुझ्या हितासाठीं तुला खऱ्या गोष्टी सांगतों त्या ध्यानीं धर, संशय वाटत असेल तर शोध व विचार करून पहा. तुला स्वहित पाहिजे असेल तर पाखांडवाद साफ सोडून दे व वाद मिटेल असा हितकारक संवाद कर

११२

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला
परी वादवेवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभधारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

जगाच्या प्रारंभापासून सांगणारे व ऐकणारे कोट्यवधि होऊन गेले आहेत, पण वादविवाद कांहीं मिटले नाहींत! (सवांदांत निःसंदेहता येते) पण ज्या वादांत संशयाचे ढग

व वादाची वादळें एकामागें एक अशीं असंख्य उठत असतात ते वाद दंभ मात्र वाढवितात ह्मणून मना त्यांच्या मागें न लागतां सत्संगांतले संवादसुख तेवढें घेत जा.

ह्मणून नारदांनीं 'वादो नावलंब्यः' असें भक्तिसूत्रांत एक सूत्र घातलें आहे.

११२

**जनीं हीत पंडीत सांडीत गेले**
**अहंतागुणें ब्रह्मराक्षस जाले ।**
**तयाहूनि व्युत्पन्न तो कोण आहे**
**मना सर्व जाणीव सांडूनि राहें ॥**

अहंकारामुळें आजपर्यंत अनेक शब्दपंडितांनीं स्वहिताचरणाचा मार्ग सोडून वादविवादाचा मार्ग धरिला व ब्रह्मराक्षस होऊन बसले! त्यांच्यापेक्षा अधिक विद्वान् कोण सांपडेल? पण त्यांचा परिणाम काय झाला हें लक्ष्यांत आणून मना! सर्व जाणीव ह्म० ज्ञातेपणाचा अभिमान सोडून ( निरहंकार होऊन ) रहा.

पंडित कोण? पण्डा-बुद्धिः-आत्मबुद्धिः-विद्यते यस्य सः पंडितः ह्म० ज्याच्या ठिकाणीं आत्मबुद्धि आहे, देहबुद्धि जाऊन ज्याची आत्मबुद्धि स्थिर झाली आहे तो पंडित.

**पंडित तो भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥ १ ॥**
**अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वांभूतीं विठ्ठल आहे॥२**

तुकोबा सांगतात कीं जो नित्य विठ्ठलाला भजतो, ह्म० सर्वांभूतीं विठ्ठल पाहतो, सर्वत्र ब्रह्म पाहतो तोच पंडित.

'यः क्रियावान् सः पंडितः' ह्म० बोलतो तो पंडित नव्हे, तर क्रिया करितो, वागतो, तो पंडित.

वामनपंडित ब्रह्मराक्षस झाल्याची जी गोष्ट प्रसिद्ध आहे ती यथार्थदीपिका, समश्लोकी भाषांतरें, सुरस भागवती प्रकरणें रचणाऱ्या कृष्णभक्त वामनपंडितांची नव्हे. ह्या गोष्टींतील वामनपंडित दुसरे आहेत. प्रसिद्ध वामनपंडित ह्यांना मलयाचल पर्वतावर सच्चिदानंदयतिवेषानें नारायणानें उपदेश केला होता व ते निस्सीम कृष्णभक्त होते.

## ११४

**फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे**
**दिसेंदिस अभ्यंतरीं गर्व सांचे ।**
**क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे**
**विचारें तुझा तूंचि शोधून पाहे ॥**

ब्रह्मज्ञान नुस्तें तोंडानें सांगण्यांत काय अर्थ आहे !

त्याला काय खर्च लागतो ? दिवसानुदिवस मी मोठा ब्रह्मज्ञानी ' ह्मणून अंतरीं गर्व मात्र सांचत जातो. ह्मणून मना! क्रियेवांचून वाचाळता व्यर्थ आहे. विवेकानें तूं आपल्या ठिकाणींच आपला शोध पहा.

ब्रह्मज्ञान तारकच आहे, नाहीं कोण ह्मणतो ? पण त्याला निरंहकार क्रियेची जोड पाहिजे.

११५

**तुटे वाद संवाद तेथें करावा**
**विवेकें अहंभाव हा पालटावा ।**
**जनीं बोलण्यासारिखें आचरावें**
**क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें ॥**

सांगायचें तात्पर्य ह्मणून इतकेंच कीं वाद मिटण्यासारखा असेल अशा ठिकाणींच निरभिमानी पुरुषाशींच संवाद करावा, व विवेकानें आपला अहंभाव सोडावा. आपण बोलण्यासारखें वागावें व आपले आचरण शुद्ध करून किंवा करीत करीत भक्तिमार्गाची कास धरावी.

# ( १० ) नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ( ११६–१२७ )

(राम दासाची उपेक्षा करीत नाहीं हें पूर्वी श्लोक २७ तें ३६ पर्यंत १० श्लोकांत सांगितलें आहे, आतां येथून ह्मं० ११६ ते १२५ पर्यंतच्या १० श्लोकांत तेंच तत्त्व पुन्हां सांगत आहेत. फरक केवळ शब्दांत आहे, सिद्धांतांत नाहीं. ‘राम दासाची’ उपेक्षा करीत नाहींत असें पूर्वीं ह्मटलें आहे त्या ऐवजी येथें ‘देव भक्ताची’ उपेक्षा करीत नाहीं असें ह्मटलें आहे. उपेक्षा करीत नाहीं हा सिद्धांत मुख्य आहे. हा समर्थांना मुख्यत्वें मनावर ठसवायचा असल्यामुळें पुनरुक्त केला आहे. पूर्वींच्या १० श्लोकांत त्या सिद्धांतांच्या सिद्ध्यर्थ केवळ रामचरित्रांतीलच उदाहरणें घेतली आहेत, ह्या १० श्लोकांत विष्णूच्या सर्व अवतारांतील पण भागवतांतील घेतलीं आहेत; पूर्वी शंकर, बिभीषण, मारुती, अहल्या यांचींच उदाहरणें घेतलीं असून येथें अंबरीष, उपमन्यु, ध्रुव, गजेंद्र, अजामीळ, यांचीं उदाहरणें ११६ ते ११९ पर्यंत येऊन पुढील सहा श्लोकांत दशावतारांचे उल्लेख केले आहेत, हा दोहोंत मुख्य फरक आहे.)

११६

**बहू श्रापितां कष्टला अंबऋषी**
**तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी ।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

विष्णुभक्त अंबरीषराजा दुर्वासशापामुळें फार कष्ट सोसूं लागला तेव्हां त्याला शापमुक्त करण्यासाठीं भगवंतानें गर्भवास पत्करिला; तसेंच उपमन्यु बाळाला क्षीरसागरही दिला. तात्पर्य देवाला भक्ताचा अभिमान असल्यामुळें तो आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाहीं.

**अंबरीषराजा** हा महा विष्णुभक्त होता. याला कार्तिकांतलें त्रिदिनात्मक व्रत होतें. द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि अकस्मात् प्राप्त झाले असतां यानें त्यांचा पूजासत्कार केला व भोजनास ठेवून घेतलें. दुर्वास आपलें नित्यकर्म आटोपण्यास नदीतीरी गेलें व त्यास येण्यास उशीर लागला. द्वादशी थोडी असून अतिक्रांत होत चालली ह्मणून राजानें नैवेद्य करून तीर्थ घेतलें व पारणा केली. दुर्वासांनीं जटेंतील एक केस उपटून त्यापासून एक कृत्या निर्माण करून राजावर सोडली. भगवान् विष्णूच्या

सुदर्शनचक्रानें राजाच्या रक्षणार्थ त्या कृत्येचा नाश केला व तें दुर्वासाच्या मागें लागलें. दुर्वासही महान् तपस्वी होतें म्हणून तें त्यास स्पर्श करूं शकलें नाहीं. शेवटीं दुर्वास विष्णूस शरण गेलें. विष्णूनें त्यांस सांगितलें कीं ' तूं आतां अंबरीषाकडे जा, तो तुझी वाट पाहात आज वर्षभर उपोषित राहिला आहे. तो प्रसन्न झाला म्हणजे हें सुदर्शन स्वस्थळीं जाईल. ' दुर्वासानें त्याप्रमाणें केलें. राजा व दुर्वास यांनीं संतोषानें भोजन केलें ( भागवत स्कंध ९ अ० ४ ते ६ ). भागवती कथेंत श्रीहरीनें जन्म सोसल्याचें वर्णन नाहीं, पण मराठी गुरुचरित्रांत आहे ( अ. ३ ओवी ६२ ते ७८ पहा ). हें जन्म म्हणजे अर्थात् दशावतार होत

**उपमन्यु** हा वासिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपाद ऋषीचा ज्येष्ठ पुत्र व धौम्य ऋषीचा वडील भाऊ. हा एकदा दुसऱ्या एका ऋषीच्या आश्रमांत भावासह खेळायला गेला असतांना तेथें गाईचीं धार काढतांना यानें पाहिली व यालाही इतर मुलांबरोबर थोडेसें दूध प्यायला मिळालें. भूलोकीचें अमृत असें तें मधुर गोदुग्ध प्राशन करून याला परमानंद झाला. दुसरे दिवशीं याच्या आईनें याला रोजच्यासारखें पाण्यांत पीठ कालवून प्यायला दिलें तें तो पिईना व मला 'ते दें, कालच्यासारखें दूध दे ' असा त्यानें हट्ट धरिला. त्या

गरीब मातेनें याला पोटाशीं धरून रुदन केलें व ह्मणाली ' बाळ ! असें उत्तम दूध आपणां गरिबांस रोज कोठून मिळणार ! आपण मागच्या जन्मीं देवाचें पूजन केलें नाहीं ह्मणून हें दारिद्र्य प्राप्त झालें आहे ?' यावरून त्यानें भगवंताची अनन्यभक्ति करून दीर्घायुष्य व क्षीरसमुद्राचें आधिपत्य मिळविलें. उपमन्यूची गणना शैवांत असून श्रीकृष्णानेंही त्यापासून शैवी दीक्षा घेतली होती ( महाभारत. अनुशासनपर्व अ. १४ ).

११७

**धुरू लेंकरूं बापुडें दैन्यवाणें**
**कृपा भाकितां दीधली भेटि जेणें ।**
**चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।**

पांच वर्षांचें बाळ ध्रुव ! बापडें व दीनवाणें झालेलें, पण त्यानें हांक मारतांच देव त्याच्या भेटीसाठीं तांतडीनें धांवले व भेट देऊन वर तारांगणांत अढळ पद दिलें. यावरून देव भक्ताला उपेक्षीत नाहींत असें नाहीं कां होत ?

**ध्रुवः**—सूर्यवंशीय राजा उत्तानपाद यास त्याच्या नावडत्या राणीपासून झालेला पुत्र. याच्या जननीचें नांव

‘ सुनीति ’ व याच्या सापत्न मातेचें नांव ‘ सुरुचि. ’ हा बापाच्या मांडीवर बसत असतांना सुरुचीनें त्याला धिक्कारलें. हा रडत आईकडे गेला. तेव्हां ‘ आपण भगवंताचें आराधन केलें नाहीं ह्मणून आपण राजवंशीय असून आपल्या कपाळीं राज्यभोग नाहीं असें ती म्हणाली. ‘ कोठें आहे तो देव?’ असें विचारीत हा घराबाहेर पडला व वनांत चालला, वाटेंत यास नारद भेटले व त्यांनीं त्यास भगवंताच्या ध्यानाचा मार्ग सांगून मंत्रोपदेश दिला. ध्रुवाचें वय पांचा वर्षांचें, पण प्रखर विश्वास, तीव्र अनुष्ठान व दृढतम वैराग्य यामुळें प्रसन्न होऊन भगवान् प्रकट झाले. भगवंताची स्तुति करण्याची यास इच्छा होतांच ‘पस्पर्श बालं कृपया कपोले ’ ह्म.त्याच्या गालास देवांनीं वात्सल्यानें आपल्या हातांतील शंख लावला, व त्याबरोबर स्फूर्ति होऊन ध्रुवानें भगवंताची स्तुति केली. हें गोड स्तोत्र मूळांतून पाठ करावें. ध्रुवानें पुढें ३६ हजार वर्षे राज्य केलें. भगवंतांनीं त्यास अढळपद दिलें व ह्मणाले कीं ‘ ज्यास ग्रह व नक्षत्रें प्रदक्षिणा करितात असें माझें अचलस्थान मी तुला दिलें आहे ’ ( भागवत स्कंद ४ अ० ८ )

११८

**गजेंद्रु महासंकटीं वाट पाहे**
**तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।**
**उडी घातली जाहला जीवदानी**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

गजेंद्राचे पाय नक्रानें धरिले तेव्हां त्याच्या संकटसमयाला त्याच्या हांकेसरसी देवानें उडी घालून त्याचे प्राण वांचविले यावरूनही तेंच सिद्ध होतें.

**गजेंद्र** हा आपल्या स्त्रियांसह जलक्रीडा करीत असतांना नक्रानें त्याचे पाय धरून त्याला पाण्यांत ओढलें. तेव्हां त्यानें देवांचा धांवा केला व देव हांकेस धांवले. गरुडावर देव आरूढ होऊन आले, त्यांनीं नक्राचें मुख विदारण करून गजेंद्राला वांचविले (भागवत स्कंध ८ अ. २ ते ४)

**सोऽतः सरस्युरुबलेन गृहीत आर्तो ।**
**दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ।**
**उत्क्षिप्य सांबुजकरं गिरमाह कृच्छ्रात्**
**नारायणाखिलगुरो ! भगवन्नमस्ते** ॥ ८-३-३२ ॥

त्या सरोवरांत ( सरसि ) तो गजेंद्र त्या प्रबळ ( उरु-

बलेन ) नक्रानें धरिल्यामुळें व्याकुल ( आर्त ) झाला.त्यानें आकाशांत ( खे ) गरुडावर ( गरुत्मति ) बसलेली व चक्र मारायला काढलेली ( उपात्तचक्रं=उपात्तं उद्यतं चक्रं येन ) साक्षात् भगवन्मूर्ति पाहिली व कमलासह शुंडा वर उचलून मोठ्या प्रयासानें अशी वाणी काढली, ' हे नारायणा ! अखिल ब्रह्मांडाचा तूं गुरु, तुला नमन असो !'

११९

**अजामेळ पापी तया अंत आला**
**कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।**
**अनाथासि आधार हा चक्रपाणी**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥**

पापी अजामिळानें अंत्यसमयीं पुत्रमिषानें नारायणाला आळविलें तेव्हां देवानें दयेनें त्याला मुक्त करून वैकुंठाला नेले. हा चक्रपाणि असा अनाथांना आधार आहे तो भक्तांना उपेक्षीत नाहीं.

अजामिळाच्या कथेचा मागें ९५ व्या श्लोकांत उल्लेख आला आहे, तो पहा.

१२० ते १२७

विधीकारणें जाहला मत्स्य वेगीं
धरी कूर्मरूपें धरा पृष्ठभागीं ।
जना रक्षणाकारणें नीच योनी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

महा भक्त प्रल्हाद हा कष्टवीला
म्हणोनी तयाकारणें सिंह जाला ।
न ये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोण्ही
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

कृपा भाकितां जाहला वज्रपाणी
तयाकारणें वामनु चक्रपाणी ।
द्विजाकारणें भार्गव चापपाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥

अहल्येसतीलागि आरण्यपंथें
कुडावा पुढें देव बंदीं तयांतें ।

बळें सोडितां घाव घाली निशाणीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥
तये द्रौपदीकारणें लागवेगें
त्वरें धांवतू सर्व सांडूनि मागें ।
कळीलागि जाला असे बोद्ध मौनी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥
अनाथां दिनां कारणें जन्मताहे
कलंकी पुढें देव होणार आहे ।
जया वर्णितां सीणली वेदवाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥
जनाकारणें देव लीळावतारी
बहूतांपरीं आदरें वेषधारी ।
तया नेणती ते जन पापरूपी
दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ॥
जगीं धन्य तो रामसूखें निवाला
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ।

## देहेभावना रामबोधें उडाली
## मनोवासना रामरूपीं बुडाली ॥

देवानें ब्रह्मदेवासाठीं मत्स्याचें रूप घेतलें; पृथ्वी समुद्रा-तळीं जाऊं नये ह्मणून ते कूर्म ( कासव ) झाले; जनांच्या रक्षणासाठीं नीच योनींत वराहाचा अवतार घेतला ! बापानें छळल्यामुळें अतिकष्ट झालेल्या महाभक्त प्रल्हादासाठीं ते नृसिंह झाले; काय भयंकर तें रूप ! नृसिंहाच्या नेत्रांतून अग्नीच्या ठिणग्याच जणों पडत होत्या. त्याच्या-जवळ ब्रह्मादि देवही जाऊं शकेनात. इंद्रानें ( वज्रपाणी ) करुणा भाकली तेव्हां देव ( चक्रपाणी ) बलीपासून त्याचें ऐश्वर्य त्याला देण्यासाठीं वामन झाला, ब्राह्मणांसाठीं चापपाणी परशुराम झाला, अरण्यांतून जातांना अहल्या-सतीला शापमुक्त करून तिचें रक्षण ( कुडावा ) केलें. तेव्हां देव रामाचे गुण गाणारे भाट झाले, त्याच रामानें देवांना ( रावणाच्या बंदीशाळेंतून ) सोडविले तेव्हां त्याच्या कीर्तीचा डंका त्रैलोक्यांत गाजला. आपलें सर्व ( रुक्मिणी व राज्य सोडून ) वस्त्रहरण व दुर्वासछल या दोन प्रसंगीं द्रौपदीच्या प्रेमासाठीं कृष्ण गडबडीनें धांवले. असो. कलीसाठीं ह्मणजे कलीचें प्राबल्य चालत असतांना

जीव आपलें प्रारब्धकर्म भोगून कसें सारतात व भक्तियोगानुसार कीर्तनभक्तीचा महिमा कसा वाढवितात हें पाहण्यासाठीं—देव सांप्रत बौद्ध ( मौनी ) होऊन बसले आहेत ! याप्रमाणें अनाथ व दीन जनांच्या उद्धारासाठीं देव वारंवार अवतार घेतात. पुढें कल्कीरूपानें ते अवतीर्ण होणारच आहेत. त्याच्या लीला वर्णन करितां करितां वेदही मौन धरून राहिले. भक्तांचा अभिमान बाळगणाऱ्या देवाधिदेवानें याप्रमाणें भक्तांसाठीं वेळोवेळीं धांवणें करून ' मी भक्तांची उपेक्षा करीत नाहीं ' असें सर्वांच्या निदर्शनास स्पष्ट आणून दिलें आहे. याप्रमाणें लीलावतारी देव जनांसाठीं अनेक वेष घेऊन येतो, नाना अवतार धारण करितो, अशा दयामय देवाला जे जाणत नाहींत ते पापी, दुरात्मे, नष्ट, चांडाळ होत. उलटपक्षीं जो रामसुखानें सुखस्वरूप झाला, श्रीरामाचे गुणानुवाद व कथा ऐकून जो तन्मय होऊन गेला, रामबोधानें ज्याची देहबुद्धि नष्ट झाली व ज्याच्या वासना रामरूपीं लीन झाल्या असा अंतर्बाह्य रामरूप झालेला रामभक्त धन्य होय !

१२० श्लोकापासून पुढें सहा श्लोकांत देव भक्तांची उपेक्षा करीत नाहीं हें दाखविण्यासाठीं **दशावतारांच्या कथांचे** उल्लेख केले आहेत, ( १ ) विधीकारणें ह्म०

ब्रह्मदेवासाठीं देव मत्स्य झाले. प्रलयकालीं ब्रह्मदेव निद्रित झाल्यावेळीं त्यांच्या मुखांतून निघणारे वेद हरण करावे ह्मणून ( मुखतो निसृतान् वेदान् ) हयग्रीवनामक दैत्य त्यांजकडे गेला व तो ते वेद नेत आहेसें पाहून भगवंतांनीं मत्स्यावतार घेतला व दैत्यास मारून वेद ब्रह्मदेवास आणून दिले ( भाग. स्कं ८–२४ ). ( २ ) समुद्रमंथनसमयीं मंदर पर्वत बुडूं लागला असतां देवांच्या कैवारानें नारायणानें कांसवाचें रूप घेतलें व पर्वत आपल्या पाठीवर घेऊन वर काढला ( स्कंध १ अ० ३ ). पुढें ( ३ ) ब्रह्मदेवाच्या नासिकेंतून हिरण्याक्षदैत्याच्या नाशार्थ हा उत्पन्न झाला व यानें त्यास मारून पृथ्वीचा उद्धार केला, त्याचप्रमाणें पृथ्वीला दैत्य समुद्रांत ओढीत नेत असतां यानें विराट्स्वरूप होऊन तिला वर काढली. (भाग. स्कं. ३ अ १२।१३ ). ( ४ ) मागें श्लोक ९६ मध्यें प्रल्हादकथा दिलीच आहे. (५) कश्यपापासून आदितीच्या ठायीं झालेला वामन हा विष्णूचा पांचवा अवतार. प्रल्हादाचा नातु व विरोचनाचा मुलगा बलि यानें इंद्रपदप्राप्तीसाठीं शतयज्ञांची प्रतिज्ञा करून ९९ यज्ञ पुरे केले. तेव्हां इंद्र ( वज्रपाणी ) विष्णूला शरण गेले. विष्णूनें वामनरूप घेऊन त्रिपाद भूमि मागितली. दैत्यगुरु शुक्र यानें निषेध

केला तरी त्या उदार बलीनें वामनाची याचना मान्य केली व हातावर उदक सोडलें. तेव्हां वामन मोठा झाला व एका पावलांत पृथ्वी व दुसऱ्यांत आकाश व्यापून त्यास पाताळांत घातलें. ( भाग. स्कं ८ अ० १५ ते २३. देवीभागवत स्कंध ४ अ० १६. मत्स्यपुराण अ. ४७ ). ( ६ ) क्षत्रियांनीं ब्राह्मणांचा छळ केला तेव्हां भक्तवत्सल देव ब्राह्मणवंशीं परशुराम होऊन आले व त्यांनीं २१ वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली, क्षत्रियांना टिपून मारण्याकरितां हा २१ वेळ भरतवर्षभर हिंडला. शेवटीं कश्यपाच्या सांगण्यावरून हा समुद्रतीरीं गेला, त्यानें दिलेल्या शूर्पारक देशांत ( कोंकणप्रांतांत ) राहिला. (परशुरामचारित्र भाग० स्कंध ९ अ. १५।१६ मध्यें व इतर ग्रंथांतही आहे.) ( ७।८ ) राम व कृष्ण यांचीं चरित्रें विश्वविश्रुतच आहेत. रावणादि राक्षसांचा संहार करून भूभार हलका करावा व ' क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू ' याप्रमाणें जगाला सच्चारित्र्याचा उज्ज्वल कित्ता घालून देऊन उद्धाराचा मार्ग उजू करावा यासाठीं दशरथकौसल्येच्या पोटीं रामाचा अवतार झाला. कंसादि दैत्यांचा वध करून तसाच भूभार हलका करण्यासाठीं व जगाला गोगोपगोपींच्या द्वारें भगवत्प्रेमाचें रहस्य शिकविण्यासाठीं व प्रपंचराजकारणांच्या नानाविध

उलाढाली करूनही अकर्तात्मबोध कसा संभाळतां येतो हें दाखविण्यासाठीं वसुदेवदेवकींच्या उदरीं कृष्णाचा अवतार झाला. रामकृष्णांचीं गुणकर्में व नामें असंख्य जीवांनीं स्वोद्धारार्थ गायिलीं आहेत. ( ९ ) कलीचा प्रादुर्भाव झाल्यापासून भगवान् बौद्ध मौनी झाले आहेत. ( १० ) कलंकींचा अवतार पुढें शंभलग्रामीं होणार आहे.

'भूम्नः पुरुषस्य' ह्म० महाशक्तिमान् पुरुषाचे 'लीलावतार' किंवा विशेष अवतार जे झाले त्यांचें संकलित वर्णन भागवत स्कंध २ अ० ७ मध्यें पहावें.

## ११ सत्संगांत रामभक्ति ( १२८—१३५ )

( रामसुखानें निवालेला, रामाचे गुणानुवाद ऐकतां तल्लीन झालेला व रामबोधानें देहभाव शून्य झालेला असा भक्त असला म्हणजे अशा भक्तांचा अभिमानी राम आपल्या भक्तांची कधींच उपेक्षा करीत नाहीं हें वर सांगितलें. आतां अशी भक्तिही सत्संगांतच जीवांना लाभते म्हणून सत्संग धरा असें पुढील ८ श्लोकांत सांगतात. )

१२८

**मना वासना वासुदेवीं वसों दे**
**मना कामना कामसंगीं नसों दे ।**

**मना कल्पना वाउगी ते न कीजे**
**मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ॥**

मना! वासुदेवाच्या ठिकाणीं सर्व वासना ठेव ह्म० साऱ्या वासना हरिविषयक असूं दे, मना! कामनांना कामाचा वारा लागूं देऊं नकोस म्हणजे त्या निष्काम असूं दे. मना! उगाच विषयासंबंधी कल्पनांची जाळीं विणीत बसूं नकोस. मना! निष्काम वासना असाव्यात असें वाटत असेल तर सज्जनांच्या संगतींत रमून रहा.

वासुदेवाची वासना इतर सर्व वासनांपासून मुक्त करिते. निर्वासन होण्यासाठींच वासुदेवाची वासना ठेवायची कां कीं ती इतर सर्व वासनांचीं कवाडे बंद करिते. (शाळेंत मुलांची तोंडें बंद करण्यासाठींच गुरुजी आपलें तोंड उघड तात!) सर्व वासना, कामना व कल्पना यांचा गलबला बंद करणारे संत आहेत. तुकोबा म्हणतातः—

**संतचरणरज लागतां सहज।**
**वासनेचें बीज जळोनि जाय ॥ १ ॥**
**मग रामनामीं उपजे आवडी।**
**सुख घडोघडी वाढों लागे ॥ २ ॥**

१२९

गतीकारणें संगती सज्जनाची
मती पालटे सूमती दुर्जनाची ।
रतीनायकाचा पती नष्ट आहे
म्हणोनी मनातीत होऊनि राहें ॥

सज्जनसंगतीनें ( भाविकांना ) सद्गति मिळते व दुर्जनांची ही बुद्धि पालटून त्यांच्या ठिकाणीं सद्बुद्धि उत्पन्न होते. रती जी नायका तिचा पति ह्म० नायक अर्थात् काम हा महादुर्जन आहे म्हणून त्याचा वाराही न लागावा या साठीं तूं मनातीत होण्याचा ह्म० उन्मन होण्याचा, निर्विकारपद पावण्याचा, अभ्यास कर.

१३०

मना अल्पसंकल्प तो ही नसावा
सदा सत्यसंकल्प चित्तीं वसावा ।
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा
रमाकांत येकांतकाळीं भजावा ॥

सत्यसंकल्प ब्रह्माचा व मिथ्यासंकल्प किंवा पापसंकल्प मायेचा, स्थूलदृष्टीनें बोलायचें ह्मणजे विषयवासनेचा.

मना ! विषयाची अल्पही कल्पना उठूं देऊं नकोस ( कां कीं ती तरंगरूप असली तरी लवकर समुद्रप्राय मोठी होते. ) उलट ब्रह्माचा संकल्प चित्तांत वहात जा. स्वरूपानुसंधान निरंतर ठेवीत जा. मना ! वादाविवादाचा संकर्प ठेवूं नकोस व विकल्प ह्म० संशयतर्कटांच्या मार्गांत पडूं नकोस, यासाठीं प्राकृत जनसंबंधापासून दूर एकांतांत रहा व तेथें सीतापति जो रामराय त्याचें भजन करीत जा.

(१) शिष्या एकांतीं बैसावें ।
स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ( दा. ५-६-५८ )

(२) स्वजन जन त्यजावे देश लंघूनि जावें
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ।
अनुदिन विवरावें दूरदेशीं भरावें
निरुपण विवरावें तर्कपंथेंचि जावें॥(करुणा० १५४)

(३)बहु एकांतावरी प्रीति। जया जनपदाची खंती।
जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ।
(ज्ञाने० १३-६-१४)

(४) एकातांचें सुख जडलें जिव्हारीं ।
वीट परिचारीं बरा आला ।

खेळों मना सर्वें जीवाच्या संवादें ।
कौतुकें विनोदें निरंजनीं ॥
तुका ह्मणे धडा राहिला पडोन ।
पांडुरंगीं मन विसावलें ॥

(५) एकांते सुखमास्यतां परतरे
चेतःसमाधीयताम् ॥ ( आचार्य )

१३१

भजाया जनीं पाहतां राम येकू
करीं बाण येकू मुखीं शब्द येकू ।
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू
धरा जानकीनायकाचा विवेकू ॥

मना ! तुला भजायला एक राम सर्वोत्तम आहे. तो एकवाणी व एकवचनी ( व एकपत्नीही ) आहे. रामाचें चरित्र पाहत जा, तें इतकें निर्मळ आहे कीं तें पाहतां पाहतां ( त्याचें मननविवरण करितां ) लोकांचा उद्धार होऊन जातो. ह्मणून मना ! त्या जानकीनायकाचा-त्या एकपत्नी रामाचा-विवेक धर, त्याचें चरित्र कित्त्यासारखें पुढें ठेवून त्याप्रमाणें वर्तनक्रम ठेव.

( २ ) बहुविध भजनाचीं दैवतें पाहिलीं हो । सकळ

त्यजुनि रामीं वृत्ति हे राहिली हो । विमळगुणशिळाची
लागली प्रीति मोठी। विमळ हृदय होतां उद्धरे कूळकोटी ।।
( करुणा. १४६–३ )

१ राम विश्राम देवांचा । राम भक्तांसि आश्रयो ।
राम योगिमुनिध्यानीं । राम रक्षी ऋषिकुळा॥१॥
कीर्ति या रघुनाथाची । पाहतां तुळणा नसे ।
येकबाणी येकवचनी । येकपत्नीच धार्मिकु ॥६॥
उद्वेग पाहतां नाहीं । चिंता मात्र नसे जनीं ।
व्याधी नाहीं रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती।
युद्ध नाहींच अयोध्या । राग ना मत्सरु नसे ।
बंदनिर्बंदही नाहीं । दंडदोष कदा नसे ॥ ९ ॥
बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे ।
अनेक वर्तती काया । येकजीव परस्परें ॥ ११ ॥
दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हा तो असेचिना ।
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ १२ ॥
अद्भूत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळें ।
अखंड दुभती धेनु । आरोग्यें वाहतीं जळें॥१३॥
चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळे ।
संतोष समस्तै लोकां। रामराज्य भुमंडळीं॥१८॥
( मानपंचक )

(२) चकोरासि चंद्रोदईं सूख जैसें ।
रघूनायका देखतां सूख तैसें ।
सगूणासि लांचावलें स्थीर राहे ।
रघूनंदनेवीण कांहीं न पाहे ॥१॥
चमत्कारलें चित्त हें रामगूणीं ।
उठे कीर्ति वाखाणितां प्रीति दूणी ।
रघूनायकासारिखा देव नाहीं ।
क्रिया पाहतां चोखडी सर्व कांहीं ॥ ३ ॥

करुणाष्टकें १८

१३२

विचारूनि बोले विवंचूनि चाले
तयाचेनि संतप्त तेही निवाले ।
बरें शोधिल्यावीण बोलों नको हो
जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ॥

ज्याचें बोलणें चालणें सर्व कांहीं विचारपूर्वक होत असतें त्याच्या संगतीनें संसारतप्त जीवांनाहीं विश्रांतिसुख मिळतें म्हणून मना! पूर्ण विचार केल्याशिवाय तोंडांतून शब्द कधीं काढूं नकोस, व जनांत वागणें नेहमीं शुद्ध व नेमस्त (अतिशय नाहीं, हांव नाहीं,) असें असों दे.

**सहसा विदधीत न क्रियाम्**
**अविवेकः परमापदां पदम् ॥**

कोणतेंही काम एकाएकीं विचार न करितां ( सहसा ) करूं नये, कां कीं अविवेक हें कनेक आपत्तींचें स्थान आहे असें भारवीनें किरातार्जुनीयांत म्हटलें आहे.

**संसार तो कोण देखे ? । आह्मां सखे हरिजन॥१**
**काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥२॥**
**( तुका० )**

१३३

**हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी**
**जेणें मानसीं स्थापिलें निश्चयाशीं ।**
**तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे**
**तया भाषणें नष्ट संदेह मोडे ॥**

जो हरिभक्त आहे, विरक्त आहे व ज्ञानवंत आहे ह्म० भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न आहे; जो ( देहबुद्धि सोडून ) आत्मनिश्चयावर आरूढ झाला आहे, त्याच्या दर्शनस्पर्शा-बरोबर पुण्य जोडतें ह्म० मनुष्याचे संस्कार शुद्ध होतात, व त्याच्या भाषणानें मनांतील सारे दुष्ट संशय जाऊन हाही निश्चयारूढ होतो.

हरिभक्ति, विरक्ति व ज्ञान हे तीनही महात्म्याशिवाय कोठेंही एकवटलेले सांपडायचे नाहींत; सामान्य लोकांत ज्ञान आहे तेथें भक्ति नाहीं; भक्ति आहे तेथें ज्ञान नाहीं; दोन्ही आहे तेथें वैराग्य नाहीं असा प्रकार आढळतो—

**हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त।**
**व्युत्पन्न आणि वादरहित । तरी हेही अपूर्वता ।**

( दास० १४-५-४ )

१३४

**नसे गर्व आंगीं सदा वीतरागी**
**क्षमाशांति भोगी दयादक्ष योगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा**
**इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥**

गर्व नाहीं, सर्वकाळ वैराग्यसंपन्न आहे, क्षमा व शांति नित्य सान्निध आहेत, भूतदयेच्या कामीं तत्पर आहे, रामचरणीं अखंड जडला आहे ह्म० योगी आहे, लोभ नाहीं, क्षोभ नाहीं व ह्मणून दैन्यही नाहीं—ह्या लक्षणांनीं युक्त असलेला पुरुष योगीश्वर आहे असें जाण. **वीतरागी** ह्म० विषयप्रीति ज्याची उडाली आहे असा विरक्त-**योगी** ह्म० परमात्मयोग पावलेला, जीवशिवैक्य केलेला.

लोभ नाहीं म्हणून क्षोभ नाहीं व दोन्ही नाहींत म्हणून दैन्य नाहीं लोभाचें मांजर झालें कीं मनुष्य दीन होतो; निर्लोभ तोच समर्थ.

१३५

**धरीं रे मना संगती सज्जनाची**
**जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।**
**बळें भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे**
**महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥**

मना ! अशा सज्जनांची संगति धर. सत्संगतीनें दुर्जनाचीही बुद्धि पालटते ( असें पूर्वीं सांगितलेंच आहे. ) याच्या मनांत नसलें तरी (बळें) सद्भाव, सद्बुद्धि व सन्मार्ग सत्संगतीनें लागतात व महाक्रूर अशा यमराजाचीही भीति उरत नाहीं-निर्भयता प्राप्त होते. तुकोबाः—

**पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्यउदयाचा ठसा ।**
**जालों सन्मुख तो कैसा । संतचरण पावलों ॥१॥**
**आजी फिटलें माझें कोडें । भवदुःखाचें सांकडें ।**
**कोंदाटलें पुढें । परब्रह्म सांवळें ॥ २ ॥**

# ४ राघवाचा पंथ–निर्गुणबोध.

## ( १३६–१७४ )

( येथून पुढें ३९ श्लोकांत निर्गुणब्रह्माला पावण्याचें वर्म काय आहे तें सांगितलें आहे. ब्रह्मपद हें जीवाचें जुनें ठेवणें आहे, तेंच स्वस्वरूप आहे, पण मीपणा–अहंकार आड आल्यामुळें तें आकळत नाहींसें झालें आहे. हें सांगितल्यावर त्या उगमांचें ( त्या अनंत संतांचें ) श्रुत्य·नुसार स्वरूप दर्शविलें आहे. नंतर सत्संगति व मीपणाचा त्याग याच्या योगानें त्याची प्राप्ति होते असें सांगितलें आहे.)

### ( १ ) जुनें ठेवणें मीपणें आकळेना

### ( १३६–१४४ )

१३६

भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे
भयातीत तें संत आनंत पाहें ।
जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना
भय मानसीं सर्वथा ही असेना ॥

प्राणिमात्र ह्या ब्रह्मांडीं भयानें व्यापलेले आहेत, पण निर्गुणपद शाश्वत ( संत ) आणि अनंत असल्यामुळें तेवढें भयातीत आहे. त्या एकीएक अशा निर्गुणाचा विचार करूं जावें तों तेथें द्वैत कांहींच नाहीं. द्वैत नसल्यामुळें तेथें भयही नाहीं.

भव किंवा संसार ह्मणजेच द्वैत. द्वैताची भावना खुटली कीं संसार ओसरला. आतां जेथें द्वैत आहे तेथेंच भय आहे, प्राणिमात्रांना द्वैतामुळें भय वाटतें. एक दुसऱ्याला खातो व दुसरा याला पाहून पळतो. पहिल्याला पुन्हां तिसरा खात असतो. 'जीवो जीवस्य जीवनम्' याप्रमाणें संसाराचें घोर स्वरूप भागवतांत दाखविलें आहेः—

**अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम् ।**
**फल्गूनि तत्र महतां जीवो जीवस्य जीवनम् ॥**

ह्या जगांत मृत्यूशिवाय दुसरें काय दिसतें? हस्तपाद असलेल्या प्राण्यांनीं हस्तपाद नसलेल्या प्राण्यांना खावें, सबळांनीं दुर्बळांना खावें, अशी संसाराची रीतच आहे. द्वैतापासून भय व अद्वैतापासून निर्भयता. द्वैत ह्मटलें कीं आपपर, शत्रुमित्र इ० द्वंद्वें आलींच. स्वतःचा देह, स्त्री, पुत्र, इष्टमित्र, घरदार इत्यादिकांविषयीं मोह, भय, शोक, स्पृहा, लोभ हे विकार तोंपर्यंतच जीवाला त्रास देत असतात

'यावन्न तेंऽघ्रिमभयं प्रवृणीत लोकः' (भाग. ३-९-६) जोंपर्यंत लोक भगवंताच्या निर्भय चरणांचा आश्रय करीत नाहींत. 'भयं द्वितीयाभिनिवेशतःस्यात्' (भाग ११-२-३७) द्वैतापासून भयादिकांची उपज आहे. निर्गुण ब्रह्माव्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं, देहागेहादि अखिल ब्रह्मांडाला ब्रह्मा-व्यतिरिक्त अस्तित्वच नाहीं, व तें ब्रह्म मीच आहे या दृढ-निश्चयाच्या बैठकीवर आरूढ झाल्यानेंच जीव निर्भयता पावतो. बृहदारण्यांत याज्ञवल्क्यानें जनकाला ब्रह्मज्ञान सांगून ' अभयं वै प्राप्तोसि जनक ' असाच आशीर्वाद दिला आहे. भगवंतांनीं गीतेंतही ज्ञानलक्षणांत पहिलें लक्षण 'अभय' हेंच सांगितलें आहे. निर्गुणब्रह्म 'एकमेवाद्वितीयम्' आहे म्हणून तेथें द्वैत नाहीं तर भयही नाहीं. ' तत्व-मसि ' महावाक्याच्या विवरणानें तें मी आहे हा बोध पूर्णपणें ठसला म्हणजे जीवाचें जीवपण ( द्वैतलक्षणरूप ) मावळून त्याला अभय मिळतें; म्हणून ब्रह्म निर्भय आहे तसे तद्रूप झालेले महात्मेही निर्भय असतात. ब्रह्मरूपता जुनें ठेवणें आहे ह्म० ती कांहीं नवीन मिळवायची नाहीं, फक्त मीपणाचा पडदा आड आला तो दूर सारायचा आहे. परब्रह्म निर्भय आहे व ब्रह्मस्वरूप संतही निर्भयच असतात. मना ! मीपणाचा (द्वैताचा) पडदा विवेकानें फाडून निर्भय हो.

अहंकार हा सर्व विकारांचा राजा आहे. काम क्रोधादि हे किडामुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांवर अंमल गाजवितात; अहंकार हा विशेषेंकरून सज्ञानांच्या मागें लागतो. तो ब्रह्मभावाच्या आड येतो, त्याच्यामुळेंच जीव आपलें आपणाला विसरून भवसागराच्या भोंवऱ्यांत पडतो ह्मणून त्यापासून दूर सटकण्यास समर्थ सांगतात. मीपण-त्यागावर जोर देण्यांत हा हेतु आहे.

१३७

**जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले**
**परी जीव अज्ञान तैसेंचि ठेले ।**
**देहेबुद्धिचें कर्म खोटें टळेना**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

अनंत कालापासून सारे थोर महात्मे जीवांना याच यथार्थज्ञानाचा मार्ग दाखवून गेले आहेत, पण बापडे जीव तसेच अज्ञानी राहिले आहेत! ह्मणून यांच्या देहबुद्धीमुळें उत्पन्न होणारें खोटें कर्म ह्म० शोकमोहमृत्युभय इ० विकारांपासून यांची सुटका होत नाहीं व यांच्यांतील मी-पणामुळें जुनें ठेवणें (निजरूप) यांचें यांना आकळत नाहीं.

**देहबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ।**

देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ ३६ ॥
जागा होतां स्वप्न सरे । विवेक पाहतां दृश्य वोसरे । स्वस्वरूपानुसंधानें तरे । प्राणिमात्र ३८
( दास. ६–२ ).

१३८

भ्रमें नाडळे वित्त तें गुप्त जालें
जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें ।
देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना
जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥

भ्रमामुळें ( देहालाच मी ह्मणणें या भ्रमामुळें, देहबुद्धीमुळें ) तें यांचें निजधन उर्फ जुनें ठेवणें जवळ असून यांना गुप्त झालें आहे–दूरसें ह्म० हरपलेसें वाटत आहे, व जन्ममरणाचें दारिद्रय व्यर्थ भोगावें लागत आहे! देहबुद्धिजन्यविकार सुटत नाहींत म्हणून जुनें ठेवणें आकळत नाहीं.

‘ देहाचें जें थोरपण । तेचि देहबुद्धीचें लक्षण ’, ह्म० देह मी, देहाचे थोरपण तें माझें थोरपण, ही देहात्मबुद्धीच स्वहिताच्या आड येत असते. “ म्हणोनि देहबुद्धि झडे तरीच परमार्थ घडे । देहबुद्धीनें बिघडे । ऐक्यता ब्रह्मीची

॥ ३९ ॥ विवेक वस्तूकडे वोढी । देहबुद्धि तेथूनि पाडी । अहंता लाऊन निवडी । वेगळेंपणें ॥ ४० ॥ विचक्षणें या कारणें । देहबुद्धि त्यजावी निरूपणें । सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ॥ ४१ ॥ ( दास० ७–२ ). देहबुद्धि (अथवा मीपण) काय आहे व ती टाकावी कशी याचें साग्रं विवरण या समासांत पाहावें. मीपण ह्म० जीवपण ह्म० अज्ञान ह्मण-जेच संग. 'सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंन्यासी' निःसंग ह्म० निरूपाधि निर्गुण ब्रह्म, स्वस्वरूप, जुनें ठेवणें.

**देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसि येकाचि प्राप्ती ।**
**येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ३० ॥**

ब्रह्माची ऐक्यता मुळचीच आहे, फक्त देहबुद्धीमुळें ती घडी बिघडली असेल तर देहबुद्धीचा पडदा फाडला कीं आपण ब्रह्मस्वरूपच आहोंत. जुनें ठेवणें याच अर्थानें सम-जावें. ' ब्रह्म नाहीं नवें जुनें ' सर्वकाळ अखंड एकाकी एक-जिनसी आहे तसेंच आहे. आतां(द० ७ स० ७):—

**मीपण कैसें त्यागावें ? । ब्रह्म कसें अनुभवावें ?**
**समाधान कैसें पावावें । कोण्याप्रकारें ? ॥ ५१ ॥**
**मीपण—जाणोनि त्यागावें । ब्रह्म-होऊन अनु-**
**भवावें । समाधान-तें पावावें । निःसंगपणें॥५२॥**

थोडक्यांत सांगायचें इतकेंच कीं:—

**आपण वस्तु सिद्धचि आहे । मन मी ऐसें कल्पूं नये । साधू सांगती उपाये । तूंचि आत्मा ॥ ७५ ॥ ( दास० ८-१० ).**

तें ब्रह्म आहे ' अंतरींच, परीं ठावें । सकळांस कैचें !' ( दास० १५-७-२० ) एवढयाचसाठीं त्याला 'गुप्तधन' म्हटलें आहे.

१३९

**पुढें पाहतां सर्व ही कोंदलेंसे**
**अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे ।**
**अभावें कदा पुण्य गांठीं पडेना**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

हें गुप्त धन (कोठें एकीकडे पुरून ठेवलें आहे असें नव्हे, हें ) चहूंकडे कोंदाटलें आहे. ( रघुनाथभजानें त्याचा लाभ होतो ) पण अभागी मनुष्याला दाशरथी रामांतला सर्वव्यापी राम दिसत नसून पाषाणमूर्तीच दिसते त्याला कोणी काय करावें ? अशा अभावानें, अश्रद्धेनें पुण्य ( शुद्ध संस्कार ) गांठीं पडत नाहीं व जुनें ठेवणें प्राप्त होत नाहीं.

१४०

**जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं**
**गुणें गोविलें जाहलें दुःख देहीं ।**
**गुणावेगळी वृत्ति तेही वळेना**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥**

हें जुनें ठेवणें, हें आत्माख्यधन, ज्याच्या त्याच्या मालकीचें असून प्रत्येकाच्या अगदीं जवळ आहे, पण भ्रमामुळें मिळत नाहीं. हा त्रिगुणांत सांपडल्यामुळें याला भ्रम झाला आहे व त्यामुळें हा दुःख भोगीत आहे. वृत्ति गुणांवेगळी होत नाहीं, गुणातीतता किंवा निस्त्रैगुण्य पावत नाहीं, ह्मणून याच्याजवळ असलेलें याचेंच धन याला मिळत नाहीं.

गुणांनीं गोवणें कसें व गुणांवेगळें होणें कसें याचा पूर्ण बोध होण्यासाठीं गीतेचा १४ वा अध्याय पहावा. सत्व, रज व तम हे तीन गुण मूळप्रकृतीपासून होऊन देही जो आत्मा किंवा अंतरात्मा त्याला देहाशीं जखडून टाकीत असतात ( गीता १४–५ ). देहसंभूत गुणांशींच काय पण देहाशींही माझा संबंध नाहीं, मी देहाहून वेगळा, देहाचा व गुणांचा साक्षी आहे, असें जो जाणतो

तो गुणांच्या कार्यांत असूनही आपली गुणातीतता ओळखतो व त्याला जुनें ठेवणें जवळच आढळतें:—

आपण गुणातीत आहोंत हें ज्यानें जाणलें, त्याच्या ब्रह्मत्व किंवा साज्युज्य पाठीस लागतें !

आत्मरूप धन 'जयाचें तया चूकलें' आहे. 'देव जवळी अंतरींच' आहे. दा. द० ७-४:—

**चळचरांस जैसें जळ । बाह्याभ्यंतरीं निखळ ।**
**तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रांसी ॥ ५ ॥**
**जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां नये।**
**ब्रह्म अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें ।**
**अतिनिकट परी चोरलें । सकळांसि जें ॥ ८ ॥**

१४१

**ह्मणे दास सायास त्याचे करावे**
**जनीं जाणता पाय त्याचे धरावे ।**
**गुरुअंजनेवीण तें आकळेना**
**जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥**

ही गुणातीतता प्रतीत व्हावी, जुनें ठेवणें आपलें आपल्याला मिळावें यासाठीं जाणत्याचे पाय धरावे. त्याची सेवा करावी. गुरूनें डोळ्यांत ज्ञानांजन घातल्याशिवाय

मीपणा जात नाहीं व मीपण गेल्याशिवाय जुनें ठेवणें आपलें आपल्याला मिळत नाहीं.

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः॥ गीता**

'सद्गुरुविण मोक्ष पावावा! हें कल्पांतीं न घडे' (दास० ५-१-४४) हा सिद्धांतच आहे. देवभक्तांचा जीवशिवांचा एकांत गुरुवांचून कोणीच करूं शकत नाहीं. 'जो ब्रह्मज्ञान उपदेशी। अज्ञानअंधार निरसी। जिवात्मया परमात्मयासी। ऐक्यता करी' (दास० ५-२-९) हें सद्गुरुचें लक्षण आहे म्हणून समर्थ म्हणतात कीं 'दिसेना जें गुप्त धन। तयास करणें लागे अंजन। गुप्त परमात्मा सज्जन-। संगतीं शोधावा.' (द. ६-९-१९)

१४२

**कळेना कळेना कळेना ढळेना**
**ढळे नाढळे संशयो ही ढळेना ।**
**गळेना गळेना अहंता गळेना**
**बळें आकळेना मिळेना मिळेना ॥**

जुनें ठेवणें गुरु अंजनेंवीण कळायचें नाहीं, संशय ढळायचा ाहीं, अहंता गळायची नाहीं व बळें ह्म० हटातळानें

ह्म०नानाविध सायास करून आत्मधन मिळायचें नाहीं हें मी त्रिवार सांगतों.

१४३

अविद्यागुणें मानवा ऊमजेना
भ्रमें चूकलें हीत ते आकळेना ।
परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें
परी सत्य मिथ्या असें कोण जाणे ॥

खऱ्याखोटयांची परीक्षा नसल्यामुळें अडाणी मनुष्यानें खोटें नाणेंच खरें म्हणून कडोसरीला बांधावें, त्याप्रमाणें अविद्येनें ह्म. विषयाकार कल्पनेनें बांधला गेल्यामुळें मनुष्याला स्वहित उमगत नाहीं, व देहहंतेमुळें ( भ्रमें ) तो स्वहिताला चुकला आहे व म्हणून देहबुद्धीलाच कल्याणकर आत्मबुद्धि तो मानीत असतो. ( स्वहित कळत नाहीं व सत्यमिथ्या काय याची पारख होत नाहीं म्हणून तर त्याच्या डोळ्यांत अंजन घालणाऱ्या गुरूची अवश्यकता आहे. )

१४४

जगीं पाहतां साच तें काय आहे
अतीआदरें सत्य शोधूनि पाहें ।

**पुढें पाहतां पाहतां देव जोडे**
**भ्रमे भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥**

ह्या जगांत सत्य काय आहे तें अत्यादरपूर्वक शोधीत पहात जा. असेंच पाहतां पाहतां ( असत्य मायेचें टरफल उडून जाऊन ) सत्य ह्म० शाश्वत देव जोडेल व तो जोडतांच भ्रमभ्रांतिअज्ञानाचा सारा अंधार कोठच्या कोठें लोपून जाईल.

## ( २ ) मना ! संत आनंत शोधूनि पाहे

( १४५–१५० )

१४५

**सदा वीषयो चिंतितां जीव जाला**
**अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।**
**विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें**
**जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ॥**

जीव हा ( मूळचा ब्रह्मस्वरूप पण ) सर्वकाळ विषयांचें चिंतन करितां करितां जीवपणाला येऊन अहंभाव व अज्ञान यांनीं वेष्टित होत्सांता जन्मास येतो, ( जन्म-

मरणाच्या फेऱ्यांत सांपडतो ); आणि विवेकानें ( मिथ्या-मायेचा त्याग करून ) आत्मस्वरूपाच्या निदिध्यासानें तद्रूप होत ( उलट खाऊन ) तो उगमाशीं जाऊन भिडला कीं जन्ममरणाच्या यातायातींसून मोकळा होतो.( द २०-९ ):

**माया सांडून मूळास जावें ।**
**तरीच समाधान पावावें ॥**

१५६

**दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी**
**अकस्मात आकारलें काळ मोडी ।**
**पुढें सर्व जाईल कांहीं न राहे**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ॥**

जें डोळ्यांला दिसतें तें कोटिकल्प टिकणारें नसतें ह्म० दृश्य हें नाशिवंत आहे, जेवढें म्हणून आकाराला येतें तेवढें काळ मोडून काढतो. प्रळयकाळीं तर सर्वच नामरूप मोडून जाणार आहे,नामरूपापैकीं–दृश्यभासापैकीं कांहीं एक राहणार नाहीं, म्हणून मना ! तूं याहून वेगळें म्ह० ‘ संत (शाश्वत) आणि ‘अनंत’ काय आहे तेवढें शोधून पहा, त्या निर्गुणदेवाचा शोध घे. ( द०६ स० २ ):—

**जें जें रूप आणि नाम । तो तो अवघाचि भ्रम ।**
**नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ॥ १३ ॥**
**पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधाप्रकृति जाण।**
**अष्टधाप्रकृतीस नानाभिधान । दृश्य ऐसें ॥१४॥**
**तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेदश्रुति बोलत ।**
**निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥**

पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचभूतांत जेवढें आलें तेवढें नामरूप, दृश्य. तें सारें नाशिवंत आहे. ज्या प्रकृतिपुरुषापासून ही चराचर सृष्टि निर्माण झाली ते प्रकृति-पुरुषही जेथें अखेर लीन होतात तें शाश्वत निर्गुण ब्रह्म. तो ' अनंत संत ' तो मुख्य देव ! दृश्यभास दूर सारून त्याला शोधावें. पिंडब्रह्मांडात्मक सृष्टीहून तो वेगळा आहे. नाम, रूप, संबंध, जाति, क्रिया, भेद यांचा आकारांशींच संबंध आहे; मुख्य देव निर्गुण, तो निराकार आहे. 'पंच-भूतातीत देव । सृष्टि मिथ्या' ॥ 'सृष्टि पूर्वीं, सृष्टि चालतां, । सृष्टि अवघीं संहारता, । शाश्वत देव तत्वता । आदिअंतीं ।
( द० ६-६-४८ ),

' इतिश्री पुढें पंचभूतांसि होतें '–पंचभूतांना नाश आहे त्रिगुणांना नाश आहे, जें जें कांहीं आकारास येतें व ज्याला नामरूप आहे त्या सर्वांस नाश आहे म्हणून बा मना !

इतिश्री नव्हे तेंचि शोधूनि पाहे ! ॥ (करुणा १२५)

१४७

**फुटेना तुटेना चळेना ढळेना**
**सदा संचलें मीपणें तें कळेना ।**
**तया येकरूपासि दुजें न साहे**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ॥**

तो देव फुटत नाहीं, तुटत नाहीं, चळत नाहीं, ढळत नाहीं. सर्वत्र तो कोंदाटला असून मीपणा आहे तोंवर मात्र कळत नाहीं. तो एकरूप असल्यामुळें, एकमेवाद्वितीय असल्यामुळें, त्याला दुजें खपत नाहीं. असा तो ' अनंत संत '–शाश्वत परब्रह्म, मना ! शोधून पहा.

' नैनं छिंदान्ति शास्त्राणि ' या गीताश्लोकांत हेंच आहे.

**जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना ।**
**जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ॥ ४ ॥**
**जें सन्मुखचि सर्वकाळ । निष्कळंक आणि निखळ**
**सर्वांतर आकाशपाताळ । व्यापूनि असे ॥ ५ ॥**

( दास. ६–३ )

दृश्य आलें आणि गेलें । परी तें परब्रह्म संचलें।
जैसें गगन कोंदाटलें । चहूंकडे ॥ २ ॥
जिकडे पहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं
पार । येकाजिनसी, स्वतंत्र, । दुसरें नाहीं ॥ ३ ॥
( दास० २०-२ )

१४८

निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।
जया सांगतां सीणली वेदवाचा ।
विवेकें तदाकार होऊनि राहें ।
मना संत आनंत शोधूनि पाहें ॥

परब्रह्म स्वतः निराकार असून ब्रह्मादिदेवांना व अनंत ब्रह्मांडाना आधारभूत आहे. निर्गुण निराकाराच्या अधि॰ ष्ठानावर सर्व सृष्टि उभारली आहे. त्याचें वर्णन करितां करितां मति कुंठित होऊन वेद मूग गिळून गप्प बसले. 'नेति नेति' म्हणजे 'हें कांहीं तें नव्हे असें नामरूपाच्या निषेधपर बोलूनच वेद थबकले आहेत, स्वरूपवर्णन कांहीं वेदांना करवलें नाहीं. (वेदाची ही स्थिति मग स्मृतिशास्त्रपुराणां बद्दल तर बोलायलाच नको. ) सारासारविवेक करून तद्रूप होऊन) रहा. मना ! ( तद्रूप आपण आहोंतच पण

आहेत हें कळून रहा ) मना ! शाश्वत ब्रह्म शोधून पहा

देव निर्गुण आहे व 'देवपदीं अनन्यपण' ठेवल्यानें पूर्ण-समाधान मिळतें. संत व अनंत अशा देवाशीं अनन्यता हीच भक्ति. ही देवभक्तांची गांठ सद्गुरु घालतात.

१४९

**जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे**
**जगीं पाहतां ज्ञानचक्षीं नरक्षे ।**
**जगीं पाहतां पाहणें जात आहे**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ॥**

तें परब्रह्म चर्मचक्षूला दिसत नाहीं, तर ज्ञानचक्षूला मात्र दिसतें ( निरीक्षे ) तें पाहायला गेलें असतां पाहणें-पण नाहींसें होतें, असें तें शाश्वत ब्रह्म मना शोधून पहा.

'ब्रह्म जाणावें शाश्वत । सर्वांठायीं सदोदित । भरलें असें' ( ४१ ) नेत्रादि इंद्रियांनीं जें जाणूं जावें तर 'जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ।' ( ४५ ) तें जवळ असून पाहूं जातां दिसत नाहीं. मी त्याला पाहणार असें ह्मणतांच पाह-णारा, पाहणें व पाहण्याची वस्तु अशी त्रिपुटी उभी राहते व ब्रह्माच्या ठिकाणीं त्रिपुटी तर मावळते म्हणून 'पाहणें जात आहे' असें म्हटलें आहे. 'ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्म-

दृष्टी पाहूं नेणें । अंतरवृत्तींचिये खूणे । अंतरवृत्ति साक्ष ॥' ( दास० ७-४ ). अस्थिमासांच्या देहांत देहबुद्धीनें राहून मांसाच्या डोळ्यानें ह्म० चर्मचक्षूनें ब्रह्म पाहतां येत नाहीं ( द० ६-८-४६ ).

मग वस्तुदर्शन कसें व्हावें ? परब्रह्म वस्तु पाहावी कशी?

**आकाश वेगळेपणें पहावें ।**
**स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ।**
**वस्तूचें पाहणें स्वभावें ।**
**ऐसें असे** ॥ ( दास० ८-५-६६ )

ब्रह्माला नेहमीं आकाशाची उपमा देतात, पण आकाश हें भूत आहे व देव पंचभूतातीत आहे. आकाश त्याहून वेगळे राहून पाहतां यते, निर्गुण ब्रह्म पाहाणें ह्म० त्याशीं अनन्य होणें. ' स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ' हें स्वरूपदर्शन होय. ' वस्तूचि होऊन राहणें । ऐसें वस्तूचें पाहणें ' ह्मणून तर नाथ म्हणतातः-'कसें बोटानें दाखवूं तुला । घे अनुभव गुरुच्या मुला. ' ब्रह्म अनिर्देश्य आहे, गुरुपुत्र होऊन अनुभवरूप हो.

'यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यन्ति' असें केनोपनिषदांत ह्मटलें आहे. ' यद्वाचा नभ्युदितं-यन्मनसा न मनुते ' इ० इ०

१५०

**नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं**
**नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं ।**
**ह्मणे दास विश्वासतां मुक्ति लाहे**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ॥**

परब्रह्म अनिर्देश्य आहे तें पीत ( पिवळें ) नाहीं, श्वेत ( पांढरें ) नाहीं, श्याम ( काळें ) नाहीं. तें व्यक्त (सगुण) नाहीं व अव्यक्त ( निर्गुण ) नाहीं. तें नीळ ( आकाश ) नाहीं. तें सद्गुरुवचनीं पूर्ण विश्वास ठेवल्यानें आकळतें ह्मणजे मुक्ति मिळते. मना ! अशा शाश्वत ब्रह्माचा शोध घे.

ब्रह्म पिवळें, पांढरें व काळें नाहीं हें नुस्तें सांगण्यांत कांहींच स्वारस्य नाहीं. याचा अर्थ स्पष्ट केला पाहिजे. पांढरा वर्ण सत्वगुणाचा, पिंवळा किंवा तांबडा वर्ण रजोगुणाचा व कृष्णवर्ण तमोगुणाचा द्योतक आहें, हें श्रुतिपुराणांत प्रसिद्ध आहे. तेव्हां परब्रह्म पीत, श्वेत व श्यामें नाहीं ह्म० तें सत्वरजतम ह्या त्रिगुणांहून पलीकडचें आहे तें गुणत्रयातीत आहे. गणपति अथर्वशीर्षांत ‘ त्वं गुणत्रयातीतः त्वं अवस्थात्रयातीतः ’ असें ह्मटलें आहे. गीतेंतही अर्जुनाला ‘ तूं निस्त्रैगुण्य हो, तूं गुणातीत हो ’ असें

देव ह्मणाले, त्याचें तात्पर्य ब्रह्म गुणातीत आहे म्हणून तूंही गुणातीत होशील तरच ब्रह्मस्वरूप तुला होतां येईल असें आहे. जो जेथें असतो तेथें गेल्याशिवाय त्याची भेट होत नाहीं, गुणांत राहून निर्गुणाची भेट होत नाहीं!

**अभंग**

**रक्तश्वेतकृष्णपीतप्रभाभिन्न ।**
**चिन्मय अंजन सूदलें डोळां ॥ १ ॥**
**तेणें अंजनगुणें दिव्य दृष्टी जाली ।**
**कल्पना निमाली द्वैताद्वैत ॥ ध्रु० ॥**
**देशकालवस्तुभेद मावळला ।**
**आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥ २ ॥**
**न जाला प्रपंच आहे परब्रह्म ।**
**अहं सोहं ब्रह्म आकळलें ॥ ३ ॥**
**तत्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग ।**
**तेंचि जाला अंगें तुका आतां ॥ ४ ॥**

## ( ३ ) समाधान तें सज्जनाचेनि योगें

## ( १५१–१५५ )

[ तें समाधान संतसंगतीशिवाय होत नाहीं ह्मणून सत्संग करा असें सांगतात. ]

१५१

**खरें शोधितां शोधितां शोधताहे**
**मना बोधितां बोधितां बोधताहे ।**
**परी सर्व ही सज्जनाचेनि योगें**
**बरा निश्चयो पाविजे सानुरागें ॥**

सत्य परब्रह्माचा शोध घेतां घेतां ह्म० विचार करितां करितां तें आकळतें. मनाला त्याचा बोध करितां करितां बोध होतो. पण हें सारें सत्संगानें होतें ह्मणून संतगुरु-चरणीं प्रेम ठेवावें ह्मणजे ब्रह्माचा निश्चय होतो.

**सर्वही सांडणें मागें । आधीं देवासि धुंडणें ।**
**धुंडितां धुंडितां देवो । सत्संगें सांपडे जनीं ॥**

—पंचीकरणयोग.

सत्संगतींत ब्रह्माचा निश्चय होतो कारण संतांचें ज्ञान निश्चयाचें असतें, त्यांजपाशीं संशय नसतो. ‘ साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला । निश्चय चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध ’ ( दास० ५-१०-१० ) संशयाचें भजन, वैराग्य, ज्ञान, सारेंच खोटें. ज्यापाशीं संदेहराहित ज्ञान व निश्चयाचें समाधान आहे तोच सिद्ध. मी देह नाहीं, आत्मा आहे—अहमात्मा हा निश्चय,

१५२

बहूतांपरी कूसरी तत्त्वझाडा
परी अंतरीं पाहिजे तो निवाडा ।
मना सार साचार तें वेगळें रे
समस्तांमधें येक तें आगळें रे ॥

अंगीं पुष्कळ कलाकौशल्य व चातुर्य असलें किंवा पंचीकरणाच्या अभ्यासानें तत्वांचा विचार पुष्कळ केलेला असला तरी शाश्वत ब्रह्माचा अंतरीं स्वच्छ निवाडा झाला पाहिजे. तो मुख्य आहे. मना! सत्य शाश्वत वस्तु ही कांहीं और चीज आहे. ती सर्वांत आहे, सर्वांहून भिन्न आहे, व सर्वांत श्रेष्ठ आहे. ( द. ९-२ ):—

**जें सकळांमध्यें सार । मिथ्या नव्हे तें साचार ।**
**जें कां नित्य निरंतर । संचलें असे ॥ १ ॥**
**तें भगवंताचें निजरूप । त्यासी बोलिजे स्वरूप**

कळाकुसरी व तत्वविचार यांनीं कांहीं समाधान मिळत नाहीं, शाश्वत समाधानाला शाश्वत ब्रह्माचाच अंतरीं निश्चय झाला पाहिजे.

१५३

**नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें**
**समाधान कांहीं नव्हे तानमानें ।**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें**
**समाधान तें सज्जनाचेनि योगें ॥**

पिंडज्ञान, तत्वज्ञान, गायनादि कलाज्ञान, अष्टांगयोग, यज्ञयाग, सुखोपभोगांचा त्याग ह्म.बाहिस्त्याग यांच्या साह्यानें जें आत्मसमाधान होत नाहीं तें सत्समागमानें पूर्णपणें होतें. सत्संगाची थोरवी एवढी मोठी आहे.

**पिंडज्ञान** ह्म० शरीरशास्त्र. Anatomy.

**तत्वज्ञान** ह्म० ज्या तत्वांनीं पिंडब्रह्मांडांची रचना झाली आहे त्या तत्वांचें ज्ञान. ही तत्वसंख्या वेगवेगळी दिलेली आढळते. गीतेच्या १३ व्या अध्यायांत ही संख्या ३६ दिली आहे. भागवतांत (स्कंध ११ अ० २२) ४ ते २८ पर्यंत वेगवेगळ्या संख्या दिल्या आहेत. समर्थांनीं दासबोधांत (द १७ स. ७।८) ही संख्या ८२ दिली आहे. Philosophies.

**तानमान** ह्म. गायनवादनादि ललितकला Music & co--related fine Arts.

योगयाग Yoga & Sacrifices
भोगत्याग Renunciation.

बहुसाल शास्त्र पाहतां सरेना ।
आयुष्य पुरेना जन्मवेरी ॥ ४० ॥
जन्मवेरी वायां संदेहीं पडावें ।
केधवां घडावें समाधान! ॥ ४१ ॥
समाधान घडे साधूचे संगती ।
गीताभागवतीं हेंचि आहे ॥ ४२ ॥
हेंचि आहे सार जाणावें साचार ।
करावा विचार शाश्वताचा ॥ ४३ ॥
संतसंगें देव पाविजे तत्वता ।
शास्त्रें धांडोळितां आढळेना ॥ ४५ ॥
साधुसंगें ज्ञान रामदासीं जालें ।
शरीर लागलें भक्तिपंथें ॥ ५१ ॥

( स्फुट ओव्या ४ ).

१५४

महावाक्य तत्त्वादिकें पंचिकर्णें
खुणें पाविजे संतसंगें विवर्णें ।
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो
तया सांडूनी चंद्रमा भाविजेतो ॥

महावाक्यें, तत्वविचार, व पंचीकरण यांचें संतांच्या तोंडून विवरण ऐकल्यानें शाखाचंद्रन्यायानें शाश्वतब्रह्माची खूण पटते. ( त्याचा निदिध्यास व अनुभव ज्याचा त्यालाच घेतला पाहिजे. शास्त्रप्रतीति व गुरुप्रतीति पाहिल्यावर आत्मप्रतीति आली म्हणजेच खरें समाधान होतें. ) द्वितीयेची चंद्रकला ज्यानें आधीं पाहिली असते तो ज्याला ती पहायची आहे त्याला दाखवितांना एखाद्या फांदीची किंवा पानाची खूण दाखवून पाहण्यास सांगतो. खुणेनें पाहिल्यावर चंद्र दिसला कीं तो खुणेची फांदीबिंदी सोडून चंद्रावरच टक लावतो.

येथें चंद्र ज्यानें आधीं पाहिला असतो तो सद्गुरु, पाहण्याची इच्छा करणारा मुमुक्षु, फांदी महावाक्यादि व चंद्र हा परब्रह्म--महावाक्यादि साधन आहे, ब्रह्मप्राप्ति हें साध्य आहे.

महावाक्यें चार वेदांतील चार आहेत. ' प्रज्ञानं ब्रह्म ' ( ऋग्वेद ), ' अहंब्रह्मास्मि ' ( यजुर्वेद ), ' तत्वमसि ' ( सामवेद ), व ' अयमात्मा ब्रह्म ' ( अथर्ववेद ). समर्थांचा अभंग पहाः—

**'तत्वमसि' आणि 'अहंब्रह्म' ऐसें ।**
**जाण हें विश्वासें महावाक्य ॥ १ ॥**

'अयमात्मा ब्रह्म' आणि 'ज्ञानब्रह्म'।
दास ह्मणे वर्म वेदवाक्य ॥ २ ॥
वेदवाक्य रामीरामदास पाहे।
मुख्यपद लाहे निवेदनें ॥ ३ ॥

पंचीकरण अगदीं संक्षेपांत पाहणें असल्यास समर्थांचा 'पंचीकरणयोग' पाहावा, विशेषतः तिसरा योग पहावा.

**पंचीकरण महावाक्यें । श्रवणें मननें सदा ।**
**सत्संगें निःसंग होतां । धन्य संसार होतसे ॥**

स्फु. प्र. ५२॥

१५५

**दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहें**
**बरें पाहतां गूज तेथेंचि आहे।**
**करीं घेउं जातां कदा आडळेना**
**जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥**

जें ह्या जनांत ( सृष्टींत, जन्=उत्पन्न होणें ) ह्म० विश्वांत स्थूलदृष्टिला दिसत नाही तेंच (तें जुनें ठेवणें, गुप्तधन, शाश्वत ब्रह्म ) शोधून पहा, त्याचा सूक्ष्म विचार करून पहा, ह्मणजे तुला सकल सृष्टीचें गूढ तेथेंच उलगडेल. तें

हातांनीं घेतां येत नाहीं, कोठें आढळत नाहीं, सर्व विश्वांत भरून उरलें असून कळत नाहीं.

## ( ४ ) मना ! सर्व जाणीव सांडून राहे

## ( १५६–१६२ )

### १५६

**म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे**
**अतर्कासि तर्की असा कोण आहे ।**
**जनीं मीपणें पाहतां पाहवेना**
**तया लक्षितां वेगळें राहवेना ॥**

त्याची मौज अशी आहे कीं 'मला तें कळलें आहे, मी तें शाश्वत ब्रह्म पाहिलें आहे' असें कोणी म्हणेल तर तो मूर्ख आहे असें बेशक समजावें ! ब्रह्म तर्कातीत आहे, त्याचा तर्क कोण करूं शकेल ? मी त्याला पाहणारा, मला तें कळतें, असा मीपणा घेऊन त्याला कोणी पाहूं जाईल तर तें त्याला पाहतांच येणार नाही, बरें मीपणा सोडून त्याला कोणी लक्षील तर तो त्याहून वेगळाच राहणार नाहीं. तात्पर्य 'मीं ब्रह्म पाहिलें' अशी भाषाच होऊं शकत नाहीं.

'जो मी जाहलों म्हणे । तो कांहींच नेणें ।' असें ज्ञानेश्वाराय म्हणतात. केनोपनिषदांत (द्वि.खं. ११) म्हटलें आहे.:–

**यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।**
**अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥**

ज्याला ‘ कळलें ’ वाटतें त्याला कांहींच कळलें नाहीं व ज्याला वाटतें कीं मला कांहींच ‘ कळलें नाहीं ’ त्याला कळलेंलें असतें ! मला ब्रह्म कळतें असें म्हटलें कीं असें म्हणणारा ब्रह्माहून वेगळा पडला, व ब्रह्माहून वेगळा पडला कीं तोच अहंकार ! करुणाष्टकांत समर्थ म्हणतातः—

**अद्वैतचर्चा गुरुगम्य आहे । कळे ह्मणे तो सहसा न लाहे । चोरून जागे हृदयीं अहंता । कळे ह्मणे त्या नकळेचि भ्रांता ॥**

१५७ व १५८

**बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे**
**जया निश्चयो येक तोही न साहे ।**
**मती भांडती शास्त्रबोधें विरोधें**
**गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ॥**
**श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें**
**स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें ।**

**स्वयें शेष मौनावला स्थीर राहे**
**मना सर्व जाणीव सांडून पाहे ॥**

शब्दशास्त्र अनंत आहे, शास्त्रें नानाविध आहेत व त्यावर हजारों ग्रंथ आहेत. आधीं शास्त्राशास्त्रांचेंच कोठें पटतें आहे? शास्त्रें आपापसांत भांडतात, कांकीं सर्वांचा निश्चय एक होत नाहीं. निश्चय वेगळाले. पुन्हां शास्त्रांचे भिन्नभिन्न विरुद्धार्थ करून परस्परांशीं भांडणारे अनेक मतवादी आहेतच! अस्तु. अशांतही एखाद्यास यथार्थ ज्ञान-बोधानें बुद्धिप्रकाश लाभला तर त्याची मति कुंठित होऊन तो या वादाच्या गलबल्यापासून लांब राहतो. ( १५७ ). उपनिषदें, न्यायशास्त्र, मीमांसा ( कर्मकांड ), तर्कशास्त्र, स्मृति, वेद, वेदांत इत्यादिकांत वेगवेगळीं वचनें व मतें सांपडतात. सर्वांत ज्यास्त बोलका शेष त्यालाही ब्रह्माचा थांग न लागल्यामुळें तो मौन धरून उगाच बसला आहे. मना! आतां सांग बरें! या धेंडांपुढें तुझ्या जाणिवेचा पाड काय आहे तो! ह्मणून सर्व जाणीव ह्म० जाणतेपणाचा अभिमान सोडून दे.

**(१) पावावया भगवंतातें। नाना पंथ नाना मतें**
**तया देवाचें स्वरूप तें। कैसें आहे? ॥ १७ ॥**

**वहु देव बहु भक्त । इच्छा जाले आसक्त ।**
**बहु ऋषी बहु मत । वेगळाले ॥ ८ ॥**

**वहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध**
**ऐसा करितां वेवाद । बहुत गेले ॥१०॥**(द. ८-१)

वेदशास्त्रस्मृतींत अनेक वाक्यभेद पडतात पण 'ते सर्वही निवडती । सद्गुरुवचनें.' वेदशास्त्रांचें भांडण कांहीं शस्त्रानें तुटत नाहीं, साधुवांचून त्याचा निवाडा होत नाहीं, ह्मणून वादविवाद सोडून संतांना जाणीवरहित शरण जावें, त्यांच्याशीं खुशाल सुखसंवाद करावा, 'तेणें होय ब्रह्मानंद । स्वानुभवें' (दास० द०६ स० ६ पहा.)

१५९

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची**
**तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना**
**तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥**

जाणतेपणाचा अभिमान हीच ज्ञानभोजनांतली माशी ! ही माशी ज्याच्या पोटांत गेली त्याला भोजनाची रुचि कोठची ! ही माशी लहानसहान नका समजूं. ही खाल्लेलें

कांहीं एक पचूं द्यायची नाहीं. शीतन्‌शीत सारें ओकून बाहेर पाडील तेव्हांच ती राहील ! !

ज्ञानान्न कितीही पोटांत गेलें तरी अहंकार निःशेष झडल्यावांचून तें पचत नाहीं,

'देहोहं' हा जीवदशेंतील अहंकार, 'जीवोहं' हा मध्यदशेंतला व 'शिवोहं' हा सज्ञानदशेंतला अहंकार. अहंकार हा कोठलाही मारकच. 'जविपण येकदशी। अहं-कारें जन्म सोसी। विवेक पाहतां प्राणियासी। जन्म कैंचा?' (दास० ८-७-५६). जीव हा परमात्माच पण एकदेशी-पण पत्करितो व देह मी म्हणून लहानग्या घरकुलांतला संसार माझा म्हणतो म्हणून जननमरण त्याच्या मागें आहे. विवेक पाहतां 'अहं' ही मायेंतली वृत्ति. अहं मेला त्या क्षणीं जीव जन्ममरणाच्या सुतकांतून सुटला. 'कुश्चिळ ठायीं जन्मलें। आणि कुश्चिळरसेंचि वाढलें' असें हें शरीर–मोठेपणाला ठाव कोठें आहे? 'काया माया दों दिसाची। आदिअंतीं अवघी चींची' हें जाणून 'उगेंचि कासया तंडावें। मोडा अहंतेचें पुंडावें। विवेकें देवास धुंडावें हें उत्तमोत्तम' (दास० द० १५ स० ८ पहा). जीव पर-ब्रह्मच आहे, मध्येंच देहबुद्धीचा पडदा आल्यानें संसार उभा राहिला आहे, तो पडदा दर सारावा. 'संग सोडावा

आपुला। मग पाहावें तयाला' 'सोडितां तया संगासी। ऐक्य होय निःसंगासी':—

**विवेक वस्तूकडे वोढी। देहबुद्धि तेथूनि पाडी।**
**अहंता लाऊन निवडी। वेगळेपणें ॥ ४० ॥**
**विचक्षणें याकारणें। देहबुद्धि त्यजावी श्रवणें।**
**सत्यब्रह्मीं साचारपणें। मिळोनि जावें॥४१॥**दा.७-२

१६०

**नको रे मना वाद हा खेदकारी**
**नको रे मना भेद नानाविकारी।**
**नको रे मना सीकऊं पूढिलांसी**
**अहंभाव जो राहिला तूजपासीं ॥**

हे मना! ही जाणीव, अहंता सोडून दे, अहंकारापासून सर्व विकार उत्पन्न होतात. वादविवाद अहंकारामुळेंच चालतात. बा मना! जोंपर्यंत अहंकार तुजजवळ आहे तोंवर दुसऱ्याला तरी शहाणपण शिकवण्याच्या भरीस पडूं नकोस!

१६१

**अहंतागुणें सर्वही दुख होतें**
**मुखें बोलिले ज्ञान तें व्यर्थ जाते।**

**सुखी राहतां सर्वही सूख आहे**
**अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहे ॥**

अहंतेच्या योगानें सर्वदुःखें ओढवतात, तोंडानें सांगितलेलें ज्ञान व्यर्थ जातें (त्याचा कोणावरही कांहींच परिणाम होत नाहीं). अहंकार सोडल्यानें सर्व सुखें वोळंगतात, ह्मणून बा मना ! तुझी अहंता तूंच शोधून पहा !

**मीपणें वस्तु नाकळे। मीपणें भक्ति मावळे।**
**मीपणें शक्ति गळे। वैराग्याची ॥ ४९ ॥**
**मीपणें प्रपंच न घडे। मीपणें परमार्थ बुडे।**
**मीपणें सकळही उडे। यशकीर्तिप्रताप ॥ ४७ ॥**

(दास. ७-७)

'देह मी' हा मीपणा जसा बंधकर आहे तसाच अखेरचा 'ब्रह्म मी, मुक्त मी' हा मीपणाही बंधकारकच आहे. (द० ७ स० ६):—

**मुक्तपण होंचि बद्ध। मुक्तबद्ध हें अबद्ध।**
**स्वस्वरूप स्वतः सिद्ध। बद्ध ना मुक्त ॥ ५२ ॥**

मी मुक्त आहे हेंच बंधन जाणत्यांच्या मागें लागतें. मुक्त आणि बद्ध हें समजुतीसाठीं बोलायचें. स्वरूपाच्या

ठिकाणीं मुक्त व बद्ध या दोनी कल्पना नाहींत. जाणत्या-नेणत्या सर्वांच्या मागें ही अहंता लागली आहे. तिच्यांतून सुटला तो धन्य. मूळ अहंता कोठून कशी उत्पन्न झाली, ती जीवमात्रांना कशी नाचवीत असते व माझा मीच अहंतेचा दास कसा झालों आहे हें पहात असावें. अहंतेचें रूप आपल्या ठिकाणींच पहावें. पहातां पहातां ती लाजून मुरडून जाते. 'बा मना ! तुझी अहंता तूंच शोधून पहा' हा अहंतेंतून–जाणीवेंतून सुटण्याचा उपाय आहे.

( अहंतेचें स्वरूप काय व ती आपली आपण कशी शोधून पहायची हें लक्ष्यांत येण्यासाठी '**श्रीतुकाराम-चरित्र**' ह्या ग्रंथांतील पृ० २९१ ते २९९ हीं वाचून पहा.)

१६२

**अहंतागुणें नीति सांडि विवेकी**
**अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।**
**परी अंतरीं सर्वही साक्ष येते**
**प्रमाणांतरें बुद्धि सांडूनि जातें ॥**

नित्यानित्यविचार ज्याला कळला आहे असा विवेकी पुरुष सुद्धा अहंतेच्या भोंवऱ्यांत सांपडला म्हणजे नीति

सोडून वागतो व ( लौकिकांत त्याची मान्यता मोठी असल्यामुळें त्या मान्यतेला भुलून ) तो अनीतीनें वागत आहे असें कळत असूनही लोक त्याची वाहवा करीत असतात ! पण हा बाहेरचा डामडौल ठीक चालला असला तरी तो विचारी असल्यामुळें त्याचें मन त्याला खातच असतें ! त्याच्या बुद्धीला वेदशास्त्रप्रमाणें कळत असलीं तरी तो ( अहंतावश झाल्यामुळें ) तीं एवढालीं थोर थोर प्रमाणेंही मानीत नाहीं.

मोठमोठे विवेकी ( शब्दज्ञानी ) पुरुषही नीतीला सोडून इ० वेदशास्त्रमर्यादा उल्लंघून क्वचित् वागतांना दिसतात याचें कारण त्यांना कळत नाहीं, किंवा शास्त्रप्रमाणें माहीत नसतात असें नाहीं तर ते अहंकाराला वश झालेले असतात. ' माझ्या बुद्धीला योग्य वाटतें तेंच मी करणार, मी मुक्त असल्यामुळें सामान्य जनांचीं बंधनें मला काय होत, मी करून अकर्ता आहे, हें शास्त्रानें सांगितलें असलें तरीं शास्त्रें आमच्यासारख्या माणसांनींच केलीं आहेत व तीं फिरवण्याचा आह्मांला हक्क आहे ' इ० प्रकारें अहंकार त्यांच्या बुद्धीला घेरतो.

**नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञा-**

नापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नानासंकटीं नाचवी ॥

या साठींच

थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळिक माझी ॥ ( ज्ञाने० ९-३७८ )

## ( ५ ) सत्संगांत देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि करावी ( १६३-१७४ )

१६३

देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला
देहातीत तें हीत सांडीत गेला ।
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी
सदा संगती सज्जनाची धरावी ॥

देह तोच मी अशी देहबुद्धि ह्म० अहंता बळकट केल्यामुळें देहापलीकडील आत्महिताला तो मुकला. यासाठीं देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि करावी ( देह मी हा ध्यास सोडून आत्मा मी अशी बुद्धि दृढ करावी ) व ही होण्यासाठींच सत्संग धरावा.

देहाचें जें थोरपण । तेंच देहबुद्धीचें लक्षण ।
मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिती देहो ॥३४॥
हित आहे देहातीत । ह्मणोनि निरोपिती संत ।
देहबुद्धीनें अनहित । होचि लागे॥३७॥ (दा.७-२)

देहातीत ह्म. परमात्मवस्तु. ' तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे, ' कां कीं ' मायातीत अनंताची । संत सोय सांगती ' ( दा० द० १-५ )

१६४

**मनें कल्पिला वीषयो सोडवावा**
**मनें देव निर्गूण तो वोळखावा ।**
**मनें कल्पितां कल्पना ते सरावी**
**सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

मनानें कल्पिलेला विषय अर्थात् द्वैतकल्पना सोडून द्यावी व द्वैताची कल्पना करणारी अद्वैतकल्पनाही सोडून द्यावी ( मी देह ही अहंता सोडावी व मी ब्रह्म हीही अहंता सोडावी ) म्हणजे मग शाश्वत निर्गुण देवाची ओळख पटते, पण हें साध्य होण्यासाठीं सत्संग करावा.

' अद्वैत कल्पना प्रकाशे । तेचि क्षणीं द्वैत नासे ।' याप्रमाणें द्वैतकल्पना, कांट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें,

अद्वैतकल्पनेनें उडून जातें व मग तोही कांटा फेंकून द्यावा त्याप्रमाणें 'स्वरूपीं तद्रूप' होतां अद्वैतकल्पनाही सरते. 'मी ब्रह्म!' हीही कडकड जिरली म्हणजे मगच सायुज्यतेचें साजूक व चविष्ट तूप तोंडांत पडतें.

१६५

**देहादीक प्रपंच हा चिंतियेला**
**परी अंतरीं लोभ निश्चित ठेला।**
**हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी**
**सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

देह व तत्संबंधी गृहपुत्रादि प्रपंचाचें चिंतन करीत राहिल्यानें अनिवार लोभ मात्र चित्तांत वाढतो ह्मणून प्रपंचाची चिंता न करितां हरिचिंतन करावें व हरिचिंतनानें मुक्तिनोवरीशीं लग्न लावून चार दिवस सायुज्यतेचा सुखसोहळा भोगावा. हें होतें सत्संगतींत ह्मणून सत्संग धरावा. संत हेच असें लग्न लावणारे जोशी होत!

समर्थांचे शिष्य रघुनाथपंडित यांनीं समर्थांच्या स्तुतींत पुढील मौजेचा श्लोक लिहिला आहे:—

**चिद्बोध शेज अरुवार नव्या फुलांची**
**सायुज्यमुक्ति असतां ललना जयाची।**

**तो रामदास अकलत्र कसें गणावें ?**
**अज्ञान होत जन काय तया ह्मणावें ॥**

'तुका ह्मणे मुक्ती परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळिमेळी ' असें तुकोबाही मौजेनें म्हणतात.

१६६

**अहंकार विस्तारला या देहाचा**
**स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा ।**
**बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी**
**सदा संगती सज्जनाची धरावी ॥**

देहाहंकाराचाच विस्तार होऊन स्त्रीपुत्रमित्रादिकांचा मोह पडतो. पण हा भ्रम असून हाच 'पुनरपि जननं पुनरपि मरणं ' या यातायातीला कारण होतो. यांतून सुटण्यास सत्संग करावा.

**घरगांव स्थान माझें । सेत वाडे मळे गुरें ।**
**कन्यापुत्र वधू माझी । सर्व सांडोनि चालिला ॥**
**आधींच सर्व जाणावें । काय येतें समागमें ।**
**निर्वाणीं अंतिचा देवो । कोणी येकें चुकों नये ॥**

( षड्रिपु० )

यदध्रुवस्य देहस्य सानुबंधस्य दुर्मतिः ।
ध्रुवाणि मन्यते मोहात् गृहक्षेत्रवसूनिच ॥
( भाग० ३–३० )

१६७

वरा निश्चयो शाश्वताचा करावा
ह्मणे दास संदेह तो वीसरावा ।
घडीनें घडी सार्थकाची करावी
सदा संगती सज्जनाची धरावी ॥

प्रपंचमोह सोडून ह्म० देहबुद्धित्याग करून शाश्वत ब्रह्माचा निश्चय करावा ह्म० अहंब्रह्म–मी आत्माराम आहे असा दृढ निश्चय करून निःसंदेह असावें. नरदेहाची दुर्लभता जाणून प्रत्येकक्षण हरिभजनीं लावून जन्मसाफल्य करावें. सत्संगांत संदेह सोडून आत्मनिश्चय होतो ह्मणून सत्संग करावा.

मागचा व हा असे दोन श्लोक मनावर ठसावेत यासाठीं दासबोध द. ३ स. १० वा मननपूर्वक वाचावा. तात्पर्यः—**सत्संगती ज्या नरांस नाहीं । ते पाप-**

रूपी पडती प्रवाहीं। संदेह चित्तीं सहसा ढळेना। सिद्धांत साधूविण आकळेना॥

( करुणा० १३१ )

१६८

करी वृत्ति जो संत तो संत जाणा
दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।
उपाधी देहेबुद्धिते वाढवीते
परी सज्जना केवि बाधूं शके ते॥

( सत्संग धरा ह्मणून सांगतां पण संतांचीं लक्षणें तरी सांगा. तींच सांगतों ). ज्याची वृत्ति संत आहे ह्म० जो मनानें ( बाह्यवेषानें नव्हे ) संत ( शाश्वतपदारूढ ) झाला आहे तोच संत समजा. तो भवस्वर्गादिसुखांचा लालची नसतो, दुराशेचा कुतरा झालेला नसतो, तो मोक्षश्रिया-विराजित असल्यामुळें दैन्यवाणा मुळींच नसतो. सामान्य लोकांची उपाधि त्यांची देहबुद्धि वाढवीत असते, पण संत उपाधींत असला किंवा नसला तरी उपाधीचा पगडा त्यावर कधींच बसत नाहीं, अर्थात् तो अंतरीं पूर्ण निरु-पाधिक असतो. तात्पर्य संत स्वरूपाकार, नैराश्यवंत व निरूपाधिक असतात.

दासबोधांत द० ५ स. १० व द. ८ स. ९ हे दोन्ही समास पहावेत. त्यांत सिद्धलक्षणें पहावींत.

**सदा स्वरूपानुसंधान। हें मुख्य साधूचें लक्षण। जनीं असोन आपण। जनांवेगळा ॥ ९ ॥ येथें कारण अंतरस्थिती। अंतरींच पाहिजे निवृत्ती। अंतर लागलें भगवंतीं। तोचि साधु ॥ १७॥ आशा धरितां परमार्थाची। दुराशा तुटली स्वार्थाची। या कारणें नैराश्यता। साधूची। वोळखण ॥ ४६ ॥ स्वरूपीं लागतां बुद्धी। तुटे अवचित्र उपाधी। याकारणें निरुपाधि। साधुजन ॥ ५० ॥** ( द० ८ स० ९ )

१६९

**नसे अंत आनंत संता पुसावा**
**अहंकारविस्तार हा नीरसावा।**
**गुणेंवीण निर्गूण तो आठवावा**
**देहेबुद्धिचा आठवो नाठवावा ॥**

ज्याला अंत नाहीं तो अनंत, शाश्वत, सदोदित. त्याचें स्वरूप संतांना पुसावें. देहबुद्धि व देहबुद्धीचा विस्तार

जो देहगेहादि प्रपंच त्याचा निरास करावा; निगुणांसे गुणातीत होऊन आठवावें, देहबुद्धीची आठवणही पुसून टाकावी.

**धरितां साधूची संगती। आपषाच लागे स्वरूपस्थिती। स्वरूप स्थितीनें बाणतीं। लक्षणें अंगीं॥ ५५॥** ( दास० ८-९ )

१७०

**देहेबुद्धि हे ज्ञानबोधें त्यजावी**
**विवेकें तये वस्तुची भेटि घ्यावी।**
**तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें**
**ह्मणोनि सदा तेंचि शोधीत जावें॥**

ज्ञानबोधानें देहबुद्धीचा त्याग करावा. ह्म० ज्ञानशस्त्रानें, असंगशस्त्रानें, देहभान उडवावें; आणि विवेकपूर्वक आत्मवस्तूची भेट घ्यावी. (आत्मवस्तु ही आपलें जुनें ठेवणें आहे, आपलें तें निजरूप आहे, मग त्याच्या भेटीसाठीं एवढें सायास कां? तर) वृत्ति स्वभावें तदाकार नाहीं म्ह० मनाची ओढ ( पूर्वजन्मसंस्कारानुरूप ) बाह्य विषयांकडे आहे, मन स्वरूपाकडे पाठमोरें असून स्वभावतः बाहेर धांवते ( व इंद्रियें त्यास बाहेर खेंचीत असतात ) म्हणून मन अंतर्मुख

करून निजवस्तूची भेट घ्यावी. ( ज्ञाने० १८–१३९७ ):–

**मी एक वांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय॥**

१७१

**असे सार साचार तें चोरलेंसें**
**इहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे ।**
**निराभास निर्गूण तें आकळेना**
**अहंतागुणें कल्पितांही कळेना ॥**

सत्य व शाश्वत ब्रह्म गुप्त असल्यामुळें चर्मचक्षूला चोरलें आहे, डोळ्यांना दृश्य ह्म० नामरूप तेवढेंच दिसतें. ब्रह्म हें निर्गुण असून मनाला भासत नाहीं व डोळ्यांना दिसत नाहीं म्हणून तें आकळणें कठिण आहे, त्यांत पुन्हां देहाहंकाराचा पडदा आड येत असल्यामुळें शुद्ध अद्वैतकल्पनाही करणें दुष्कर होतें.

१७२

**स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या**
**स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।**

## मुळीं कल्पना दोरुपें तेचि जाली
## विवेकें तरी स्वस्वरूपीं मिळाली ॥

विषयांच्या ठिकाणीं स्फुरण पावणारी कल्पना ती अविद्या व ब्रह्माच्या ठिकाणीं स्फुरण पावणारी कल्पना ती सुविद्या, सद्विद्या. ( पहिली अशुद्ध व दुसरी शुद्ध. पहिली कल्पना जन्ममरणप्रवाहांत पाडते, दुसरी त्या प्रवाहाचें निवारण करून तारते ). कल्पना मूळची एकच, तिचीं हीं दोन रूपें आहेत. मन विषयचिंतनांतून काढावें व विवेकानें ब्रह्मचिंतनांत रमवावें.

दासबोधांतील द. ७ स. ५ समग्र वाचावा. संकल्पविकल्प हे मनाचे धर्म आहेत. ' सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प' ह्या दोन्ही कल्पना मनच करितें.

स्वरूपीं मनाचें उन्मन होतें, मन मनपणानेंच उरत नाहीं ह्मणून तेथें दोन्ही कल्पना नाहींत. दोन्ही कल्पना मनाच्या अर्थात् मायेंतल्या, मिथ्या. त्यांत शुद्ध कल्पनेनें अशुद्ध कल्पना ह्म. ब्रह्मकल्पनेनें विषयकल्पना उडवावी ह्म० शेवटीं ब्रह्मकल्पना कल्पायचें सोडून देऊन निर्विकल्पीं वुडी मारते. " जयास ( ज्या मनास ) द्वैत ( अविद्या व सुविद्या) भासलें । तें मन उन्मन जालें । द्वैताअद्वैताचें तुटलें ।

अनुसंधान ॥ एवं द्वैत आणि अद्वैत। होय वृत्तीचा संकेत। वृत्ति जालिया निवृत्त। द्वैत कैचें? ॥ वृत्तिरहित जें ज्ञान। तेंचि पूर्ण समाधान......" इ०

१७३

**स्वरूपीं उदेला अहंकारराहो**
**तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहों।**
**दिशा पाहतां ते निशा वाढताहे**
**विवेकें विचारें विवंचूनि पाहें ॥**

स्वरूपावर उगवलेला हा अहंकार, राहूनें आकाश आच्छादून टाकावें त्याप्रमाणें, स्वरूपाला झांकून टाकतो (अहंवृत्ती उद्भवली कीं आत्मरूपाची विस्मृति पडते) व त्यामुळें चारी दिशांकडे पहायला जावें तों देहबुद्धीचा अंधार सर्वत्र पसरलेला दिसतो. मना! विवेकानें पहा तर खरें हें कसें होतें तें!

मूळ आधीं स्वरूपीं माया होते कशी! ज्ञानोबा सांगतात कीं उदकावर शेवाळ येऊन उदकाला झांकतें, किंवा आकाश निरभ्र असतांना त्यावर ढग येऊन आकाश लोपतें किंवा डोळ्यांतूनच पाणी गळून त्याचें डोळ्यांवर पडळ उभारतें. 'तैसी हे माझीच बिंबली। त्रिगुणात्मक साउली।

कीं मजचि आड ओढवली । जवनिका जैसी ॥ म्हणऊनि भूतें मातें नेणती । माझींच परी मी नव्हती । जैसीं जळींचीं जळीं न विरती । मुक्ताफळें ॥ ६४ ॥ '(ज्ञाने.अ.७)

ब्रह्म आणि माया म्हणजे काय, सृष्टि सत्य कीं मिथ्या, माया मिथ्या मग दिसते कां, ब्रह्म सत्य व निरंतर मग उपासना कशाला पाहिजे, ब्रह्मीं माया झाली कशी या प्रश्नांचीं उत्तरें दासबोधाच्या ७ व्या दशकांत गुरुशिष्य-संवादरूपानें दिलीं आहेत. तीं नीट पहावींत. ' अरे जें झालेंचि नाहीं ' ह्म० माया झालीच नाहीं हा आहे सिद्धांत, पण हा ज्यांना पटत नाहीं त्यांच्यासाठीं सृष्टीच्या उभा-रणीसंहारणीची कहाणी दासबोधांत श्रुतिशास्त्रानुसारच परोपरीनें सांगून सिद्धांतच सिद्ध केला आहे.

स्वरूप शाश्वत, सर्वगत व एकटें आहे तर जीवाच्या ठिकाणीं अहंकार उठतो कसा यावर उत्तर आधीं दृश्यभास मिथ्या, त्यांतला जीव हाही मिथ्या, व दिसतें व भासतें हेंही मिथ्या. ' दृश्यभास अविद्यात्मक । तुझाही देहो तदा-त्मक । म्हणोनि हा अविवेक । तेथें संचरला ॥ ३८ ॥ दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें । तरी तें लिंग-देह जालें । अविद्यात्मक ॥ ३९ ॥ अविद्येनें अविद्या देखिली ह्मणोनि गोष्टी विश्वासली । तुझी काया अवघी संचली ।

अविद्येची ॥ ४० ॥ तोचि काया मी आपण। हें देहबुद्धीचें लक्षण। येणेंकरितां जालें प्रमाण। दृश्य आवघें ॥ ४१ ॥ ( द० ७ स० ८ ). दृश्य सृष्टि अविद्यात्मक व तुझा देहही अविद्यात्मक, म्हणून तेथें हा अविवेक संचरला आहे. दृष्टि दृश्य पाहते व मन भासाचें चिंतन करितें म्हणून वासनात्मक लिंगदेहच अविद्येचा झाला आहे. लिंगदेहापासून स्थूलदेह झाला ( वासनेमुळें जन्म येतो ) याप्रमाणें तुझी स्थूलसूक्ष्म कायाच अविद्यात्मक असल्यामुळें व ती कायाच मी असा भ्रम झाल्यामुळें ही देहबुद्धी म्ह० हा अहंकार उभा राहिला आहे. स्वरूपसाक्षात्काराला अहंभाव आड कसा येतो व तो उडवून आपली स्वरूपस्थिती कशी मिळवायची हा विचार करावा.

१७४

**जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना**
**भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना।**
**क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो**
**दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो॥**

तें शाश्वत ब्रह्म चर्मचक्षूला कांहीं केल्या दिसत नाहीं व एकदा कां ब्रह्मसाक्षात्कार झाला कीं तो जन्ममरणरूप

भवाला खाऊन टाकतो ह्म० मायाजाळ उरत नाहीं. मग त्या भवाचें रक्षण करूं ह्मटल्यास तें कोणालाही करितां येत नाहीं ( स्वरूपानुभवानें दृश्याचा केर एकदा उडून गेला कीं पुन्हां म्हणून दृश्यभास होत नाहीं ), पुन्हां संसाराचें नांव उरत नाहीं. तो अक्षय्य निरंजन परमात्मा आपल्या भक्तांना अक्षय मोक्ष ह्म० सायुज्यमुक्ति देतो. या भक्तवत्सलते-मुळेंच तो दयाळु परमात्मा वेळोवेळीं भक्तकैवारानें अवतार घेऊन येत असतो, निर्गुण परमात्माच सगुण साकार होतो.

येथें निर्गुण व सगुण यांची शेवटीं एकरूपता दाखविली आहे. निर्गुण परमात्माच मायेचा आश्रय करून भक्तकार्यार्थ सगुण रूप घेतो.

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥**

( गीता. ४–६ )

**अमूर्तचि मी किरीटी । परि प्रकृति जैं अधिष्ठीं । तैं साकारपणें नटनटी । कार्यालागीं ॥ ४८ ॥ ह्मणोनि अजत्व परते ठेवीं । मी अव्यक्तपणही नाठवीं । जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्म हा ॥ ५० ॥ ते वेळीं आपुलियांचेनि कैवारें । मी**

**साकार होऊनि अवतरे । मग अज्ञानाचें अंधारें। गिळोनि घाली ॥ ५१ ॥** ( ज्ञाने० अ. ४ )

सगुणाच्या उपासनेंत नवविधाभक्तींपैकीं मुख्य नामस्मरणभक्ति सांगितली व निर्गुणबोधाच्या आड मुख्यतः देहबुद्धि येते ती दूर सारावी व सत्संगानें निरहंकार व्हावें हें सांगितलें. आतां राघवाचें शुद्धस्वरूप सगुणनिर्गुणातीत कसें आहे हें सांगतात.

# ५ सगुणनिर्गुणातीत शुद्ध स्वरूप

## ( १७५–२०५ )

### ( १ ) थोरला देव–केवल ब्रह्म.

### ( १७५–१७९ )

विधी निर्मितां लीहितो सर्व भाळीं
परि लीहितो कोण त्याचे कपाळीं ।
हरू जाळितो लोक संहारकाळीं
परी सेवटीं शंकरा कोण जाळी ॥
जगीं द्वादशादित्य हे रुद्र अक्रा
असंख्यात संख्या करी कोण शक्रा ।
जगीं देव धुंडाळितां आदळेना
जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥
तुटेना फुटेना कदा देवराणा
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ।

कळेना कळेना कदा लोचनासी
वसेना दिसेना जनीं मीपणासी ॥
जया मानला देव तो पूजिताहे
परी देव शोधूनि कोणी न पाहे ।
जगीं पाहतां देव कोट्यानकोटी
जया मानिली भक्ति जे तेचि मोठी ॥
तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले
तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरलासे
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥

ब्रह्मदेव ( विधी ) प्राण्यांना जन्मास घालतांना त्यांच्या कपाळावर ( जन्ममरणादिक ) लिहितो, पण ब्रह्मदेवाच्या कपाळावर ( त्याचे जन्ममृत्यु इ० ) लिहिणारा त्याहून वरिष्ठ कोणी नाहीं काय ? विश्वसंहारकर्ता रूद्र कोणाच्या सत्तेनें संहार पावतो ? ( १७५ ). विश्वांत १२ आदित्य व ११ रुद्र आहेत. इंद्र तर असंख्य होत असतात. त्यांची गणती कोणें करावी ? ह्या सर्व देवांचा नियामक मुख्यदेव

कोण आहे ? तो शोधतां शोधतां आढळत नाहीं, व ता कळल्यावांचून तर जन्ममरणरूप संसार सुटून सायुज्यता मिळत नाहीं ( १७६ ). तो देव काळाचाही नियंता असल्यामुळें काळाचीही सत्ता ( जी अखिलसृष्टीवर व वरील ांवरही चालते ) चालत नाहीं. तो फुटत नाहीं, तुटत नाहीं, ढळत नाहीं, त्याला कसलीच स्पृहा नाहीं व ह्मणून तो दैन्यवाणा नाहीं. तो डोळ्यांना दिसत नाहीं व अहं-ाराचा लवलेश आहे तोंवर कळत नाहीं ( १७७ ). याची ज्या देवावर श्रद्धा बसते तो त्याची पूजा करितो. ण मुख्यदेवाचा, देवादिदेवाचा, शोध घेणारे कोणी दिसत नाहींत. जगांत कोट्यवधि देव व ( त्यांचे भजक आहेत ). ज्याची जेथें भक्ति तोच त्याला मोठा वाटतो, ण मोठ्यांचा मोठा देव कोण आहे ? ( १७८ ). हरिहर-ब्रह्मदेवांनाही ज्यानें निर्माण केलें त्या देवरायाचा कोणीच विचार करीत नाहीं. तो थोरला देव साऱ्यांना चोरलेला आहे, त्यांना तो आढळत नाहीं, ते त्याचा शोधच घेत नाहींत; आणि त्यांनीं स्वबुद्धीनें शोध घेतला तरी सद्गुरु-कृपेवांचून त्याची भेट व्हायचीच नाहीं ( १७९ ).

**अभंग.**

**ब्रह्मा विष्णु रुद्र जयाचे अवतार। तोचि देव [redacted]**

थोर जाण बापा ॥ १ ॥ जाण बापा देव देवांसी निर्मिता । तो येक तत्वता ठाईं पाडी ॥ २ ॥ ठाईं पाडी देव साधूचे संगती । दास ह्मणे गती पावशील ॥ ३ ॥

हीच गोष्ट दासबोधांत ठिकठिकाणीं सांगितली आहे.

जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें । परी हें पाहिजे निवडिलें । प्रचीतीनें ॥ २३ ॥ ब्रह्मयानें सकळ निर्मिलें । ब्रह्मयास कोणें निर्माण केलें । विष्णुनें विश्व पाळिलें । विष्णूस पाळिता कवणु ॥ २४ ॥ रुद्र विश्वसंहारकर्ता । परी कोण रुद्रास संहारिता । कोण काळाचा नियंता कळला पाहिजे ॥ २५ ॥ याचा कळेना विचार । तो अवघा अंधकार । ह्मणोनियां सारासार । विचार करणें ॥ २६ ॥ (द० ९ स० ५ ॥

विष्णु सत्वगुण, ब्रह्मा रजोगुण व रुद्र तमोगुण. हे तीन गुण ज्या गुणमायेच्या पोटीं झाले ती गुणमाया तीनही देवांना वडील आहे. गुणमायेच्या मागें जाऊं. मुख्य देव ह्म० निर्गुण निश्चळ निर्मळ ब्रह्म. ब्रह्माच्या ठिकाणीं मी बहु व्हावें अशी जी मूळ स्फूर्ति झाली ती मूळमाया, ईश्वर तो. सर्व कर्तृत्वाचा उगम तो. निर्गुण ब्रह्माकडे कांहींच

कर्तृत्व नाहीं. मूळमायेकडे सारें कर्तृत्व. समर्थांनीं 'ब्रह्म निर्गुण निराकार। माया सगुण साकार,' 'माया पांचभूतिक अनेक। ब्रह्म तें शाश्वत एक,' ब्रह्म असताचि असे। माया निरासितांच निरसे' 'ब्रह्म सार माया असार,' 'माया असत् व सान्त। ब्रह्म संत व अनंत' इ. प्रकारें मायाब्रह्माचें विवरण (द० ६ स० ५) केलें आहे. नुस्तें ब्रह्मनिरूपण द ७ स. २ व स. ४ मध्यें आहे, व मधल्या ३ ऱ्या समासांत १४ ब्रह्मांची (लोक भ्रमानें ज्याला ब्रह्म ह्मणतात त्यांची) उभारणी व संहारणी पुरी केली आहे. ब्रह्म आणि माया या द्वैतकल्पनेचें निरसन ५ व्यांत केलें आहे. द० ८ स. १ मध्यें 'देवदर्शन' आहे तें पहावें.

**जेणें केलें चराचर। केले सृष्ट्यादि व्यापार। सर्वकर्ता निरंतर। नाम ज्याचें ॥ १७ ॥ चारी खाणी चारी वाणी। चौऱ्यासि लक्ष जीवयोनी। जेणें निर्मिले लोक तिनी। तया नांव देव ॥२०॥ ब्रह्मा विष्णु आणि हर। हे जयाचे अवतार। तोचि देव हा निर्धार। निश्चयेसी ॥ २१ ॥**

पण हा सृष्टिकर्ता देव 'निर्गुण ब्रह्म' नव्हे हें विसरूं नये. ब्रह्माकडे कर्तृत्व नाहीं. **हा देव ह्म० मूळमाया उर्फ ईश्वर.** सृष्टीचें कर्तृत्व मूळमायेकडे आहे, हरिहर

ब्रह्मा हे कर्ते नव्हत, हे कार्यांत आले. हरिहर ब्रह्मा कडे कर्तृत्व नाहीं ( कांकीं सृष्टि त्यांच्या पूर्वींची आहे ) म देव्हाऱ्यांतील देवांकडे कर्तृत्व नाहीं हें सांगणें नकोच 'मातीचे, सोन्याचें, तांब्याचे इ, देवांकडे' कर्तृत्व नाहींच नाहीं ( द० १९ स. ५ ) हे सारे उपासनेचे भेद आहेत 'आपापले आवडीचा वेध । लागला जनीं' इतकेंच. मुख्य देव तो मूळमाया, सष्टिरचना तेथून झाली, उपासनेचें मूळ तें. आतां ही मूळमाया काय आहे तें पूर्वीं गणेशशारदा स्वरूप वर्णितांना सांगितलेंच आहे. पुनरुक्ति नको. तें विव रण पुन्हां येथें वाचून पहावें. मूळमाया किंवा मूळपुरुष हाच देव. हा सर्वांचें उपास्य. हा सर्व सृष्टीचा नाथ.

**त्या मूळपुरुषाची वोळखण । मूळमायाच आपण । सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें १**

परमात्मा, परमेश्वर, सर्वकर्ता, ईश्वर, इ० 'अनंतनामें धरी । अनंत शक्ति निर्माण करी । तोचि जाणावा चतुरीं । मूळपुरुष' ॥ १३ ॥ देवाच्या स्तुतिस्तोत्रांतून जेवढीं म्हणून नामें येतात तीं सारीं ह्या मूळमायेचीं. पिंडाच्या उपाधीनें ज्याला जीव ह्मणतात, ब्रह्मांडाच्या उपाधीनें ज्याला शिव ह्मणतात, मूळमायेच्यामुळें त्यालाच देव ह्मण तात. ( द० ८–३–१८ ). पुढें:—

ह्मीं मूळ माया जाली।तिच्या पोटा माया आली।
मग ते गुणा प्रसवली। ह्मणोनि गुणक्षोभिणी
।२॥ पुढें तिजपासाव कोण। सत्व रज तमो-
गण। तमोगुणापासून निर्माण जालीं पंच
ूतें ॥ ३ ॥ (द० ८ स० ४)

तीन गुण व पंच महाभूतें मिळून अष्टधाप्रकृति. ही
ाष्टधा मूळमायेंत बीजरूपानें आहेच. मूळमाया–गुणमाया–
ागुण-हरिहरब्रह्मा–तमोगुणापासून पंचभूतें–गुणभूतांपासून
ेवें, व पिंडब्रह्मांडरचना व चार खाणी चारखाणींचे असंख्य
ोवजंतु अशी ही सृष्टीची वंशवेल आहे! ( वर ३ च्या
ोवींत 'कोण' शब्द आहे त्याचा अर्थ 'निर्माण झाले'
असा आहे. ) ह्या विषयाचें आणखी स्पष्टीकरण द. ९
, ६ मध्यें आहे. ब्रह्माचीच स्फूर्ति मूळमाया, तेव्हां
'देवपद' दोघांसही लावतात. पण कर्तृत्व मूळमायेचें
ह्मणून मूळमायेस 'देव' व निर्गुणब्रह्मास 'देवादिदेव'
ह्मणतात. असो. ह्या अध्यात्माचें सविस्तर विवरण पुढें
स्वतंत्रपणें व सविस्तर '**श्रीसमर्थचरित्र**' ह्या ग्रंथांत
ागर निराळ्या ग्रंथांत होणार असल्यामुळें येथें अधिक
विस्तार नको. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वाणीनें (ज्ञाने० अ०
११ ) ह्या मुख्य देवाला स्मरून पुढें जाऊं:—

जाणितलें मियां साचें । महिमान आतां देवाचें । देवो होय चराचराचें । जन्मस्थान ॥ ५६१ ॥ हरिहरादि समस्ता । देवा तूं परमदेवता । देवांतेंही पढविता । आदिगुरु तूं ॥ ५६२ ॥ गंभीर तूं श्रीरामा । नानाभूतैकसमा । सकळ गुणीं अप्रतिमा । अद्वितीया ॥ ५६३ ॥ ह्मणोनि त्रिभुवनीं तूं एक । तुजसारिखा ना अधिक । तुझा महिमा अलौकिक । नेणिजे वानूं ॥ ५६६ ॥

## २ भोंदु गुरु नकोत, खरा सद्गुरु पाहिजे.

## ( १८०–१८३ )

गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।
मनीं कामना चेटकें धातमाता
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥
नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू
नव्हे निंदकू मत्सरु भक्तिमंदू ।

नव्हे उन्मतू व्यसनी संगबाधू
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधु ॥
नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।
मुखें बोलिल्यासारखें चालताहे
मना सद्गुरु तोचि शोधूनि पाहें ॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ।
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे
तयाचेन योगें समाधान बाणे ॥

( गुरु अंजनेंवीण ब्रह्म आकळत नाहीं असें पूर्वीं सांगितलें पण गुरु ता सद्गुरु पाहिजे. आपणांस ' गुरु ' ह्मणवून शिष्यशाखा वाढवून गुरुपणाच्या धंद्यावर पोट भरणारे दांभिक कोट्यवधि आहेत- त्यांच्या नादीं लागूं नको स ) गुरु कोट्यवधि, मंत्रही कोट्यवधि आहेत. कित्येक जण वेगवेगळीं सामर्थ्यें दाखवून जगाला भुलविणारे आहेत. पण त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या क्षुद्रवासना वुजबुजत

असतात. नानाप्रकारचीं ते चेटकीं करितात, धातम
सांगण्यांत ते तरबेज असतात. ( धात ह्म. कल्पित गोष्ट
मात ह्म. घडलेली गोष्ट )–असले गुरु काय कामाचे
मुक्तिदाता सद्गुरु तो वेगळाच आहे ( १८० ). चेट
फसवे, द्रव्य उकळणारे, परनिंदा करणारे, परांचा म
करणारे, भक्तीच्या नांवानें पूज्य, उन्मत्त ह्म० अहंकार
फुगलेले, व्यसनांत मग्न असणारे, ज्यांची संगत के
असतां उपायाच्या ऐवजीं अपायच व्हावयाचा–असले लो
गुरुपणाला नालायक आहेत. जो खरा ज्ञानी आहे
आचरणानें साधु आहे तोच खरा सद्गुरुपदाचा अधिका
आहे ( १८१ ). ज्याच्या बोलण्यांत चावटपणा फा
पोटांत कामाची जळजळ, कर्मज्ञानउपासनाशून्य अस
बोलण्यांत मात्र पटाईत, असला गुरु कामाचा नाहीं.
मुखानें ब्रह्मज्ञान सांगतो व त्याला अनुरूप असें ज्या
आचरण असतें असाच सद्गुरु, हे मना ! तूं धुंडून क
(१८२). भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न, विवेकी, दयाळु, मनस
ह्म. मन स्वाधीन ठेवणारा, उदार, क्षमाशील, अखं
ध्यानरत, समर्थ, दक्ष, व्युत्पन्न, चतुर इ. गुणांनीं संप
असलेला सत्पुरुषच सद्गुरुपदाचा अधिकारी आहे. त्याच्या
समागमानें शांतिसुख लाभेल. ( १८३ ).

दासबोध द. ५ स. १ मध्यें 'सद्गुरुवीण मोक्ष पावावा, हें कल्पांतीं न घडे ' (४४ ) हें स्थापित केल्यावर समर्थांनीं स. २ मध्यें गुरुलक्षणें सांगितलीं आहेत तीं पहावींत. लौकिक गुरु १७ प्रकारचे सांगून सद्गुरूचें लक्षण वेगळेंच केलें आहे, ' जो ब्रह्मज्ञान उपदेशी । अज्ञान अंधार निरसी जीवात्मया परमात्मयासी । ऐक्यता करी ' तोच सद्गुरु होय. भवांतून वासनाजाळांतून, जन्ममरणांतून सोडवील तो सद्गुरु. ' जीव येकदेसी बापुडें । तयासि ब्रह्मचि करी रोकडें' तो सद्गुरु.

**अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।**
**तेथें बहु भक्तजन । विश्रांति पावती ॥ ५० ॥**

मंत्रही बहुत प्रकारचे आहेत. ( द. ५ स. ३ ) व विद्याही बहुत प्रकारच्या आहेत ( द. ५ स. ४ ) पण तें ज्ञान नव्हे. ज्ञान कोणतें ?—(द० ५ स० ६ )

**ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान ह्मणिजे आत्मज्ञान ।**
**पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥ १ ॥**
**मुख्यदेवास जाणावें । सत्यस्वरूप वोळखावें ।**
**नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ २ ॥**

मुख्य देवास जाणावें म्हणजे काय ? ' जाणिजे परमा-

त्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान ' ( द० ६-१-१०).
( पंचमान ३ ):—

**शाक्त मुक्त अनाचारी । मंत्र यंत्र करामती ।**
**नाटकी चेटकी भोंदू । तो गुरु न मने मना ॥**

परमात्मा एक अद्वय आहे हे मग गुरु कशाला ?

**एक शिष्य एक गुरु । हा रुढला साच व्यवहारु ।**
**तो मत्प्राप्तिप्रकारु । जाणावया ॥ १२२६ ॥**

( ज्ञाने० १८ )

' श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठं ' ' आचार्यवान् पुरुषो वेद ' इ० प्रकारें श्रुतीनें व ' तद्विद्धि प्रणिपातेन ' याप्रमाणें स्मृतीनेंही श्रीगुरूला शरण गेलें पाहिजे अशी आज्ञा केली आहे. ' शाब्दे परेच निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ' याप्रकारें भागवतशास्त्रही सांगतें. रामकृष्णांनींही गुरुसेवा केल्याचें प्रसिद्ध आहे. श्रीज्ञानेश्वरनाथांसारखे निःसीम गुरुभक्त एकमुखानें गुरुभक्तीचा महिमा वर्णन करितात. असो. करुणाष्टकें:—

**जगीं धुंडितां धुंडितां आढळेना । कदा सद्गुरु-**
**वीण ठाई पडेना । सदासर्वदा तोचि धुंडीत**
**जावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥ ५ ॥**

## ३ संग सोडून मुख्यदेवाला भजावें

### ( १८४–२०१ )

### १८४

नव्हे तेचि जालें नसे तेचि आलें
कळों लागलें सज्जनाचेनि बोलें ।
अनिर्वाच्य तें वाच्य वाचे वदावें
मना संत आनंत शोधीत जावें ॥

शुद्ध स्वरूपाच्या ठिकाणीं जग नव्हतेंच पण तें झालें ( असें जन मानतात ). ज्याला कांहीं नामरूप नाहीं तें नामरूपादि विकारवंत होऊन जगदृष्टीला दिसूं लागलें, पण वस्तुतः नामरूप हा भासमात्र असून कांहीं झालें व आलें ही नाहीं. ब्रह्म एकाकी एकमय आहे. असें तें ब्रह्म अनिर्वाच्य आहे. वाणीनें त्याचें वर्णन करून सांगता येत नाहीं. वाणीनें बोललें पाहिजे कां कीं बोलल्यानें त्याचें समाधान बिघडतें असें थोडेंच आहे ? मना ! श्रुतिसंत हें त्याचें रूप बोलले आहेत म्हणून त्यांच्या नजरेनें पाहून आपला ठाव शोधून काढ.

१८५

**लपावें अतीआदरें रामरूपीं**
**भयातीत निश्चिंत ये स्वस्वरूपीं ।**
**कदा तो जनीं पाहतांही दिसेना**
**सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ॥**

भय आणि चिंता यांचा जेथें संपर्क नाहीं अशा स्वस्वरूपाच्या ह्मणजेच रामरूपाच्या ठिकाणीं अत्यादरपूर्वक लपावें, गुप्त होऊन बसावें; असें गुप्त व्हावें कीं तेथून कोणालाच आपण सांपडूं नये ! (आपल्याला निर्भय व निश्चिंत स्थान मिळालें व तेथें जनसंमर्दाचा तापही नाहीं.) जनांला दिसूंही नये असें लपण्यासारखें स्थान तेंच एक आहे. रामरूपी रामरूप होऊन गेलों, वेगळेपणानें उरलोंच नाहीं, ह्मणजे मग लोकांना निजरूपानें दिसणार कोठून ?

आकाशाहूनही सूक्ष्म असें परमात्मस्वरूप. त्याशीं अभेद-भक्तीनें समरस होऊन जाणें, निराळेपणानें न उरणें, ह्मणजेंच ‘ रामरूपीं लपणें ’ होय.

**विवेकबळें गुप्त झाला । आपेआप मावळला ।**
**दिसतो परी देखिला । नाहींच कोणी ॥**

( दास० ५-९-२५ )

जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला ।
जो अनन्यपणें उरला । नाहींच काहीं ॥
( दा.९-३-१७ )

तो जीताचि असतां मेला । मरणास मारूनि जियाला । जन्ममृत्यु न स्मरे त्याला । विवेकबळें ॥३०॥ तो जनीं दिसतो–परी वेगळा । वर्ततां-भासे निराळा । दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ ३१ ॥ द० ७–१०

तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थ लाभाचा ईश्वर । ॥ १८ ॥ दिसेना जें गुप्त धन । तयास करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन– । संगतीं शोधावा ॥ १९ ॥ ( दा० द० ६–९ )

समर्थांच्या कवितेंत ' रामरूपी लपणें ' यालाच अनेक-वार ' गुप्तपंथ ' ह्मटलें आहे. गुप्तपंथांत ' भक्तिरंग ते तरंग अंतरंग ऊठती ' (करुणा० १५५–५)

गुप्त होय त्या न होय जन्ममृत्युयातना
ज्ञानगुप्त तो अलिप्त वेगळाचि या जना ।
अंतरींचि वोसरे सरोन ही उपासना
भक्तराज मुक्तकाज काय कर्म कामना ॥

१८६

सदा सर्वदा राम सन्नीध आहे
मना सज्जना सत्य शोधून पाहे ।
अखंडीत भेटी रघूराजयोगु
मना सांडि रे मीपणाचा वियोगु ॥

सज्जना मना ! सदा सर्वकाळ राम तुझ्याजवळच आहे. तूं नीट शोधून पहा. आपण रामापासून वेगळे आहोंत असें तुला आपलें उगीच वाटतें झालें. तो देहबुद्धीचा खेळ आहे, बाकी खरें ह्मणशील तर रामाची तुझी अखंड भेटी आहे, तुटी नाहींच. निरंतर योग आहे- शोधून तर पहा !

आह्मां तुह्मां मुळीं जाली नाहीं तुटी । तुटीवीण भेटी इच्छितसां । इच्छितसां योग नसतां वियोग । तुह्मां आह्मां योग सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ तुह्मी आह्मी एकेस्थळीं । वायां मृगजळीं बुडों नये ॥ ३ ॥ लावूं नये भेद मायिक संबंधी । रामदासीं बोधीं भेटि जाली ॥ ६७ ॥

देवाचा योग तो योगी । वियोगी योगिया नव्हे । विभक्तीनें नव्हे भक्ती । जाणती भक्त जाणते ॥

१८७

भुतें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे
परी सर्वही स्वस्वरूपीं न साहे।
मना भासलें सर्व कांहीं पहावें
परी संग सोडूनि सूखीं रहावें ॥

पिंड व ब्रह्मांड दोनी पंचभूतात्मक आहेत व ह्मणून पिंड, ब्रह्मांड व भूतें यांच्यांत ऐक्य आहे, पण या तिहीं-चाही संबंध स्वस्वरूपाशीं नाहीं, स्वरूप सर्वांहून वेगळें आहे! डोळ्यांना व मनाला भासते तें पहावें पण दृश्य व भास याहून स्वरूप अगदीं निराळें आहे म्हणून दृश्यभा-सांचा संग सोडून स्वरूपानुभव घ्यावा.

ब्रह्मांडपिंडिचीं तत्वें। बहुरूपें विकारलीं।
पिंडब्रह्मांडही नाहीं। तें ब्रह्म जाणती भले ॥
ऊर्ध्वमूलमधःशाख। पत्रें पुष्पें बहुविधा।
फल मूळ तरु नाहीं। तें ब्रह्म जाणती भलें ॥
सारासार विचारावें। पिंडब्रह्मांडनिरसनीं।
संगातीत महायोगी। निःशब्द याचिकारणें ॥
कर्पूर जाळितो वन्ही। दोघां होते बराबरी।

जाणावें काय बोलावें। आत्मनिवेदनापुढें ॥

( चतुर्थमान )

पिंड ब्रह्मांड हे तत्वें। जीव शिव ऐलीकडे।
त्याहुनी पर तें ब्रह्म। सदोदितचि संचलें ॥

( स्फु० प्र० ११ ).

( १८८ )

देहेभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें
विदेहीपणें भक्तिमार्गेंचि जावें।
विरक्तीबळें निंद्य सर्वै त्यजावें
परी संग सोडूनि सूखें रहावें ॥

ज्ञानशस्त्रानें ह्म. असंगशस्त्रानें ( असंगोह्ययं पुरुषः– तो पुरुष मी आहे, देह मी नव्हे या अशा विचारानें ) देहभान उठवावें, अशा तऱ्हेनें देहातीत ब्रह्म ओळखून त्याशीं अनन्य व्हावें. भक्तिपंथ तो हाच. ( देहातीत जें ब्रह्म तें मी याप्रमाणें त्याशीं अनन्य होणें हीच भक्ति ). वैराग्यबळानें निंद्य तेवढें सर्व सोडून द्यावें पण तें मी सोडलें एवढाही संग ठेवूं नये म्हणजेच समाधान मिळेल.

**निःसंग शोधितां आत्मा। स्वयें निःसंग होइजे**

—स्फुट प्र. ४७

१८९

महीं निर्मिली देव तो वोळखावा
जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ।
तया निर्गुणालागि गूणी पहावें
परी संग सोडूनि सूखें रहावें ॥

ज्या देवानें सृष्टि निर्माण केली त्या देवास ओळखावें, ह्मणजे ओळखीबरोबर जीवपण मावळून मुक्ति मिळेल. तोच निर्गुण देव सगुण होतो हेंही पहावें, व पण सगुण निर्गुण या उभयकल्पनाविरहित आपण निर्विकल्प आहोंत असा असंगपणा धरून शमसुख भोगावें.

१९०

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता
परेहून पर्ता न लिंपे विवर्ता ।
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें
परी संग सोडूनि सूखें रहावें ॥

निर्गुण देव कार्यकर्ता ( ब्रह्मदेव ) नव्हे, सृष्टिकर्ता ( विष्णु ) नव्हे तो हरिहरब्रह्माहून थोर आहे. तो परावाणीच्या पलीकडचा आहे, परात्पर आहे. विवर्त ह्म०

मायाभ्रम त्याला स्पर्शूं शकत नाहीं, असा तो निर्विकल्प देव कल्पीत जावा पण निर्विकल्पास कल्पणारा मी हा संग ( अहंकार ) सोडून समाधान पावावें.

**'निर्विकल्पासी कल्पावें । परी कल्पिते आपण न व्हावें "** या रीतीनें निर्विकल्पास कल्पावें. **"आपलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें। मग सुकाळीं पडावें। अनुभवाचे ॥४८॥ निर्विकल्पास कल्पावें। कल्पना मोडावें स्वभावें। मग नसोनि असावें। कल्पकोटी ॥ ४९॥ कल्पनेचें येक बरें। जे मोहरितांच मोहरे। स्वरूपीं घालितां भरे। निर्विकल्पीं ॥५०॥ निर्विकल्पासी कल्पितां। कल्पनेची नुरे वार्ता। निःसंगास भेटों जातां। निःसंग होइजे ॥ ५१ ॥ पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे। मा तें हातीं धरून द्यावें। असो हें अनुभवावें। सद्गुरुमुखें ॥ ५२ ॥**

( दास० ७-३ )

१९१

**देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना**
**तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना ।**

**परब्रह्म ते मीपणें आकळेना**
**मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥**

देहबुद्धि ज्याची ढळत नाहीं त्याला कल्पांतींही ब्रह्मज्ञान आकळायचें नाही. परब्रह्म मीपणानें प्राप्त होत नाहीं, व मीपण आहे तोंवर शून्य म्हणजे अज्ञान नाहींसें होत नाहीं.

१९२

**मना नाकळे नाढळे रूप ज्याचें**
**दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें ।**
**तया खूण ते हीण दृष्टांत पाहे**
**तेथें संग निःसंग दोनी न साहे ॥**

परब्रह्माचें रूप मनाला गोचर नाहीं. तें अढळ ह्म० अचळ, सर्वत्र संचलेलें, आहे. त्या सर्वोत्तमाचें रूप कोणासारखें आहे ह्मणावें? त्याच्यासारखें दुसरें कोणी असतें तर दृष्टांतानें सांगितलें असतें; पण तें 'एकमेवाद्वितीय' आहे ह्मणून कोणताही दृष्टांत पुरा पडत नाहीं. अशा त्या परमात्म्याचें ठिकाणीं संग व निःसंग ह्या दोन्ही कल्पना चालत नाहींत.

दृष्टांताला सूर्य, परिस, गंगा, सागर, गगन इ० घेऊन

पाहिलें ( द० १ स. ४ पहा ) पण हे सारे दृष्टांत दृश्यांतले असून अदृश्य, अपार, अखंड, अद्वय अशा वस्तूची खूण पटविण्यासाठीं कोणताच दृष्टांत पुरा पडत नाहीं.

संग ही कल्पना व निःसंग हीही कल्पनाच. निःसंग ही कल्पना संगसाक्षेप आहे. निर्विकल्पाच्या ठिकाणीं दोन्ही कल्पना चालत नाहींत.

१९३

**नव्हे जाणता नेणता देवराणा**
**न ये वर्णितां वेदशास्त्रा पुराणा ।**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा**
**श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥**

जाणता ह्मणवत नाहीं, नेणता ह्मणवत नाहीं असा हा देवराणा ( सर्व देवांचा आदि, नाथ, देवदेव ) आहे. वेदशास्त्रपुराणांनीं त्याचें वर्णन करितांना हात टेकले आहेत. दिसतो ह्मणावा तर दृश्यतेला येत नाहीं; अदृश्य ह्मणावा तर त्याच्याइतका उघडा तोच आहे; दृश्य नाहीं, अदृश्य नाहीं, दृश्यादृश्याचा साक्षी–तोही पण नव्हे. ( कारण साक्षित्व ही मनाची वृत्ति आहे व तो वृत्त्यतीत आहे ). वेदांना त्याचा अंतपार लागला नाहीं.

"अन्यदेव तद्विदितात् अथो अविदितादधि।"–केनोपनिषत्. विदित म्हणावा तर दृश्य विदित आहे व तो दृश्यातीत आहे, बरें अविदित म्हणावा तर जाणण्याची अपेक्षा होते, तेथें अपेक्षाही नाहीं.

" न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनो न विद्मो न विजानीमो यथैतदनुशिष्यात् "

" तस्य भासा सर्वमिदं विभाति "

**जाणणें हें घडेना कीं। नेणणें दूरि राहिलें।**
**जाणण्या नेणण्यातीत। तें ब्रह्म जाणती भले॥**
**॥ २–१२ ॥ (चतुर्थ मान)**

**दृश्य ना भास ना साक्षी। ज्ञानाज्ञान असेचिना।**
**वृत्ती निवृत्तीही नाहीं। शब्द मौन घडेचिना।**
**(स्फु० प्र० ६३)**

१९४–१९८

**वसे हृदईं देव तो कोण कैसा**
**पुसे आदरें साधकू प्रश्न ऐसा।**
**देहे टाकितां देव कोठें रहातो**
**परी मागुता ठाव कोठें पहातो॥**

वसे हृदई देव तो जाण ऐसा
नभाचेपरी व्यापकू जाण तैसा ।
सदा संचला येत ना जात कांहीं
तयावीण कोठें रिता ठाव नाहीं ॥
नभीं वावरे जो अणूरेणु कांहीं
रिता ठाव या राघवेवीण नाहीं ।
तया पाहतां पाहतां तेंचि जालें
तेथें लक्ष आलक्ष सर्वे बुडालें ॥
नभासारिखें रूप या राघवाचें
मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ।
तया पाहतां देहबुद्धी उरेना
सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ॥
नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे
रघूनायका उपमा ते न साहे ।
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें
तया व्यापकू व्यर्थ कैसें म्हणावें ॥

साधक आदरानें प्रश्न करितो कीं 'हृदयांत राहणारा तो देव कोण आहे व कसा आहे ? देह टाकल्यावर तो देव कोठें राहतो व पुन्हा जन्म कोठें कसा घेतो ?' ( १९४. ) याला सिद्ध उत्तर करितो. " देव आकाशासारखा सर्वव्यापी आहे, सर्वत्र संचला आहे, त्याला येणें नाहीं व जाणेंही नाहीं, त्यांवाचून अणुभरही रिता ठाव नाही. आकाशांत जो अत्यंत सूक्ष्माहून सूक्ष्म अणुरेणु वावरत असतो त्यांतही तो आहे. या माझ्या रामावांचून रिता ठाव कोठेंचा नाहीं. रामाला पाहतां पाहणारा रामरूपच होऊन जातो त्या रामरूपी लक्ष्यालक्ष्य (दृश्यादृश्य) सारें एकमय होऊन जातें ( १९४–१९६ ). गगनासारखें व्यापक असें हें रामाचें रूप चिंतितां जन्ममरणाचें बीजच खंडून जातें, देहभावना पार नाहींशी होते व तेंच सुंदर रूप निरंतर पाहतां पाहतां पाहण्याची असोशी पुरत नाहीं (१९७). आकाशानें सर्व ब्रह्मांड व्यापलें आहे असें वर म्हटलें खरें, पण आकाशाचा दृष्टांत माझ्या रामाला पुरत नाहीं. आकाश व्यापक आहे पण त्याला त्यावांचून दुसरें व्याप्य आहे. राम हा एकीएक असल्यामुळें त्याला याला दुसरें कांहींच नाहीं. व्याप्यव्यापककल्पनारहित अशा रामाला व्यापक ह्मणणें अनुचित आहे " ( १९८ ).

साधकाच्या प्रश्नाला सिद्धानें सिद्धदशेच्या अनुभवानें ह्म० अध्यात्माच्या दृष्टीनें उत्तर दिलें आहे. देव ह्म० जीव नव्हे, शिव नव्हे, तर निर्गुण ब्रह्म. देव कोण आणि कैसा व देह टाकितां देव कुठें राहतो व मग पुन्हां कुठें ठाव पाहतो हे प्रश्न जीवाच्या दृष्टीनें पाहिले असते तर यांचें उत्तर वासनारूप जीव पुन्हां जन्म घेऊन येतो, इ० मिळालें असतें. पण सिद्धाचें उत्तर सिद्धवस्तूच्या दृष्टीवरूनच मिळालें आहे. तें योग्य आहे. निर्गुण ब्रह्म आकाशासारखें व्यापक आहे, सर्वत्र कोंदाटलें आहे, हें ह्मटल्यावर त्याचें येणें जाणें, राहणें ठावठिकाणा इ० सर्वच प्रश्न उडाले. त्याच्यावांचून 'रिता ठाव' नाहीं मग त्याचा विशेष ठाव काय सांगावा? तें 'सर्वत्र संचलें' आहे असें ह्मटल्यावर त्याच्या 'येण्या-जाण्याचा' प्रश्नच उरत नाहीं. ब्रह्माला व्यापक आकाशाची उपमा दिली पण लगेंच तीही उडविली आहे. आकाश हें भूत आहे व ब्रह्म पंचभूतातीत आहे, आकाशाची व्यापकता पृथ्वी, आप, तेज व वायु या चार तत्त्वांच्या मानानें फार मोठी आहे पण तें ब्रह्माची बरोबरी कसें करणार? आकाश हें व्यापक व इतर तत्वें व्याप्य असा व्याप्यव्यापकपणाचा भेद उरतो; पण निर्गुण ब्रह्म 'दुजेवीण' एकाकी एक-जिनसी असल्यामुळें त्याला व्यापक ह्मणणें ह्मणजे त्याची

योग्यता कमी करण्यासारखें, त्याचीं निंदा करण्यासारखें, आहे! समर्थासारखें ज्ञानोबारायही विचारतात कीं 'तैसें साचचि जें एक। तेथ कें व्याप्यव्यापक ?'!(ज्ञाने० १३-८८७).

**ब्रह्म आकाशासारखें व्यापक आहेः—**

**ब्रह्म नभाहून निर्मळ। पाहतां तैसेंचि पोकळ।**
**अरूप आणि विशाळ। मर्यादेवेगळें ॥ १ ॥**
**अनंत ब्रह्मांडांखालतें। अनंत ब्रह्मांडांवरुतें।**
**तेणेंवीण स्थळ रितें। अणुमात्र नाहीं ॥ ३ ॥**
**'खं ब्रह्म' ऐसी श्रुति। 'गगनसदृशं' हे स्मृती।**
**ह्मणोन ब्रह्मास दृष्टांती। आकाश घडे ॥ २२ ॥**

( द० ७-४ )

**ब्रह्म आणि आकाश यांच्यांत भेद** कोणता तो द. ८ स. ५ मध्यें विशद करून दाखविला आहे. पांचही भूतांत आकाश थोर, व्यापक, अरूप, अमर्याद, तरीपण तें कांहीं ब्रह्म नव्हे. त्यांत भूतपपणाचे गुण नसते तर आकाशालाच ब्रह्म म्हटलें असतें. काम, क्रोध, शोक, मोह भय, अज्ञान, शून्यत्व हे आकाशाचे गुण आहेत. अर्थात् आकाश 'भूत' आहे. मग तें भूत आणि अनंत एक कैसें होतील? 'आकाश तमापासून जालें। म्हणोनी काम, क्रोधें वेष्टिलें। अज्ञान शून्यत्व बोलिलें। नाम तयाचें (५५)

आकाश स्तब्धपणें शून्य—ह्म० अज्ञान, ह्म० कठिण, अर्थात् नाशवंत. आकाशाच्या ठिकाणीं अज्ञान, शून्यत्व, आहे आणि ब्रह्म संत शाश्वत आहे हा दोहोंत मुख्य भेद आहे; तात्पर्य ' भूत आणि अनंत एक नव्हेती '. शिवाय ' आकाश वेगळेपणानें ' पाहतां येतें, स्वरूप वेगळेपणानें अनुभवतां येत नाहीं. ' आकाश वेगळेपणें पहावें । स्वरूपीं स्वरूपाचि व्हावें । वस्तूचें पाहणें स्वभावें । ऐसें असे' (६६)

**रामरूपदर्शन** घेतलें तरी पुरेसें होत नाहीं. रामदर्शनीं भव आटतो, देहबुद्धि सरते व तृप्ती होत नाहीं. रामाचे जेवढे ह्मणून भक्त त्या सर्वांचा अनुभव हाच आहे. दर्शनसुख अवीट आहे. अपार आनंद देणारें आहे.

### अभंग

**जेथें तेथें देव नाहीं रिता ठाव । ऐसा माझा भाव अंतरीचा ॥ १ ॥ एकसरा लाभ झाला अकस्मात । ब्रह्म सदोदित सर्वां ठाईं ॥ २ ॥ कळों आलें वर्म आत्मनिवेदनें । ज्ञानें समाधान रामदासीं ॥ ३ ॥**

**राघवाचें रूप जाणावें अरूप । सिद्ध स्वरूप निराकार ॥ १ ॥ निराकार राम देखतां विश्राम । दुरी ठाके श्रम संसारीचा ॥**

श्लोक

नव्हे लक्ष आलक्ष ना पक्ष दोनी। नव्हे खूण निर्गूण ना गूण तीनी। नव्हे बद्ध ना मुक्तता ना विकारी। ह्मणा रे ह्मणा राम लीळावतारी॥७॥ नव्हे व्याप्य ना व्यापकु ज्ञेय ज्ञाता। नव्हे दृश्य अदृश्य ना ध्येय ध्याता। नव्हे निर्विकारी नव्हे वेशधारी। ह्मणा रे ह्मणा राम लीलावतारी॥८॥

( करुणा० ५८ )

१९९

अतीजीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे
तेथें तर्कसंपर्क तोही न साहे।
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें
दुजेवीण जें खूण स्वामिप्रतापें॥

ब्रह्मस्वरूप अत्यंत पुरातन व विशाळ आहे, तेथें तर्कांचा संपर्कही होत नाहीं ह्म० तें अतर्क्य आहे. तें जरी अत्यंत गूढ आहे तरी सद्‌गुरुप्रसादानें तें तात्काळ सुगम होतें, प्राप्त होतें. त्याची खूण काय सांगावी? एवढीच सांगतां येते कीं तें एकच आहे, दुजें काहीं नाहीं.

**जीर्णः**—'सनातनस्त्वं पुरुषो मतो मे' 'यो मामज-मनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्' 'कविं पुराणमनुशासितारम्' 'त्वमादिदेवः पुरुषः पुराणः' (गीता).

२००

**कळे आकळे रूप तें ज्ञान होतां**
**तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था ।**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे**
**तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ॥**

श्रीसद्‌गुरुकृपेनें तें ज्ञान झालें म्हणजे रामरूप प्रत्ययास येतें, पण तें प्रत्ययास आलें असें म्हणणारा साक्षी वेगळा न राहतां (त्रिपुटीरहित) असा त्याचा अनुभव होतो (साक्षित्वाची तूर्यावस्था आटून जाते), ह्म० मन उन्मन होतें व वाणी कुंठित होते. एक रामच सर्वत्र भरून राहतो, रामच रामाला पाहतात (दृश्य दृष्टा दर्शन ही त्रिपुटी जाऊन सर्वत्र राममय होतें.

**मग ह्मणे 'सर्वत्र सच्चिदानंदु । मीचि एक स्वतः सिध्दु ।' जो आपणेनसी भेदु । नेणोनि जाणे ॥ ५६२ ॥ तेणेंचि सर्व जाणितलें । हेंही ह्मणणें**

थेकुलें । जें तया सर्व उरलें । द्वैत नाहीं ॥५६३॥ माझिया भजना । उचित तोचि अर्जुना । गगन जैसें आलिंगना । गगनाचिया ॥ ५६४ ॥ साडे पंधरेसी मिसळावें । तैं साडेपंधरेंची होआवें । तेविं मी जालियां संभवे । भक्ति माझी ॥५६६॥ ( ज्ञाने० १५ ) मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां । माझा प्रसाद जाण तेव्हां । संपूर्ण जाला ॥ १२६८ ॥ ( ज्ञाने० १८ )

२०१

कदा वोळखीमाजि दूजें दिसेना ।
मनीं मानसीं द्वैत कांहीं वसेना ।
बहूतां दिसा आपुली भेटि जाली ।
विदेहीपणें सर्व काया निवाली ॥

उन्मन्यावस्थेंत अर्थात् दुजेपण उरत नाहीं आणि रामावांचून दुसरी कोणतीच प्रतीति येत नाहीं. प्रतीति घेणारा (ज्ञाता) ज्ञेयांत समरस होऊन जातो. रामा ! तुह्मां आह्मांत मूळची कांहींच वेगळीक नसतां ( देहबुद्धीमुळें उत्पन्न झालेलें द्वैत ( मीपण ) निःशेष निरसून गेल्यामुळें ) किती तरी जन्मांनीं आपली भेट झाली आहे. (पुन्हां

आपल्या माहेरीं आल्यामुळें ) सर्वत्र आनंदानुभव येऊन जन्माचें सार्थक झालें !

**तैसें माझ्या साक्षात्कारीं। सरे अहंकाराची वारी। अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ॥ ६९४ ॥ मग मी तो हें आवघें। एक मीचि आथी स्वभावें । किंबहुना सामावें। समरसें तो ॥ ६९५ ॥ ( ज्ञाने० अ० ११ ) ऐसा द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एक निभ्रांत। हें जाणोनि जाणणें जेथ। अनुभवीं रिघे ॥१२०५॥ (ज्ञाने १८)**

---

# उपसंहार.

## (१) साध्य होऊन साधन करावें.

( २०२–२०४ )

मना गूज रे तूज हें प्राप्त जालें
परी अंतरीं पाहिजे यत्न केले ।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी
धरी सज्जनसंगती धन्य होसी ॥

मना सर्वही संग सोडूनि द्यावा
अतीआदरें सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगें महादुःख भंगे
जगीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥

मना संग हा सर्वसंगास तोडी
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ।
मना संग हा साधकां सीघ्र सोडी
मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥

मना ! परमगुह्य अशा आत्मज्ञानाचा ठेवा जरी हस्तगत झाला तरी तो जतन करून टेवण्यासाठी ह्म० रामरूपता अखंड पाहण्यासाठीं अंतरीं यत्न हे केलेच पाहिजेत. मुख्य यत्न साधनांतलें परमसाधन सत्संगांत घडणारें श्रवण-त्यानें आत्मनिश्चय होतो ( २०२ ). मना ! देहगेहादिकांचा अंतर्बाह्य संग सोडून देऊन अत्यादरपूर्वक सत्संग करावा. सत्संगानें संसाराचें महःदुःख दूर होतें व इतर साधनांचे सायास करावे न लागतां सन्मार्ग ह्म० सद्वस्तुप्राप्तीचा राघवाचा पंथ सांपडतो ( २०३ ). मना ! सत्संग हा सर्व संसारसंगापासून सोडवितो, तात्काळ मोक्ष देतो, साधकांला दुस्तर भवसागरांतून वांचवितो व द्वैतबुद्धीचा समूळ उच्छेद करितो ( २०४ ).

गुह्य ब्रह्मज्ञानाचा ठेवा प्राप्त झाल्यावर मग 'अंतरीं यत्न केले' पाहिजेत असें वर ह्मटलें आहे तें कां ? साध्य झाल्यावर मग साधन कोणतें व कशाला करायचें ? अशी शंका उठल्यास तिच्या निरसनार्थ दास० ७ द. स. ७ पहावा. 'साध्याचि होऊनि तत्वता । साधन करावें'

**साधनेंवीण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता ।**
**आळस प्रबळे तत्वता । ब्रह्मज्ञानमिसें ॥ ६४ ॥**

मी सिद्ध झालों आतां मला साधन कशाला ? असा

विचार मनांत आला कीं देहबुद्धि उठलीच. ती उठूंच नये, यासाठीं श्रवणमनननिदिध्यासाचें किंवा नवविधा-भक्तीचें साधन केलेंच पाहिजे. ‘ मी सिद्ध ’ एवढें शब्दज्ञान झाल्यानें कोणी सिद्ध होत नाहीं. अहंकारसर्प डोकें वर काढायला नेहमीं तयार असतो, मोठमोठ्यांना त्यानें पालथें पाडलें आहे, त्याचें तोंड ठेंचायला नित्य विवेकाची जागृति पाहिजे. ‘ याकारणें मूळ प्रेत्ना । श्रवण आधीं ’

**जेथें नाहीं श्रवण मनन । तेथें कैचें समाधान । मुक्तपणाचें बंधन । जडलें पाईं ॥ ४२ ॥ सेवि-लेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन । तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ४७ ॥**

( द० ७–८ )

कोणत्या ग्रंथांचे कसे श्रवण करावें हें द. ७ स. ९ मध्यें सांगितलें आहे. निश्चयात्मक आत्मज्ञान देणारे अद्वैतग्रंथच पहावेत, इतर ग्रंथ केवळ करमणूक होत.

**हेंचि साधकांसी निरवणें । अद्वैत प्रांजळनिरू-पणें । तुमचेंही समाधान बाणे । साधूचऐसें ॥ ३४ ॥ जो संतास शरण गेला । तो संतचि होऊनि ठेला । इतर जनांस उपेगा आला ।**

**कृपाळूपणें ॥ ३५ ॥ गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें । क्रियाशुद्धनिर्धारें । पाविजे पद ॥ ३७ ॥** ( द. ७ स. १० )

तात्पर्य 'परमार्थाचें जन्मस्थान । तेंचि सद्गुरूचें भजन' तें पळभरही चुकों नको. 'स्वयें मीच आहें ब्रह्म। ऐसा अहंतेचा भ्रम' (द. ९-२-१९) विद्वानांना होत असतो ह्मणून साधन सोडतांच येत नाहीं. 'स्वस्वरूपानुसंधानें तरे प्राणिमात्र' हें सत्य, पण साधन सोडतां नये.

गीतेंतही ब्रह्मज्ञान सांगितल्यावर 'सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे' (अ. १८-५०) येथून पुढील श्लोकांत साधनच सांगितलें आहे. या श्लोकांवरील ज्ञानोबारायांचें भाष्य पाहिलें ह्मणजे 'गुज' प्राप्त झाल्यावर 'अंतरीं यत्न' केले पाहिजेत असेंच ठरतें.

**परी हेचि आत्मसिद्धि । जो कोणी भाग्यनिधि । सद्गुरुकृपालब्धि-। काळीं पावे ॥ ९८४ ॥**

एखाद्या भाग्यवंताला गुरुमुखानें महावाक्यबोध होऊन आत्मसिद्धी झाली व तो वस्तुरूप होऊन ठेला:—

**परी वोषध घेतखेवों । कायी लाभे आपुला थांवो ? । कीं उदैजतांचि दिवो । मध्यान्ह होय ? ॥ ९९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वोलटे । बीजहि पेरिलें**

**गोमटें। तरी अलोट फळ भेटे। परि वेळे कीं गा! ॥ ९९९ ॥ जोडला मार्ग प्रांजळु। मिनला सुसंगाचाही मेळु। तरी पाविजे वांचुनि वेळु। लागेचि कीं? ॥ १००० ॥**

तथापि औषध पोटांत जातांक्षणींच आपलें ठिकाण (थांवा)ह्म० आरोग्याची पूर्वस्थिति काय एकदम मिळते? किंवा सूर्याचा उदय झाल्याबरोबर काय मध्यान्ह होतो? अथवा उत्तम शेत व तेंही ओल्याजमीनींचें मिळून त्यांत बींही उत्तम पेरलें गेलें ह्मणून काय शेत पिकानें लगेंच भरभरून येतें? कां त्याला कांहीं वेळ लागतो? सरळ रस्ता लागला व सत्संगहीं मिळाला तरी मुक्कामावर पोंचायला कांहीं वेळ लागलच कीं नाहीं? त्याप्रमाणेंच वैराग्य लाभ झाला, सद्गुरुही भेटला, जीवीं विवेकाच्या अंकुर फुटला, एका ब्रह्मावांचून सर्व भ्रांति आहे अशी गाढ प्रतीतिही आली, तरीः—

**ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंदकणुहि विरे। कांहींचि नुरोनि उरे। जें कांहीं गा ॥ १००५ ॥ तये ब्रह्मीं एकपणें। ब्रह्मचि होऊनि असणें। तें क्रमेंकरूनि तेणें। पाविजे गा ॥ १००६ ॥**

शेताचाच दृष्टांत दासबोधांतही (द. ५स. ३) समर्थांनीं गुरुशिष्यलक्षणें सांगतांना घेतला आहे. भूमि उत्तम पण बीज

किडखाद किंवा बीज उत्तम पण जमीन खडकाळ असली तर दोन्ही निरुपयोगी होतात ह्मणून दोन्ही उत्तम पाहिजेत. तसा सच्छिष्य व सद्गुरु दोन्ही योग्य पाहिजेत, दोहोंचा मेळ पाहिजे. भूमि व बीज उत्तम असून पाऊसही ठीक झाला पाहिजे, त्याप्रमाणें गुरुशिष्यांची उत्तम जोडी मिळाली तरी अध्यात्मनिरुपणाची वृष्टि झाली पाहिजे. भूमि, बीज व वृष्टि या तिहींचा संगम होऊन पेरणी झाली तरी शेताचीं उत्तम निगा राखली पाहिजे, पीक आल्यावरही स्वस्थ बसून चालायचें नाहीं, पीक पदरांत पडेतों शेताची मशागत केलीच पाहिजे;–

**तैसें आत्मज्ञान जालें। परी साधन पाहिजे केलें।**
**येक वेळ उदंड जेविलें। तरी सामग्री पाहिजे११**

ह्मणून सच्छिष्य, सद्गुरु, सच्छास्त्रविचार व साधनाभ्यास ही चौकडी एकत्र मिळेल 'तरीच विमळज्ञान निवळेल,' नाहींतर पाखांड बोकाळेल ! ब्रह्मज्ञान किंवा वेदांत शब्दांनीं कळणें विशेष कठिण नाहीं पण तो पचवायला पाहिजे, ज्ञान जिरविलें पाहिजे व तें साधनाभ्यासाशिवाय कधींही जिरणार नाहीं. तें जिरवितां न आलें तर 'क्रिये-

वीण वाचाळता ' वाढते. कोरड्या ब्रह्मज्ञानाचा ह्म० शब्द-पांडित्याचा साधूंनीं निषेधच केला आहे.

चित्ताला उपरति, सप्रेम उपासना, स्वधर्माचार, शुद्ध आचरण हा तर परमार्थाचा आधार आहे. हा लाथाडला तर परमार्थाचा कणही पदरांत पडणार नाहीं. ज्याची त्यानें फार सावधानता ठेविली पाहिजे. साधनांची निंदा किंवा तिरस्कार करून कोणी सिद्ध होत नाहीं. मी ब्रह्म झालों असें ह्मटल्याबरोबर कोणी ब्रह्मनिष्ठ होत नाहीं. खऱ्या संतांच्या ठायीं साध्यसाधनें एकरूप झालेलीं असतात.

सत्संग हें सर्व साधनांवरिष्ठ ह्मणून येथें सांगितलें आहे. एका सत्संगांत श्रवणापासून तों सायुज्यमोक्षापर्यंत सर्व कांहीं प्राप्त होतें. संसार व संसारिक यांच्या संगापासून एक सत्संगच सोडवितो. ' ओव्या शतक' तिसरें पहाः—

**पावावया मुक्ती हरीचें भजन । श्रवणमनन सर्वकाळ ॥२२॥ सर्वकाळ होय सार्थक श्रवणें। ब्रह्मनिरूपणें संतसंगें ॥ २३ ॥ संतसंगें ब्रह्मपद वोळखावें । विवेकें पावावें निरंजना ॥ २४ ॥**

तात्पर्यः—' **संग त्यागूनि येक। सत्संग धरी** '

( दास० ५-९-५६ )

संगत्यागेवीण कांहीं। परब्रह्म होणार नाहीं।
संगत्याग करूनि पाहीं। मौन्यगर्भा ॥

( दास० १३-२-१७ )

## ( २ ) फलश्रुती ( २०५ ).

**मनाचीं शतें ऐकतां दोष जाती**
**मतीमंद ते साधना योग्य होती।**
**चढे ज्ञानवैराग्यसामर्थ्य अंगीं**
**ह्मणे दास विश्वासतां मुक्ति भोगी॥**

हीं मनाची शतें, मनोबोधाचे हे दोनशें पांच श्लोक, मननपूर्वक सश्रद्ध ऐकले असतां जडमूढ जीव सकल-दोषांपासून मुक्त होऊन साधनाधिकारी होतील, ते ज्ञान-वैराग्यसामर्थ्यसंपन्न होतील ( त्यांचे अंगचे अज्ञान, विषयासक्ति व दुर्बळता इ० दोष जातील ) व ते मुक्तिसुख भोगतील अशी या ग्रंथाची फलश्रुति आहे.

मनोबोधाची योग्यता या श्लोकांत समर्थांनीं स्वमुखानेंच वर्णिली आहे. त्यासंबंधानें मुमुक्षूंनीं अधिक काय बोलावें? श्लोकांचें अखंड श्रवणमनन करून अनुभव पहावा. दासबोधाची जी फलश्रुती तीच मनोबोधाची:—

श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरा ॥
मार्ग सांपडे सुगम । नलगे साधन दुर्गम ।
सायुज्यमुक्तीचें वर्म । ठाईं पडे ॥
बद्धचि होति मुमुक्षु । मूर्ख होती अतिदक्ष ।
अभक्ताचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ॥
ऐसी याची फलश्रुति । श्रवणें चुके अधोगती ।
मनास होय विश्रांति । समाधान ॥

॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

# पांगारकरांचीं पुस्तकें.

१ **भक्तिमार्गप्रदीप** ( आवृत्ति बारावी ) किं. ८ आ.

२ **श्रीज्ञानेश्वर**–चरित्र आणि ग्रंथविवेचन ( आवृत्ति दुसरी ) किं. १ रु. ८ आ.

३ **श्रीएकनाथचरित्र**–( सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति ) किं. १२ आ.

४ **श्रीतुकारामचरित्र**–पृ. सं. ५२८ किं. रु. ३.

५ **कविवर्य मुक्तेश्वर**–चरित्र व काव्यविवेचन. किं. रु. १.

६ **संतचरित्रमाला**–ह्यांत, कांहीं प्राचीन व कांहीं अर्वाचीन अशा ४३ सत्पुरुषांचीं चरित्रें दिलीं आहेत. पृ. सं. २५६ किं. १ रु. ८ आ.

७ **श्रीतुकारामचरितामृत**–( अभंगवृत्तांत गायिलेलें ) किं. ५ आ.

८ **मारुतिउपासना**–( चौथी आवृत्ति ) किं. ४ आ.

९ **नारदभक्तिसूत्रें**–सार्थ, सटीक व सविवरण. किं. ८ आ.

१० **नवविधाभक्ति**–किं. ४ आ.

११ **निरंजनमाधवांची कविता**–( भाग १ ला ) किं. १ रु.

१२ **कविरामायण**–किंमत ४ आ.

१३ **आनंदलहरी**–( कवितासंग्रह ) ह्यांत पांगारकरांच्या कवितेपैकीं ४० स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. किं. १२ आ.

१४ **सार्थ हरिपाठ व चांगदेवपासष्टी**–(आवृत्ति तिसरी ) किं. ५ आ.

१५ **मोरोपंती वेंचे**–( आवृत्ति दुसरी ) किं. १ रु. १२ आ.

१६ **पारिजातकाचीं फुलें**–( आवृत्ति तिसरी ) किं. ८ आ.

१७ **मुमुक्षूंतील निवडक निबंध**–( भाग १।२ ) प्रत्येकीं रु. १ आ. ८

१८ **निबंधमालेचें स्वरूप आणि कार्य**–किं. १० आ.

१९ **भक्तिमणिमाला**–भागवतांतील निवडक ५०० श्लोक संदर्भ व विवरण यांसह दिले आहेत किं. रु. १॥८.

**२० सार्थ श्रीदासबोध**–पृ. सं. ७५० किं. रु. ४. व्ही. पी. नें ४ रु. १०' आ.

**२१ सार्थ मनोबोध**–मनाच्या श्लोकांचें संपूर्ण विवरण किं. १२ आ.

**२२ रामदासी वेंचे**–ह्यांत समर्थांच्या सर्व कवितेंतील निवडक वेंचे प्रपंच राजकारण व परमार्थ ह्या तीन भागांत दिले आहेत. पृ. सं. २५० वर किं. १ रु. ८ आ.

पत्ता:—व्यवस्थापक 'मुमुक्षु' पुणें.

REFBK-0002562

REFBK-0002562

ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. २५६२

